# सामान्य ज्ञान

( प्रथम वर्ष वर्गासाठी )

( 'सामान्य ज्ञान'–गुजरातीचें रूपांतर )

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी
महिला विद्यापीठ प्रकाशन–मुंबई.

वा. के. लेले, एम्. ए.,
सरस्वती महाल (नं २),
रानडे रोड, दादर, मुंबई-२८.

: मुद्रक :

के. एल्. एन्. राव,
मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१,
सरदार वल्लभभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई ४.

*

आवृत्ति पहिली

[ सर्व हक्क प्रकाशकाधीन ]

जून १९६०

किंमत ४ रु. ५० न. पैसे

*

: प्रकाशक :

**श्रीमती लक्ष्मी ठाकरसी**, बी. ए.,
रजिस्ट्रार,
श्री. ना. दा. ठाकरसी
महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी रोड,
क्वीन्स रोड, फोर्ट मुंबई १.

# प्रस्तावना

'**सामान्य ज्ञाना**'चें हें पुस्तक श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या नव्या अभ्यासक्रमाप्रमाणे 'प्रथम वर्ष वर्गा'साठी तयार करण्यांत आलेलें आहे. या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत '**सामान्य ज्ञान**' ह्या विषयास स्थान देण्यामागे असलेल्या विचारसरणीचें सविस्तर विवेचन विद्यापीठ–पूर्व वर्गाच्या सामान्य ज्ञानाच्या पाठ्यपुस्तकाच्या प्रस्तावनेंत करण्यांत आलेलें आहे, सबब त्याची येथे पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाही.

विद्यापीठ–पूर्व वर्गाच्या सामान्य ज्ञानाच्या पाठ्यपुस्तकांत कांही भौगोलिक शोधक आणि वैज्ञानिक संशोधक यांचा तसेंच त्यांच्या प्रमुख शोधांचा थोडक्यांत परिचय करून देण्यांत आला आहे. शिवाय, संस्कृति व भारतीय संस्कृति ह्यांच्या विषयींची माहितीहि संक्षेपानें देण्यांत आलेली आहे. प्रस्तुत पुस्तकांत जागतिक धर्म तसेंच जागतिक समस्या व आधुनिक विचारसरणी या विषयांचा थोडक्यांत परिचय करून देण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे.

**धर्म** ही व्यक्ति व समाज यांचें धारण करणारी शक्ति आहे. धर्म व्यक्ति–समाजांना स्थिर करतो, त्यांचें संरक्षण करतो आणि त्यांची प्रगति साधतो. आजकाल व्यक्तींत तसेंच समाजांत ज्या अनिष्ट प्रवृत्ति व्यापकपणें आढळून येत आहेत त्यांचें कारण, आपली दिवसेंदिवस घटत चाललेली धर्मभावना, हें आहे. धर्मामध्ये नैतिक व आध्यात्मिक दृष्टि सर्वप्रमुख असते, हें लक्षांत ठेवावयास हवें. ज्या समाजांत ही दृष्टि पायाभूत असेल तो समाज टिकून राहील. त्यामुळे प्रौढ जीवनाच्या सुरवातीच्या काळा-पासूनच नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचें जाणीवपूर्वक शिक्षण देणें प्रत्येक देशांत व प्रत्येक कालखंडांत अतिशय अगत्याचें आहे. शिवाय सध्या तर परिस्थितिवशात् हें शिक्षण अनिवार्य बनलें आहे. आज अवघें जग एक प्रकारच्या तणातणीच्या वातावरणांत वावरत आहे. वैज्ञानिक शोधांनी जगाच्या भौतिक क्षेत्रांत झपाट्यानें जी प्रगति साधली आहे ती खरोखरच आश्चर्यजनक आहे. आजकाल अणुशक्तीचा उपयोग केला जात आहे, त्यामुळे आजच्या युगाला '**अणुयुग**' हें बिरुद प्राप्त झालें आहे. याचा परिणाम जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना व्यापून राहिला आहे. विशेषेंकरून द्रुतगति वाहतुकीमुळे जगाचा संकोच झाला असून जगामधल्या वेगवेगळ्या समाजांतील संपर्क सतत वाढत आहे. अशा प्रकारें जरी भिन्नभिन्न समाज एकमेकांच्या जवळ येत असले तरी त्यांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक विचारसरणींच्या वेगळेपणामुळे त्यांच्यांत कित्येक संघर्षहि निर्माण होत आहेत. परिणामीं, समाजासमाजांतील मानसिक आणि आध्यात्मिक अंतर वाढत चाललें आहे. त्यामुळे विश्वव्यापी युद्धाचें भय दिवसानुदिवस वाढत

आहे. हें अणुयुगाचें युद्ध म्हणजे सर्वनाश ! यांतून वांचण्याचा एकच उपाय आहे आणि तो असाः—प्रत्येक समाजाच्या विशिष्ट संस्कृतीचा अभ्यास करून त्या त्या समाजाच्या अंतरंगाची व विचारसरणींची खरीखुरी ओळख करून घेणें. प्रत्येक संस्कृतीच्या मुळाशीं धर्मच मोठें व महत्त्वाचें कार्य करीत असतो, हें अगदीं खरें आहे. यावरून धर्माच्या अभ्यासाची खास आवश्यकता आहे, हें समजून येईल. हा अभ्यास मतांधतेने किंवा संकुचित सांप्रदायिक दृष्टिकोणांतून होतां कामा नये, तर तो खऱ्याखुऱ्या तुलनात्मक दृष्टिकोणांतूनच व्हावयास पाहिजे. अशा प्रकारच्या अभ्यासामुळे वेगवेगळया धर्मांमध्ये असलेलीं समान नैतिक व आध्यात्मिक तत्त्वें सुरक्षित राहातील. व त्यामुळे त्या त्या धर्मांवर श्रद्धा ठेवणाऱ्या व्यक्तींचें व समाजांचें मीलन समान भूमिकेवरून घडून येणें शक्य होईल. त्याचप्रमाणे विश्वबंधुत्वाचें आणि विश्वशांतीचें ध्येय समीप येईल. '**जागतिक धर्म**' हा पहिला विभाग या दृष्टिकोणांतून लिहिण्यांत आलेला आहे.

निरनिराळया लोकसमूहांना, समाजांना एक प्रकारें संघटित करणाऱ्या जुन्या विचारसरणी आज लोप पावत आहेत आणि त्यांची जागा नवनवीन विचारसरणी घेत आहेत. अशा नव्या विचारसरणींना होणाऱ्या अज्ञानजनित विरोधामुळे संघर्ष निर्माण होतो आणि अंधानुकरणामुळे सामाजिक जीवनांत अंदाधुंदी माजते. त्यामुळेच नवीन विचारधारांचा आस्थापूर्वक अभ्यास आवश्यक बनतो. अशा अभ्यासाने विविध विचारसरणींचा समन्वय साधणें आणि संघर्ष टाळून सह-अस्तित्वाची भावना बळकट करणें शक्य होईल. आजच्या अत्यंत तंग वातावरणांत 'यूनो' ही संस्था विश्वशांतीच्या प्रस्थापनेसाठी आशास्पद मानली पाहिजे. त्यामुळे सदरहू संघटनेस मजबूत बनविणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य ठरतें. या दृष्टीनेच यूनोची घटना, यूनोशीं संलग्न असलेल्या प्रमुख संस्था आणि त्या सर्वांची कार्यपद्धति या गोष्टी सर्वांच्या परिचयाच्या असणें जरूरीचें आहे. भारतीय प्रजेने दीडशें वर्षें पारतंत्र्य सोसल्यानंतर स्वातंत्र्य संपादिलें आहे. तथापि, आर्थिक प्रगतीशिवाय राजकीय स्वातंत्र्य अपुरें आहे. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने गरीब जनतेचें आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी भगीरथ प्रयत्न सुरू केले आहेत. पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी होऊन राहिली आहे. आणि खासगी क्षेत्रांतील साहसांवरहि, प्रजाहिताच्या दृष्टीने, निर्बंध लादण्यांत आलेले आहेत. हिंदुस्थानच्या राजकीय व आर्थिक विकासाचें ज्ञान प्रत्येक भारतीय नागरिकाला असणें अत्यावश्यक आहे. हे उद्देश डोळयांसमोर ठेवून '**जागतिक समस्या आणि आधुनिक विचारसरणी**' हा दुसरा विभाग लिहिण्यांत आलेला आहे.

मानवी जीवनांत आर्थिक विकासाला जितकें महत्त्व असतें तितकेंच, किंबहुना त्याहून अधिक महत्त्व, धार्मिक व आध्यात्मिक विकासाला असतें, ही गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी. उद्याचा भारत, आजच्या शाळांतून, महाविद्यालयांतून, विद्यापीठांतून शिक्षण घेणारा

युवकवर्ग जसा असेल, तसा बनणार आहे, हें निर्विवाद आहे. त्यामुळे प्रस्तुत पुस्तकांत वरील दोन वेगवेगळ्या विषयांची सांगड घालण्यांत आलेली आहे.

हा सामान्य ज्ञानाचा विषय आहे. ज्ञानाच्या एखाद्या विशिष्ट शाखेंत निष्णात माणसें तयार करणें हा या विषयाचा हेतु नाही. तथापि, अभ्यासकांच्या ज्ञानाच्या कक्षा वाढाव्या, त्यांची जिज्ञासा पालवावी, त्यांच्या चौकसबुद्धीला धुमारे फुटावेत व त्यांनी नवीन विचारांचें विवेकपूर्वक आकलन करण्यास शिकावें, हीं या पुस्तकामागील उद्दिष्टें आहेत. कारण ह्या गोष्टींनाहि कांहीं विशेष महत्त्व आहे. त्यासाठी वर्गांत व्याख्यानांच्या जोडीला परिसंवाद, भाषणें, निबंधलेखन इत्यादींचीहि अध्यापकांनी व्यवस्था करावी, अशी त्यांना खास शिफारस आहे.

'**जागतिक धर्म**' हा पहिला विभाग बडोदें कॉलेजचे संस्कृतचे सेवानिवृत्त प्राध्यापक आणि महाराजा सयाजीराव विश्वविद्यालयाच्या प्राच्य मंदिराचे भूतपूर्व संचालक तसेंच सांप्रत त्या विश्वविद्यालयाच्या वतीने प्रसिद्ध होत असलेल्या 'रामायणा'चे प्रमुख संपादक श्री. गोविन्दलाल हरगोविन्द भट्ट, एम्. ए. यांनी आपल्या स्वतःच्या 'विश्वांतील धर्म' या ग्रंथाचा संक्षेप करून, लिहून दिला आहे. '**जागतिक समस्या** आणि **आधुनिक विचारसरणी**' हा दुसरा विभाग भावनगरमधील महिला कॉलेजचे राज्यनीतिशास्त्राचे प्राध्यापक श्री. हसमुखराय जेठालाल बक्षी, एम्. ए., यांनी, सामळदास कॉलेजांतील अर्थशास्त्र व इतिहास या विषयांचे प्राध्यापक श्री. इन्दुलाल जेचंदभाई ध्रुव, एम्. ए. यांच्या सहकार्याने लिहिला आहे. आमच्या विनंतीस मान देऊन, विशेष परिश्रम घेऊन या लेखकांनी आमच्याशीं जें हें सहकार्य केलें आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचें अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

मूळ गुजराती पुस्तकाचा मराठी-अनुवाद मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला महाविद्यालयांतील अध्यापक श्री. वामन केशव लेले, एम्. ए., यांनी विशेष परिश्रमपूर्वक करून दिल्याबद्दल त्यांचेदेखील आम्ही आभार मानतों.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी<br>महिला विद्यापीठ, मुंबई<br>दिनांक, १५ जून, १९६०

प्रिं. **खी. चां. शाह**, एम्. ए.<br>प्रिं. **द. शां. फाटक**, एम्. ए.<br>संपादक.

# अनुक्रमणिका

## विभाग पहिला

# जागतिक धर्म

लेखक :—

**प्रा. गोविन्दलाल हरगोविन्द भट्ट**, एम. ए.,

बडोदें कॉलेजचे संस्कृतचे सेवानिवृत्त प्राध्यापक, महाराजा सयाजीराव विश्वविद्यालयाच्या प्राच्य मंदिराचे भूतपूर्व संचालक आणि विश्वविद्यालयातर्फे प्रसिद्ध होत असलेल्या 'रामायणा'चे प्रमुख संपादक.


| | | |
|---|---|---|
| प्रकरण पहिलें— | **धर्म आणि मानवसमाज—** | पृष्ठें १ ते ८ |
| प्रकरण दुसरें— | **जगांतील प्रचलित धर्म—** | पृष्ठें ९ ते ६० |
| प्रकरण तिसरें— | **जगांतील प्रचलित धर्मांची परस्परांशीं तुलना—** | पृष्ठें ६१ ते ६९ |
| प्रकरण चवथें— | **उपसंहार—** | पृष्ठें ७० ते ७६ |


## विभाग दुसरा

# जागतिक समस्या आणि आधुनिक विचारसरणी

लेखक :—

**प्रा. हसमुखराय जेठालाल बक्षी**, एम. ए.,

राज्यनीतिशास्त्राचे प्राध्यापक, महिला कॉलेज, भावनगर.


प्रकरण पांचवें—**इंग्रजांच्या आगमनानंतरचा हिंदुस्थानचा राजकीय व आर्थिक विकास** —पृष्ठें ७७ ते ११३

प्रकरण सहावें—**जागतिक समस्या—शांतता आणि सुरक्षितता**—पृष्ठें ११४ ते १४०

प्रकरण सातवें—**आधुनिक विचारसरणी** —पृष्ठें १४१ ते १७८

परिशिष्ट

# सामान्य ज्ञान

## विभाग पहिला

# जागतिक धर्म

## प्रकरण पहिलें

# धर्म आणि मानवसमाज

### धर्माची आवश्यकता

जगाची उत्पत्ति कधी झाली हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. कांही विचारवंत जगाला अनादि मानतात, तर उत्खननानंतर हातीं आलेल्या वस्तूंचा सूक्ष्म अभ्यास करून कांही विचारवंतांनी असें मत व्यक्त केलें आहे की, मनुष्यसमाज कमींत कमी दोन लाख वर्षांपूर्वी अस्तित्वांत आला असला पाहिजे. पुरातत्त्व ( Archaeology ) व मानववंश ( Anthropology ) या दोन शास्त्रांच्या आधारें आपणांस असें कळून येतें की, मनुष्यास कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपाच्या परमतत्त्वाची अपेक्षा असते. स्वतःच्या संस्कृतीप्रमाणे मनुष्य ह्या बाह्य तत्त्वाच्या स्वरूपाची कल्पना करतो, त्या तत्त्वाशीं आपल्या भावना, भाषा व क्रिया यांच्या द्वारे संपर्क साधतो आणि अशा प्रकारें मानसिक समाधान मिळवितो. ह्या संपर्काला किंवा संबंधालाच 'धर्म' असें म्हणतात. ह्या धर्मामुळेच मानवाला एक प्रकारचा आधार वाटतो व त्याचें सामर्थ्य व त्याचा उत्साह हीं वाढतात. जग सुखदुःखांनी भरलेलें असल्यामुळे संकटसमयीं मनुष्य धर्माच्या आधारानेच तग धरून राहतो.

अशा प्रकारें धर्म हें प्राणवायूसारखें मानवी जीवनाचें एक आवश्यक अंग आहे. जगांतील साऱ्या देशांत प्राचीन काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा धर्म रूढ आहे. माणसांच्या आवडीनिवडी वेगवेगळया असल्यामुळे स्वाभाविकपणेंच धर्माचीहि अनेकविध स्वरूपें अस्तित्वांत आलीं. अशा प्रकारें धर्म जरी अनेक असले, त्यांचीं बाह्य स्वरूपें व नांवें जरी भिन्नभिन्न असलीं तरीदेखील त्या सर्वांच्या बुडाशीं एकच सर्वसाधारण तत्त्व आहे. म्हणजेच धर्म अनेक असले तरी 'धर्म' एकच आहे. माणसें जरी जगाच्या पाठीवरील भिन्नभिन्न देशांत राहत असलीं तरी तीं एकमेकांना धर्माच्या सर्वसमान तत्त्वाने जोडलीं गेलेलीं आहेत. भेदांत अभेद पाहण्याचें साधन धर्मांत सामावलेलें

आहे. सगळ्या जगांत अद्वैत आहे ही भावना व तिच्यांतून उत्पन्न होणारी प्रेमभावना धर्मामुळेच निर्माण होऊं शकते.

## धर्माचें कार्य

मनुष्यास इतर कोणत्याहि साधनाने जें मिळूं शकत नाही तें धर्मामुळे मिळूं शकतें. धर्मामुळे जगांतील उत्तम व अलौकिक शक्तीशीं मनुष्याचा संबंध जोडला जातो आणि त्यामुळे जीवनाच्या धकाधकीच्या अखेरीस आपलें कल्याणच होणार आहे, असा विश्वास त्याचे ठिकाणीं उत्पन्न होतो. अर्थात्, त्याला असें वाटूं लागतें की, जीवनांतील सुखदुःखात्मक प्रसंगांचे अखेरीस चिरस्थायी, शाश्वत सुखाची प्राप्ति होणार आहे. असा आशावाद मनुष्याचे ठायीं निर्माण करणें हीच धर्माची फलश्रुति आहे. प्रत्येक धर्म धार्मिक मनुष्याचें विविध प्रकारें हित साधतो. परंतु, त्याखेरीज सर्वसामान्य-पणें सबंध समाजाचेंहि धर्मामुळे कल्याण होतें. उदाहरणार्थ, धर्मामुळे धर्मपरायण व्यक्तीचे ठायीं सामर्थ्य, आत्मश्रद्धा व समाधान यांची वाढ होते; धर्मामुळे ती व्यक्ति जीवनांतल्या हालअपेष्टा शांततेने सहन करते; तसेंच सुखांचा उपभोगहि अतिशय संयमाने, स्थितप्रज्ञ वृत्तीने घेते; धर्मामुळे पापाचा प्रश्नहि स्वाभाविक रीतीने सुटतो; धर्मामुळे ऐहिक जीवन उत्तम प्रकारचें बनतें आणि पारलौकिक जीवन चांगल्या प्रकारें जाईल अशी आशा धार्मि-काला वाटूं लागते. धर्मामुळे मानवसमाज आदर्श बनतो.

अशा प्रकारें धर्माचें खास कार्य तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, जगताच्या भावनामय व संस्कारात्मक वृत्ति यांच्या कार्यापेक्षा सर्वस्वीं वेगळ्याच स्वरूपाचें आहे. जगांत मनुष्य जिला किंवा ज्यांना दैवी शक्ति म्हणून समजत असतो, तिच्याशीं किंवा त्यांच्याशीं त्याचा दृढसंबंध येतो आणि त्यामुळे त्याचें अवघें जीवन आनंदमय होतें. हेंच धर्माचें खास प्रयोजन आहे.

## धर्माचें पृथक्करण

धर्माचें स्वरूप इतकें साधेंसुधें आहे की, मनांत आल्यास एखाद्या बुद्धिमान् मुलास किंवा एखाद्या मोठ्या माणसास धर्माची प्रचीति येऊं शकते. उलट, धर्म इतका व्यापक व गुंतागुंतीचा आहे की, त्याचा अर्थ बरोबर समजण्यासाठी व त्याचा पुरेपूर फायदा मिळवि-ण्यासाठी धर्माच्या पृथक्करणाची आवश्यकता आहे.

मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करतां असें जाणवतें की, धर्म हा कांही अंशीं बुद्धीचा विषय आहे, कांही अंशीं भावनेचा विषय आहे, तर कांही अंशीं इच्छाशक्तीचा विषय आहे. परंतु, धर्मामध्ये आत्मानुभवाव्यतिरिक्त इतर कांही अवांतर तत्त्वेंहि दिसून येतात. ज्या वस्तूवर श्रद्धा ठेवून तिची पूजा-अर्चा करण्यांत येते ती वस्तु नेहमींच धर्मामध्ये

आढळून येते. कोणत्याहि देवावर अथवा ईश्वरावर मनुष्याची जी श्रद्धा असते आणि त्या देवाविषयी अथवा ईश्वराविषयी मनुष्यास जो अनुभव येतो किंवा जी प्रचीति येते, त्या अनुभवास किंवा प्रचीतीस आपण 'धर्म' असें म्हणतों. धर्माचें हें सर्वसाधारण स्वरूप होय. जगांत जे भिन्नभिन्न धर्म आढळून येतात, त्यांचे ठिकाणीं धर्माचें वर सांगितलेलें सर्व-साधारण तत्त्व असतेंच. फरक मात्र इतकाच असतो की, वेगवेगळ्या धर्मांना मान्य असलेल्या देवतांचीं स्वरूपें भिन्नभिन्न असतात. परिणामीं, प्रत्येक धर्माच्या अनुयायांची आपापल्या देवतांविषयीची अनुभूति वेगवेगळी असते.

## देवतांचीं मुख्य वैशिष्ट्यें

जी वस्तु श्रेष्ठ प्रकारची धार्मिक भावना, पूजा आणि प्रचीति यांचा विषय बनते तीस 'देवता' असें म्हणतात. देवतांचीं किमान पांच वैशिष्ट्यें सांगण्यांत येतात. तीं अशीं :–

( १ ) देवतांचें स्वरूप व त्यांची शक्ति हीं अलौकिक असतात. अनेकदां कांही देवतांचें स्वरूप मनुष्याप्रमाणेहि आढळून येतें.

( २ ) देवता अतीन्द्रिय ( म्हणजे इन्द्रियातीत ) असल्यामुळे त्या दिसूं शकत नाहीत; तरीदेखील कित्येक बाबतींत त्यांचें स्वरूप भौतिक पदार्थांसारखें असल्याचें वर्णन करण्यांत येतें.

( ३ ) देवता नियामक, नियंत्रक असतात. साहजिकपणेंच जगांतील सृष्ट पदार्थ, मनुष्याचें कल्याण व त्याचा भावी काळ यांवर देवतांची सत्ता चालते.

( ४ ) जो मनुष्य धार्मिक भावनेने आपलें कर्तव्यकर्म पार पाडतो, त्यास त्याच्या प्रयत्नांचें योग्य फळ देवता देतात.

( ५ ) देवता पूजा-योग्य असल्यामुळे लोक त्यांची पूजा करतात. पूजेमुळे पूजकाचे मनांतील कित्येक भावना दिसून येतात. उदाहरणार्थ, देवतेबद्दलची भीति, देवतेबद्दलची आदरभावना, देवतेवरील विश्वास, शरणशीलता, सहकार्य आणि आत्मनिवेदन. ज्याप्रमाणे प्रत्येक पूजकाचे ठायीं भिन्नभिन्न भावना एकमेकींत मिसळून गेलेल्या आढळतात त्याप्रमाणेच प्रत्येक देवतेंतहि वेगवेगळीं तत्त्वें परस्परांत मिसळून गेलेलीं आढळतात. परंतु, ज्या मनुष्याची धर्मभावना बावनकशी असते, त्यास देवतेचा साक्षात्कार होतो आणि आपल्या इष्टदेवतेंत वर सांगितलेलीं पांचहि तत्त्वें आहेत, असें तो मानूं लागतो.

## देवताविषयक भावनेंतील विकल्प

प्रत्येक धर्मास कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या देवतेची आवश्यकता असतेच आणि त्याबरोबरच हेंहि खरें की, प्रत्येक देवतेंत वरील पांच वैशिष्ट्यें असलीं तरीदेखील एकाच देवतेविषयीच्या वेगवेगळ्या व्यक्तींच्या भावना वेगवेगळ्या दिसून येतात.

उदाहरणार्थ, ( १ ) **देवतांच्या संख्येविषयी मतभेद :** कांही धर्म अनेक-ईश्वरवादी आहेत, तर कांही एकेश्वरवादी आहेत. एकेश्वरवाद्यांचे धर्म एकच देवता मानतात.

( २ ) **देवतास्वरूपाविषयी मतभेद :** हिंदु धर्माच्या आणि चीन देशांतील ' टाओ ' धर्माच्या तत्त्वज्ञानांत असें मानण्यांत आलें आहे की, परमात्मा हा अलौकिक, सत्पदार्थ असून त्यास शरीर नाही. म्हणजेच परमात्मा हें भावात्मक तत्त्व आहे. उलट प्रचलित हिंदुधर्मांत, ' टाओ ' धर्मांत तसेंच जगांतल्या दुसऱ्या अनेक धर्मांत असें मानण्यांत येतें की, परमात्मा अनेक गुणधर्मांनी युक्त आहे.

( ३ ) **देवतांच्या सामर्थ्याविषयी मतभेद :** हिंदुधर्म एकच निर्गुण ब्रह्म मानतो. वैष्णव संप्रदाय भगवंतांना दिव्यगुणयुक्त व सर्वशक्तिमान् मानतो. मुसलमानांच्या इस्लामधर्मानुसार अल्लाह हा परमात्मा एकमेव असून तो सगुण व पूर्णपणें सर्वशक्तिमान् आहे. झरतुष्ट्र असें प्रतिपादितो की, एकाच सगुण ईश्वरांत अनेक शक्ति आहेत, परंतु जगाच्या विरोधी शक्ति त्याचा बाहेरून संकोच करतात.

( ४ ) **देवतांच्या नैतिक कर्तव्याविषयी मतभेद :** मुसलमानांचा धर्म असें मानतो की, परमात्मा स्वतःचीं कर्तव्यें ठरविण्याच्या बाबतींत पूर्णपणें स्वतंत्र असतो, म्हणजे कोणालाहि बांधलेला नसतो. उलट, कॉन्फ्युशिअस व ख्रिस्त यांच्या धर्माप्रमाणे परमात्मा सुरुवातीपासून अखेरपर्यंत कर्तव्य-बद्ध म्हणजेच परतंत्र असतो.

( ५ ) **देवतांच्या गुणांविषयी मतभेद :** झरतुष्ट्र व कॉन्फ्युशिअस यांच्या धर्मांत ईश्वरास अतिशय न्यायप्रिय मानण्यांत आलें आहे. ख्रिस्ती धर्म परमात्म्यास अतिशय प्रेमळ मानतो. हिंदुधर्मानुसार परमात्मा निर्गुण असला तरीहि तो आनंदमय असून भक्तांवर नेहमी कृपा करतो.

या मुख्य विरोधी तत्त्वांच्या आधारें हिंदुधर्माची जगांतील इतर धर्मांशीं चांगली तुलना करतां येण्यासारखी आहे. मनुष्याच्या योग्यतेनुसार, त्याच्या अधिकारानुसार ईश्वराचीं अनेक रूपें हिंदुधर्माने मान्य केलेलीं आहेत. हें हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे. कर्ममार्गांत परमात्मा यज्ञपुरुष म्हणून प्रकट होतो; ज्ञानमार्गांत ज्ञानी माणसें शुद्ध, प्रबुद्ध, सनातन आणि निर्गुण ब्रह्माचें ध्यान करतात; भक्तिमार्गांत भक्तजन आनन्दमय व अलौकिक गुणयुक्त भगवंतांची भक्ति करतात. अशा प्रकारची सुंदर व्यवस्था दुसऱ्या धर्मांत आढळून येत नाही.

### वेगवेगळ्या तत्त्वांचें महत्त्व

धर्म इतका विशाल आणि व्यापक आहे की, वेगवेगळ्या मनोवृत्तीच्या माणसांनी

वेगवेगळीं तत्त्वें मुख्य तत्त्वें म्हणून मानलीं आहेत. आणि असा प्रकार घडणें हें स्वाभाविकच आहे.

( १ ) **मॅक्स मुल्लर** धर्माच्या बौद्धिक स्वरूपावर भर देतो.

( २ ) **इमॅन्युएल कान्ट** आणि **मॅथ्यू अॅर्नोल्ड** यांनी धर्माची प्रसिद्ध वैशिष्ट्य सांगितलेलीं असून त्यांत त्यांनी नीति व सदाचार यांवर विशेष भर दिला आहे.

( ३ ) **श्लायेरमाखर** नांवाचा महान् धर्मवेत्ता भावना किंवा प्रतीति हीस अधिक महत्त्व देतो.

( ४ ) **अॅलन मेंझिस** पूजेस अधिक महत्त्व देतो.

( ५ ) धर्मांचा इतिहास लिहिणाऱ्या अर्वाचीन विद्वानांपैकी **आल्बर्ट रेविल** नामक एक विद्वान् आत्मज्ञान किंवा आत्मोन्नति या तत्त्वावर अधिक भर देतो.

( ६ ) चालू काळांत सामाजिक दृष्टीने धर्माच्या तत्त्वांना महत्त्व दिलें जातें ( उदाहरणार्थ, दरिद्री नारायणाची सेवा ) आणि या दृष्टिकोणाचा बराच प्रसार झाला आहे.

( ७ ) 'धर्म म्हणजे उत्तम प्रकारचे आदर्श साधण्याची क्रिया होय,' अशा प्रकारचा दृष्टिकोण **प्रो. जी. डब्ल्यू स्ट्रेटन** स्वीकारतात.

( ८ ) सगळयाच प्रकारच्या दृष्टिकोणांच्या समन्वयावर **प्रो. विल्यम् अॅडम्स ब्राऊन** भर देतात.

( ९ ) **लोकमान्य टिळक, महात्मा गांधी** आणि **डॉ. राधाकृष्णन्** यांनी अनासक्ति-योगावर भर दिलेला आहे, तर **महर्षि अरविन्द** दिव्य जीवन आणि अतिमानसतत्त्व यांना महत्त्व देतात.

या दृष्टिकोणांची जी विविधता आणि मर्यादितता आहे, ती बरोबर समजण्यासाठी स्वामी रामकृष्ण परमहंस यांनी दिलेला 'हत्ती व सात आंधळे' हा दाखला लक्षांत घेण्यासारखा आहे.

## अभ्यासाचे दृष्टिकोण

धर्म हा इतका प्रचंड विषय आहे की, एकाच प्रकारच्या संशोधनाच्या योगाने त्याचे पुरेपूर आकलन होऊं शकणार नाही. वेगवेगळया दृष्टिकोणांतून त्याचा अभ्यास करणें जरूरीचें आहे. उदाहरणार्थ,

( १ ) एक प्रमुख दृष्टिकोण म्हणजे **ऐतिहासिक दृष्टिकोण** होय. मानवी इतिहासावर, मनुष्याच्या जीवनावर प्रभाव गाजविणाऱ्या अर्थशास्त्र, भूगोल, राष्ट्र, संस्कृति इत्यादि तत्त्वांच्या बरोबरीनेच धर्माचाहि अभ्यास करण्याची विशेष आवश्यकता

आहे. याचें खास कारण असें की, एखाद्या किंवा अनेक दैवी तत्त्वांवर श्रद्धा असल्यामुळे अनेक माणसें एकत्र येतात आणि त्यांचा संघ किंवा समूह तयार होतो. साहजिकपणेंच, वेगवेगळे संघ उभारण्याचें सामर्थ्य धर्मामध्ये असतें. त्यामुळे ऐतिहासिक दृष्टीने धर्मांचा अभ्यास करणें जरूरीचें ठरतें.

( २ ) एक नवीन परंतु अधिक लोकप्रिय मार्ग **मानसशास्त्राचा** आहे. या दृष्टिकोणाप्रमाणे मनुष्याचे ठिकाणीं मनन, साक्षात्कार आणि दृढसंकल्प या तिहींचीं साधनें एकत्र होऊन मनुष्यास जें लक्षण अथवा स्वरूप प्राप्त होतें त्यालाच ‘ धर्म ’ म्हणतात.

( ३ ) परमात्म्याच्या ज्ञानाची माणसाला जी जिज्ञासा असते तिचें एक अंग या नात्याने **तत्त्वज्ञानाच्या** दृष्टिकोणांतून धर्मांचा अभ्यास करावयास हवा. तत्त्वज्ञानांत परमतत्त्व जाणण्याचा मार्ग सांगितलेला असतो तर धर्मांत परमात्म्याचें ज्ञान मिळविण्याचीं, एवढेंच नव्हे तर त्याच्याशीं गाढ संयोग पावून त्याचा ब्रह्मानंद आणि भजनानन्द मिळविण्याचीं तत्त्वेंहि सांगितलेलीं असतात.

( ४ ) मनुष्याच्या अनेक **सामाजिक** प्रवृत्तींपैकी धर्म ही एक प्रवृत्ति आहे. साहजिकपणेंच या दृष्टिकोणांतूनहि धर्मांचा अभ्यास करावयास हवा. जगाचें नियमन करणाऱ्या एका किंवा अनेक तत्त्वांशीं गाढ संबंध प्रस्थापित करून धर्मांच्या द्वारे आदर्श समाज उभा करण्याचे प्रयत्न करण्यांत येतात आणि तेवढ्यापुरतेंच सामाजिक दृष्टिकोणांतून धर्माभ्यास करणें प्राप्त ठरतें.

( ५ ) परमात्म्याविषयीचे आदर्श आणि अनुभव शब्दांनीहि अनेकदां वर्णन करून सांगतां येत नाहीत. ते भाषेच्या साह्याने प्रकट करण्याचा प्रयत्न मनुष्य कांही ग्रंथ लिहून करीत असतो. आणि अशाच ग्रंथांतून धर्मांचा कोणत्या दृष्टिकोणांतून अभ्यास व्हावयास हवा तें दाखविणारीं तत्त्वें आढळून येतात. खेरीज, प्रत्येक सुव्यवस्थित धर्मांच्या ग्रंथांच्या आधारें धर्मांचा अभ्यास करण्यांत आल्यास निश्चित फायदा होतो.

( ६ ) सौंदर्याच्या दृष्टिकोणांतूनहि धर्माभ्यास करण्याच्या पद्धतीचाहि उपयोग करण्याजोगा आहे. केवळ वाङ्मयाच्याच द्वारे नव्हे तर संगीत, शिल्प, स्थापत्य आणि इतर सगळया कलांच्या द्वारासुद्धा सौंदर्याचें महत्त्व जाणून घेण्याचे, सौंदर्य आविष्कृत करण्याचे व तें निर्माण करण्याचे जे बहुविध प्रकार मनुष्यप्राणी अंगिकारतो, त्यांपैकी धर्म हाहि एक प्रकार आहे. कारण, परमात्मरूप तत्त्व सुंदरतम आहे, असें मानलें जातें.

( ७ ) **नीतिशास्त्राच्या** दृष्टिकोणांतूनहि धर्माच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. या दृष्टीने विचार करतां असें वाटतें की, मनुष्य आपल्या कृत्यांवर सत्ता गाजविणाऱ्या इष्ट देवतेशीं गाढ संपर्क साधून, त्याच्या योगाने स्वतःला अतिशय उत्तम प्रकारचें जीवन प्राप्त व्हावें या हेतूने जे प्रयत्न करीत असतो, ते प्रयत्न म्हणजेच धर्म. धर्म समजण्याच्या दृष्टीने **आत्मानुभव** हें अतिशय उत्कृष्ट साधन आहे. मनुष्याच्या जीवनावर हुकमत गाजवि-

णाऱ्या एका तत्त्वाशीं अथवा अनेक तत्त्वांशीं संयोग पावून त्याचे द्वारा मनुष्य मोक्ष मिळवूं शकतो. ह्या प्रकारचा एक विशेष मार्ग प्रत्येक धर्मांत असतोच.

( ९ ) सध्याच्या काळांत विद्वानांच्या शोधांमुळे धर्मांचा **तुलनात्मक अभ्यास** करण्याची पद्धति अतिशय सुलभ झाली आहे. आणि ही पद्धति इतकी मनोरंजक आहे की, हिच्याकडे कित्येक लोकांचें लक्ष वेधलें गेलें आहे.

यावरून किमान इतकें तरी ध्यानांत यावयास हवें की, जर धर्माचें संपूर्ण आणि शुद्ध स्वरूप व त्याचें रहस्य समजून घ्यावयाचें असेल तर वर सांगितलेल्या सगळयाच दृष्टिकोणांतून तसेंच इतर सर्व संभाव्य दृष्टिकोणांतूनहि धर्मांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

धर्मांचा अभ्यास करण्याचें मुख्य साधन म्हणजे धर्मग्रंथ हें होय. प्रत्येकाला स्वतःच्या धर्माचें रहस्य समजण्यासाठी भाषा आणि इतिहास यांच्या मूलगामी ज्ञानाची आवश्यकता आहे. जगांतल्या अकरा प्रचलित धर्मांचीं शास्त्रें सोळा भाषांतून रचलेलीं आहेत. धर्मांच्या अभ्यासाचे बाबतींत सगळयाच धर्मांबद्दल आणि सगळयाच व्यक्तींबद्दल सहानुभूति वाटली पाहिजे. खेरीज, त्या सर्वांबद्दल संपूर्ण समवृत्ति बाळगणें आवश्यक आहे. स्वामी रामकृष्ण परमहंसांनी केशवचंद्र सेन यांना सर्व धर्मांचो एकता ऊर्फ सर्वधर्मसमन्वय चांगल्या रीतीने समजावून सांगितला होता. गांधीजींनी सर्वधर्मसमभावाचा उपदेश करून त्या उपदेशानुसार स्वतः जीवन कंठिलें. आपल्या आजच्या राष्ट्रीय सरकारनेहि हाच आदर्श स्वीकारला आहे.

## धर्मांच्या अज्ञानाचा परिणाम

असें असलें तरीदेखील जगांतील लोक धर्मांच्याच नांवाखाली परस्परांशीं लढले होते, झगडले होते, असें इतिहास सांगतो. वैदिक आणि अवैदिक, हिंदु आणि मुसलमान, यहुदी आणि ख्रिस्ती, ख्रिस्ती आणि मुसलमान हे सारे धर्मांच्या नांवानेच एकमेकांशीं झगडले आणि त्यांनी इतिहासाचा रंगढंग बदलला. धर्म हें समाजाला टिकवून धरणारें एक तत्त्व असूनदेखील त्याच्यामुळेंच राष्ट्राराष्ट्रांतील लोकांत युद्धें होतात, ही एक विचित्र विश्वलीला आहे. भारतांत इंग्रजी राजवट दीर्घकाळ चालू राहण्यास धर्म हेंहि एक कारण होतें ! राष्ट्रदृष्ट्या हिंदुस्थानची प्रजा एकखंड असूनहि धर्मांच्या नांवाखालीच हिंदु-मुसलमानांत भेदाची भिंत उभी करण्यांत आली आणि तिचा परिणाम म्हणूनच अखंड हिंदुस्थानचे भारत आणि पाकिस्तान असे दोन तुकडे होऊन संघर्षाचा प्रवाह कायमचा वाहत राहिला !

धर्माचें खरें स्वरूप न उमगल्यामुळे, दुसऱ्यांच्या धर्मांचा संपूर्णपणें सहानुभूतीने, आदरभावनेने, सत्यशोधक वृत्तीने, आणि तुलनात्मक दृष्टीने अभ्यास न झाल्यामुळे माणसांमाणसांत, समाजासमाजांत अज्ञानाचे तट उभे राहिले, त्यांची दृष्टि

संकुचित बनली, स्वार्थ बोकाळूं लागला, स्नेहाचा नाश झाला आणि द्वेषाचें अग्निकुंड धडकूं लागलें. धर्मांमुळे जगांतील केवळ वेगवेगळे समाजच नव्हेत, तर एकाच समाजांतील वेगवेगळे गट, वेगवेगळ्या जमाती परस्परांशीं झगडूं लागल्या आणि जगांत अशांतता निर्माण झाली ! चालू संघर्षयुगांत खरीखुरी शान्तता आणि सुख मिळविण्यासाठी धर्माची अत्यंत आवश्यकता आहे, आपल्या दैनंदिन वागवर्तणुकींत सदाचाराची अपेक्षा आहे, सगळ्यांचे ठिकाणीं समभावानें आत्मा वसत असतो, ही भावना सर्वत्र पसरवून जगताला प्रेममय करून सोडण्याची आज जरूरी आहे.

सध्यां जगांत मुख्यत्वेंकरून अकरा धर्म प्रचलित आहेत. त्या सर्व धर्मांची रूपरेषा, त्यांचीं वैशिष्ट्यें, त्यांचीं रहस्यें इत्यादींचा आपण आतां परिचय करून घेऊं.

## अभ्यासाचीं साधनें


1 Birth & Growth of Religion — G. F. Moore.

2 The History of Religions — Prof. E. W. Hopkins.

3 Encyclopaedia of Religion & Religions — E. Royston Pike.

4 History of Religions — G. F. Moore.

5 Encyclopaedia of Religion & Ethics — Edited by J. Hastings.

6 History of Philosophy Eastern & Western — Edited by Dr. S. Radhakrishnan.


*

# प्रकरण दुसरें

# जगांतील प्रचलित धर्म

## १ हिंदु धर्म

### हिंदु

प्राचीन इराणी लोक जुन्या आर्यभाषेंतील 'स्' चा 'ह्' असा उच्चार करून 'सिंधु' शब्दाचा 'हिंदु' असा उच्चार करीत असत. त्याप्रमाणेच सिंधु नदीच्या प्रदेशांत राहणाऱ्यांनाहि ते हिंदु ह्या नांवाने ओळखत असत. तेव्हापासून हिंदु शब्द आर्य या अर्थाने अस्तित्वांत येऊन आजहि त्याच अर्थाने रूढ आहे. ज्या नांवाने परकीय लोक आर्यांना ओळखूं लागले तेंच त्यांचें नांव रूढ झालें ही एक विचित्र घटना आहे.

हिंदु लोक 'धर्म' शब्द अतिशय व्यापक अर्थाने वापरतात. त्यांत ( १ ) ईश्वरनिष्ठा ( २ ) तत्त्वज्ञान ( ३ ) सामाजिक व्यवहार ( ४ ) नीति इत्यादि अर्थांचा समावेश होतो. याचा अर्थ असा की, धर्मामध्ये कांही अंशांनी संस्कृतीचाहि अंतर्भाव होतो. वेगवेगळया कालखंडांत निरनिराळे धर्म पाळणारे व भिन्नभिन्न संस्कृति असणारे लोक हिंदुस्थानांत आले. त्या वेगवेगळया धर्मांचा व संस्कृतींचा समन्वय आपणांस हिंदुधर्मांत आढळतो. यावरून हिंदुधर्म अत्यंत विशाल असून त्याची व्याख्या करणें कठीण आहे, हें लक्षांत येईल. तरीसुद्धा असें म्हणतां येईल की, भारतामध्ये राहणारे प्राचीन आर्य लोक जो धर्म पाळीत असत त्यांत इतर धार्मिक कल्पना व विधि यांचा समावेश झाल्यामुळे त्याचा जो विकास झाला तो हिंदु धर्म.

### आर्य

आर्यांची मूळ वसाहत कोणत्या प्रदेशांत होती ह्याबाबतींत पुष्कळच मतभेद आहेत. त्या चर्चेंत शिरण्याचें आपल्याला प्रयोजन नाही. सर्वसामान्य मत असें आहे की, इसवी सनापूर्वी दीडदोन हजार वर्षांच्या सुमारास वेगवेगळया वेळीं आर्यांच्या टोळया अफगाणिस्तानमार्गे सिंधु व पंजाबच्या प्रदेशांत येऊन तेथेच स्थायिक झाल्या. ह्या प्रदेशांत सात मोठ्या नद्या असल्यामुळे त्यांनी ह्या प्रदेशास 'सप्तसिंधु' असें नांव ठेवलें. सृष्टींतील कांही हितकारक शक्तींवर चेतनधर्मांचा आरोप करून आर्य त्या शक्तींची देवता म्हणून स्तुति करीत असत; यज्ञासारखे धार्मिक विधि करीत असत. अग्नि निर्माण करून स्तुतींच्या द्वारे देवतांचें ते आवाहन करीत असत आणि अग्नीस आहूति देत असत. अग्नि आहूति देवांपर्यंत पोहोंचवितो व त्यामुळे प्रसन्न झालेले देव यज्ञ करणाऱ्याच्या इच्छा पुऱ्या करतात, असें आर्य मानीत असत.

ज्यावेळीं आर्य सप्तसिंधूंच्या प्रदेशांत आले त्यावेळीं त्या प्रदेशांत स्वतःचा स्वतंत्र धर्म पाळणारे आणि उच्च संस्कृति असलेले लोक राहत होते. आर्य त्यांना दास, दस्यु, दानव, अहि, असुर अशा नांवांनी संबोधूं लागले. त्यांचेवर वर्चस्व मिळविण्यासाठी आर्यांनी युद्धें करून शेवटीं विजय मिळविला. पराभवानंतर आर्येतरांची संस्कृति जरी नष्ट झाली तरी त्यांची कित्येक तत्त्वें आणि त्यांच्या कित्येक विचारधारा आर्यधर्मांत मिसळून गेल्या. मोहोंजोदारो, हरप्पा, लोथल वगैरे ठिकाणीं झालेल्या उत्खननावरून सिंधु नदीच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या प्राचीन लोकांच्या कित्येक धार्मिक कल्पनांविषयी आपल्याला माहिती मिळते. शारीरिक आणि धार्मिक पवित्रतेसाठी स्नान करणें, मूर्तिपूजा, पत्रपुष्प इत्यादींनी होणारा पूजाविधि, देवतेची पूजा, लिंगपूजा, वृक्षपूजा, पशुपूजा वगैरे विधि आर्येतरांच्या धर्मातून आर्यांच्या धर्मात शिरले आणि अशा प्रकारें आर्यधर्माच्या विकासाला प्रारंभ झाला, असें मानलें जातें.

### ऋग्वेद

आर्यांनी देवतांच्या स्तुति, प्रार्थना इत्यादींचा संग्रह करून पहिल्या प्रथम ऋग्वेदाची रचना केली. हा दहा हजार मंत्रांचा ग्रंथ जगांतील सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. ह्या वेदाची रचना केव्हा झाली त्यासंबंधी निरनिराळीं मतें मांडण्यांत आलेलीं आहेत. लोकमान्य टिळक आणि डॉ. याकोबी (बॉन्, जर्मनी) ह्यांच्यासारख्या विद्वानांच्या मतानुसार ऋग्वेदाची रचना इ. स. पूर्व ४–५ हजार वर्षें या सुमारास झाली असावी. डॉ. विंटर्निट्झ इ. स. पूर्व २५०० वर्षें हा ऋग्वेद–रचनेचा काळ मानतात तर प्रो. मॅक्समुल्लर व कित्येक पाश्चात्त्य विद्वान् असें समजतात की, इ. स. पूर्व १५०० ते इ. स. पूर्व ८०० या काळांत सर्व वैदिक वाङ्मय रचलें गेलें. भारतांतील तत्त्वज्ञ वेदांना नित्य व अनादि मानत असल्यामुळे वेदकालनिर्णयाचा प्रश्नच त्यांचे दृष्टीने उत्पन्न होत नाही. वेदांतील विचार पूर्णपणें खरे, अबाधित, नित्य, सनातन असल्यामुळे वेददेखील नित्य, अपौरुषेय, भगवंतांच्या निःश्वसितासारखे आहेत, अशा कल्पना भारतांत पहिल्यापासूनच रूढ आहेत.

भारतांतील विचारधारा ऋग्वेदांतूनच वाहत असल्यामुळे ऋग्वेदाच्या अभ्यासाची जरुरी आहे. ऋग्वेदांत उत्तम काव्यें आहेत; सूर्य, अग्नि, इन्द्र, विष्णु, पर्जन्य आणि वायु अशा सृष्टीच्या आविष्कारांच्या प्रार्थना आहेत; जगाच्या उत्पत्तीपूर्वी काय होतें, जगाची उत्पत्ति कशी झाली, इत्यादि तत्वज्ञानाच्या विषयांची चर्चाहि आहे. वेगवेगळ्या ऋषींनी निरनिराळ्या छन्दांत रचलेल्या सुमारें १०,६०० ऋचांतून, आर्यांची देवतांवर किती श्रद्धा होती, ती श्रद्धा व्यक्त करण्यासाठी त्यांनी किती यज्ञ केले होते, देवतांशीं त्यांचें कसें मित्रत्वाचें नातें होतें, देवता व मनुष्यें हीं एकमेकांजवळ कशीं आलीं होतीं, आणि देवतांच्या कृपाछत्राखाली आर्य आपलें जीवन कसें शांतपणाने व आनंदाने व्यतीत करीत होते, इत्यादि साऱ्या गोष्टींचें सुंदर चित्र दिसून येतें. त्यांतच ऋग्वेदाचें महत्त्व सामावलेलें आहे.

## दुसरे वेद

कालक्रमानुसार ऋग्वेदांतील मंत्रांचा विनियोग वेगवेगळ्या यज्ञांत करण्यांत येऊं लागला आणि त्या दृष्टीने यजुर्वेद आणि सामवेद यांची रचना झाली. अथर्ववेदहि ऋग्वेदाइतकाच महत्त्वाचा आहे. जादूटोणा, जारणमारणाचे प्रयोग, औषधें तसेंच चिकित्साशास्त्र व चिकित्सापद्धति, राष्ट्रीय भावना व अध्यात्मविद्या इत्यादि विषयांवरील विपुल माहिती आपल्याला अथर्ववेदांत मिळते. ऋग्वेदांत वैदिक समाजाच्या एका विशिष्ट भागाचें दर्शन घडतें तर अथर्ववेदांत दुसऱ्या भागाचें चित्रण आहे. भारतांतील लोकांच्या कित्येक धार्मिक समजुती व भावना यांचें मूळ अथर्ववेदांत सांपडतें. या दोन वेदांच्या आधारें वैदिक काळांतील धर्माची संपूर्ण कल्पना येऊं शकते

## वैदिक काळांतील पूजाविधि

वैदिक काळांत निसर्गपूजा प्रचलित होती. प्रत्येक वस्तूंत चैतन्य आहे ( Animism ) अशी समजूत रूढ होती. सवितृ, मित्र, पूषन् आणि विष्णु ह्यांसारख्या सूर्याच्याच रूपांची पूजा होत असे. सवितृदेवतेचा मंत्र ( " सवितृदेवतेच्या पूज्य तेजाचें आपण ध्यान करूं या. ती देवता बुद्धींस प्रेरणा देवो. " ऋग्वेद ३·६२·१० ) आजहि ' गायत्री मंत्र ' म्हणून प्रचलित आहे. अग्नीच्या पूजेंतून यज्ञकांडाचा विकास झालेला असून आजहि होमहवन रूढ आहे. वरुण ही ऋत-सत्यांचें पालन करणारी देवता असून नीति-नियमांचा भंग करणाऱ्या मनुष्यास ती शिक्षा करते. इंद्र ही सर्वांत महत्त्वाची देवता होय. ती अन्तरिक्ष व पर्जन्य यांची नियामक आहे. दीर्घायुष्य, आरोग्य, धनधान्य, विपुल प्रजा, शत्रूंचा नाश वगैरे ऐहिक सुखें मिळविण्यासाठी इंद्र-देवतेची प्रार्थना करण्यांत येत असे. वेदांमध्ये सामान्यपणें अनेकदेवतावाद ( Polytheism ) आहे, तथापि ' हें सारें ब्रह्म आहे ' ( Pantheism ) व ' सगळ्या देवता म्हणजे एकाच देवतेचीं विविध रूपें आहेत, ' ( Monotheism ) असे विचारहि आढळून येतात. अशा रीतीने ब्रह्मवाद आणि अद्वैतवाद यांचें मूळ ऋग्वेद आहे. मोक्षप्राप्तीचें मुख्य साधन स्तोत्रें, प्रार्थना हें आहे. यज्ञामध्यें अशा प्रकारच्या प्रार्थना होत असत. कर्म मुख्य असून त्यांतच भक्ति असे, ज्ञान गौण होतें. ह्या तीन विचारधारा आजदेखील चालू आहेत.

## यज्ञ : ब्राह्मणग्रंथ

ऋग्वेदाचें तात्पर्य यज्ञांमध्ये आहे अशी भावना जेव्हा दृढ झाली तेव्हा यज्ञांचें स्वरूप आणि मंत्रांच्या वेगवेगळ्या अंगोपांगांचा विनियोग ह्या विषयांचें निरूपण करणाऱ्या ' ब्राह्मण ' ग्रंथांची रचना झाली आणि तिच्या योगें जगाला विरल प्राचीन गद्य-साहित्याचा लाभ झाला. ऐतरेय, तैत्तिरीय आणि शतपथ हे तीन मुख्य ' ब्राह्मण ' ग्रंथ होत. आणि त्यांतल्या त्यांत संस्कृतीच्या इतिहासाच्या दृष्टीने ' शतपथ ' ब्राह्मण महत्त्वाचें आहे.

दर्शपूर्णमासासारखे नित्य यज्ञयाग आणि श्येनयागासारखे काम्य यज्ञयाग ह्यांविषयी विपुल माहिती ब्राह्मण ग्रंथांतून मिळते. चार वेदांतील पारंगत ऋत्विज–अनुक्रमाने होता, अध्वर्यु, उद्गाता, आणि ब्रह्मा–हे विधीनुसार यज्ञ करीत आणि यज्ञाचे शेवटीं यजमान ऋत्विजांना दक्षिणा देत. यज्ञयाग करणें हाच खरा धर्म होय असें मानण्यांत येत असे. यज्ञ हाच विष्णु असून सद्भावनेने केलेल्या यज्ञांत भगवान् विष्णु—यज्ञपुरुष—स्वतः प्रकट होऊन सर्वांना दर्शन देत असत, असें सांगण्यांत आलें आहे. यज्ञप्रसंगीं जेव्हा विश्रांतीसाठी वेळ मिळत असे तेव्हा ज्ञानी ऋत्विज आणि हजर असलेले पंडित उच्च प्रकारची तत्त्वचर्चा करीत असत. या चर्चारूप बीजांतूनच उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाचा वटवृक्ष वाढलेला आहे. ब्राह्मणग्रंथांच्या कर्मकांडाच्या प्रयोगांचें सविस्तर वर्णन श्रौतसूत्रांत केलेलें आहे. त्यामुळे त्या कल्पसाहित्याला सहा वेदांगांपैकी एक वेदांग मानतात.

## आरण्यकें व उपनिषदें

ज्यांचें कर्मकांडाने समाधान झालें नाही ते अरण्यांत गेले व ज्ञानमार्गाने परमतत्त्वाचा शोध करण्यासाठी तेथे त्यांनी प्रयत्न सुरू केले. त्यांनी जे ग्रंथ रचले त्यांना 'आरण्यकें' म्हणतात. कालक्रमाने तत्त्वचिंतनाचा रोख ज्ञानमार्गाकडे वळला आणि त्यांतून उपनिषदांची रचना झाली. उपनिषद् म्हणजे गुरूने शिष्याला आपल्यापाशीं बसवून सांगितलेली मोक्षदायक रहस्यविद्या होय. ही रहस्यविद्या ज्या ग्रंथांतून वर्णिलेली आहे, त्यांनाहि उपनिषदेंच म्हणतात. उपनिषदांची संख्या पुष्कळच मोठी आहे. परंतु ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, माण्डूक्य, ऐतरेय, बृहदारण्यक, छान्दोग्य आणि श्वेताश्वतर हीं दहा उपनिषदेंच प्राचीन आणि महत्त्वाचीं आहेत. त्यांपैकीहि बृहदारण्यक व छान्दोग्य हीं दोन अधिक महत्त्वाचीं आहेत. ब्रह्म, जीव व जगत् ह्या तीन तत्त्वांसंबंधी वेगवेगळ्या तत्त्वज्ञांनी जे निर्णय दिलेले आहेत ते सारे उपनिषदांत आढळतात. याज्ञवल्क्य, मैत्रेयी, गार्गी, जनक, शाण्डिल्य, आरुणि, सनत्कुमार आणि प्रजापति, तसेंच यम आणि अंगिरस् या सर्वांना तत्त्वज्ञानाच्या चर्चेत बरीच गोडी वाटत असे असें दिसतें. वेदांचा ज्ञान, कर्म व भक्तीचा प्रवाह उपनिषदांत वाहत आलेला आहे. एकंदरीने ज्ञानाचा प्रभाव वाढलेला असून तें मोक्षप्राप्तीचें मुख्य साधन मानलें जात असे. उपनिषदांचा मुख्य उपदेश अद्वैतवादाचा आहे.

उपनिषदें वैदिक वाङ्मयाचा अखेरचा भाग असल्यामुळे आणि त्यांच्यामध्ये वेदांचें तात्पर्य म्हणजे निश्चय किंवा अन्त असल्यामुळे त्यांना 'वेदान्त' म्हणतात. भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम उपनिषदांतूनच झालेला आहे. उपनिषदांचें तत्त्वज्ञान अतिशय आकर्षक असून जगांतील तत्त्वज्ञ त्याच्या अभ्यासाने मुग्ध होऊन गेले आहेत. 'उपनिषदांनी मला जीवनांत शांति मिळवून दिली असून मरणसमयींदेखील तीं मला

शांतता देतील,' असें सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ शौपेनहॉर म्हणत असे. मॅक्समुल्लर व डॉयसेन ह्यांनीहि उपनिषदांच्या द्वारे अपूर्व आनंद मिळविला. जगांत भारताचा गौरव उपनिषदांच्या मुळेच झालेला आहे. ज्याप्रमाणे हिमालयांतून अनेक लहानमोठ्या नद्या निघतात त्याप्रमाणे उपनिषदांतूनच भारताच्या सर्व विचारधारा निर्माण झाल्या आहेत. वस्तुतः, उपनिषदें भारताचा आत्मा होत.

## वर्ण, आश्रम

भारतीय समाजांत गुण व कर्म ह्यांच्या अनुरोधाने ज्याप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण निर्माण झाले त्याप्रमाणेच जीवनाचे ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास असे चार आश्रम वा खंड मानले गेले. वास्तविक वर्णाश्रमव्यवस्था हिंदुधर्माचा पाया होय. भारताच्या सर्व दर्शनशास्त्रांचें प्रयोजन साध्य करण्यासाठी वर्णाश्रमव्यवस्थेने महत्त्वाचें कार्य केलेलें आहे. मानवी समाजांत अशा प्रकारचे विभाग जरूरीचे आहेत.

## श्रुति आणि स्मृति

वेद, ब्राह्मण, आरण्यकें आणि उपनिषदें ह्या वाङ्मयाला 'श्रुति-वाङ्मय' म्हणतात आणि त्यानंतर रचल्या गेलेल्या बाकीच्या वाङ्मयाला 'स्मृति-वाङ्मय' म्हणतात. श्रुतींना मुख्य, अबाधित व प्रमाणभूत मानलेलें आहे. स्मृति गौण असून जोपर्यंत त्या श्रुतींना अनुसरून असतात तोपर्यंत त्यांचें प्रामाण्य टिकून राहतें. वर्णाश्रमधर्म, व्यवहार (राजनीति, राज्यशासन इ०), आणि प्रायश्चित्त ह्या तीन विषयांची चर्चा करणाऱ्या साहित्यासहि विशिष्ट अर्थाने 'स्मृति' म्हणण्यांत येतें. धर्मसूत्रांच्या आधारें रचल्या गेलेल्या मनु आणि याज्ञवल्क्य यांसारख्या स्मृतींच्यामुळें समाजाच्या आचारांत नियमितपणा येतो. समाजांत जसजसे बदल होतात तशातशा स्मृति नव्याने रचल्या जातात, त्यामुळे स्मृतींची संख्या खूप मोठी झाली आहे. समाजाचा धर्म प्रगतिमान् असल्यामुळे तो कोठेहि स्थगित होत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या स्मृतींतील विचारांत फरक पडत जातो व तो इतक्या प्रमाणांत पडतो की, जरूर भासल्यास स्मृतिग्रंथ श्रुतिग्रंथांना विरोधहि करतात. स्मृति ह्या नेहमी समाजाच्या बरोबरीने राहतात, हें त्यांचें वैशिष्ट्य आहे.

## इतिहास : पुराणें

ऋग्वेद वगैरे वैदिक साहित्याचा फायदा स्वाभाविकपणें ब्राह्मणवर्गास मिळत असे. आणि ब्राह्मणांकडून कांही क्षत्रिय व वैश्य यांना ज्ञान मिळत असे. बाकीच्या प्रचंड बहुजन-समाजास ह्या ज्ञानभांडाराचा पुरेपूर लाभ घेतां यावा यासाठी इतिहास व पुराणें यांची रचना झाली. रामायण, महाभारत ह्या इतिहास-ग्रंथांतून तसेंच अठरा पुराणांतून वेदोपनि-

षदांतील विषयांचेंच सरळ व रसाळ शैलींत म्हणजे बहुजनांना आस्वादण्यास सुलभ अशा पद्धतींत वर्णन करण्यांत आलें. खेरीज, अनेक आख्यानांच्या द्वारे बहुजनांना प्राचीन इतिहासाचें ज्ञान देण्यांत आलें. अशा प्रकारच्या आस्वादसुलभ साहित्याची रचना करण्यामागे प्राचीन ऋषींच्या अंतःकरणांत सर्वांच्या कल्याणाचा म्हणजे सर्वोदयाचा हेतु होता. आणि हा हेतु सफळ झालेला आहे, असें इतिहास सांगतो.

## महाभारत : गीता

वास्तविक पाहतां महाभारत हा ज्ञानकोश असून रामायण हें अनेक आदर्श लोकांसमोर मांडणारें आदिकाव्य आहे. पुराणें म्हणजे लोकांना सदासर्वदा चैतन्य देणारी, अखंड तेवत राहणारी जणुं ज्योतिच होय. इतिहास–पुराण हा पांचवा वेद असून तो चार वेदांचें समर्थन करतो असें महाभारतांत ( १·१·२०४ ) म्हटलें आहे. महाभारतांत ( ६·२३–४० ) आलेली भगवद्गीता विश्वविख्यात आहे. भगवद्गीता म्हणजे उपनिषदांचें सार असून भारतांतील धर्मांचा ती मोठा आधार आहे.

## गीतेचा उपदेश—अनासक्ति योग

फळाची आशा न राखतां कर्म करणें; वासनांचा त्याग करून सर्व कर्मे करणें आणि तीं परमात्म्यास अर्पण करणें; सर्व देव व तेजोगोल परमात्म्याच्याच विभूति असल्यामुळे प्रत्येकाने आपापल्या आवडीनुसार कोणत्याहि देवाची पूजा केली तरी ती परमात्म्याचीच पूजा होते; अशा रीतीने कोणत्याहि धर्माशीं थोडाहि विरोध होत नाही व सर्वधर्मसमन्वय साधतो; ज्ञानाने, ध्यानाने, कर्माने आणि भक्तीने परमात्म्याची प्राप्ति होते; कोणत्याच प्रकारचें परमात्मा-प्राप्तीचें साधन हस्तगत करतां आलें नाही तर सरळ त्यास शरण जाऊन त्याच्या कृपेवर विसंबून राहावें; ज्ञानमार्ग सर्वसामान्यांना कठीण वाटत असल्यामुळे परमात्म्यास शरण गेल्याने अगर त्याची भक्ति केल्याने सामान्यांचें कल्याण होऊं शकतें, अशा प्रकारचे विचार गीतेंत आढळून येतात.

गीतेचा उपदेश भारतांतील लोकांना अगदी आजच्या काळापर्यंत पुष्कळच प्रेरणादायक वाटत आला आहे. गीता जणुं कांही 'लोकोपनिषद्' झाली आहे. महाभारतांत सनत्सुजातपर्व ( ५·४२–४५ ), अनुगीता ( १४·१६–४१ ) आणि नारायणीय उपाख्यान ( १२·३२१–३३९ ) अशा तीन ठिकाणींदेखील ज्ञान व भक्ति यांचा सुंदर उपदेश आढळून येतो. सांख्य, योग, पांचरात्र, वेद आणि पाशुपत या पांच दर्शनांचें विवरण–निरूपण महाभारतांत करण्यांत आलेलें आहे ( १२·३३७·५९ ), आणि त्यामधूनच विचारधारा सतत पुढे वाहत आहेत. धर्मांचा भव्य इतिहास त्यावरूनच रचला गेला आहे

## दर्शनशास्त्र

धर्म व तत्त्वज्ञान हे दोन वेगवेगळे विषय आहेत, असें पाश्चात्य पंडित मानतात पण भारतांत या दोहोंना भिन्न मानण्यांत आलेलें नाही. एकाच विषयाच्या त्या दोन भूमिका मानल्या जातात. तत्त्वज्ञानांत विचाराची भूमिका असते व धर्मांत आचाराची भूमिका असते. सत्याचा शोध करून तें स्वतःच्या जीवनांत, आचरणांत उतरविणें हें भारतीय तत्त्वज्ञानाचें वैशिष्ट्य आहे. या सनातन सिद्धान्तास अनुसरूनच गांधीजींनी विचार व आचारांच्या एकरूपतेचा उपदेश केला आहे. या कारणामुळेच भारतीय तत्त्वज्ञानास 'दर्शन'शास्त्र म्हणतात. ज्या साधनाने परमात्म्याचें **दर्शन** होतें, त्याची प्राप्ति होते आणि मोक्ष मिळतो त्या साधनास '**दर्शन**' म्हणण्यांत येतें. या भारतीय दृष्टिकोणांतच भारतीय स्वभावाचें वैशिष्ट्य दिसूं शकतें.

गीतायुगानंतर दर्शनयुग सुरू होतें. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा, ( कर्मकांड ) व उत्तरमीमांसा ( वेदान्त ) या सहा दर्शनांनी वेदाला प्रमाण म्हणून मान्यता दिलेली असल्यामुळे या षड्दर्शनांना ' आस्तिक ' दर्शनें असें म्हणतात. तर जैन, बौद्ध आणि चार्वाक या दर्शनांनी वेदांचें प्रामाण्य मान्य केलेलें नसल्यामुळे त्यांना ' नास्तिक ' दर्शनें असें म्हणतात. जो वेदाची निंदा करतो तो नास्तिक असे मनु म्हणतो ( मनुस्मृति, २·११ ). ह्या साऱ्या दर्शनांनी भारतीय धर्माचा विकास घडवून आणला आहे.

## षड्दर्शनें

**कपिलमुनि** सांख्यदर्शनाचे स्थापक होत. **पतंजलि** योगदर्शनाचे, **गौतममुनि** न्यायदर्शनाचे, **कणाद** वैशेषिकदर्शनाचे, बादरायणाचे शिष्य **जैमिनी** पूर्वमीमांसेचे आणि **बादरायण व्यास** उत्तरमीमांसेचे ऊर्फ ब्रह्ममीमांसेचे म्हणजेच वेदान्ताचे संस्थापक होत.या सगळ्या दर्शनांत एक प्रकारचा क्रमनिष्ठ विकास व संगति आहे. सांख्यांनी जगांतील पदार्थांची प्रकृति आणि पुरुष अशी द्विदल विभागणी केली आहे. प्रकृति आणि पुरुष हीं दोन तत्त्वें वेगवेगळीं व स्वतंत्र असल्याचें दाखवून सांख्य पुढे प्रतिपादितात की, हीं दोन तत्त्वें स्वतंत्र आहेत या गोष्टीचा विसर पडल्यामुळे अविवेकाने जग उत्पन्न होतें आणि पुरुष संसारांत फसतो. प्रकृतिविवेक व पुरुषविवेक ह्या दोन्ही गोष्टी वेगवेगळया आहेत, हें ज्ञान मिळविण्याचें साधन **योगदर्शनाने** दिलें. प्रकृति व पुरुष या उभयतांचें स्वरूप नीटपणें समजण्यासाठी जगांतील सर्व पदार्थांचें स्वरूप समजून घेतलें पाहिजे. त्यासाठी ज्या विशिष्ट पद्धतीची आवश्यकता होती ती **न्यायदर्शनाने** पुरविली आणि सगळ्या पदार्थांचीं विशिष्ट लक्षणें **वैशेषिकदर्शनाने** दिलीं. हीं साधनें मिळविल्यावर यज्ञ करून स्वर्गप्राप्ति करून घेण्याचा उपदेश **कर्ममीमांसेने** केला आणि सरतेशेवटीं ज्ञानाने परमतत्त्वाची, ब्रह्माची, परमात्म्याची प्राप्ति कशी होऊं

शकते, ब्रह्मसाक्षात्कार व ब्रह्माची प्रतीति कशी होऊं शकते व जीवनाचा परमपुरुषार्थ कोणत्या प्रकारें मिळवितां येतो, ही गोष्ट उत्तरमीमांसेने ऊर्फ वेदान्ताने दाखविली व शिकविली. याप्रमाणे वेदान्ताचें स्थान अपूर्व आहे, यांत शंका नाहीं.

उपनिषदांत निरनिराळ्या ऋषींच्या वेगवेगळ्या अनुभवांचें वर्णन असल्यामुळे त्यांच्यांत स्वाभाविकपणेंच भिन्नभिन्न, कित्येकदां परस्परविरोधीदेखील, विचार आढळून येतात. त्यामुळे उपनिषदें सर्व प्रकारच्या विचारांचीं भांडारें बनलीं आहेत व त्याच कारणाने विरोधी दर्शनांनी उपनिषदांतून प्रेरणा मिळविलेली आहे. साऱ्या उपनिषदांचा समन्वय साधून गीतेने एक सरळ, उदार, सर्व प्राणिमात्रांचें कल्याण करणारा उपदेश केलेला असून जग आजहि त्या उपदेशाचा फायदा करून घेत आहे

याचप्रमाणे कालक्रमानुसार उपनिषदांतील विचारांचा विरोध दूर करून त्यांतून एक प्रकारचें सुसंगत तत्त्वज्ञान शोधून काढण्याचा प्रयत्न करणारीं वेदान्तसूत्रें ऊर्फ ब्रह्मसूत्रें म्हणजेच उत्तरमीमांसासूत्रें रचलीं गेलीं. त्यांतच बादरायणरचित ब्रह्मसूत्रेंहि आहेत. बादरायणाने एक गोष्ट स्पष्ट केली ती अशी की, तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत श्रुति आणि त्यांना अनुसरणाऱ्या स्मृति ह्या प्रमाणभूत होत व तत्त्वज्ञानांत स्वतंत्र तर्कास स्थान नाही. श्रुतींनी सिद्ध केलेल्या सिद्धांतांचें समर्थन करणाऱ्या तर्कालाच प्रमाण म्हणून मानतां येईल. बादरायणाच्या या दृष्टिकोणाच्या आधारानेच भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास झालेला आहे व परिणामीं भारताचें शास्त्रप्रधान तत्त्वज्ञान पश्चिमेकडील तर्कप्रधान तत्त्वज्ञानाहून कांही अंशांनी वेगळें उमटून पडतें.

रामायण आणि महाभारत ह्यांसारखे इतिहासग्रंथ; सात्वत आणि जयाख्य ह्यांसारख्या पांचरात्र संहिता; विष्णु आणि भागवत ह्यांसारखी अठरा महापुराणें; नारद, कलि ह्यांसारखीं अठरा उपपुराणें; मनु, याज्ञवल्क्य आणि पराशर अशांसारख्या स्मृति; दक्षिण भारतांतील आल्वारांचें तामीळ भाषेंतील प्राचीन साहित्य, या साऱ्या साहित्याने हिंदु-धर्मावर दाट छाप पाडलेली असून हिंदुधर्माची घडण केलेली आहे.

**वेदान्ताचे आचार्य**

उपनिषदें, गीता आणि ब्रह्मसूत्रें या तिहींना प्रमाण मानून शंकराचार्यांनी स्वतःच्या सिद्धान्ताची म्हणजेच केवलाद्वैतवादाची स्थापना केलेली आहे. त्यामुळे या तीन ग्रंथांना '**प्रस्थानत्रयी**' असें म्हणतात. भारतांत अशी एक रूढि पडून गेली होती की, जो उपनिषदें, गीता आणि ब्रह्मसूत्रें यांच्यावर भाष्यें लिहील त्यालाच '**आचार्य**' म्हणावयाचें. त्यामुळे नवा संप्रदाय स्थापणारावर, आचार्य म्हणून आपली गणना व्हावी यासाठी, प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिण्याचें बंधन पडे. परिणामीं, वेदान्तशास्त्राचें साहित्य खूपच वाढलें आहे. प्रस्थानत्रयीच्या बीजांतून वेदान्ताचा महावृक्ष उगवला, फळला व फुलला.

## शंकराचार्य ✓

शंकराचार्य हे एक महान् तत्त्वचिंतक होऊन गेले. त्यांचा जन्म केरळ प्रांतांतील 'कालटी' गांवांत झाला होता. त्यांचें तत्त्वज्ञान स्वतंत्र तर्कांच्या आधाराने रचलेलें असून मागाहून त्यास श्रुति व स्मृति यांतील विधानांच्या द्वारे समर्थित करण्यांत आलें आहे. शंकराचार्यांचे सिद्धान्त खालीलप्रमाणे आहेतः

परमतत्त्व एकमेव आणि अद्वितीय आहे. त्यास ब्रह्म अथवा आत्मा म्हणतात. अविद्या किंवा माया हिच्यामुळे ब्रह्मांत जगत् दिसून येतें व त्यामुळे सर्व व्यवहार चालतो. ही अविद्या सत्य की असत्य हें सांगणें शक्य नसल्यामुळे तीस **अनिर्वचनीय** म्हणतात. यज्ञादि कर्मे करून चित्तशुद्धि करावी, उपासना अगर भक्ति करून एकाग्रता मिळवावी व ज्ञानाने मोक्ष मिळवावा अशी कर्म, भक्ति व ज्ञान यांची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. कोणती वस्तु नित्य आणि कोणती अनित्य याविषयीचें ज्ञान; वैराग्य; शम, दम वगैरे साधनें; आणि मोक्षप्राप्तीची इच्छा हीं चार साधनें ज्यास अवगत व अनुकूल आहेत त्यालाच वेदान्ताचा अभ्यास करण्याचा अधिकार आहे. श्रेष्ठ गुरु शिष्यास असा उपदेश करतो की, जीव हाच आत्मा आहे, जीव हेंच ब्रह्म होय. 'तें तूं आहेस' ( तत् त्वं असि ) ह्या जीवात्म्यांच्या एकात्मतेच्या ज्ञानामुळे शिष्याच्या अज्ञानाचा निरास होतो, 'मीच ब्रह्म आहें' ( अहं ब्रह्मास्मि ) अशी प्रतीति त्यास येते व तो संसाराच्या बंधनांतून, पाशांतून मुक्त होतो. ह्याचेंच दुसरें नांव मोक्ष हें आहे. केवळ ब्रह्म सत्य असून जगत् मिथ्या आहे. जगत् त्रिकालाबाधित नाही. जोपर्यंत जगांत अज्ञान आहे, जोपर्यंत मी आणि परमात्मा वेगळे आहोंत अशी भावना आहे, जोपर्यंत 'द्वैत' अस्तित्वांत आहे, तोपर्यंत जगाचा व्यवहार चालूं शकतो. परंतु, अद्वैताचें ज्ञान झाल्याबरोबर जगाची भ्रान्ति उडून जाते व केवळ ब्रह्म उरतें. यामुळे शंकराचार्यांचें तत्त्वज्ञान '**केवलाद्वैत**' या नांवाने ओळखलें जातें.

शंकराचार्य स्वतः भक्तहि होते. उभ्या देशांतील प्रजा धार्मिक बनून सुखी व्हावी, तसेंच देशांत ज्ञानाचा प्रसार व्हावा या उदात्त हेतूने शंकराचार्यांनी भारताच्या चारी दिशांत पीठें स्थापिलीं. तेथे आपल्या चार शिष्योत्तमांची नेमणूक केली व प्रजाजनांना उपदेश करण्याची त्या पीठाधीशांना आज्ञा केली. लोकांचें कल्याण करण्याची आचार्यांची ही केवढी तत्परता! शंकराचार्यांनी बौद्ध धर्माचा नाश करून भारतांतील वातावरण निर्मळ केलें; अनेक प्रकारचीं वासनायुक्त कर्मे करण्याच्या लोकांच्या वृत्तीचा नाश करून प्रजेंत नवचैतन्य उत्पन्न केलें व ज्ञानप्रदीप पाजळून प्रजेच्या अंधकाराचें निर्मूलन केलें. शंकराचार्यांनी अनेक ठिकाणीं शिवमंदिरें बांधून शैव-संप्रदायास अपूर्व बळकटी प्राप्त करून दिली. भारतीय संस्कृतीच्या इतिहासांत शंकराचार्यांचें स्थान अतिशय महत्त्वाचें आहे. आज देशांत शांकर संप्रदायाच्या अनुयायांची संख्या प्रचंड आहे.

## रामानुजाचार्य

ज्ञानाच्या प्रवाहाबरोबरच ' भक्तीचा प्रवाह फार प्राचीन काळापासून वाहत आला आहे. इसवी सनाच्या आरंभकाळापासून दक्षिण भारतांत आल्वारांनी म्हणजे भक्तजनांनी प्राचीन तामीळ भाषेंत अनेक प्रबंध लिहिलेले आहेत आणि त्यायोगें वैष्णव धर्माचा प्रसारहि झालेला आहे. या तामीळ प्रबंधांतूनच रामानुजाचार्यांना भक्तीची प्रेरणा मिळाली. त्यांनी प्रस्थानत्रयीखेरीज विष्णुपुराणासारख्या पुराणांना प्रमाण मानून विशिष्टाद्वैतवादाची स्थापना केली. परमात्म्यांत अनेक दिव्य गुण व शक्ति असतात. जीव आणि जगत्, चित् आणि अचित्, चैतन्ययुक्त आत्मा आणि जड पदार्थ, हें परब्रह्माचें शरीर असून तें सत्य आहे. रामानुजाचार्यांनी शंकराचार्यांच्या निर्गुण ब्रह्माऐवजी सगुण ब्रह्माचा स्वीकार केला आहे. जगत् सत्य आहे, तें मृगजळासारखें नाही; जग मायेमुळे अथवा अविद्येमुळे दिसत नाही पण परमात्मा-विष्णु, नारायण-जगद्रूपाने विकार पावतो; कर्म व ज्ञान यांचा विरोध नाही; व उपासनेने, भक्तीने, शरणभावनेने म्हणजेच **प्रपत्तीने** मोक्ष मिळतो हे रामानुजाचार्यांचे प्रमुख सिद्धान्त आहेत. रामानुजाचार्यांचा जन्म दक्षिण भारतांत कांचीजवळ भूतपुरी गांवांत झाला होता. त्यांनी आपलें आयुष्य कांची आणि श्रीरंगम येथे घालविलें. त्यांनी गीता आणि ब्रह्मसूत्रें यांवर भाष्यें लिहिलीं. त्यांच्या अनुयायांना श्रीवैष्णव म्हणतात, व त्यांची बहुसंख्या मद्रासराज्यांत आहे. सगळयाच वर्णांच्या लोकांनी या वैष्णव धर्माचा फायदा घेतला आहे.

## वीरशैवधर्म

ह्याच सुमारास जेव्हां उत्तरेंत काश्मीरमध्ये शैवदर्शनाचा आरंभ झाला तेव्हा दक्षिणेंत **वीरशैव संप्रदाय** सुरू झाला. **श्रीपति पंडित** आणि **बसव** ( इ. स. ११६० ) ह्यांच्यासारख्या तत्त्वचिंतकांनी वीरशैवदर्शनाच्या सिद्धान्तांचें चांगलें विवेचन केलेलें आढळतें. या धर्मांत शिवलिंगाची उपासना मुख्य आहे आणि वर्णभेद, जातिभेद मानण्यांत येत नाहीत. तत्त्वज्ञानापेक्षा नीतिमय व आध्यात्मिक जीवन अधिक महत्त्वाचें आहे ही ह्या धर्माची विशिष्ट भावना आहे.

## निंबार्काचार्य

रामानुजाचार्यांच्या समकालीन श्रीकंठांनी शिवभक्तीचा उपदेश केलेला आहे. त्यांच्या विचारांना "शिवाद्वैत" म्हणतात. त्यानंतर आंध्र राज्यांतील बेल्लारी तालुक्याच्या "निंब"नामक गांवांत निंबार्काचार्यांचा जन्म झाला. ते स्वतः तेलंगी ब्राह्मण होते. त्यांनी असा उपदेश केला की, जीव आणि ब्रह्म, जगत् आणि ब्रह्म हीं एकमेकांहून वेगळीं असलीं तरी एकच आहेत. त्यांच्या ह्या मुख्य सिद्धान्तामुळे त्यांच्या वैष्णवधर्मास **द्वैताद्वैत** अथवा 'भेदाभेदवेदान्त' असें

म्हणण्यांत येतें. श्रीकृष्णाच्या भक्तीमुळे मोक्ष मिळतो अशी या संप्रदायाची श्रद्धा आहे. निंबार्कांचार्यांचे अनुयायी दक्षिण व उत्तर भारतांत आढळून येतात.

## मध्वाचार्य

निंबार्कांचार्यांनंतर थोड्याच अवधींत मध्वाचार्यांनी कर्नाटकांत म्हणजे सध्याच्या म्हैसूर राज्यांत उडिपी नांवाच्या गांवांत वास्तव्य करून उपदेशास प्रारंभ केला. त्यांच्या उपदेशाप्रमाणे जीव आणि ब्रह्म, जगत् आणि ब्रह्म एकमेकांहून भिन्न असून नारायणाच्या भक्तीने मोक्ष मिळतो. त्यांच्या संप्रदायास '**द्वैतवेदान्त**' असें नांव आहे. या संप्रदायाचे अनुयायी म्हैसूर राज्यांत आढळतात.

## वल्लभाचार्य

इसवी सनाच्या १५ व्या शतकांत आंध्र देशांत एका सोमयाजी तेलंगी ब्राह्मणकुळांत वल्लभाचार्यांचा जन्म झाला. त्यांनी भारतांत तीनचारदां यात्रा करून धर्मप्रसार चांगल्या प्रकारें केला. वेद, गीता आणि ब्रह्मसूत्रें ह्या तीन प्रमाणांशिवाय भगवंतालाहि त्यांनी चवथें प्रमाण म्हणून मानलें आहे. कृष्ण हाच भगवान्, तोच ब्रह्म, परमात्मा असून त्याची भक्ति केल्याने मोक्ष मिळतो. ब्रह्माने स्वतःच या जगद्रूपाने आकारविकार धारण केला आहे त्यामुळे तें सत्य आहे. अविद्येमुळे जिवास अहंताममतारूपी संसार प्राप्त होत असतो. हा संसार मिथ्या असून त्याचा नाश ज्ञानाने होत असतो. जीव हा ब्रह्माचा अंश आहे. अशा रीतीने ब्रह्म स्वतःच, मायेच्या अगर अविद्येच्या मदतीशिवाय, सर्व कांही होतें. यामुळे वल्लभाचार्यांचं तत्त्वज्ञान 'शुद्धाद्वैत वेदान्त' या नांवाने ओळखण्यांत येतें. कर्म, ज्ञान आणि भक्ति हीं तीन साधनें ह्या काळांत शक्य नसल्यामुळे परमात्म्याच्या कृपेवरच भरंवसा ठेवून, त्याच्या नांवाचें श्रवण, कीर्तन आणि स्मरण करणें हाच या युगाचा धर्म आहे. वल्लभाचार्यांनी भगवंतांच्या अनुग्रहाचा उपदेश केलेला असल्यामुळे त्यांच्या संप्रदायास "पुष्टि (=कृपा) मार्ग" असें नांव दिलें जातें. या संप्रदायाचे अनुयायी पश्चिम आणि उत्तर भारतांत विशेष प्रमाणांत आढळतात.

## चैतन्य महाप्रभु

रामानुज, निंबार्क, मध्व आणि वल्लभ या चार आचार्यांनी प्रणीत केलेल्या वैष्णव धर्माच्या संप्रदायांखेरीज चैतन्य महाप्रभूंनी पंधराव्या शतकांत बंगालमध्ये कृष्ण-भक्तीचा मधुर उपदेश केला. या गौड संप्रदायाचे अनुयायी आज बंगालमध्ये आढळतात.

## भारतांतील संत

बाराव्या शतकांत भडोचच्या विशालदेव नांवाच्या राजाच्या (हरपाळ) 'चक्रधर' नामक मुलाने महाराष्ट्रांत 'महानुभाव' संप्रदायाची स्थापना केली. तेराव्या शतकांत

ज्ञानदेवांच्या उपदेशामुळे महाराष्ट्रांत वारकरी संप्रदायाचा प्रसार झाला. त्यामुळे पंढरपूरचें महत्त्व वाढलें. महाराष्ट्रांत अनेक साधु, संत व सत्पुरुष होऊन गेले व त्यांनी महाराष्ट्राचें पुष्कळ कल्याण केलें. नामदेव, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम आणि रामदास ह्यांसारख्या सन्तांनी महाराष्ट्रांत धर्मजागृति केली, तसेंच धर्म टिकवून धरला. त्याचप्रमाणे गुजरात-मध्येहि नरसिंह महेता, मीराबाई, दादू ह्यांच्यासारखे भक्त होऊन गेले; त्यांनी बहुविध व विपुल पद्यरचना करून सदाचाराचा उपदेश केला. त्या उपदेशामुळेच वैष्णव धर्माचा सारा प्रसार झालेला आहे. उत्तर भारतांत नानक, कबीर, तुलसीदास आणि सुरदास अशांसारख्या संतांनी जनसमाजाला उत्कृष्ट आध्यात्मिक उपदेशामृत पाजलें.

वरीलप्रमाणे भारतांतील वेगवेगळ्या प्रदेशांत तत्त्वज्ञ, साधुसंत, महात्मे यांचा प्रवाह अखंडितपणें वाहत आला आहे व त्यामुळे भारताची एकता, अखंडता टिकून राहिली आहे. धार्मिक साहित्य आणि तीर्थक्षेत्रें यांनी भारताच्या प्रजेस सतत एकतेची जाणीव करून दिली आहे. त्यामुळेच लोकमान्य टिळक, महर्षि अरविन्द, महात्मा गांधीजी आणि विनोबा भावे ह्यांसारख्या महानुभावांना गीतेसारख्या विश्ववंद्य ग्रंथाची मदत घेण्याची आवश्यकता वाटली. त्या ग्रंथाच्या सामर्थ्यामुळेच वरील महात्म्यांनी भारतांत अपूर्व शक्ति निर्माण केली.

## भारतांतील सुधारक

जे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून व ज्या भावना उराशीं बाळगून धर्म व संस्था यांची स्थापना होते ते आदर्श व त्या भावना कालक्रमाने शिथिल होत जातात व त्यामुळे नवीन विचारप्रणालि अस्तित्वांत येतात. हिंदु धर्मांचे बाबतींतहि असाच प्रकार घडून आला. वैदिक अथवा ब्राह्मणधर्मांत यज्ञाचे वेळीं पशूंची हिंसा होत असे. ह्या पद्धतीविरुद्ध जैन आणि बौद्ध धर्मांनी उठाव केला व धर्मास नवीन, अनुकूल स्वरूप दिलें. वस्तुतः, जैन व बौद्ध धर्म हे हिंदुधर्मास विरोध करीत असले तरी ते हिंदु धर्माच्या शाखाच होत. शीखधर्महि हिंदुधर्माची शाखाच. इंग्रजांच्या राजवटीच्या वेळीं या सगळ्या धर्मांना शिरगणती-पत्रकांत वेगवेगळें मानण्यांत आलें, प्रजाजनांत खोटाच भेद निर्माण केला गेला व प्रजेंत भांडणें लावून देऊन इंग्रजांनी आपलें राज्य मजबूत व चिरस्थायी करण्याचा प्रयत्न केला. आता आपला देश स्वतंत्र झालेला असल्यामुळे धर्मविषयक खऱ्याखुऱ्या व शुद्ध कल्पना समजून घेणें अगत्याचें आहे. तसें केलें तरच भारताची स्वाभाविक एकता टिकवून धरतां येईल.

## सहजानन्द स्वामी /

वैदिक धर्मांतर्गत वैष्णव तसेंच भागवत संप्रदायांनी, साधुसंतांच्या शाखांनी वैदिक धर्मास भारभूत झालेल्या कर्मकांडाच्या विचारसरणीला आणि वर्णभेदांना एक प्रकारें

विरोधच केलेला आहे. सहजानन्द स्वामींनी ( इ. स. १७७९ ते १८३० ) रामानुजाचार्यांचें तत्त्वज्ञान आणि वल्लभाचार्यांची सेवापद्धति यांचा स्वीकार करून भक्तांचें जीवन पवित्र असावयास हवें या गोष्टीवर फार भर दिला आणि मागासलेल्या जातींचा उद्धार व्हावा या उद्देशाने त्यांना योग्य मार्गदर्शन करून समाजाचें कल्याण केलें. वैष्णव संप्रदायाच्या अनुयायांत आचाराचें जें शैथिल्य आलें होतें तें दूर करण्यासाठी सहजानन्द स्वामींनी पुष्कळ स्तुत्य प्रयत्न केले. सहजानंदांच्या संप्रदायास 'उद्धव संप्रदाय' म्हणतात. त्याचे अनुयायी गुजरातेंत अधिक आहेत.

### ब्राह्मसमाज

याच सुमारास बंगालमध्ये एक तेजस्वी तारा प्रकट झाला; तो तारा म्हणजे राजा राममोहन रॉय ( १७७२–१८३३ ). त्यांनी असें दाखवून दिलें की, मूर्तिपूजा, अनेक देवतांची पूजा-अर्चा, सतीची चाल, सक्तीचें केशवपन, अनेक बायका करण्याची रीत, जातिभेद, प्रजेंत धार्मिक व राष्ट्रीय भावनेचा अभाव ह्या साऱ्या चालीरीति, रूढि हिंदुधर्मांत पोसल्या गेल्या आहेत व त्यांच्यामुळे देशाचें अतोनात नुकसान होत आहे. हें लक्षांत घेऊनच राजा राममोहनांनी १८२८ त ब्राह्मसमाजाची स्थापना केली. वरील अनिष्ट रूढि, रीतिरिवाज यांचें समाजांतून उच्चाटन व्हावें व समाजाचें हित व्हावें हें ब्राह्मसमाजाच्या स्थापनेमागील उद्दिष्ट होतें. या समाजाच्या प्रगतीसाठी केशवचन्द्र सेन, द्वारकानाथ टागोर, त्यांचे सुपुत्र देवेन्द्रनाथ टागोर आणि त्यांचे सुपुत्र रवीन्द्रनाथ टागोर ( म्हणजे गुरुदेव टागोर ) या थोर मंडळींनी खूपच परिश्रम घेतले. मुंबईतदेखील १८६७ सालीं डॉ. आत्माराम पांडुरंग नांवाच्या गृहस्थांनी प्रार्थनासमाजाची स्थापना केली; आणि १८७१ सालीं अहमदाबादेंत श्री. सरदार भोळानाथ साराभाई दीवेटीआ यांनी प्रार्थनासमाजाची स्थापना करून गुजरातेंत एक नवीन दीपज्योत पाजळली. १८७५ सालीं गुजरातमध्ये महर्षि दयानन्द सरस्वतींनी ( १८२४–१८८३ ) आर्यसमाजाची स्थापना करून हिंदु धर्मांत सांचलेला केरकचरा झटकून टाकला. प्रजेंत चैतन्य उत्पन्न होईल अशा प्रकारें दयानंदांनी वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें. ह्याच वर्षी थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाली आणि तिने सगळयाच धर्मांतील तत्त्वें एकत्रित करून धर्माधर्मांतील विरोध दूर केला. थोड्या वर्षांनंतर ( १८८२ ) बडोद्यांत श्रीमन्नृसिंहाचार्यांनी ( इ. स. १८५३–१८९६ ) 'श्रेयःसाधक अधिकारी–वर्गा'ची स्थापना केली आणि कर्म, ज्ञान व भक्ति यांचा समन्वय साधला. अशा प्रकारें त्यांनी हिंदु धर्माच्या मूळ विशालतेचें पुनरुज्जीवन केलें आणि अनेक जिवांची आध्यात्मिक उन्नति साधली.

### रामकृष्ण परमहंस

पुनः एकदा बंगालमध्ये प्रकाश पसरला. स्वामी रामकृष्ण परमहंसांनी ( इ. स. १८३४–१८८६ ) हिंदुधर्माची विशालता सचेतन केली. त्यांनी असा उपदेश केला की,

जगांतील सगळेच धर्म मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीच आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये कोणत्याहि प्रकारच्या विरोधास जागाच नाही. ह्या अत्यंत उदार सिद्धान्तामुळे अनेक लोक स्वामीजींकडे आकर्षिले गेले. नरेन्द्र ( १८६२–१९०२ ) त्यांचे शिष्य बनले. हेच पुढे विवेकानन्द म्हणून प्रख्यात झाले. स्वामी विवेकानन्द १८९३ मध्ये सर्वधर्मपरिषदेंत भाग घेण्यासाठी शिकॅगोस ( अमेरिका ) गेले आणि तेथे त्यांनी वेदान्त विषयावरील आपल्या व्याख्यानांनी श्रोत्यांना आश्चर्यचकित केलें आणि भारताच्या गौरवांत, थोरवींत भर घातली. त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. हें मिशन आज उत्तम प्रकारें समाजसेवा करीत आहे आणि मिशनच्या कार्याची आज सर्वत्र वाखाणणी होत आहे.

## चालू युग–टिळक, अरविन्द, गांधी

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जन्माला आलेल्या कांही व्यक्तींनी भारतामध्ये चैतन्य निर्माण केलें. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ( १८५६–१९२० ) गीतेवर ' गीतारहस्य ' नामक एक मौलिक टीकाग्रंथ लिहून कर्मयोगाच्या सिद्धान्ताच्या प्रतिपादनाने भारतीय जनतेस बलसंपन्न बनविलें. महर्षि अरविन्दांनी ( १८७२–१९५० ) पॉंडिचेरीस आश्रम स्थापून पूर्णयोगाचा उपदेश केला व परमचैतन्य जगांत केव्हा प्रकट होईल ती गोष्ट जगास समजावून दिली. आज त्यांच्या तत्त्वज्ञानाचा उत्तम प्रसार झालेला असून हिंदु समाजांत नवतेज् निर्माण झालें आहे. महात्मा गांधीजींनी (१८६९–१९४८) हिंदु धर्माचें व्यापक स्वरूप चांगल्या प्रकारें विवरून गीतेच्या अनासक्ति योगाचा उत्तम प्रकारें प्रचार केला. वर्णभेद, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रियांची परवशता आणि धर्माला आलेली मरगळ या व अशाच अनिष्ट तत्त्वांना हिंदु धर्मांतून घालवून देण्यासाठी गांधीजींनी खूप प्रयत्न केले व त्यामुळे देशाच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय परिस्थितींत चांगलाच फेरबदल घडून आला आहे. शिवाय हिंदु धर्मांतहि पुनः जीव आला आहे. गांधीजींचीं तत्त्वें आपल्या देशाने आत्मसात् केलेलीं आहेत व त्यामुळे आपला देश आज प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करीत आहे.

## मूल्यमापन

वैदिक काळापासून सुरू झालेल्या व आजवर टिकून राहिलेल्या हिंदुधर्माचा इतिहास बहुविध व मोठा मनोरंजक आहे. हिंदु धर्माने आजपर्यंत अनेक युगें बघितलीं, अनेक साम्राज्यें पाहिलीं, अनेक प्रकारची जनता बघितली आहे आणि तिला आपलीशी केली आहे. उदारता, सहिष्णुता, गुणग्राहकवृत्ति हे हिंदु धर्माचे विशेष गुणधर्म आहेत. ह्या गुणधर्मांमुळेच तो आजपर्यंत टिकून राहिला आहे. त्यांत अनेक धर्म, संप्रदाय, पंथ इत्यादींचा समावेश झालेला असून आज तो एखाद्या महावृक्षाप्रमाणे उभा आहे. विरोधी धर्मांना कसें आत्मसात् करावयाचें ही कला हिंदु धर्माने शिकविली आहे.

बुद्धास व ऋषभदेवास विष्णूचे अवतार म्हणून स्वीकारून बौद्ध व जैन धर्मांच्या अनुयायांची सहानुभूति हिंदुधर्मांने जिंकली आहे. अर्थात्, ज्याला कोणताच धर्माधार नाही अशास हिंदु धर्मांने उदार आश्रय दिला आहे. सर्व चांगल्या तत्त्वांचा स्वीकार करणें व तीं आपल्या तत्त्वांशीं एकजीव करून टाकणें हा विरळ गुणधर्म हिंदु धर्मांत आढळून येतो. त्यामुळे हिंदुधर्म बहुरंगी झाला आहे. ज्याप्रमाणे रंगीबेरंगी फूल आपलें मन मोहून टाकतें त्याप्रमाणे हिंदुधर्मांने जगाला आकृष्ट केलें आहे. जगांतील अनेक पंडितांना आपल्या धर्मांचा मूलगामी अभ्यास करण्याचें आकर्षण वाटलें आहे. धर्म आणि कथा, भाषाशास्त्र आणि संस्कृति या विषयांच्या मूलगामी अभ्यासासाठी जगांतील विद्वान हिंदूंच्या धर्मग्रंथांकडे वळतात. हिंदु धर्म एखाद्या स्पंजाप्रमाणे सगळें शोषून घेतो. त्यामुळे त्यांत सगळींच तत्त्वें सामावून जातात. हिंदु धर्म जगांतील धर्मांचें खरोखरच एक संग्रहस्थान बनून गेला आहे आणि हिंदु धर्मामुळे भारत हें एक धर्मक्षेत्र झालें आहे. हेंच हिंदुधर्मांचें मोठें यश होय.

## २ जैन धर्म

### जैन धर्माची उत्पत्ति

वैदिक धर्मांच्या यज्ञयागांत होणाऱ्या पशूंच्या हिंसेमुळे आणि त्या धर्मांत उच्चनीच असे भेदभाव पडल्यामुळे अनेक वर्गांत विरोध निर्माण झाला आणि उपनिषदांतील तत्त्वज्ञानाच्या कांही भागांवर अधिक भर देऊन नवीन धर्मांची स्थापना होऊं लागली. सत्य, अहिंसा, करुणा, समता, आणि तपश्चर्या ह्यांसारखीं साधनें अध्यात्मविद्येंत किती महत्त्वाचें कार्य करीत असतात, ही गोष्ट उपनिषदांनी दाखवून दिली होती. शुक्ल यजुर्वेदांत (२६·१५) असें म्हटलें आहे की, पर्वतांच्या गुहांमध्ये वा नद्यांच्या संगमावर राहून चिन्तन केल्याने मुनि होतां येतें. या विचारसरणींतून प्रेरणा मिळवून निरनिराळे पंथ प्रस्थापित झाले आणि त्यांतूनच आधुनिक जैन व बौद्ध धर्मांची स्थापना झालेली आहे. जैन व बौद्ध धर्म वैदिक धर्मांचें शुद्धीकरण करणारे धर्म असून वैदिक धर्माप्रमाणे ते भारताचेच धर्म आहेत. याच सुमारास वैदिक धर्माची आंतून शुद्धि करण्याचा प्रयत्न झाला व तो प्रयत्न म्हणजे महाभारतांतील भगवद्गीता होय. अशा प्रकारें वैदिक धर्मांचें अंतर्बाह्य शुद्धीकरण झाल्यामुळे भारतांतील धर्म टिकून राहिले.

जैन आपला धर्म अनादि असल्याचें मानतात. प्रत्येक कालखंडांत चोवीस तीर्थंकर होतात. वर्तमानकाळचा पहिला तीर्थंकर ऋषभदेव असून चोविसावा तीर्थंकर महावीर होय. सध्या महावीराने स्थापलेल्या तीर्थाप्रमाणे जैन धर्म चालू आहे.

### पार्श्वनाथ

तेविसावा तीर्थंकर पार्श्वनाथ वाराणसीच्या नागकुळांतील अश्वसेन नामक राजाचा

मुलगा होता. अश्वसेनाच्या राणीचें नांव वामादेवी असें होतें. पार्श्वनाथांचा जन्म इ. स. पूर्वी ८७६ मध्ये झाला, असें मानतात. वयाच्या तिसाव्या वर्षी राज्यपदाचा त्याग करून पार्श्वनाथ संन्यासी बनले. गृहत्यागानंतर ८४ व्या दिवशीं त्यांना 'केवलज्ञाना'चा साक्षात्कार झाला. त्यानंतर सुमारें सत्तर वर्षेपर्यंत संन्याशाचें जीवन घालवून पार्श्वनाथ वयाच्या शंभराव्या वर्षी संमेत शिखराच्या पर्वतावर मरण पावले. त्यांच्या काळांत रूढ असलेल्या अहिंसा, सत्य, तपश्चर्या इत्यादि तत्त्वांवर आधारलेल्या पंथांवर संस्कार करून त्यांनी चातुर्यामिक धर्माची स्थापना केली. हे चातुर्याम ( चार तत्त्वें ) खालीलप्रमाणे आहेत.

( १ ) अहिंसा—कोणत्याहि प्रकारच्या जीवजन्तूंची हिंसा न करणें.

( २ ) सत्य – कोणत्याहि प्रकारें खोटें न बोलणें.

( ३ ) अस्तेय – कोणत्याहि न दिलेल्या वस्तूचा स्वीकार न करणें.

( ४ ) अपरिग्रह – कोणतीहि बाह्य वस्तु जवळ न ठेवणें.

या चातुर्यामिक धर्मात सुधारणा करून महावीराने आधुनिक जैन धर्माची स्थापना केली.

महावीर ( इ. स. पूर्व ५९९–५२७ ).

बिहारांतील वैशाली शहराजवळील क्षत्रियकुंडग्रामांतील सिद्धार्थ आणि त्रिशला नांवाच्या राजदांपत्याचा महावीर हा दुसरा मुलगा. महावीरांचा जन्म इ. स. पूर्वी ५९९ मध्ये झाला. त्यांचें मूळ नांव वर्धमान होतें. परंतु, बालपणापासूनच ते वीरवृत्तीचे असल्यामुळे ते 'महावीर' या नांवाने प्रसिद्धि पावले.

वर्धमान लहानपणापासूनच संन्यस्त वृत्तीचे होते; तथापि, आईवडिलांच्या आग्रहाखातर ते संसारांत राहिले होते. त्यांचा यशोदा नामक एका राजकन्येशीं विवाह झाला होता व त्यांना प्रियदर्शना नांवाची एक मुलगीहि झाली होती. वर्धमानांच्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्यांचे आईवडील स्वर्गस्थ झाले. तेव्हा वर्धमानांनी संसारत्याग करण्याचा विचार केला. परंतु, नंदिवर्धन नांवाच्या ज्येष्ठ बंधूंच्या आग्रहाला मान देऊन ते आणखी दोन वर्षे संसारांत राहिले. तिसाव्या वर्षी गृहत्याग करून ते संन्यासी बनले. त्यांनी १२ वर्षे घोर तपश्चर्या केली आणि अनेक हालअपेष्टा सोसल्या. वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी त्यांना 'केवलज्ञाना'चा साक्षात्कार झाला व ते जीवन्मुक्त बनले. त्यानंतर तीस वर्षे त्यांनी अनेक देशांचा प्रवास केला आणि धर्मप्रचाराचें कार्य केलें. इंद्रियें व वासना यांवर त्यांनी जय मिळविल्यामुळे ते 'जिन' नांवाने प्रसिद्ध झाले व त्यांच्या अनुयायांना लोक जैन म्हणूं लागले. इ. स. पूर्वी ५२७ सालीं दिवाळीच्या रात्रीं पावापुरी येथे महावीरांचें निर्वाण झालें. त्यावेळीं त्यांचें वय ७२ वर्षांचें होतें.

पार्श्वनाथांच्या चातुर्यामांतील अपरिग्रहाच्या नियमांत स्त्रीसंग आणि ऐहिक वस्तूंचा उपभोग या दोहोंचा अंतर्भाव होत होता. परंतु, याबाबतींत कोणत्याहि प्रकारची संदिग्धता राहूं नये यासाठी महावीरांनी त्या एका नियमाचे दोन नियम बनविले.

( ४ ) ब्रह्मचर्य—कोणत्याहि प्रकारें स्त्रीसंग करूं नये.

( ५ ) अपरिग्रह-जरूरीच्या साधनांचाहि त्याग करणें.

या पांच नियमांना 'महाव्रतें' असें म्हणतात आणि हीं महाव्रतें महावीराने आपल्या शिष्यांना शिकविलीं.

## धर्मग्रंथ : आगम

जैन धर्मग्रंथांना 'आगम' असें म्हणतात. या धर्मग्रंथांच्या पहिल्या विभागांत चौदा पूर्वे होते आणि मागाहून बारा अंगें रचण्यांत आलीं होतीं, असें म्हणतात. परंतु, आज मात्र चौदा पूर्वे व त्यांना सामावून घेणारें 'दृष्टिवाद' नांवाचें बारावें अंग उपलब्ध नाही. अंगें आणि इतर आगम हें साहित्य महावीरांच्या निर्वाणानंतर दोनशें वर्षांनी रचिलें गेलें असें कळतें. त्या सर्वांना प्रमाण म्हणून स्वीकारण्याच्या बाबतींत जैनांच्यामध्ये मतभेद आहेत. मूर्तिपूजा न करणारे स्थानकवासी जैन केवळ बत्तीस आगमांनाच प्रमाण मानतात, तर मूर्तिपूजा करणारे श्वेतांबर जैन पंचेचाळीस आगमग्रंथांना प्रमाण म्हणून मानतात. कित्येक जैन तर चौऱ्याऐशीं ग्रंथांना प्रमाण मानतात. सगळे मूळ 'आगम' ग्रंथ नष्ट झाले असें दिगंबरांचें मत आहे. महावीरांच्या काळांत उत्तर भारताच्या मध्यप्रदेशांत जी अर्धमागधी नांवाची प्राकृत भाषा प्रचलित होती त्याच भाषेंत जैनांच्या आगमग्रंथांची रचना झालेली आहे. वैदिक धर्माचे सारे धर्मग्रंथ संस्कृत भाषेंत रचले गेले तर जैन व बौद्ध धर्मांचे धर्मग्रंथ लोकभाषेंत रचिले गेले. त्यामुळे या दोन धर्मांचा उत्तम प्रकारें प्रसार झाला.

**सिद्धान्त** : जैन धर्माचे मुख्य सिद्धान्त खालीलप्रमाणे आहेतः—

ईश्वरासारखें परमतत्त्व मानण्यांत येत नाही. लौकिक अगर अलौकिक शक्तींमध्ये देवता असतात ह्या वैदिक सिद्धान्ताचा त्याग करण्यांत आला आहे. कोणत्याहि देवाची प्रार्थना करण्याची आवश्यकता नाही. हें जग ईश्वराने उत्पन्न केलें असें मानण्याची जरूरी नाही. वैदिक धर्मांत परमतत्त्व ब्रह्म हें अज्ञेय व पापपुण्यातीत असें मानलेलें आहे. त्यामुळे या बाबतींत जैन धर्म वैदिक धर्माहून वेगळा उमटून पडतो.

कर्मसिद्धान्त हें जैन धर्माचेंहि हिंदु धर्माप्रमाणेच वैशिष्ट्य होय. पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचें फळ चालू जन्मीं मिळतें असें सांगणारा, नीतीवर आधारलेला असा हा सिद्धान्त आहे. गेल्या जन्मीं जीं कार्यें केलेलीं असतील त्यांतून पापपुण्याचा उद्भव होतो आणि त्यांचें फळ भोगण्यासाठी या दुःखमय संसारांत पुनःपुन्हा जन्म घ्यावा लागतो. कर्म ही

एक अव्यक्त शक्ति असून ती नेहमी कार्य करीत असते. प्रयत्नांच्या साह्याने तिचें ज्ञान मिळवितां येतें आणि तिचा नाशदेखील करतां येतो.

मनुष्याचा निर्मळ, अमर, नित्य आत्मा जेव्हा शरिराशीं संलग्न होतो तेव्हापासून दुःखांची परंपरा चालू होते. जड पदार्थ ऊर्फ प्रकृति आणि चेतन पदार्थ ऊर्फ आत्मा हे दोन्ही एकमेकांहून निरनिराळे पदार्थ होत. त्यामुळे जैन धर्म द्वैतवादी ठरतो. मोक्ष म्हणजे अंतिम अवस्था अथवा निर्वाण. या अवस्थेंत जीवात्मा शरिराच्या उपाधि, आसक्ति आणि सर्व पूर्वकर्में यांतून मुक्त होतो. प्रत्येक मुमुक्षूने आत्म्यास मोक्ष मिळावा यासाठी महावीराप्रमाणे स्वतःचें शरीर खूप झिजविलें पाहिजे आणि इंद्रियें व वासना जिंकावयास हवींत, अशी जैनांची समजूत आहे.

## तीन रत्नें

मोक्षप्राप्तीसाठी **तीन रत्नें** मान्य करण्यांत आलेलीं आहेत. **दर्शन, ज्ञान** आणि **चारित्र्य** हीं तीन मोक्षप्राप्तीचीं खरींखुरीं साधनें होत. दर्शन — सम्यक्-दर्शन—म्हणजे खराखुरा सिद्धान्त पाहणें. हा सिद्धान्त तीर्थंकर भगवानाने उपदेशिला आहे. **ज्ञान** म्हणजे ज्याच्या योगाने पदार्थांचें खरें स्वरूप समजूं शकतें तें म्हणजे तत्त्वज्ञान. सर्वोत्कृष्ट ज्ञानास **'केवलज्ञान'** असें म्हणतात. केवलज्ञान प्राप्त झालेले संसारांतून मुक्त होऊं शकतात. **चारित्र्य** म्हणजे सदाचार. अशा प्रकारें श्रद्धापूर्वक धर्मग्रंथांचें अध्ययन करून शास्त्राज्ञा-प्रमाणे जीवन व्यतीत केल्याने मोक्ष मिळूं शकतो. चारित्र्यसिद्धीसाठी पांच महाव्रतांखेरीज **पांच समित्या** ( सदाचार ) [अ], **तीन गुप्ति** ( रक्षण ) [ब] आणि **चार भावना** [क] या तिहींची आवश्यकता असते.

---

### ( अ ) पांच समित्या

पांच समित्या पुढीलप्रमाणे आहेत. ( १ ) इर्या–जीवजन्तु पायांखालीं चिरडले जातात म्हणून रात्रीं चालावयाचें नाही; ( २ ) भाषा–नेहमी हितप्रद, मधुर व सत्य बोलणें; ( ३ ) एषणा–पदरीं दोष येणार नाही अशाप्रकारें भिक्षा मागणें; ( ४ ) आदान–निक्षेपणा–पदरीं दोष येणार नाही अशाप्रकारें वस्तू घेणें व ठेवणें आणि ( ५ ) प्रतिष्ठापना–पाप लागणार नाही अशाप्रकारें शरिरांतील मलिन पदार्थ टाकणें.

( ब ) **गुप्ति** म्हणजे रक्षण करणें; आत्म्यास दोष लागूं नये यासाठी त्याचें मन, वाणी आणि शरीर यांपासून संरक्षण करणें. मनोगुप्ति, वाग्गुप्ति आणि कायगुप्ति या तीन प्रकारच्या गुप्तींच्या द्वारे अनुक्रमें ( १ ) मनांत हिंसा इत्यादींचें चिंतन न करणें ( २ ) खोटें किंवा कोपयुक्त भाषण न करणें आणि ( ३ ) चोरी न करणें. अशा प्रकारचा उपदेश करण्यांत आला आहे.

( क ) **भावना** म्हणजे मनांत सद्भावना बाळगणें. प्राणिमात्रांविषयी मैत्रीची

जैन धर्मीय नऊ पदार्थ मानतातः–( १ ) जीव ( २ ) अजीव ( ३ ) पुण्य ( ४ ) पाप ( ५ ) आस्रव ( ६ ) संवर ( ७ ) निर्जरा ( ८ ) बन्ध आणि ( ९ ) मोक्ष. पहिले चार व अखेरचे दोन पदार्थ यांचा अर्थ सहजासहजीं समजण्यासारखा आहे. आस्रव ( आ + स्रु – वाहणें ) म्हणजे या संसारांतील विषय इंद्रियांच्या वगैरे द्वारा आत्म्यांत पोसले जाऊन आत्म्यास बिघडवितात, ह्या प्रकारास आस्रव म्हणावयाचें. क्रोध, अभिमान, कपट आणि लोभ हे चार आत्म्यास बिघडविणारे दोष आहेत, त्या वृत्ति आहेत, त्यामुळे त्यांना कषाय वृत्ति असें म्हणतात. आस्रवाचें निवारण करणारा जो पदार्थ त्यास संवर म्हणतात. ( सम् + वृ – रोखणें, निवारणें ). तीन गुप्ति आणि पांच समित्यांची गणना संवरांत करण्यांत येते. **निर्जरा** म्हणजे तपश्चर्या वगैरे साधनांच्या साह्याने कर्मांचें निर्दोलन करणें, कर्मक्षय करणें.

जैनधर्मांत जीवाविषयी जो विचार करण्यांत आलेला आहे तो अतिशय आकर्षक आहे. वेगवेगळया पदार्थांत–स्थावर पदार्थांतसुद्धा–एक प्रकारचें चैतन्य असतें, एकेन्द्रिय, द्वीन्द्रिय इत्यादि प्रकार असतात. चालू युगांत श्री. जगदीशचंद्र बोसांनी जो शोध लाविला तो जैन धर्मांत आढळून येतो.

## स्याद्वाद

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत स्याद्-वादाच्या रूपाने जैन धर्माने फार महत्त्वाची भर घातली. वस्तूचें वेगवेगळया बाजूंनी अवलोकन करणें याचें नांव स्याद्-वाद. ज्याप्रमाणे एका ढालीच्या दोन बाजू असतात आणि दोन्ही बाजू आपापल्या परीने खऱ्याच असतात त्याप्रमाणे एकच पदार्थ वेगवेगळया दृष्टिकोणांतून निरनिराळा भासतो व पदार्थाचीं हीं विविध रूपें त्या त्या दृष्टिकोणांतून खरींच असतात, हें स्याद्वादाचें तात्पर्य आहे. स्यात्— म्हणजे या अपेक्षेने, ह्या दृष्टिकोणांतून व्हावें. या वादाच्या साह्याने वेगवेगळया मतप्रणालींचा सुन्दर समन्वय साधून जगांत अविरोध साध्य करतां येतो. स्वामी रामकृष्ण परमहंसदेखील ‘ हत्ती आणि सात आंधळे ’ ह्या गोष्टीचा दाखला देऊन सर्वधर्मसमन्वय साधीत असत.

## संघ

वैदिक धर्मामध्ये असलेल्या वर्णव्यवस्थेचा महावीरांनी त्याग केलेला आहे. आणि अशाप्रकारें जैन धर्म वैदिक धर्माहून वेगळा झाला आहे. महावीरांनी वर्णव्यवस्थेच्या ऐवजी स्वतःच्या शिष्यांचा साधु, साध्वी, श्रावक व श्राविका असे चार घटक असलेला संघ स्थापन केला आहे. या संघांत सामील होण्याची ज्याची इच्छा असते, त्यास संघांत येतां येते. तथापि,

भावना बाळगावी. गुणी माणसांना पाहून आनंद मानावा म्हणजे प्रसन्न व्हावें, उपदेश करण्याच्या वेळीं चांगल्याप्रकारें समजावून सांगूनहि ज्यांना आकलन होत नाही अशांविषयी मध्यस्थभाव म्हणजे उपेक्षावृत्ति बाळगावी. तसेंच दीनदुःखितांबद्दल सहानुभूति बाळगावी. अशाप्रकारें मैत्री, आनंद, मध्यस्थ आणि कारुण्य ह्या चार भावना आहेत.

समाजव्यवस्थेच्या कोणत्याहि रचनात्मक योजनेच्या अभावीं जैन धर्म रूढ झालेल्या वर्णव्यवस्थेच्या प्रभावापासून अलिप्त राहूं शकला नाही. जैन धर्मांत मागाहून जे देव मान्य करण्यांत आले त्यांचाहि सामाजिक स्थितीच्या अनुरोधाने अनुक्रम लावण्यांत आला.

## जैन

हाडाचा जैन हा नम्र व संन्यस्त असतो. तो कुणालाहि दुखवत नाही अथवा कुणाविषयीहि मनांत वैरभाव बाळगत नाही किंवा कुणावरहि सूड उगवत नाही. राग आणि द्वेष या दोहोंचा जैनाने त्याग करावयाचा असतो. अहिंसा, संयम आणि तपश्चर्या हीं सर्वांचें लक्ष वेधून घेणारीं तत्त्वें आहेत. आदर्श जैनाने पांचहि महाव्रतें व इतर व्रतेंदेखील पाळावयाचीं असतात.

## शाखा

जैन धर्माच्या दोन मुख्य शाखा आहेत. त्या म्हणजे (१) श्वेतांबर व (२) दिगंबर. अशी एक आख्यायिका सांगतात की, इ. स. पूर्वी ३१० च्या सुमारास उत्तर हिंदुस्थानांत फार मोठा दुष्काळ पडला. त्यावेळीं साधु लोक इतरांना छळूं लागले. त्या समयीं भद्रबाहु व इतर सुमारें बारा हजार जैन दक्षिणेंत म्हैसूरच्या रोखाने निघाले आणि तेथे पोंचल्यावर त्यांनी घोर तपश्चर्येस प्रारंभ केला. कपडे नेसावयाचे की नाही याविषयी पुष्कळ वादविवाद झाला, आणि मतभेदांमुळे इ. स. ८२ च्या सुमारास जैन धर्मांत दोन गट पडले. दक्षिणेंत गेलेले साधु वस्त्रें नेसत नसत त्यामुळे त्यांना व त्यांच्या अनुयायांना लोक दिगंबर (दिक् + अंबर–दिशा हेंच ज्यांचें वस्त्र आहे असे) म्हणूं लागले, व उत्तर भारतांतील जैनांना श्वेतांबर (शुभ्र वस्त्रें नेसणारे) म्हणूं लागले. या दोन शाखांत मूर्तिपूजेच्या बाबतींतहि मतभेद आहे. दिगंबर जैन मूर्तींनादेखील वस्त्रें नेसवीत नाहीत. स्त्रियांना मोक्ष मिळूं शकत नाही अशी दिगंबरांची धारणा आहे. त्यामुळे त्या पंथांत साध्वी आढळून येत नाहीत. जेव्हा सत्कृत्यें करून स्त्री पुरुषाचा अवतार घेईल तेव्हाच तिला मोक्ष मिळूं शकेल. श्वेतांबरांच्या पंथांत अनेक साध्वी होऊन गेल्या आहेत.

इ. स. १४७४ मध्ये एका श्वेतांबर सुधारकाने असें दाखवून दिलें की, जैन आगम-ग्रंथांत मूर्तीची नांवनिशाणीदेखील नाही. त्यामुळे त्याने मूर्तिपूजेचें खंडन करून स्थानकवासी नांवाचा एक तिसरा पंथ काढला. श्वेतांबर व स्थानकवासी यांचे अनेक गट पडले आहेत.

## धर्माचा प्रसार

जैन धर्माचीं, त्याच्या अडीच हजार वर्षांच्या इतिहासांत, अनेक स्थित्यंतरें झालीं आहेत. अनेक राजांनी त्या धर्माचा स्वतः स्वीकार करून त्याच्या प्रसारासाठी प्रयत्न केले आहेत. जैनांनी जगाला अव्वल दर्जाचें साहित्य दिलें आहे. इतकेंच नव्हे, तर चित्रकला व

शिल्पकला यांच्या विकासालाहि जैन धर्माने हातभार लावला आहे. महावीराच्या नंतरच्या काळांत अशा अनेक घटना घडून आल्या की, ज्यांच्या योगें जैन धर्मास स्थैर्य प्राप्त होऊन त्याचा खूप प्रसार झाला. उदा० इ. स. पूर्वी ४०० च्या सुमारास जैन मंदिरांतून महावीराच्या पूजेस प्रारंभ झाला. इ. स. पूर्वी ३०० च्या आसपास जैन आगम ग्रंथांच्या पहिल्या दोन विभागांची व्यवस्था लावण्यांत आली. अशोकाच्या संप्रति नामक नातवाने जैन मंदिरें बांधवून जैन धर्माच्या प्रसारास मदत केली ( इ. स. पूर्वी २३० चा सुमार ). मल्लवादी, सिद्धसेन दिवाकर इत्यादि महापंडितांनी उत्तमोत्तम धार्मिक ग्रंथ लिहून धर्मास दृढता प्राप्त करून दिली ( इ. स. ५५० ). गुजरातच्या कुमारपाल राजाने जैन धर्माची दीक्षा घेऊन जैन मंदिरें बांधलीं आणि धर्मप्रसार केला ( इ. स. ११२५-११५९ ). अकबर बादशहासहि जैन धर्माबद्दल सहानुभूति वाटत असल्यामुळे त्याने जैनांच्या अहिंसा-तत्त्वास मान देऊन, राज्यांत वर्षातून सहा महिने कोणीहि प्राणिवध करूं नये, असा एक हुकूम काढला.

## जैन धर्म व हिंदु धर्म यांची तुलना

भारतांतील महापुरुषांनी जे धर्म स्थापलेले आहेत त्यांमध्ये जैन धर्म आद्य आहे. वैदिक धर्म जैन धर्माहून प्राचीन आहे आणि तो भारताचा स्वाभाविकपणेंच मुख्य धर्म बनलेला आहे. या दोन धर्मांत पहिल्यापासूनच कांही तत्त्वें सारखीं आहेत. आणि कांही तत्त्वें वेगळीं आहेत. कालान्तराने या दोन धर्मांत कित्येक समान तत्त्वें शिरलीं आहेत.

## सुरुवातीच्या काळांतील समान तत्त्वें

वयाच्या तिसाव्या वर्षी महावीराने धर्मप्रसाराचें कार्य सुरू केलें आणि जैन धर्म हळूहळू स्वतंत्र दर्शनरूपाने विकसित झाला. महावीरांनी ह्या प्रकारच्या चळवळीस प्रारंभ केल्यानंतरहि ते वैदिक धर्माच्या कर्म आणि पुनर्जन्म या दोन सिद्धान्तांना चिकटून राहिले होते.

## सुरुवातीच्या काळांतील असमान तत्त्वें

जैन धर्मांत सुरवातीच्या काळापासूनच कांही विशिष्ट तत्त्वेंहि होतीं. वैदिक धर्माच्या ईश्वरवादास जैन धर्माचा पहिल्यापासून विरोध आहे. कोणत्याहि प्रकारची देवता जैन धर्म मानत नाही. वैदिक धर्माच्या अद्वैतवादांत जीव आणि जगत् हीं दोन्ही परमात्म्याचीं रूपें आहेत, असें जें मानण्यांत आलेलें आहे, त्याचें जैन धर्माने खंडन केलें आहे आणि द्वैतवादाचा उपदेश केला आहे. जैन धर्मानुसार परमात्मा नांवाचा कोणताहि पदार्थ नाही आणि जीव आणि जगत् हे दोन पदार्थ सत्य आहेत. वैदिक धर्मांतील यज्ञयागांत जी पशुहिंसा होत होती, तिला जैन धर्माने सक्त विरोध केलेला आहे. हिंसेऐवजी महावीरस्वामींनी तपश्चर्या, संयम आणि अहिंसेचा उपदेश केला आणि सदरहू तत्त्वांचा प्रसार करण्याचा प्रयत्नहि केला. वैदिक धर्मप्रणीत चातुर्वर्ण्यव्यवस्थेसहि जैन धर्म सुरवातीपासूनच

विरोध करीत आला आहे. तपश्चर्या करणारा मनुष्य व धार्मिक जीवन घालविणारा मनुष्य हे दोघे एकसारखेच होत, असें जैनांचें मत आहे.

वैदिक धर्मांत ऋत्विज–यज्ञ करविणारे ब्राह्मण–आणि देव यांच्या मदतीने स्तुति आणि यज्ञ करण्यांत येत असत. तसेंच या दोन साधनांनी मोक्ष मिळतो असें मानण्यांत येत असे. जैन धर्मास ही कल्पना मान्य नव्हती. जैन धर्म असा उपदेश करतो की, केवळ स्वाश्रयाने आत्म्याचा उद्धार होऊं शकतो. वैदिक धर्माचे ग्रंथ-वेद, उपनिषदें वगैरे-सामान्य लोकांना अनाकलनीय अशा संस्कृत भाषेंत रचलेले आहेत. जैन धर्मास ही गोष्ट रुचली नाही. म्हणून उपदेश करण्यासाठी आणि सिद्धान्तग्रंथ रचण्यासाठी लोकांच्या बोलीभाषेचा उपयोग करण्यांत आला.

## मागाहून प्रविष्ट झालेलीं समान तत्त्वें

वैदिक धर्म आणि जैन धर्म या दोघांचा दीर्घकाळपावेतो बरोबरीनेच प्रचार होत होता. त्यामुळे नवा व अनुयायांची कमी संख्या असलेला जैन धर्म कांही बाबतींत जुन्या आणि अतिविशाल वैदिक धर्माशीं एकरूप झाला आहे. आज जैन धर्म आणि वैदिक धर्म हे दोन्ही धर्म सगुण ईश्वरास मानतात. जैन धर्मांत तीर्थंकरांना आणि मुख्यत्वेंकरून महावीरस्वामींना देव म्हणून मानण्यांत येतें आणि वैदिक धर्मांत मुख्यत्वेंकरून राम, कृष्ण, विष्णु व शिव यांची देव म्हणून पूजा करण्यांत येते. आज जैनधर्मांत तसेंच वैदिक धर्मांत अनेक देवतांना मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यांत मूर्तिपूजा रूढ आहे, अनेक मंदिरें आहेत, अनेक जातींचे गट आहेत.

ज्या बाबींमुळे जैन वैदिक वर्गाहून वेगळे झाले होते, त्या बाबींविषयी आज ते फारसा आग्रह धरीत नाहीत. इतकेंच नव्हे तर ते एकमेकांत बरेच मिसळून गेले आहेत. एकमेकांत लग्नसंबंधहि होऊं लागले आहेत. सर्व व्यवहारांत आता एकता आलेली आहे. वस्तुतः, या दोन धर्मामुळे निर्माण झालेला दुरावा आज समाजांतून नष्ट होत आहे ही भारताच्या दृष्टीने हितप्रद घटना होय.

## मूल्यमापन

जैन धर्माच्या सुरुवातीस **आजीविकांचा** पंथ चालत होता. हा पंथ जैन धर्मासारखाच होता. त्याचा संस्थापक गोसाल ( संस्कृत–गोशाला ) हा एक साधुपुत्र होता. त्याचे रीतिरिवाज महावीर व बुद्ध या उभयतांना रुचत नसत. गोसालाच्या मृत्यूनंतर त्याचे अनुयायी दिगंबर जैनांना येऊन मिळाले. सध्या गोंड जिल्ह्यांत ( उत्तरप्रदेश ) सहेत–महेत (Sahet–mahet) नांवाच्या ठिकाणीं उत्खननप्रसंगीं ज्या वस्तु हातीं आल्या आहेत त्यांवरून असें समजतें की, बुद्धानंतर श्रावस्ती शहर जैनांचें आणि विशेषतः आजीविकांचें

मुख्य ठिकाण (धाम) बनलें होतें, परंतु, अशोकाच्या वेळीं त्या ठिकाणीं पुनश्च बौद्ध धर्माचा प्रभाव पडण्यास सुरुवात झाली. इसवी सनापूर्वीचें सहावें शतक या दृष्टीने अतिशय महत्त्वाचें आहे. जैन धर्मासारख्या धर्मांनी वैदिक धर्मातल्या यज्ञयागांत होणारी हिंसा ब्राह्मणांची श्रेष्ठता, वर्णांची असमानता आणि शूद्रांविषयी प्रेमाचा अभाव या सर्वांविरुद्ध बंड पुकारलें. प्रजेंत असंतोष भडकला होता. त्याचा फायदा जैन धर्मास मिळाला आणि त्या धर्माच्या अनुयायांची संख्या वाढूं लागली. आज जैन धर्माचे अनुयायी गुजरातेंत, सौराष्ट्रांत आणि राजस्थानांत अधिक प्रमाणांत आढळून येतात.

जैनधर्मानें वर्णभेद नष्ट केला आहे, यज्ञांत होणाऱ्या पशुहिंसेस आळा घातला आहे, पूजाविधीचा विस्तार करून एका विशिष्ट प्रकारच्या भक्तीचें पोषण केलें आहे आणि व्रतांविषयी आग्रह धरून जीवन संयमपूर्ण केलें आहे. पर्युषणाच्या दिवसांत जैन एकत्र येतात आणि एकमेकांना मिच्छामि दुक्कडम् ( तुझें खोटेंनाटें कर्म मी माफ करतों ) असें म्हणून ते एकमेकांस क्षमा करतात, परस्परांचीं वाईट, खोटींनाटीं कृत्यें विसरतात आणि परस्परांवर अधिक प्रेम करूं लागतात. सहिष्णुता आणि प्रेमभावना यांची शिकवण देण्याच्या दृष्टीने ही प्रथा खरोखरीच चांगली आहे.

जैन धर्माचे जणुं आधारस्तंभ असलेले उमास्वाति, सिद्धसेन दिवाकर, मल्लवादी, हेमचन्द्रसुरी इत्यादि आचार्य, इतर मुनि आणि जैन पंडित या सर्वांनी उच्च दर्जाचे धार्मिक आणि तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ रचलेले आहेत. परंतु, त्यांखेरीज संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादि भाषांतील साहित्याच्या विकासालाहि त्यांनी फार मोठ्या प्रमाणांत हातभार लावला आहे. हेमचन्द्राचार्यांना त्यांच्या बहुशास्त्र ज्ञानामुळे कलिकालसर्वज्ञ हें बिरुद लाभलें आहे. त्यांच्या सिद्ध-हैम-व्याकरण ग्रंथाची गुजरातच्या महाराज सिद्धराजांनी हत्तीवरून मिरवणूक काढून आचार्यांचा भव्य सत्कार केला होता. सिद्धराजांनंतर गादीवर आलेले महाराज कुमारपाळ तर आचार्यांचे अनुयायी होते. गुजरातेंत जैन धर्म स्थिरपद करण्यांत कुमारपाळांचा फार मोठा वांटा आहे. हीरविजयसुरींनी अकबर बादशहास जैन धर्माच्या सिद्धान्तांचा व विशेषेंकरून अहिंसेच्या तत्त्वाचा उपदेश केला. त्याचा बादशहाचे मनावर परिणाम होऊन त्याने गुजरातेंत चालूं असलेला जिझिया कर बंद केला आणि वर्षांतून सहा महिने कोणत्याहि प्राण्याचा वध करूं नये असा हुकूमहि फर्माविला होता. जेसलमेर, पाटण, खंबायत आणि इतरत्र ज्ञानभांडारें उघडून जैनांनी आपल्या धार्मिक ग्रंथांचें उत्तमप्रकारें संरक्षण केलें आहे. अशा भांडारांमुळे जैन धर्मग्रंथांबरोबरच इतर धर्मांचे ग्रंथ आणि साहित्यकृति यांचें मुसलमानी हल्ल्यांपासून संरक्षण झालें आहे. या कामगिरीबद्दल जैन खरोखरीच धन्यवादास पात्र आहेत.

जैनांनी आपल्या तीर्थक्षेत्रांचे ठिकाणीं भव्य मंदिरें बांधलीं आहेत. त्यांतील शिल्पकला, कारागिरी, खोदकाम हीं सर्वांना आश्चर्यचकित करून टाकणारीं आहेत. अबू व शत्रुंजयाच्या

देवळाची भव्य कला, पार्श्वनाथ वगैरेंच्या मूर्तींची कलाकुसर, यन्त्रपट व पोथ्या यांतून आढळणारी कला ही जैन धर्माची खरीखुरी सिद्धि आहे. आज युरोप-अमेरिकेंतील कलारसिक विद्वान् या जैन कलेच्या अभ्यासासाठी हिंदुस्थानांत येतात. कला हें ईश्वराचें स्वरूप होय. कला म्हणजे दिव्यतेची खूण होय. " A thing of beauty is a joy for ever," या कीट्सच्या उक्तीप्रमाणे, त्या दिव्यतेच्या भावनेने जैनांना प्रेरणा दिली असें मानण्यांत येतें.

वैदिक धर्माच्या अनुयायांबरोबरच राहावें लागल्यामुळे जैनांच्या अनेक सामाजिक चालीरीति बदलल्या आहेत. त्यामुळे उभयधर्मांतील भेद जाणवत नाही. ते एकमेकांत मिळून मिसळून गेले आहेत. वैष्णवांशीं त्यांचे रोटी-बेटी-व्यवहार सुरू झाले आहेत. गुजरातेंत हे दोन धर्म परस्परांत विलीन झाले आहेत. व्यवहारांत तर कोणत्याहि प्रकारचा भेदभाव उरलेला नाही. जैन धर्म भारतांत उत्पन्न झाला, भारतांतच त्याचा प्रचार-प्रसार झाला आणि भारतांत तो आजतागायत चालूं आहे. परंतु वैदिक धर्माच्या विरुद्ध अशी जी प्रवृत्ति सुरवातीच्या काळांत होती, ती आता नष्ट होत आहे. गुजरातेंत जैन, वैष्णव व शैव या तिन्ही धर्मांचे अनुयायी आहेत परंतु ते एकमेकांशीं अतिशय सलोख्याने वागतात; त्यांच्यांतील भेदभाव नष्ट झाला आहे, ही गोष्ट प्रशंसनीय आहे.

## ३ बौद्ध धर्म

जगांत वेगवेगळ्या देशांमध्ये प्रसार पावलेल्या धर्मांत बौद्ध धर्म सर्वांत जुना आहे. एके काळीं उभ्या आशिया खंडांत या धर्माचा प्रसार झाला होता. आज पश्चिम आशियांत व भारतांत त्याचें अस्तित्व जवळजवळ नाहीच; तथापि, चीन, जपान, आग्नेय आशिया, ब्रह्मदेश आणि लंका या देशांत तो चांगलाच फैलावलेला आहे. जगाच्या लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोक हा धर्म पाळतात. म्हणजे हा जगांतला मोठ्यांतला मोठा धर्म होय. परंतु नवलाची गोष्ट अशी की, ज्या भारतांत त्याची उत्पत्ति झाली व ज्या भारतामधून त्याच्या प्रसारास प्रारंभ झाला, त्या भारतांत मात्र तो जवळजवळ नेस्तनाबूद झाला आहे. त्याचें पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न भारतांत चालूं आहेत, हें सुचिह्न होय.

### गौतम

बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध या नांवाने प्रसिद्ध आहेत. त्यांचें मूळ नांव सिद्धार्थ होतें. काशीच्या उत्तरेस शंभर मैलांवर असलेल्या नेपाळांतील कपिलवस्तु नामक नगराच्या शाक्यजातीच्या शुद्धोदन नामक एका समृद्ध राजाच्या घराण्यांत सिद्धार्थाचा जन्म इ. स. पूर्वी ६२३ मध्ये झाला. त्यांची आई मायादेवी त्यांच्या जन्मानंतर सातव्या दिवशीं मरण पावली. त्यामुळे महाप्रभावती नामक त्यांच्या मावशीने त्यांचें पालनपोषण केलें.

**महान् त्याग ( वय-२९ वर्षें )**

बाळपणापासूनच गौतम वृत्तीने विरागी होते. पुष्कळदां ते आपल्या वडिलांच्या शेतांत एखाद्या झाडाखाली ध्यानस्थ स्थितींत बसून राहत असत. त्यांनी संसारांत लक्ष घालावें, त्यांचे ठिकाणीं संसाराबद्दल गोडी, आसक्ति निर्माण व्हावी, यासाठी त्यांचे वडील खूप प्रयत्न करीत असत. त्यांच्या वडिलांनी त्यांचें लग्न गोपा ऊर्फ यशोधरा नामक एका सुस्वरूप राजकन्येशीं लावून दिलें होतें. गौतमांना राहुल नामक एक मुलगाहि झाला होता. तरीसुद्धा त्यांना संसाराबद्दल गोडी वाटत नसे. ते स्वतःच सांगतात की,

“सर्वसामान्य अडाणी मनुष्य स्वतः वृद्धावस्थेंत असतांनाहि वृद्ध माणसाचा तिरस्कार करतो, वृद्धाचा त्याला उबग येतो. परंतु, मला स्वतःला वृद्धावस्था प्राप्त होणारी असतांनाहि जर मी सर्वसामान्याप्रमाणे म्हाताऱ्यांचा तिरस्कार करूं लागलों, जर त्यांच्याबद्दल मला उबग वाटूं लागला, तर तसें वागणें मला शोभणार नाही. या विचाराने माझा तारुण्यमद नष्ट झाला.” व्याधिग्रस्त आणि मृत शरीर यांसंबंधीच्या अशाच प्रकारच्या विचारांमुळे त्यांचा आरोग्य व जीवित यांविषयींचा उन्माद गळून पडला. ( १ ) एक वृद्ध पंगु मनुष्य ( २ ) एक व्याधिग्रस्त किळसवाणा मनुष्य ( ३ ) एक प्रेत आणि ( ४ ) कोणत्याहि वेदनेने प्रक्षुब्ध न होणारा एक शांत तपस्वी, हीं चार दृश्यें पाहून गौतमांच्या मनावर सखोल परिणाम झाला, असें जें मानण्यांत येतें तें त्यांचे वरील विचार लक्षांत घेऊन कल्पिलेलें असावें, असें वाटतें. त्यांचे मद, त्यांच्या स्पृहा नष्ट होतांच त्यांना असें कळून चुकलें की, आपल्याला इतर साऱ्या मनुष्यजातीप्रमाणेच जरा ( वृद्धावस्था ), व्याधि आणि मृत्यु हीं दुःखें भोगावयाचीं आहेत. ह्या जाणिवेने त्यांना अपरंपार दुःख झालें. आणि अखेरीस त्यांनी संसाराचा त्याग करून दृढ आत्मबलाच्या आधारें शाश्वत शांतीच्या मार्गाचा आणि दुःखाच्या कायमच्या निवारणाच्या मार्गाचा शोध करावयाचा, असा निश्चय केला. परिणामीं, अनेक प्रलोभनें त्यांना भुलविण्यास समर्थ असूनहि त्या सर्वांवर मात करून त्यांनी वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी स्वतःची पत्नी, स्वतःचा पुत्र, आणि पित्याचें ऐश्वर्य या सर्वांचा त्याग केला. त्यांनी मुंडन केलें आणि साधूचा वेश चढवून ते निघून गेले.

**मोक्षाच्या वाटेवर** ( वय वर्षें २९-३५ )

जीवात्मा व परमात्मा यांच्या परस्परसंबंधाविषयी तत्त्वज्ञानाच्या मदतीने चिंतन करणें हें वैदिक धर्मांतील सर्वोत्तम साधन होय. गौतम बुद्धांनी पूर्वी विश्वव्यापी दुःखाच्या कोणत्याहि प्रश्नाचा विचार केलेला नव्हता. गौतमांनी त्या प्रश्नाचें निराकरण करण्यास सुरवात केली व त्या कार्यांत वर सांगितलेल्या वैदिक धर्माच्या साधनाचा उपयोग केला. गौतम कांही काळ उद्दक रामपुत्र नांवाच्या योग्यांच्या मठांत राहिले; तेथे त्यांनी समाधीचें ज्ञान संपादिलें. तथापि, हृदयाची खरीखुरी शांतता त्यांना लाभली नाही. त्यामुळे तेथून ते निघून गेले. पुढे नयरंजना नदीच्या कांठावरील दुसऱ्या पांच तापसांबरोबर, पार्श्वनाथाच्या चातुर्यामिक धर्मांत

मोक्षप्राप्तीसाठी स्वीकारण्यांत आलेल्या पद्धतीप्रमाणे, गौतमांनी घोर तपश्चर्येस आणि देहदमनास प्रारंभ केला. पांच वर्षें अशीं निघून गेलीं. गौतमांनी ह्या पांच वर्षांत खूप हालअपेष्टा सोसल्या परंतु कांहीच फलनिष्पत्ति झाली नाही. त्यामुळे तो मार्गहि त्यांना अनुकूल वाटला नाही. त्यावेळीं त्यांना असें कळून चुकलें की, ज्याप्रमाणे आत्यंतिक भोगविलासांनी सत्य हातीं येत नाही, त्याप्रमाणेच आत्यंतिक देहदमन केल्यानेहि शांति मिळत नाही. या दोन मार्गांच्या मधला 'मध्यममार्ग'च मोक्षाच्या ध्येयाप्रत पोंचण्याचा सरळ मार्ग होय. त्यामुळे त्यांनी शरिराचे सर्वसामान्यपणें पोषण होईल इतका सात्विक आहार घेण्यास सुरुवात केली आणि एकीकडे चिंतन चालूंच ठेवलें. त्यावेळीं गौतम योगभ्रष्ट झाले असें मानून त्यांचे साथीदार संन्यासी त्यांना सोडून चालते झाले.

**दिव्य ज्ञान** ( वय ३५ )

एके रात्रीं जेव्हा गौतम एका पिंपळाच्या वृक्षाखाली बसून एकटेच ध्यानमनन करीत होते त्यावेळीं दुःखाचें मूळ कारण आणि त्याच्या नाशाचा उपाय त्यांनी शोधून काढला. बौद्ध धर्माचीं सर्वसाधारण चार मुख्य, सुंदर, आर्य तत्त्वें खालीलप्रमाणे आहेत :—

( १ ) जगांतील सारे पदार्थ दुःखमय आणि क्षणिक आहेत.

( २ ) आपल्या ठिकाणीं असलेल्या अतृप्त वासना हेंच सर्व दुःखांचें आदिकारण आहे.

( ३ ) त्यामुळे सगळ्या वासनांना दूर सारल्यास सारें दुःखहि लोप पावेल.

( ४ ) तरीसुद्धा जिवांत जीव असेतोपर्यंत प्रत्येकाने आठ सुंदर गुणांनी युक्त असलेल्या मार्गांनुसार वागावें. हा मार्ग पुढीलप्रमाणे आहेः—

खरीखुरी श्रद्धा, उच्च अभिलाषा, चांगलें भाषण, चांगलें कर्म, चांगली वागणूक, रास्त प्रयत्न, सद्विचार व चांगलें ध्यानमनन, ह्या मार्गास आर्य लोक अष्टांगिक मार्ग म्हणतात.

गौतमांना संपूर्णज्ञानाचा प्रकाश ज्या अवस्थेंत जाणवला, त्या अवस्थेस सामान्यपणें 'बुद्ध' म्हटलें जातें. ज्ञानप्राप्तीनंतर गौतमाला 'बुद्ध' हें पद कायमचें जोडण्यांत आलें. 'बुद्ध'पदप्राप्तीनंतर ते स्वतःच म्हणतात, "स्वर्गांत वा पृथ्वींत मिळणार नाही असा ज्ञानाचा संपूर्ण प्रकाश मला आता लाभला आहे. माझ्या हृदयाचा हा मोक्ष स्थिरदृढ आहे. हा माझा अखेरचा जन्म आहे. यानंतर मला पुनः जन्म घ्यावा लागणार नाही."

**जाहीर उपदेश** ( वय ३५–८० )

बुद्धांनी स्वतःच्या सिद्धान्तांचा प्रचार चालू केला. प्रथमतः पूर्वीं त्यांच्याबरोबर असलेल्या पांच संन्याशांना त्यांनी सारनाथापाशीं हुडकून काढून त्यांना आपले सिद्धान्त

समजावून सांगितले व त्यांना आपले शिष्य बनविले. तेव्हापासून **धर्मचक्रप्रवर्तनास** प्रारंभ झाला, असें म्हणतां येईल.

उत्तर हिंदुस्थानांत स्वतःची जन्मभूमि जो मगधदेश तो त्यांनी पूर्णपणें पालथा घातला. तेथे त्यांनी, आर्य अष्टांगिक मार्गाचें अनुकरण केल्यास मोक्ष मिळतो, ह्या आपल्या सिद्धान्ताच्या उपदेशास प्रारंभ केला. त्यांनी असें सांगावयास सुरुवात केली की, ज्या माणसास मोक्षप्राप्तीची इच्छा असेल त्याने देवता, पूजा, कर्मकांड, इतर श्रद्धा, पुरोहिताची मदत अथवा दैवी तत्त्वांचें साह्य इत्यादि रूढ झालेल्या धार्मिक बाबींत मन घालण्यापेक्षा स्वतःच्या चित्तवृत्तींवर ताबा मिळविणें, त्या जिंकणें हें अधिक चांगलें. बुद्धांनी विशेषें-करून वैदिक धर्माच्या व्यवहारातीत परतत्त्वाविरुद्ध, प्रार्थनांच्या माहात्म्याविरुद्ध आणि वेदांच्या पवित्रतेच्या भावनेविरुद्ध बंड पुकारलें होतें.

जेव्हा त्यांच्या शिष्यांची संख्या साठापर्यंत पोहोचली, तेव्हा स्वतःचा उपदेश लोकांपर्यंत पोचविण्यासाटी त्यांनी आपल्या शिष्यांना देशाच्या वेगवेगळ्या भागांत धाडलें. गौतम बुद्धाचा मोक्षमार्ग ब्राह्मणधर्माच्या मोक्षमार्गापेक्षा अधिक सहजतेनें अनुसरण्यासारखा आहे हें त्यांनी जेव्हा लोकांना पटवून दिलें, तेव्हा लोक बुद्धाचा पंथ स्वीकारूं लागले.

ऐंशीं वर्षांच्या वयाला गौतमांचें शरीर जरी जीर्ण झालें तरी त्यांचा आत्मा बलवान् व दुर्जयच होता. शेवटीं कुशिनारा नामक गांवांत इ. स. पूर्वी ५४३ सालीं त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या मृत्यूस बौद्ध धर्मीय लोक परिनिर्वाण असें म्हणतात. जसें त्यांचें जीवन भव्य होतें तसाच त्यांचा अंतिम उपदेशहि भव्य होता.

सुभद्राच्या शंकेचें समाधान करतेवेळीं बुद्ध म्हणाले की, संसारांतील प्रत्येक वस्तु-मात्रास मर्यादित आयुष्य आहे. वस्तुमात्र व्ययधर्मी आहे. त्यामुळे अत्यंत सावधगिरीने वागा. आपल्या आनंद नामक प्रियशिष्यास उद्देशून ते म्हणाले :— "तथागतांची पूजा, त्यांनी उपदेशिलेला धर्म यथार्थरीत्या अनुसरलांत, तरच होऊं शकेल." बुद्ध आणखी असें म्हणाले, "माझ्या परिनिर्वाणानंतर माझ्या देहाची पूजा करण्याच्या भानगडींत पडूं नका. मीं जो सन्मार्ग दाखवून दिला आहे तो अनुसरून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा."

सगळे पदार्थ नाशिवंत आहेत. सावधगिरी, धैर्य आणि उद्योग यांच्या साह्याने तुम्ही मोक्ष मिळवा अशा आशयाचा त्यांचा अंतिम उपदेश होता.

### बौद्ध धर्माचे नीतिविषयक सिद्धान्त

एकमेव, अनिर्वचनीय परमतत्त्वाच्या संबंधांत वैदिक धर्माच्या तत्त्वज्ञानांत जे शुष्क तर्क लढविण्यांत आले आहेत, त्यांपेक्षा गौतम बुद्धांनी केलेला व्यावहारिक उपदेश सर्वस्वीं

वेगळाच उमटून पडतो. इतकेंच नव्हे, तर वैदिक धर्मांतर्गत यज्ञयागादि आणि कर्मकांड-विषयक इतर धार्मिक क्रिया या सर्वांहून भगवान् बुद्धांचा उपदेश सर्वथा वेगळा आहे. 'धम्मपद' नामक एका लहानशा परंतु अतिशय सुंदर अशा ग्रंथांत बुद्धधर्माच्या साऱ्या सिद्धान्तांचें विवरण केलें आहे. गीतेप्रमाणे धम्मपदाचें रोज पठण करणें आवश्यक आहे.

हिंदु धर्मांतील वर्णव्यवस्थेचे दोष दाखविण्यांत आणि तिचें यथार्थ रहस्य समजावून सांगण्यांत गौतम बुद्धांनी एका महान् सुधारकाचें धैर्य दाखविलें आहे. खिस्तापूर्वी पांच शतकें अगोदर बुद्धांनी पापी लोकांना असें सांगितलें की, खऱ्या उच्च वर्गाच्या व खऱ्या नीच वर्गाच्या माणसांची किंमत त्यांच्या जन्मपरंपरेप्रमाणे किंवा त्यांना मिळणाऱ्या सवलतींप्रमाणे किंवा रूढ धर्माच्या बाह्य चिन्हांच्या अनुरोधाने करावयाची नसते तर व्यक्तींचें चारित्र्य व धार्मिक जीवन या गोष्टी लक्षांत घेऊनच करावयाची असते.

'कुळाने अथवा जन्माने कुणीहि ब्राह्मण होऊं शकत नाही. जो सत्यप्रिय व धार्मिक आहे तोचें खराखुरा भाग्यवान्, तोच खरा ब्राह्मण होय.'

"जो मनुष्य रागावतो, जो इतरांचा द्वेष करतो, जो प्राणिमात्रांना छळतो, जो खोटें बोलतो, जो आत्मस्तुति करतो व जो दुसऱ्यांची निंदा करतो तो पतित, चांडाळ समजावा."

अशीं विधानें बुद्धांच्या उपदेशांत जागोजागीं आढळतात. बौद्ध धर्मांत सामील होतांच वैदिक धर्माच्या चारी वर्णांचे भेद लुप्त होतात. सारिपुत्त, मोग्गल्लान वगैरे ब्राह्मण ज्याप्रमाणे संघांत होते, त्याप्रमाणेच सोपाक नामक चांडाळहि त्यांत होता.

गौतम बुद्धांनी स्वतःच्या सामान्य अनुयायांसाठी पुढील पांच निषेधांचा उपदेश केला आहे.

(१) हिंसा करूं नये. (२) चोरी करूं नये. (३) व्यभिचार करूं नये. (४) खोटें बोलूं नये. (५) मादक पदार्थांचें सेवन करूं नये.

शिवाय उच्च कोटीच्या अनुयायांसाठी वरील पांच निषेधांखेरीज दुसऱ्या पांच व्रतांचाहि उपदेश बुद्धांनी केलेला आहे.

(१) निषिद्ध वेळीं भोजन करूं नये.

(२) नृत्य करूं नये, गाणें म्हणूं नये, संगीत ऐकूं नये, आणि सुन्दर वस्तु पाहूं नयेत.

(३) हार, अत्तर, दागदागिने, उटणीं आणि अशाच प्रकारच्या सुंदर वस्तूंचा उपभोग घेऊं नये.

(४) मौल्यवान् व लांबरुंद गादीवर झोपूं नये.

(५) सोनें वा चांदी घेऊं नये.

बौद्ध धर्मांतील सदाचाराचे नियम मुख्यत्वेंकरून निषेधात्मक, संयमप्रधान, निवृत्तिपर आणि व्यक्तिगत स्वरूपाचे आहेत. सदाचाराच्या उत्कृष्ट आदर्शानुसार मनुष्य पापपुण्यातीत पूर्ण दशेस पोंचतो. ज्याने चांगल्यावाइटाचा विचार थांबविला आहे आणि जो शुभाशुभातीत झाला आहे असा मनुष्यहि वरील उत्तम दशेप्रत पोंचतो.

## कर्माचा सिद्धान्त

बौद्धदेखील कर्माचा व पुनर्जन्माचा सिद्धान्त मानतात. जी उत्तम शक्ति या जगांत काम करून राहिली आहे, ती म्हणजे कर्म-सिद्धान्त. न्यायान्यायाचें व पापपुण्याचें फळ देणारा हा नियम अतिशय कडक असून त्यांतून कोणालाहि निसटतां येत नाही. कर्मांच्या सिद्धान्तास अनुसरून प्रत्येक मनुष्यास स्वकर्मानुसार या दुःखमय संसारांत पुनःपुन्हा जन्म घ्यावा लागतो.

## बौद्ध संघ

बौद्ध धर्माचे सिद्धान्त व्यक्तिगत व समाजविरोधी आहेत. त्यामुळे प्रथमतः असें वाटूं लागतें की, त्यांत सामाजिक प्रश्नांना स्थानच नसावें. परंतु, गौतम बुद्ध अतिशय व्यवहारकुशल होते. त्यांनी स्वतःच्या अनुयायांचें एक नवें मंडळ स्थापन केलें. बौद्ध धर्मातील मुख्य मंत्र तीन आश्रयांचा आहे. या मंत्रांत त्याचें सारें रहस्य येऊन जातें. धर्मात जेव्हा नवीन माणसें सामील होतात त्यावेळीं या मंत्राचा उपयोग करण्यांत येतो.

" मी बुद्धास, धर्मास व संघास शरण जातों. " १

स्त्रियांना कांही कालावधीनंतर संघांत दाखल करून घेण्यांत आलें होतें. या बौद्ध संघांत साधूंनी बुद्ध–वचनें पाठ करण्यासाठी आणि अपराधांचा कबुलीजबाब देण्यासाठी एकत्र जमावें असा उपदेश करण्यांत आलेला होता.

## धर्मग्रंथ : शाखा

बौद्ध **धर्माचा धर्मग्रंथ त्रिपिटक**—तीन पेट्या किंवा टोपल्या या नांवाने ओळखला जातो. त्रिपिटकाचे तीन भाग आहेत. विनयपिटक, सुत्तपिटक आणि धम्मपिटक. पहिल्या भागांत नियम आहेत, दुसऱ्यांत बुद्धांच्या कथा व त्यांचा उपदेश आहे आणि तिसऱ्यांत तत्त्वज्ञान आहे. बुद्ध ज्या प्रदेशांत राहत होते त्या प्रदेशाची भाषा 'पाली' होती. त्यामुळे बुद्धांनी 'पाली' भाषेंतच उपदेश केला व त्रिपिटकहि त्याच भाषेंत रचला गेला. उत्तरकालीन व्यापक शास्त्रीय ग्रंथ संस्कृतांत रचण्यांत आले.

बुद्धांचा उपदेश शिष्यांनी आपापल्या अधिकारानुसार समजावून घेतला. त्यामुळे

---

१ बुद्धं शरणं गच्छामि । धम्मं शरणं गच्छामि । संघं शरणं गच्छामि ।

बौद्ध धर्माच्या चार शाखा निर्माण झाल्या. ( १ ) वैभाषिक ( २ ) सौत्रान्तिक ( ३ ) विज्ञानवाद आणि ( ४ ) माध्यमिक. कांही विचारवंत असें मानतात की, ह्या चार शाखा कालानुक्रमाने विकास पावल्या. जगांतील बाह्य पदार्थ प्रत्यक्ष दृष्टिगोचर असल्यामुळे ते स्वीकारावेत अशी वैभाषिकांची भूमिका; बाह्य पदार्थ अनुमानाने सिद्ध होऊं शकतात, असें सौत्रान्तिकांचें मत; सारे पदार्थ आपल्या विज्ञानांत-मनांत आणि विचारांत-आहेत असें विज्ञानवाद्यांचें-योगाचाऱ्यांचें मत; तर हें सगळें शून्य आहे ही माध्यमिकांची मतप्रणालि.

दुसऱ्या दृष्टीनेहि बौद्ध धर्माच्या दोन शाखा झाल्या आहेत. त्या म्हणजे **हीनयान** आणि **महायान**. बुद्धांच्या उपदेशामुळे लोक ध्यानधारणा, समाधि, तपश्चर्या इत्यादि साधनांच्या द्वारे स्वतःचीच उन्नति करून घेऊं लागले, त्यामुळे अवघ्या मानव-जातीच्या कल्याणाचा विचार बाजूला राहिला. मागाहून पूजा, उपासना, सामाजिक कल्याण वगैरे व्यापक योजनेमुळे बौद्ध धर्मामध्ये खूपच सामर्थ्य निर्माण झालें. ही नवीन व्यापक योजना महायान-मोठा मार्ग-या नांवाने ओळखली जाऊं लागली व जुन्या वैयक्तिक प्रगतीच्या भावनेस हीनयान-हलका, निकृष्ट मार्ग-असें नांव मिळालें. बुद्धाच्या मूर्तीच्या पूजेस कालानुक्रमाने जोर आला. सांचीसारख्या ठिकाणीं बुद्धाच्या अवशेषांचें जतन करून खूप मोठमोठे स्तूप बांधण्यांत आले. पुण्याजवळील कार्ल्याच्या गुहांसारख्या गुहांत जेथे बौद्ध साधु राहत असत, तेथे सुंदर लेणीं आढळतात, शिल्पकलेचे उत्तमोत्तम नमुने आढळतात आणि अनेक महत्त्वाचे शिलालेखहि खोदलेले आढळतात. अशा कलाकृतींमुळे भारतीय इतिहासावर चांगलाच प्रकाश पडतो.

## मूल्यमापन

जवळजवळ २५०० वर्षांपूर्वी बौद्ध धर्म भारतांत अस्तित्वांत आला. अशोक व कनिष्क यांसारख्या राजांनी त्यास आश्रय दिल्यामुळे त्यास बळकटी आली. त्यानंतर त्यांत भ्रष्टाचार सुरू झाले व त्याला उतरती कळा लागली. बौद्ध धर्माचें स्वतःच्या जन्मभूमीमधून उच्चाटन झालें आणि त्याचा तिबेट, चीन, जपान, सिलोन आणि सयाम या देशांत प्रसार झाला. परंतु, भारतांत बुद्धांची २५०० वर्षांची जयंति नुकतीच मोठ्या उत्साहाने साजरी झाली आणि बुद्धांस ज्या स्थळीं दिव्य ज्ञान झालें होतें त्या बुद्धगयेस एकदम महत्त्व प्राप्त झालें. बौद्ध धर्माचे सगळे ग्रंथ शुद्ध स्वरूपांत छापण्याची योजना आखण्यांत आली आहे. तिचा अभ्यासकांना बराच उपयोग होणार आहे.

• बौद्ध धर्माची विचारपरंपरा बहुतांशीं उपनिषदांतूनच निर्माण झालेली आहे. जगांतल्या पदार्थांचें अनित्यत्व, वासनांचा त्याग, संन्यास, तपश्चर्या इत्यादि बौद्ध धर्मांतर्गत तत्त्वें उपनिषदांत आढळून येतात. वस्तुतः बौद्ध धर्म म्हणजे उपनिषदांवरील एक प्रकारचें

भाष्यच होय. वैदिक धर्माप्रमाणेच बौद्ध धर्मदेखील आर्य संस्कृतीचीच एक शाखा होय. आज उभयतांत भेदभाव जाणवत नाही, ही गोष्ट समाधानाची आहे.

# ४ झरतुष्ट्र धर्म

## झरतुष्ट्रांचें जीवन

आपल्या पारशी बंधूंच्या धर्माचे संस्थापक झरतुष्ट्र आहेत (इसवी सनापूर्वी ६६०-५८३). इराणांत त्यांचा जन्म कधी झाला, त्याविषयी मतभेद आहे. परंतु, सर्वसाधारणपणें असें मानण्यांत येतें की, त्यांचा जन्म इ. स. पूर्वी ६६० सालीं झाला. ते लहानपणापासूनच तैलबुद्धीचे होते. वयाच्या पंधराव्या वर्षी धार्मिक जीवनाची एक खूण म्हणून त्यांनी एक मेखला वापरावयास सुरुवात केली. ते अतिशय कनवाळू होते, गरिबांना ते मदत करीत असत आणि प्राणिमात्रांबद्दल त्यांना ममत्व वाटे. वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांच्या जीवनांत एक महत्त्वाची घटना घडून आली. त्यांना असें वाटूं लागलें की, आहुरमझ्द आपल्याला बोलावीत आहे आणि पवित्र होऊन पैगंबराचें कार्य आपण करावें अशी तो आपल्याला आज्ञा करीत आहे.

पुढील दहाबारा वर्षांत (वय वर्षे ३० ते ४२) आहुरमझ्दाच्या आज्ञेनुसार झरतुष्ट्रसाहेबांनी ईश्वरी धर्माविषयी उपदेश करावयास सुरुवात केली. ते पापी माणसांचा धिक्कार करीत असत. ईश्वरावर विश्वास व श्रद्धा ठेवा, हें त्यांच्या उपदेशाचें तात्पर्य होतें. इराणच्या राजाने जेव्हा या धर्माचा स्वीकार केला तेव्हा झरतुष्ट्रांच्या जीवनांत आणखी एक बदल घडून आला. त्यांनी इराणच्या राजाच्या प्रधानाच्या मुलीशीं लग्न केलें. बल्ख शहराला जेव्हा वेढा पडला तेव्हा तुराण्यांच्या हातीं त्यांना वयाच्या सत्याहत्तराव्या वर्षी मरण आलें.

झरतुष्ट्र-साहेबांना इराणांत मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. लोकांना त्यांचेबद्दल अतिशय पूज्यभाव वाटत असे. ते अतिशय विनम्र व स्वभावाने सरळ होते. प्रजा व धर्म यांच्या हितासाठी झरतुष्ट्रांनी लष्करी शिक्षणाचा प्रचार केला होता. त्यांचें जीवन अतिशय पवित्र होतें.

## धर्मग्रंथ

या धर्माच्या ग्रंथाचें नांव 'अवेस्ता' असें आहे. त्याचा अर्थ, हिंदुधर्मातील वेद शब्दाच्या अर्थाप्रमाणे, ज्ञान असा होतो. सदरहू धर्मग्रंथाची भाषा अवेस्ता आहे व ती संस्कृताशीं बरीच मिळतीजुळती आहे. पेहलवी भाषेंतहि कांही ग्रंथ रचलेले आहेत. मूळ अवेस्ता ग्रंथांतून जें साहित्य उपलब्ध होतें त्याचे मुख्य पांच भाग पाडण्यांत आलेले आहेत.

( १ ) **यश्न**--पूजा किंवा यज्ञ--हा भाग मोठा असून त्याचें महत्त्वहि अधिक आहे.

( २ ) **वीस्परद**—याचा अर्थ 'सर्व देवांना आवाहन' असा होतो. यांत कर्मकांडाच्या वेळीं जे मंत्र म्हणतात त्यांचा संग्रह करण्यांत आलेला आहे.

( ३ ) **वंदीदाद**—याचा अर्थ 'राक्षसी शक्तीविरुद्धचा कायदा' असा होतो. पारश्यांच्या धर्मगुरूंनी ( दस्तुरांनी ) कर्म करतेवेळीं जे नियम पाळावयाचे असतात ते यांत दिलेले आहेत. त्याखेरीज त्यांत जगाची उत्पत्ति, पुनर्जन्म आणि अनेक ऐतिहासिक बाबींविषयी माहिती दिलेली आहे.

( ४ ) **यश्त**—पूजेचे मंत्र.

( ५ ) **खोर्देह-अवेस्ता**—लहान अवेस्ता ग्रन्थ. प्रत्येक माणसाने रोज जी प्रार्थना करावयाची असते ती यांत संग्रहीत केलेली आहे.

कालान्तराने या धर्मांत विशाल व महत्त्वाचें साहित्य निर्माण झालें.

**सिद्धान्त**

जगांत एकच देव असून तो म्हणजेच परमतत्त्व होय. हा देव म्हणजे प्रकाश, जीवन, सत्य व साधुत्व यांची शक्ति होय. त्याचें खास नांव आहुर-मझ्द म्हणजे बुद्धिमान् प्रभु किंवा बुद्धीचा देव असें आहे. या देवाची पूजा करावयाची असते. या देवाच्या नांवाचा रात्रंदिवस जप करावा असा उपदेश करण्यांत आलेला आहे.

जगांत दुसरें एक पापी तत्त्व असून तें आहुरमझ्दाच्या दैवी तत्त्वाच्या विरुद्ध आहे. या पापी तत्त्वाचें नांव 'अंग्र मइन्यु' आहे. ज्याप्रमाणे हिंदुधर्मांत जगाच्या आरंभापासूनच दैवी व आसुरी संपत्ति प्रचलित असल्याचें मानण्यांत आलें आहे, त्याप्रमाणे झरतुष्ट्र धर्मांत देखील चांगलें आणि वाईट, खरें आणि खोटें म्हणजे आहुरमझ्द आणि अंग्र मइन्यु हीं दोन विरोधी तत्त्वें प्राचीन काळापासून चालत आलीं आहेत, असें मानण्यांत आलें आहे. या दोन तत्त्वांमध्ये सतत युद्ध चालूंच असतें. आहुरमझ्दाखेरीज अनेक नैसर्गिक तत्त्वांचा पूजाविधि सांगितलेला आहे. सूर्य, चन्द्र, तारे, अग्नि, वायु, पाणी, पर्वत इत्यादींची पूजा करावयाची असते. आजदेखील पारशी लोक अग्नि, सूर्य, आणि समुद्र यांची दररोज पूजा-अर्चा करतांना आढळून येतात. झरतुष्ट्राच्या अनुयायांनी दीर्घकाळपावेतो अग्नीस प्रज्वलित ठेवलें आहे. आजदेखील अगिआरींत ( Fire Temple ) अग्नीची पूजा होते.

प्रकाश प्रज्वलित ठेवा, पवित्र राहा, गरिबांना मदत करा, साऱ्या लोकांशीं चांगुलपणाने वागा आणि दुष्टांना शिक्षा करा, गृहस्थाश्रमांत राहा, एकान्तांत वा अरण्यांत

जाऊन तपश्चर्या करण्यापेक्षा समाजाची सेवा करणें हें अधिक चांगलें, हीं झरतुष्ट्र धर्माचीं मुख्य तत्त्वें आहेत. विचारांत, भाषणांत आणि वर्तनांत पवित्रता कटाक्षाने ठेवावी असा उपदेश करण्यांत आलेला आहे. पारशी लोक नेहमी जो मंत्र म्हणतात तो असा असतोः हुमत, हुउक्थ, हुवर्ष्त ( चांगले विचार, चांगली भाषा आणि चांगलें कर्म ). कीर्तीच्या रंगासारखा पवित्रतेचा रंग शुभ्र, धवल असतो त्यामुळे झरतुष्ट्रांचे अनुयायी सामान्यपणें पांढऱ्या रंगाचे कपडे वापरतात.

वैदिक धर्माप्रमाणे या धर्मांतहि असा उपदेश करण्यांत आलेला आहे की, पवित्रता नेहमी पापावर मात करते. खेरीज, ईश्वर कर्मानुसार न्याय देतो. ज्याचे विचार व ज्याचें आचरण हीं चांगलीं असतात त्यास स्वर्गाचें फळ प्राप्त होतें. जे लोक खोटें बोलतात ते नरकांत जाऊन पडतात आणि त्यांना दुःख सोसावें लागतें. आर्य व इराणी दीर्घकाळपर्यंत एकत्र राहिले. परिणामीं, उभयतांच्या धर्मांमध्ये पुष्कळ साम्य आढळून येतें.

## मूल्यमापन

झरतुष्ट्र धर्म इराणांत स्थापन झाला व त्याने अखिल देशांत नवीन चैतन्य निर्माण केलें. त्याच्या सैन्याने बॅबिलोनिआच्या राजाचा पाडाव केला व इराणी राज्याचा थेट युरोपापर्यंत विस्तार केला. त्याचा प्रभाव ग्रीक विद्वानांवरहि पडला होता. प्लेटो यास इराणांत जाऊन या धर्माचा अभ्यास करण्याची इच्छादेखील झाली होती. परंतु, ग्रीकांशीं झालेल्या युद्धांमुळे ती इच्छा परिपूर्ण होऊं शकली नाही. अलेक्झांडरचा विजय झाला व इराण देश परकीयांच्या सत्तेखाली गेला. पहिल्या अर्देसराने इराणास पुनश्च स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें. त्यानंतर मुसलमानधर्मी अरबांनी झरतुष्ट्र प्रजेस इराणांतून हांकलून लावलें आणि अनेकांना बाटवून मुसलमान केलें. झरतुष्ट्रानुयायी भारतांत आले, गुजरातेंत त्यांनी वसाहत स्थापन केली व ते गुजराती बनून गेले.

# ५. ख्रिस्ती धर्म

## येशू ख्रिस्तांचें जीवन-चरित्र

ख्रिस्ती धर्माचे संस्थापक येशू ख्रिस्त ( इ. स. पूर्व ४ – इ. स. २९ ) यांचा जन्म जुडियांत बेथ्लेहेम नांवाच्या गांवीं अलौकिक रीतीने झाला. ख्रिस्तांची माता मेरी कुमारी होती. लोक असें मानीत की, येशू हे जोसेफ व मेरी यांचे पुत्र आहेत. तीं उभयतां यहुदी असून यहुदी धर्म पाळीत असत. येशू ख्रिस्त त्या वातावरणांत वाढले आणि शिक्षण संपादूं लागले. त्यांच्यांत कालक्रमाने अनेक उदात्त आणि विशाल वृत्ति उदित झाल्या. वयाच्या तिसाव्या वर्षी येशूंना जॉन बॅप्टिस्टकडून जॉर्डन नदीच्या किनाऱ्यावर धार्मिक उपदेश मिळाला की, ' तूं पश्चात्ताप कर, स्वर्गाचें राज्य आता जवळ आहे. ' येशूंस खात्री पटली

की, माझा प्रेमळ दैवी पिता–ईश्वर मला जीवित-कार्याची प्रेरणा देत आहे. येशू खिस्त मग एकान्तांत गेले आणि त्यांनी मनाशीं असें ठरविलें की, स्वतःच्या जातीचें हित साधून, किंवा मोठी प्रसिद्धि मिळवून किंवा आपल्या भव्य, उदात्त आदर्शांना खाली खेंचून खऱ्या अर्थाने ईश्वराचा पुत्र होतां येणार नाही.

जेव्हा जॉनला कैदेंत टाकण्यांत आलें तेव्हा येशूंनी सारी जबाबदारी स्वीकारून उपदेश करावयास प्रारंभ केला. लोकांना त्यांच्या उपदेशापासून खूप प्रेरणा मिळाली आणि आनंद लाभला. लोक त्यांना एखाद्या धर्मगुरूसारखे मानूं लागले. परंतु, यहुदी धर्माच्या ज्ञात्यांच्या असें लक्षांत आलें की, येशूंचे विचार, सिद्धान्त अतिशय उद्दाम व प्रक्षोभक असल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. हे सत्तालोभी यहुदी येशूंचे कट्टर शत्रू बनले. येशू खिस्त आपल्या शिकवणुकीच्या प्रसाराचें कार्य मोठ्या उत्साहाने करीत होते. त्यांनी धर्म–प्रचारासाठी आपल्या शिष्यांना सर्वत्र पाठविलें. येशूंस त्यांच्या गांवांतील माणसं मान देत नसत. येशूंनी जाहीर केलें की, मी हिब्रू पैगंबर (माणसांसाठी ईश्वराचा संदेश घेऊन येऊन त्याचा प्रचार करणारा ) असून सर्वांना साहाय्य करण्यासाठी ईश्वराने मला पाठविलें आहे. मी ईश्वराचा खाइस्ट आहें. येशूंच्या या धार्मिक चळवळीमुळे जेरुसलेमचे मुख्य धर्मनेते चिडले आणि त्यांनी येशूंस पकडलें. यहुद्यांच्या वरिष्ठ कोर्टाने येशूंस देहान्ताची शिक्षा ठोठावली. येशूंस क्रूसावर खिळयांनी ठोकून अत्यंत अमानुषपणें ठार करण्यांत आलें.

येशू एक आदर्श उपदेशक होते. त्यांची उपदेश करण्याची पद्धति उत्कृष्ट होती. उपदेश करतेवेळीं ते सांगत असत की, आता ईश्वरी राज्य समीप आलें आहे. ते आग्रहानें प्रतिपादित असत की, धार्मिक जीवन घालविल्याने आणि सर्वांशीं मित्रभावाने वागल्याने हृदयांतच आध्यात्मिक राज्य निर्माण होऊं शकेल. येशूंनी लोकांना दुर्धर रोगांपासून वांचविण्यासाठी मोठे अद्‌भुत चमत्कार केले. ते अतिशय कनवाळू असून नैतिक चारित्र्या-वर अधिक भर देत असत. त्यांचें अवघें जीवन ईश्वरमय होतें. ‘ मी ईश्वराचा पुत्र आहें ’, असें ते वारंवार सांगत असत. अनेक लोक येशूंस भजत असत.

### धर्मग्रन्थ

खिस्ती धर्माचा प्रमाणभूत ग्रन्थ ‘ बायबल ’ ( नवा करार ) हा होय. त्यामध्ये येशू खिस्त, त्याचा उपदेश आणि खिस्ती धर्मसंघ ह्यांविषयी संपूर्ण माहिती देण्यांत आलेली आहे. खिस्ती मंदिरांतून बायबलचें पारायण करण्यांत येतें आणि धर्मपरायण खिस्ती लोक रोज बायबलचें पठण करतात. बायबल हा गीता आणि कुराण यांच्यासारखाच प्रेरणादायक ग्रन्थ आहे. बायबलाचे दोन भाग आहेत :—१ जुना करार व २ नवा करार. जुना करार प्रमाण म्हणून यहुदी लोकांनी मान्य केला आहे. तो मूळ हिब्रू भाषेंत लिहिलेला होता. जुन्या करारांत ३९ प्रकरणें असून नव्या करारांत २७ प्रकरणें आहेत. ग्रीक व लॅटिन

धर्मसंघांच्या बायबलांत जुन्या कराराच्या जोडीला दुसरीं १४ प्रकरणें देण्यांत आलेलीं आहेत आणि तेवढ्या भागास 'प्रक्षिप्त' (Apocrypha) म्हणण्यांत येतें. ग्रीक आणि लॅटिन धर्मसंघ त्यास प्रमाण मानतात. परंतु, प्रॉटेस्टंट लोक तसें मानत नाहीत. इ. स. २०० पूर्वी सर्व लिखाणाचा एका ग्रन्थांत संग्रह करण्याचें काम सुरू झालें आणि इ. स. ३२५ च्या आसपास कॉन्स्टंटाइनच्या हुकमानें संपूर्ण बायबलाची नक्कल तयार करण्यांत आली.

बायबलमध्ये निरनिराळ्या लिखाणांचा संग्रह असला तरी त्यांत एक प्रकारची एकता आहे. आणि त्या दृष्टीने त्याचें महत्त्व आहे. जगावर बायबलचा प्रभाव खूप पडला आहे. सुमारें ६०० भाषांत बायबलचें भाषान्तर झालें आहे. त्यावरून खिस्ती लोकांनी आपल्या धर्माच्या प्रचारासाठी किती भगीरथ प्रयत्न केले आहेत तें आपल्या लक्षांत येईल. खिस्ती लोक आज सबंध जगांत विखुरलेले असून त्यांनी स्वधर्मप्रसार खूप वेगाने केला आहे. हें खिस्त्यांच्या संघशक्तीचें फळ होय.

## सिद्धान्त

या जगताचा स्वतंत्र नियामक एक ईश्वर आहे. तो महान राजा असून, तो सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे. तो द्यावापृथिवीचा अधिपति असून, परमपवित्र व परमकारुणिक आहे. तोच जगाला खराखुरा न्याय देणारा न्यायाधीश होय. ईश्वर एकच असून तो सगळ्यांना चाहतो. त्यामुळे प्रत्येक माणसाने आपल्या शेजाऱ्यावर निःस्वार्थी प्रेम करावयास हवें. माणसें श्रद्धा ठेवत नाहीत आणि ईश्वरी आज्ञांचें पालन करीत नाहीत. तरीपण भविष्यकाळांत एक दिवस असा उजाडेल की, ज्या दिवशीं ईश्वराचें नीतिमय राज्य अवघ्या जगामध्ये पूर्णपणें प्रस्थापित होईल. असें राज्य प्रस्थापित होण्यासाठी प्रत्येकाने दररोज ईश्वराची प्रार्थना करावी, त्याच्या आज्ञा योग्यपणें पाळाव्यात, आणि खिस्ती धर्माचा प्रचार करावा.

पापी माणसांनी पश्चात्ताप केल्यास ईश्वर त्यांना क्षमा करतो. इतकेंच नव्हे, तर पापी माणसाने आपलें अकल्याण करणाऱ्या माणसांना (आणि शत्रूंना) जर क्षमा केली तर ईश्वर त्यास क्षमा करतो. येशू स्वतः जणुं मूर्तिमंत क्षमा होते. जेव्हा येशूंचा वध करण्यांत आला तेव्हा त्यांनी आपल्या शत्रूंसाठी पुढील प्रार्थना केली--"हे आकाशांतील बापा! माझ्या मारेकऱ्यांना क्षमा कर; कारण ते काय करीत आहेत, तें त्यांचें त्यांनाच कळत नाही." ईश्वर हा खरोखरीच सर्वांचा पिता होय. सगळीं माणसें एकाच बापाचीं लेंकरें होत त्यामुळे कोणाचाहि द्वेष करूं नये; सर्वांविषयी प्रेमभाव बाळगावा; इतरांचें दुःख हलकें करावें आणि ईश्वरमय जीवन घालवावें. खिस्ती धर्म आपल्या भक्तिमार्गाशीं बराच जुळणारा आहे. बायबल, गीता आणि धम्मपद यांतील सिद्धान्त जवळजवळ सारखेच आहेत. खिस्तशिष्यांनी येशूच्या उत्कृष्ट सिद्धान्तांचा उत्तम

प्रचार-प्रसार केला आहे. सेंट पॉलने (इ. स. '५०-६५) या प्रसारकार्याचा श्रीगणेशा गिरविला व त्यामुळे त्यास आद्य नेता म्हणतात. ख्रिस्ती संघ सर्वत्र स्थापन करण्यांत आले व जाहीर प्रार्थना सुरू झाल्या. आजदेखील ख्रिस्ती मंदिरांतून नियमितपणें प्रार्थना होतात.

## इतिहास

ख्रिस्ती धर्माचा इतिहास पंचरंगी आहे. यहुदी धर्मांतूनच ख्रिस्ती धर्म निघाला. त्यामुळे यहुदी लोक ख्रिस्त्यांना शत्रू मानूं लागले आणि त्यांना अतिशय छळूं लागले (इ. स. १५०-३२५). रोमच्या कॉन्स्टंटाईन राजाने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करून इ. स. ३२५ सालीं सगळ्या ख्रिस्ती संघांची प्रथम परिषद् भरविली. त्याने सबंध राज्याचा धर्म ख्रिस्ती धर्म होय, असें जाहीर केलें आणि क्रॉसला (†) ख्रिस्ती धर्माचें राज्यचिन्ह म्हणून मान्यता दिली. पुढे जवळ जवळ सातशें वर्षे (३२५-१०५४) ख्रिस्ती धर्माचा प्रचार होत राहिला आणि त्यामुळे सबंध युरोपांत सगळ्या राज्यांनी तो धर्म स्वीकारला. नंतरच्या सुमारें पांचशें वर्षांत (१०५४-१५१७) रोमच्या पोपची सर्वंकष सत्ता सर्वत्र फैलावूं लागली. या युगाच्या धर्मसंघांमध्ये अनेक अनिष्ट प्रवृत्ति घुसल्या होत्या हें खरें, परंतु त्यांच्या बरोबरीने कांही चांगल्या प्रवृत्तिहि शिरल्या होत्या. गरीब व दुबळ्या माणसांना मदत करण्याचें स्तुत्य कार्य करण्यांत येत असे. शिवाय कायदा, व्यवस्था आणि शिक्षण या तीन बाबींचा विकास करण्याचें कार्य या युगाच्या धर्मसंघांनीच केलें होतें. अद्यापपावेतो तडीस न गेलेलीं ध्येयें गांठण्याचें, जातीय व राजकीय भेदाभेद न मानतां सगळ्या लोकांची एकता साधण्याचें आणि न्याय, शांतता, दया, सहकार्य आणि भ्रातृभाव राखण्याचें सुंदर कार्य या ख्रिस्ती धर्मसंघांनी केलें.

पोपची व धर्मसंघांची सत्ता व कार्यपद्धति यांना कालान्तराने विरोध होऊं लागला आणि १५१७ पासून सुधारणेचें युग सुरू झालें. **मार्टिन ल्यूथर** नामक एका जर्मन सुधारकाने पोपविरुद्ध बंड पुकारून प्रॉटेस्टंट रिफॉर्मेशन—विरोधकांनी सुधारणा, नवा ख्रिस्ती धर्म—या नांवाच्या धर्माची स्थापना केली. ह्या सुधारणा लोकांना फारच रुचल्या. प्रॉटेस्टंट धर्माने सामाजिक, आर्थिक, शिक्षणविषयक, राज्यविषयक, धर्मसंघ व तत्त्वज्ञान याविषयींच्या अशा सर्वच बाबतींतल्या सुधारणा घडवून आणल्या. जुन्या ख्रिस्ती धर्मांत म्हणजे रोमन कॅथॉलिक धर्मांत पुनश्च चैतन्य निर्माण झालें आणि ह्या दोन्ही धर्मांच्या अनुयायांनी सबंध जगांत निरनिराळ्या ठिकाणीं ख्रिस्ती धर्माचा प्रचार केला.

## मूल्यमापन

ख्रिस्ती लोक भारतांत—दक्षिण भारतांत—फार पूर्वीच आले आहेत. लोक संत फ्रान्सिसच्या समाज-सेवेची आजदेखील आदरपूर्वक आठवण काढतात. हिंदु समाजांत मागासलेल्या जातींना अस्पृश्य समजण्याची भावना जेव्हा निर्माण झाली, तेव्हापासून

आपल्या देशांतील समाजांत दुबळेपणा उत्पन्न झाला आणि समाजांत विषमता निर्माण झाली. परिणामीं, माणुसकी नष्ट होऊं लागली. खिस्त्यांनीं ही परिस्थिति पाहून भारतांत खिस्ती धर्माचा प्रचार करण्याचें काम जोरदारपणें सुरू केलें. त्यांनी अनेक मंदिरें बांधलीं, अनेक शाळा स्थापन केल्या आणि अनेक इस्पितळें सुरू केलीं. गरीब आणि मागासलेल्या जाति सदरहू सुधारणांनी मोहित झाल्या व त्यांनी खिस्ती धर्माचा स्वीकार करून शिक्षण वगैरे गोष्टींचा फायदा उठविला. खिस्ती लोकांची प्रेमभावना व समाजसेवा खरोखरीच खूप वाखाणण्यासारखी आहे. भारतांत कित्येक खिस्ती लोक असून ते सुखसमाधानांत राहत आहेत. महात्मा गांधीजींनी खिस्ती धर्मातून पुष्कळच प्रेरणा मिळविली.

# ६. इस्लामी धर्म

## महंमद पैगंबरांचें जीवन

इस्लामी अथवा मुसलमानी धर्माचे संस्थापक महमद पैगंबर यांचा जन्म इ. स. ५७० सालीं मक्केंत झाला. त्या सुमारास अरबस्तानांत मूर्तिपूजा आणि सर्व पदार्थांत चैतन्य आहे हें मत हीं प्रचलित होतीं. महंमद व्यापारासाठी सीरिया व पॅलेस्टाईनमध्ये गेले होते व तेथे ते यहुदी व खिस्ती यांच्या सान्निध्यांत आले आणि त्यांना ईश्वर एकच आहे या तत्त्वाची प्रेरणा झाली. त्यांना असें दिसून आलें की, लोक सध्यां अतिशय दुःखीकष्टी असून त्यांची नैतिक व सामाजिक स्थिति समाधानकारक नाही. महंमदांची अतिशय निराशा झाली. त्याच वेळीं ईश्वराने त्यांस प्रेरणा दिली की, तूं सर्वत्र फिरून एक स्वतंत्र ईश्वर जगाचा कर्ता, बादशहा व न्यायाधीश आहे असा लोकांना उपदेश कर. महंमदांना अनेकदां ईश्वराचें दर्शन झालें. त्यांनी एकेश्वरवादाच्या उपदेशास प्रारंभ केला आणि मूर्तिपूजेच्या खंडनास सुरुवात केली. वयाच्या ५२ व्या वर्षी (इ. स. ६२२ सालीं) महंमद स्वतःचा जीव वांचविण्यासाठी मक्केहून मदिनेस पळून गेले. मुसलमानांची कालगणना याच वर्षापासून सुरू होते आणि लॅटिन भाषेंत त्यास 'हजीराचें वर्ष'— Anno Hegirac (A. H.) म्हणतात.

मदिनेंत आल्यानंतर महंमदांच्या धर्मप्रसाराच्या प्रयत्नांना यश येऊं लागलें. त्यांनी अरबस्तानांत अल्लाहाच्या आज्ञांचा आणि सहा प्रतिज्ञांचा प्रचार केला. या प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे आहेत. (१) एका ईश्वराखेरीज दुसऱ्या कुणाचीहि पूजा आम्ही करणार नाही. (२) आम्ही चोरी करणार नाही. (३) आम्ही व्यभिचार करणार नाही. (४) आम्ही आमच्या मुलांना मारणार नाही. (५) आम्ही कोणाची निन्दा करणार नाही व (६) सत्य गोष्टींचे बाबतींत आम्ही पैगंबराच्या आज्ञेचें उल्लंघन करणार नाही. रोजच्या प्रार्थनेसाठी व शुक्रवारीं सर्वांना एकत्र जमतां यावें यासाठी महंमदांनी एक मशीद

बांधविली. त्यांनी अनुयायांना भक्तीची, धार्मिक शिक्षणाची आणि उत्साहाने लढण्याची शिकवण दिली. हळूहळू अनुयायांची संख्या वाढूं लागली. मक्केकडे तोंड करून प्रार्थना करावी, रमझानच्या महिन्यांत उपवास करावा, आणि पवित्र जीवन घालवावें, असें ते सर्वांना सांगत असत. महंमदांची चळवळ फोफावूं लागली. त्यांची पहिली बायको निवर्तल्यानंतर त्यांनी एकूण अकरा बायका केल्या. अखेरीस वयाच्या बासष्टाव्या वर्षी महंमद पैगंबरवासी झाले.

महंमद हे एक समर्थ पुढारी व संघटक होते. अनुभव व अवलोकन यांच्या साह्याने ते एका व्यापाऱ्याचे धर्मसंस्थापक झाले. परस्परांशीं लढणाऱ्या अरबांना त्यांनी संघटित केलें. आज सगळे मुसलमान एकोप्याने राहतात हा महंमदांच्या शिकवणुकीचाच परिणाम होय.

## धर्मग्रंथ

कुराण हा मुसलमानांचा प्रमाणभूत ग्रंथ होय. अल्लाह् हा कुराणांतला प्रमुख वक्ता आहे. कुराणाची ११४ प्रकरणें अथवा 'सुरत' असून त्यांत २८६ वाक्यें आहेत. जवळ-जवळ प्रत्येक प्रकरणारंभीं पुढील वाक्य आहे: 'बिस्मिल्ला, हीर् रहमा नीर् रहीम' याचा अर्थ 'दयाळु व कृपासागर अल्लाहाच्या नांवाने' असा होतो. कुराणाचा प्रभाव अरबी साहित्यावर फार मोठ्या प्रमाणावर पडला आहे.

## सिद्धान्त

ईश्वर – अल्लाह् – एक आहे, ही मुख्य शिकवण आहे. त्याला शरण गेल्याने व पवित्र जीवन कंठिल्याने मनुष्य स्वर्गांत जातो व सर्व प्रकारचा आनंद मिळवितो. दुष्कृत्यें करणारे नरकांत जातात. 'इस्लाम' शब्दाचा अर्थ 'ईश्वरास शरण जाणें' असा होतो. **मुस्लिम** शब्दाचा अर्थहि 'जे शरण जातात' असा होतो. जगाचा सर्वोपरि नियंता ईश्वर जगांत स्वतंत्रपणें आपली सत्ता चालवितो. प्रत्येकाने लीनतेने वागून ईश्वरास शरण जाणें आवश्यक आहे. ईश्वर पापी माणसांना शिक्षा करतो. माणसांना क्षमा करणारे देवदूत असतात, असें मानण्यांत आलें आहे. अल्लाहाने पहिल्यापासूनच सारें कांही निश्चितपणें ठरवून ठेवलें आहे. जगाचा जेव्हा नाश होईल तेव्हा एके दिवशीं सगळीं मृत माणसें पुनः जिवंत होतील व अल्लाह् त्यांना न्याय देईल.

मुसलमानांस पांच कर्तव्यें करावयाचीं असतात. (१) दररोज कुराण पठण (२) रोज पांच वेळां प्रार्थना (३) गरिबांस दानधर्म करणें (४) रमझान महिन्यांत उपोषण करणें व (५) मक्केची यात्रा ऊर्फ हाज करणें. **शिया** व **सुन्नी** असे मुसलमानांत दोन पंथ आहेत. प्राचीन परंपरेचें – सुन्नचें – मार्गाचें अनुकरण करणारे ते **सुन्नी.** महंमदाच्या वचनांखेरीज त्याच्या 'अली' नामक जांवयाचीं वचनें प्रमाण मानणारे

ते **शिया**. **'सुफीधर्म'** हा तिसरा पंथ आहे. या पंथाचे अनुयायी प्रथमतः सुरूर्चा अथवा खडबडीत लोंकरीचीं वस्त्रें नेसत असत. मनुष्य तपश्चर्येने आणि भक्तिभावनेने ईश्वराचें रूप धारण करूं शकतो, अशी या पंथाची श्रद्धा आहे.

### मूल्यमापन

आज मुसलमानी धर्म सगळ्या अरब राज्यांत प्रचलित आहे. इ. स. १००० च्या सुमारास मुसलमानांच्या भारतावरील स्वाऱ्यांस सुरुवात झाली. महंमद गझनीने (९९७–१०३०) भारतावर सतरा वेळां चढाई केली. हिंदुस्थानांत मुसलमानी राजवट सुरू झाली; कित्येक हिंदु मुसलमान बनले; मुसलमानांचें संख्याबळ वाढलें; अखेरीस छत्रपति शिवाजी महाराजांनी आणि मराठ्यांच्या राजांनी मुसलमानी सत्तेचा नाश केला. इंग्रजी राजवट सुरू होऊन ती देखील १९४७ सालीं संपुष्टांत आली. देश स्वतंत्र झाला. हिंदु–मुसलमान मारल्याच प्रमाणांत हिंदी प्रजाजन होते. तरीहि ते वेगवेगळे आहेत असला बेगडी सिद्धान्त कायदे आझम जिनांनी मांडला. इंग्रजांनी त्याचा फायदा उठविला. दोन्ही जमाती परस्परांशीं लढल्या आणि परिणामीं भारताचीं दोन छकलें झालीं. पाकिस्तानांत ७ कोटी मुसल्मान आहेत व भारतांत ४ कोटी आहेत. भारताच्या उदार धोरणामुळे या देशांत मुसलमान हिंदूंइतकेच सुखी आहेत. आज हे दोन देश एकमेकांकडे समजूतदारपणें पाहूं लागले आहेत, ही चांगली गोष्ट आहे.

मुसलमानांच्या एकेश्वरवादामुळें व प्रार्थनावादामुळे ते हिंदूंच्या भक्तिमार्गाजवळ आले आहेत व हिंदु-मुस्लिम एकता स्थापण्याचे प्रयत्न होत आहेत. कुराणाची शिकवण पूर्णपणें अंमलांत आणल्यास उत्तम परिणामप्राप्ति होईल.

## ७. शीख धर्म

### गुरु नानक (१४६९–१५३८)

मुसलमान जेव्हा हिंदुस्थानांत आले तेव्हापासून त्यांचा हिंदूंशीं संघर्ष चालूं झाला. जेव्हा हिंदु मूर्तिपूजा करीत असत, तेव्हा मुसलमान मूर्तिभंजन करीत असत. हिंदु लोक अनेक देव मानत असत तर मुसलमान एकच ईश्वर मानत असत. या दोन धर्मांतील विरोध कमी करण्यासाठी शीख धर्माची स्थापना झालेली आहे, असें सांगण्यांत येतें. पंधराव्या शतकांत वैष्णव धर्मांनी हा विरोध दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शीख धर्माचे संस्थापक गुरु नानकसाहेब यांचा जन्म इ. स. १४६९ सालीं लाहोरजवळील एका खेड्यांत झाला. ते जातीने हिंदु क्षत्रिय होते. बालपणापासूनच त्यांची बुद्धि असामान्य व तल्लख होती. त्यांनी संबंध हिंदुस्थानांत हिंडून ईश्वर एकच आहे असा उपदेश केला आणि मुसलमानी यात्रेकरूंच्या वेषांत मक्केची यात्रादेखील केली. अनेक हिंदु व मुसल्मान

त्यांचे शिष्य बनले. १५३८ सालीं नानकांनीं देह ठेवला. त्यांचे शिष्य त्यांना प्रत्यक्ष परमेश्वर मानत असत. आजदेखील शीख लोक गुरु नानकसाहेबांची मोठ्या आदराने, भक्तिभावाने पूजा-अर्चा करतात.

## धर्मग्रन्थ: ग्रन्थसाहेब

शीख धर्माच्या पवित्र पुस्तकास **ग्रन्थ** म्हणतात. त्यांत जवळजवळ ३० हजार कविता आहेत. त्यांमध्ये ईश्वराची प्रार्थना, त्याचें ध्यान-मनन आणि जीवनाविषयीचा बोध यांचा संग्रह करण्यांत आलेला आहे. १६०४ सालीं पांचव्या गुरूने **'आदिग्रन्थ'** रचला. १०० वर्षांनंतर दहाव्या गुरूने 'दशम ग्रन्थ' रचला. या ग्रंथांत शीख कवि आणि हिंदु व मुसलमान भक्त यांचीं काव्यें आढळतात. भक्तवर्गांत कबीर आणि रामानन्द हे प्रसिद्ध आहेत. ग्रंथांत एकूण सहा भाषा वापरण्यांत आल्या आहेत, त्या म्हणजे-पंजाबी, मुलतानी, फारसी, प्राकृत, हिन्दी आणि मराठी. ग्रन्थास शीख 'ग्रंथसाहेब' असें म्हणतात व त्याची मूर्तीप्रमाणे मोठ्या आदराने व भक्तिभावाने पूजा करतात. अमृतसरमधील शीखांचें सुवर्णमंदिर शिल्पकलादृष्ट्या अतिशय आकर्षक आहे.

## नानकाचा उपदेश : परमतत्त्व

नानकाने भक्ति-प्रधान अद्वैतवादाचा उपदेश केलेला आहे. परमात्मा एकमेव, **सत्य** व भयद्वेषरहित असून त्यानेच जग निर्माण केलें आहे. तो अजर, अज व स्वयंभू आहे. तसेंच तो महान् व अति-उदार आहे. सुरुवातीस हें एक सत्य परमतत्त्व होतें, आजहि आहे व भविष्यकाळींहि राहील. उपनिषदें आणि कुराण यांमध्येहि याच प्रकारचा उपदेश आहे. परमात्मा एकच असला तरीहि त्याचीं अनेक रूपें असल्यामुळे त्यांच्यासाठी अनेक नांवांचा उपयोग करण्यांत येतो. परमतत्त्वासाठी ग्रन्थसाहेबांत 'अल्लाह्' आणि 'खुदा' अशीं मुसलमानी धर्मांतील नांवें वापरण्यांत आलेलीं आहेत. आणि त्यांच्या जोडीला ब्रह्म, परब्रह्म, परमेश्वर, हरि, राम आणि गोविंद अशांसारखीं हिंदुधर्मातील नांवेंहि वापरलेलीं आहेत. नानक म्हणतो की, हे प्रभो, तूं एकच आहेस; परंतु, तुझीं रूपें अनेक आहेत. नानक ईश्वरासाठी **'गुरु'** असा दुसरा साधा शब्द वापरतो. शीख म्हणजे शिष्य. त्यामुळे या धर्मानुसार प्रत्येकाने ईश्वराचा शिष्य या नात्याने नेहमी वागावयाचें असतें. परमेश्वरासाठी मुख्यत्वेंकरून सत्-नाम, व सत्य-नाम हे शब्द वापरण्यांत येतात. हे शब्द म्हणजे जणुं परमतत्त्वच होय असें समजून त्यांचा जप केला जातो.

## सिद्धान्त

परमात्मा नित्य असून सर्वशक्तिमान आहे. त्याच्याशीं तुलना करतां जग क्षणभंगुर आणि निरर्थक आहे, आणि मनुष्य निराधार आणि पराधीन आहे.

ईश्वराला जाणणें किंवा त्याला प्राप्त करून घेणें किंवा त्याच्यांत विलीन होऊन जाणें याचें नांव मोक्ष. ईश्वराच्या कृपेने मोक्ष मिळतो. ईश्वराचें ध्यान करणें आणि सत्-नामाचा जप करणें हीं मोक्षप्राप्तीचीं मुख्य साधनें आहेत. या धर्मांत मूर्तिपूजा अथवा यज्ञ करण्यांत येत नाहीत. हा धर्म असें मानतो की, मोक्षप्राप्तीसाठी गुरूची आवश्यकता आहे. या धर्माच्या अनुयायांचें एक मंडळ असतें, त्यास '**खालसा संगत**' असें म्हणतात. कालक्रमानुसार हें मंडळ अतिशय प्रबळ झालें असून आजहि त्याचें सामर्थ्य जाणवतें. या धार्मिक व सामाजिक मंडळाची स्थापना हें शीख धर्माचें सर्वोत्तम तत्त्व होय.

## धर्म-प्रचार

गुरु नानकांनंतर त्यांच्या शिष्यांनी या धर्माचा प्रचार केला. गुरु अंगद (१५३८–१५५२) वगैरे गुरूंत गुरु अर्जुन (१५८१–१६०६) आणि गुरु गोविन्दसिंह (१६७५–१७०८) यांचीं नांवें विशेष प्रसिद्ध आहेत. गुरु नानकास परमेश्वराप्रमाणे मानावें, असा गुरु अंगदाने उपदेश केला. तर गुरु गोविन्दसिंहाने पूर्व बंगालमध्ये डाक्का शहरांत शीख धर्माचें बळ वाढविलें आणि स्वतः सिंघ-सिंह हें आडनांव धारण केलें. आणि त्यासाठी 'सिंहांचें-शूरवीर योध्यांचें'-एक नवें खालसा मंडळच उभारलें गेलें. गुरु गोविंदसिंहांनी 'दहाव्या **गुरूचा ग्रन्थ**' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. त्यांच्या मृत्यूनंतर शीख लोक गुरूच्या ऐवजीं ग्रंथसाहेबालाच परमतत्त्व मानूं लागले. ते शरिराने मजबूत असल्यामुळे त्यांनी लष्करी शिक्षण घेतलें व ते सैन्यांत भरती झाले. त्यांनी युद्धें करून पंजाबांतून अफगाणांना हुसकून लावलें आणि काश्मीर, मुलतान, पेशावर वगैरे प्रदेश काबीज केला. महाराणा रणजितसिंहांच्या (१७८०–१८३९) प्रभावामुळेच शीख लोक पंजाबचे मालक बनले व युरोपीय पद्धतीने युद्ध करण्याची कला शिकले. १८४९ सालीं शेवटचा महाराणा दुलीपसिंह इंग्रजांना शरण गेला. तेव्हा शिखांची सत्ता संपुष्टांत आली.

## मूल्यमापन

शीख धर्म हा हिंदु व मुसलमान धर्मांना जोडणारा दुवा आहे. त्याने भारतीय जनतेस शौर्याचे धडे शिकविले आहेत. शीख धर्म हा वास्तविक हिंदु धर्माचाच एक भाग आहे. त्याचे मूलभूत सिद्धान्त उपनिषदें व गीता यांतूनच निघालेले आहेत. इंग्रजांच्या 'फोडा व झोडा' या कुटिल राजनीतीमुळे खानेसुमारी–पत्रकांत शीख धर्माचा हिंदु धर्माहून स्वतंत्र धर्म असा निर्देश करण्यांत आला. त्यामुळे आज पंजाबांत शीख व हिंदु यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. शीख लोकांचें शील, चारित्र्य उत्तम असल्यामुळे स्वदेश–संरक्षणासाठी ते नेहमी तयार असतात. ते पंजाबचे सिंह होत. शीख धर्मामुळे शीख लोक शूरवीर, लढवय्ये बनले. तरवार हीच विजयाची नौबत होय, ही शिकवण शिखांना त्यांच्या धर्मानेच दिली. शीख लोक म्हणजे आपल्या सेनादलाचें एक भूषण होय.

# ८ यहुदी धर्म

महापुरुषांनी स्थापन केलेल्या नवधर्मांमध्ये यहुदी धर्म सर्वांत जुना आहे. सगुण ईश्वर एखाद्या धर्मस्थापकाच्या द्वारे दैवी उपदेश प्रकट करतो या समजुतीवर आधारलेल्या पांच विद्यमान धर्मांत यहुदी धर्म सर्वांत जुना आहे. एका अलौकिक पुरुषाने सर्व जग निर्माण केलेलें असून तोच सगळ्या मनुष्यप्राण्यांवर ईश्वर या नात्याने राज्य करतो असा उपदेश करणारे तीन धर्म आहेत, त्यांमध्येहि यहुदी धर्म अतिप्राचीन आहे.

सेमेटिक लोकांच्या सुरुवातीच्या धार्मिक जीवनांतून यहुदी धर्म निर्माण झाला आहे. ते लोक असंस्कृत होते, तरीदेखील ते वृत्तीने धार्मिक होते. त्यांची समाज–रचना गोत्र किंवा कुळ या कल्पनेवर आधारलेली होती आणि प्रत्येक गोत्राचा कुळदेव होता. अशा प्रकारच्या धार्मिक व्यवहारांत मनुष्याला स्वतःच्या कुळाबाहेर कर्तव्यकर्म बजावावें लागत नसे. खेरीज, एकाच कुळांतील व्यक्तींचे परस्परांशीं असलेले संबंध अत्यंत साधेसुधे व प्राथमिक स्वरूपाचे असत.

अशाप्रकारें प्रारंभीं अनेक देवतांची साधी, सरळ कल्पना आणि नीतीचे थोडे सिद्धान्त इतक्याच गोष्टी होत्या. अशा अत्यंत साध्या भूमिकेंतून, ज्यांत नैतिक सिद्धान्तांवर अधिष्ठित असलेला एकेश्वरवाद मान्य करण्यांत आलेला आहे, अशा यहुदी धर्माचा विकास अब्राहाम मोझेस, अेलिजाह आणि इस्राएलचे संत यांसारख्या महापुरुषांनी स्वतःच्या सामर्थ्यावर घडवून आणला.

या धर्माच्या इतिहासांतील अब्राहाम हा अगदी सर्वप्रथम संत होय. त्याचेसमोर ईश्वर प्रकट झाला होता आणि त्यास परिपूर्ण होण्याचा सल्ला ईश्वराने दिला होता. खेरीज, ईश्वराने अब्राहामास कांही विशिष्ट आज्ञादेखील केल्या होत्या. यहुदी धर्मग्रंथ अब्राहामास ‘ संतांचा पिता ’ आणि ‘ प्रभूचा मित्र ’ असें म्हणतात. तरी ह्या धर्माची खरी स्थापना मोझेसच्या ( Moses ) हस्तेंच झाली. ( इ. स. पूर्व १२०० चा सुमार ).

**मोझेसची स्वभावप्रकृति**

मोझेस हे इजिप्तमधील एक हिब्रू असून मोठे सरकारी अधिकारी होते. हिब्रूंना इजिप्तच्या लोकांकडून अतिशय त्रास होतो, हें मोझेसांना कळलें. त्यामुळे त्यांनी ‘मी तो आहें’ या अर्थाचें नांव धारण करून जाहवेहच्या प्रेरणेने हिब्रूंना स्वतंत्र करण्याचा प्रश्न हातीं घेतला. मोझेसांना अंगीकृत कार्यांत यश आलें, इस्राएल लोक स्वतंत्र झाले आणि शेवटीं ते पॅलेस्टाइनच्या स्वर्गीय भूमींत गेले. मोझेसांनी ईश्वराच्या दहा आज्ञा त्यांना शिकवल्या. जगाचे प्रश्न केवळ बुद्धिवादाने सोडविण्याऐवजी, दुःखाचे प्रसंगींहि मनुष्यास जें सुख भोगावयास मिळतें त्याबद्दल मनुष्याने ईश्वराचे आभार मानावयास हवेत व ईश्वराज्ञांचें पालन करावयास हवें, या

स्वरूपाचा उपदेश करून मोझेसांनी लोकांना सन्मार्गाकडे वळविलें व धर्माचे अनुभव समजावून सांगितले. सगुण धर्मनिष्ठ ईश्वरावर प्रत्येकाने श्रद्धा ठेवावयास हवी हें मोझेसांच्या उपदेशाचें तात्पर्य होतें. मागाहून होऊन गेलेल्या **हिब्रू** संतांनी या उपदेशाचें अनुकरण करून त्यांत कालानुसार कांही फेरफार करून धर्म टिकवून धरला. **इझेकिल** आणि **इसाइआह** या संतांच्या वाणीने हिब्रूंत जागृति केली. इ. स. पूर्वी ५१६ सालीं जेरुसलेममध्ये एक देऊळ बांधण्यांत आलें आणि तेव्हापासून विधिपूर्वक पूजा–अर्चा होऊं लागली.

## धर्मग्रंथ : सिद्धान्त

हिब्रू लोकांचा प्रमाणभूत धर्मग्रंथ म्हणजे बायबलमधील जुना करार ( Old Testament ) म्हणून ओळखला जाणारा भाग होय. हा हिब्रू भाषेंतच लिहिलेला आहे. याचीं ३९ प्रकरणें असून त्यांत धर्माचा इतिहास देण्यांत आला आहे. मागाहून कांही संग्रह–ग्रंथ तयार करण्यांत आले आहेत. ईश्वर एकच आहे हा या धर्माचा प्रमुख सिद्धान्त आहे. ईश्वर ऊर्फ जाहवेह हा धर्मनिष्ठ, पवित्र, प्रेमळ आणि बुद्धिमान् आहे. ईश्वरापाशीं कोणत्याहि प्रकारचा भेदभाव नसतो. प्रत्येक पुरुषाने धर्ममय जीवन व्यतीत केलें तर ईश्वराची कृपा त्याचेवर होऊं शकते. ईश्वराने जग निर्माण केलें आहे. तो सर्वशक्तिमान्, सर्वद्रष्टा, सर्वनियंता आणि सर्वांचा उद्धारकर्ता आहे. याच सिद्धान्तांतून येशू ख्रिस्ताला प्रेरणा मिळाली होती.

ह्या ईश्वरास कोणत्याहि प्रकारचें मूर्तरूप नाही. त्यामुळे मूर्तिपूजेस तसेंच ईश्वर अवतार घेतो या कल्पनेस या धर्मांत स्थान नाही. ईश्वर परमपवित्र असून त्याने मानवजातीच्या हितासाठी हें जग निर्मिलें आहे. ईश्वराच्या मार्गाने जाणें, त्याच्या आज्ञा पाळून ईश्वरमय जीवन घालविणें हा मानवी जीवनाचा खरा आदर्श होय. याप्रमाणे यहुदी धर्म नीतिप्रधान एकेश्वरवादाची शिकवण देतो. भावी काळांत मोसाइआह नांवाचा दैवी पुरुष जन्म घेऊन तो सगळ्यांचा उद्धार करणार आहे, असा दिलासाहि या धर्माने दिला आहे.

## मूल्यमापन

एकेश्वरवाद आणि नीतिमय जीवन यांची शिकवण देऊन यहुदी धर्माने जगांतील प्रजेस ईश्वरी पंथाकडे वळविण्याचा स्तुत्य प्रयत्न केलेला आहे. या धर्माने ख्रिस्ती धर्माच्या स्थापनेस प्रेरणा दिली. दुर्दैवाने यहुदी प्रजा विभागली गेली आणि आज तर तिचे जवळजवळ अवशेषच आढळतात. यहुदी धर्मीयांची संख्या सव्वा कोटीच्या आसपास आहे आणि ते जगाच्या साऱ्या भागांत विखुरले गेले आहेत. दुसऱ्या महायुद्धांत जर्मनींत त्यांना भारी त्रास झाला तरीहि त्यांनी आपल्या धर्माचें संरक्षण केलें हें त्यांच्या सचारित्र्याचें निदर्शक होय. ‘ तुम्ही पवित्र व्हा, कारण मी जाहवेह, तुमचा ईश्वर-पवित्र आहें, ’ असा उपदेश करून यहुदी धर्माने पवित्र जीवनाची महति गायिली आहे. ज्या ईश्वरी दहा

आज्ञांवर त्या धर्मानें भर दिलेला आहे, त्या आजहि जगाचें कल्याण करणाऱ्या आहेत. त्या दहा आज्ञा अशा :--

(१) मी तुझा ईश्वर आहें. माझ्याखेरीज दुसऱ्या कोणासहि तूं ईश्वर म्हणून मानूं नकोस.

(२) आकाशांत, समुद्रांत वा पृथ्वीवर असलेल्या कोणत्याहि पदार्थांची तूं मूर्ति खोदूं वा कोरूं नकोस.

(३) कोणत्याहि मूर्तीपुढे वाकूं नकोस.

(४) निष्कारण ईश्वराचें नामस्मरण करूं नकोस. विश्रांतीचा दिवस लक्षांत ठेव व तो दिवस पवित्र मान. त्या दिवशीं तूं, तुझीं मुलेंबाळें, तुझे पाहुणेरावळे, तुझे बंदेगुलाम किंवा तुझीं गुरेंढोरें यांपैकी कोणीहि काम करतां कामा नये.

(५) तूं आपल्या आई–वडिलांचा मान राख.

(६) कुणाचीहि हिंसा करूं नकोस.

(७) व्यभिचार करूं नकोस.

(८) चोरी करूं नकोस.

(९) शेजाऱ्याविरुद्ध खोटीनाटी साक्ष देऊं नकोस.

(१०) शेजाऱ्याच्या स्त्रीची, नोकराचाकरांची, पशुधनाची अभिलाषा बाळगूं नकोस.

## ९ कॉन्फ्युशिअस धर्म

### कॉन्फ्युशिअसचें जीवन

चिनी संस्कृतीचा इतिहास इ. स. पूर्व २३०० वर्षें इतका प्राचीन आहे. समाजाला न्याय मिळावा, जातिजमातींचें कल्याण व्हावें आणि प्रजेची राजकीय जबाबदारी सांभाळली जावी इत्यादि कल्पना प्राचीन चिनी धर्माशीं संलग्न होत्या. ही स्थिति १८०० वर्षें चालू राहिली; परंतु, तीस व्यवस्थित रूप देण्यांत आलेलें नव्हतें. तिची पहिल्याप्रथम व्यवस्था लावण्याचा मान बुद्धाचा समकालीन कॉन्फ्युशिअस ( इ. स. पूर्व ५५१ ते ४७८ ) यास दिला जातो. कॉन्फ्युशिअस यांचा जन्म शांटुंग नामक विभागांत झाला व तेथेच ते मरण पावले. त्यामुळें चिनी लोक तो प्रदेश तीर्थक्षेत्रासारखा पवित्र मानतात. कॉन्फ्युशिअस लहान असतांनाच त्यांचे वडील वारले. कॉन्फ्युशिअस एकोणिसाव्या वर्षींच विवाहबद्ध झाले होते; त्यांना एक मुलगा होता.

कुटुंबाच्या पोषणासाठी कॉन्फ्युशिअसांनी एक शाळा स्थापली. त्यांच्या आदर्श शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थ्यांची संख्या थोडक्याच काळांत खूपच वाढली. त्यांचें कार्यक्षेत्रहि

व्यापक बनलें. ते हळूहळू न्यायाधीशाच्या पदवीपर्यंत पोचले व आपल्या चोख शासनामुळे ते अतिशय लोकप्रिय बनले. लोकांनाहि शांततेची थोरवी कळून आली व ते शस्त्रास्त्रांचा त्याग करूं लागले. कांही उपद्रवी लोकांच्या त्रासामुळे कॉन्फ्युशिअस यांना नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. ते असें आग्रहपूर्वक प्रतिपादित असत की, साऱ्या सुधारणा–अगदी मनुष्याच्या स्वभावांतल्याहि सुधारणा–उत्तम राज्यकारभारामुळेच घडून येतात. एखादा हताश झालेला मनुष्य त्यांचेकडे आला तर ते त्यास धीर देत असत. त्यांचा परमात्म्यावर अतिशय विश्वास होता. त्यांची सहिष्णुता आणि त्यांचा सत्याबद्दलचा आग्रह हे दोन्ही गुण असामान्य होते. त्यांच्या शत्रूंनी त्यांना खूप छळलें. तथापि, त्यांचे अनेक प्रेमळ शिष्यदेखील होते. मनुष्याने कसें वागावें अशांसारख्या विषयांवर त्यांनी उत्तमोत्तम ग्रंथ लिहिले आहेत. हे सारे प्रयत्न करूनहि त्यांना अपेक्षित यशःसिद्धि लाभली नाही. त्यामुळे ते निराश झाले व त्या मानसिक अवस्थेंतच त्यांचा अंत झाला. त्यांच्या शिष्यांनी तीन वर्षेपर्यंत शोक केला आणि त्यांचा एक शिष्य तर त्यांच्या समाधीपुढे सतत सहा वर्षे नुसता बसून राहिला.

कॉन्फ्युशिअस स्वभावाने अतिशय सरळ व स्पष्टवक्ते होते. ते नेहमी सांगत असत की, मी कांहीएक नवीन सांगत नसून मी केवळ परमेश्वराचा संदेश सांगणारा आहें. त्यांचें जीवन अतिशय पवित्र होतें. ते दुराग्रही नव्हते की त्यांच्यांत अहंताहि नव्हती. त्यांचे ठायीं शारीरिक बळ आणि अथांग ज्ञान यांचा सुंदर संगम झालेला होता. त्यांचे ठिकाणीं सगळ्याच गोष्टी, सगळे गुणविशेष समप्रमाणांत होते. त्यामुळे 'औचित्याचा आदर्श' असें त्यांचें वर्णन करण्यांत येत असे. कालानुक्रमाने राज्यांत कॉन्फ्युशिअस यांचें महत्त्व वाढलें. राज्यकर्त्यांकडून त्यांना आजपर्यंत मान दिला जात आहे. त्यांच्या समाधीपुढे राजे पशुयाग करूं लागले, राज्यांतील पाकशाळांतून त्यांच्या सन्मानार्थ यज्ञ करण्याचा हुकूम सुटला, त्यांचीं मंदिरें उभारलीं गेलीं, त्यांचे पुतळे उभारले गेले, त्यांना 'चीनचे महाराज' ही पदवी देण्यांत आली, देवांच्या बरोबरीने त्यांना मानाचें स्थान देण्यांत आलें, आणि १९१४ सालीं चीनच्या प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष युआन शी काई यांनी त्यांची पूजा चालू केली. हा सारा कॉन्फ्युशिअसांच्या गौरवाचा इतिहास आहे.

## धर्मग्रन्थ आणि सिद्धान्त

लोकांना उपदेश करण्यासाठी कॉन्फ्युशिअसांनी ग्रंथ लिहिले व त्यांना त्यांच्या अनुयायांनी प्रमाण मानलें. त्यांच्या ग्रंथांचे दोन भाग पाडण्यांत येतात: (१) प्रमाणग्रंथ (क्लासिक्स–अभिजात साहित्य) आणि (२) चार ग्रंथ. पहिल्या विभागांतील ग्रंथांत इतिहास, कविता, भविष्य जाणण्याची कला आणि औचित्यविचार हे विषय आलेले आहेत. पैकी 'वसन्त आणि शरद्' या नांवाच्या ग्रंथामध्ये देशाचा इतिहास देण्यांत आलेला आहे व तो ग्रंथ ही कॉन्फ्युशिअस यांची स्वतंत्र कृति आहे. मातापितरांशीं मुलाने

कसें वागावें याची चर्चा करणारा ग्रंथदेखील रचण्यांत आला आहे. दुसऱ्या विभागांतील ग्रंथांमध्ये सद्‌गुणांचा उपदेश, मध्यममार्गाचा उपदेश, कॉन्फ्युशिअसांच्या वचनांचा संग्रह आणि त्यांच्या नंतरच्या लेखकांच्या कृति आढळून येतात. या ग्रंथांना वेदांप्रमाणे अपौरुषेय मानण्यांत आलेलें नसलें तरीदेखील चिनी लोकांचे जीवनादर्श निश्चित करण्याच्या बाबतींत ह्या ग्रंथांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

कॉन्फ्युशिअस हे अतिशय व्यवहारकुशल गृहस्थ असल्यामुळे त्यांच्या उपदेशांत तत्त्वज्ञानाच्या विचारांच्या ऐवजी जगांत माणसाने कसें वागावें ह्याची म्हणजे सदाचाराची चर्चाच अधिक प्रमाणांत आढळून येते. तरीदेखील, जगाचें नियंत्रण करणारी एक श्रेष्ठ शक्ति असून, ती अमूर्त, अव्यक्त आहे; नीतिमय जीवन व्यतीत करण्यासाठी ईश्वरावर श्रद्धा ठेवणें आवश्यक आहे, असा उपदेश कॉन्फ्युशिअसांनी अनेकदां केला आहे. सूर्य, चन्द्र, पृथ्वी यांसारख्या नैसर्गिक तत्त्वांची पूजा या धर्माने मानलेली आहे. सामाजिक हित हा या धर्मातील विचारांचा केंद्रबिंदु असल्यामुळे सदाचाराच्या शिकवणीला प्राधान्य मिळालें आहे. जगांत परस्परांशीं संबंध कसे ठेवावेत, त्यासंबंधी कॉन्फ्युशिअसांनी कांही नियम घालून दिले आहेत. हे संबंध पांच प्रकारचे असतात. ( १ ) राजा व प्रजा यांचे परस्परसंबंध ( २ ) पितापुत्रांचे संबंध ( ३ ) पतिपत्नींचे संबंध ( ४ ) मोठ्या व धाकट्या भावांचे परस्परसंबंध आणि ( ५ ) मित्रामित्रांचे संबंध.

हे पंचविध संबंध रामायणांत वर्णिलेल्या आदर्शांशीं बरेच जुळतेमिळते आहेत. तत्त्वज्ञानाची नीरस, शुष्क चर्चा करण्यापेक्षा समाजांतील व्यक्ति परस्परांविषयी प्रेमभाव बाळगून वागतील तर सबंध जगाचें हित होईल. सद्‌भावनेने एकमेकांशीं वागणें हा या धर्माचा मुख्य सिद्धान्त आहे. ज्याप्रमाणे भगवद्‌गीतेंत ‘ स्थितप्रज्ञ ’ पुरुषाचीं लक्षणें सांगितलेलीं असून तो आदर्श समाजाने आपल्यासमोर ठेवावा असा उपदेश करण्यांत आलेला आहे, त्याप्रमाणे या धर्मांत ‘ आदर्श पुरुषां ’ ची वागणूक दाखविण्यांत आलेली आहे. स्त्रियांबद्दल फारसा विचार या धर्मांत करण्यांत आलेला नाही, उलट ग्रंथांतून कांही ठिकाणीं त्यांचा पाणउतारा करण्यांत आलेला आहे.

पूर्वजांविषयी आदरभाव बाळगून त्यांची नित्यनेमाने पूजा करावी असा या धर्माने केलेला उपदेश, हें या धर्माचें दुसरें वैशिष्ट्य होय. चीनच्या अतिप्राचीन संस्कृतींत पितृपूजा मुख्य आहे. चीनमध्ये पितृमंदिरें असून तेथे पूर्वजांची विधिपूर्वक पूजाअर्चा होत असते. आईवडील जिवंत असतांना त्यांचेविषयी मुलाबाळांनी आदरभाव बाळगावयाचा असतो. सत्यनिष्ठा, कृतज्ञता, अध्ययन, न्याय, दान, परोपकार-बुद्धि, मनःशांति व सत्याचा शोध या सद्‌गुणांवर अतिशय भर देण्यांत आलेला आहे. प्रत्येक बारीकसारीक बाबतींत योग्यायोग्याचा म्हणजे औचित्याचा विचार करावा आणि

मध्यमक्रमाने वागावें, ह्या दोन गोष्टींवर जें या धर्मांत सर्वाधिक महत्त्व दिलेलें आहे, तें या धर्माचें प्रमुख तत्त्व आहे. गौतम बुद्ध आणि श्रीकृष्ण या दोघांनीहि मध्यमक्रमाचाच उपदेश केलेला आहे आणि दीडशें वर्षांनंतर ग्रीस देशांत होऊन गेलेल्या प्रसिद्ध तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल यानेदेखील तसाच उपदेश केलेला आहे (अतिरेक आणि न्यूनता या दोहोंचा सुवर्णमध्य म्हणजेच सद्‌गुण). कॉन्फ्युशिअसनंतर होऊन गेलेल्या मेन्सिअसने (इ. स. पूर्वी ३७२–२८९) आग्रहपूर्वक असा उपदेश केला की, मनुष्याचा स्वभाव मूळांतच चांगला असतो. चीनमध्ये या तत्त्वाचा चांगलाच प्रसार झालेला आहे.

## मूल्यमापन

चीनच्या दीर्घकालीन इतिहासावर कॉन्फ्युशिअसांच्या धर्माचा प्रभाव पुष्कळच पडलेला आहे. नीतिमय जीवनावर योग्य भर देणाऱ्या या धर्माने चीनच्या प्रजेची नीतिमत्ता खूप उच्च राखली आहे. गौतम बुद्ध व कॉन्फ्युशिअस हे दोघेहि समकालीन. दोघांनीहि जीवनांतील नीतीचें महत्त्व चांगल्या प्रकारें जाणलें होतें. तथापि, बुद्ध विरक्त होऊन एकान्तांत निघून गेले तर कॉन्फ्युशिअस मानवी समाजाचें कल्याण करण्यासाठी प्रवृत्तिमय जीवन कंठिते झाले. कालक्रमानुसार चीनची राजकीय परिस्थिति पालटली आणि प्रजेने मंचु वंशाचें राज्य उलथून पाडून देशास स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा प्राप्त करून दिला. १९४३ सालीं चीनच्या स्वतंत्रतेचा संपूर्ण उदय झाला आणि १९४९ सालीं 'प्रजासत्ताक चीन' अस्तित्वांत आला. आज चीनमध्ये रशियाचा साम्यवादहि शिरला आहे आणि चिनी लोक कॉन्फ्युशिअसांच्या धर्मसिद्धांतांपासून दूरदूर सरकूं लागले आहेत. त्यांच्यांत शांततेच्या ऐवजी कलहप्रिय वृत्ति प्रादुर्भूत झाली आहे. आज भारताच्या सीमाप्रदेशाचें उल्लंघन करून चीनने भारतांत घुसण्याचें साहसकर्म केलें आहे व असें वागून जागतिक शांततेस धोका उत्पन्न केला आहे. परोपकारी व शांततामय जीवन व्यतीत करावें, या कॉन्फ्युशिअसांच्या सिद्धान्ताचा आज चीनला विसर पडला आहे, ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.

# १० टाओ धर्म

## लाओत्झेचें जीवन

चीनमध्ये एकूण तीन धर्मांचा प्रसार झालेला आहेः—टाओ धर्म, कॉन्फ्युशिअसांचा धर्म व बौद्ध धर्म. त्यांपैकी टाओ धर्म—दैवी मार्गाचा धर्म—सर्वांत जुना आहे. 'टाओ' या शब्दाचा सर्वसामान्य अर्थ सद्‌गुण, परमात्म्याची कृपा असा आहे. या धर्माचे प्रस्थापक लाओत्झे (इ. स. पूर्वे ६०४–५१७) यांचा जन्म मध्य चीनच्या होनान प्रांतांत कॉन्फ्युशिअसांच्या अगोदर सुमारें पन्नास वर्षे झाला. याच सुमारास जगांत झरतुष्ट्र, महावीर, बुद्ध वगैरे होऊन गेले. लाओत्झे चोउ नांवाच्या चिनी वंशाच्या राज्यांत

राज्याचे दप्तरदार म्हणून काम करीत असत. त्यांच्या विद्वत्तेमुळे तत्त्वचिन्तक म्हणून त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली होती. कॉन्फ्युशिअसदेखील वयाच्या चौतिसाव्या वर्षी या महापुरुषाचें दर्शन घेण्यास आलेले होते. त्यांच्या सहवासामुळे कॉन्फ्युशिअसांस प्रेरणा मिळाली होती. तरीदेखील दोघांचे विचार वेगवेगळे होते :–कॉन्फ्युशिअस ह्या जगाविषयीं विचार करीत असत, तर लाओत्झे ह्या जगापलीकडील परलोकाचा विचार करीत असत. एक प्रवृत्तिपरायण, दुसरे निवृत्तिपरायण.

लाओत्झे अतिशय बुद्धिमान् होते. ते स्वतः धार्मिक जीवन कंठीत असत. अहंकारवृत्तीचा नाश करणें हें त्यांच्या सिद्धान्ताचें उद्दिष्ट होतें. ते आपल्या जन्मभूमींतच दीर्घकाळ राहिले व तेथेच त्यांनी एक ग्रन्थहि लिहिला. त्यानंतर ते स्वतःचें गांव सोडून निघून गेले. ते कोठे मरण पावले त्याविषयी कोणालाच माहिती नाही.

लाओत्झे यांचा सिद्धान्त अति–उदार व सभ्यतेचा होता. चांगल्या माणसाशीं चांगल्या प्रकारें वागावें आणि वाईट माणसाशींहि चांगल्या रीतीने वागावें, असें ते सांगत. ख्रिस्तानेहि असाच उपदेश पुढील काळांत केला होता आणि चालू काळांत महात्मा गांधीजींनीहि तसाच उपदेश केला होता. या सभ्यतेच्या, सौजन्यपूर्ण उपदेशामुळे लाओत्झे-विषयीचा आदरभाव लोकांमध्ये कालांतराने खूपच वाढला. इ. स. १५६ सालीं राज्याचे तर्फे असा पहिल्यांदाच हुकूम सुटला की, लोकांनी लाओत्झे यांच्या सन्मानार्थ यज्ञ करावेत. ते एक परमपूज्य तत्त्वचिंतक होते, ते अनेक अवतार घेतात, ते पहिल्यांदा एक भूपति होते, ते एक प्राचीन महर्षि होते, असें कालांतराने लोक मानूं लागले.

## धर्मग्रंथः सिद्धान्त

असें सर्वसामान्यरीत्या मानतात की, टाओ धर्माचा जो मुख्य ग्रन्थ आहे, तो लाओत्झे यांनी स्वतः लिहिलेला आहे. या ग्रन्थाचें नांव '**टाओ–तेह–किंग**' असें आहे. इंग्रजी भाषान्तरकारांनी या नांवाचे वेगवेगळे अर्थ दिलेले आहेत :—(१) ताउ आणि सद्गुणांचा ग्रन्थ, (२) सद्गुणांच्या मार्गाचा ग्रन्थ, (३) परमेश्वराच्या कृपेचा ग्रन्थ, (४) प्रकृति व तिच्या धर्मांचा सिद्धान्त, (५) प्रकृति आणि ईश्वराच्या आविर्भावा-विषयी विचार, (६) बुद्धि आणि सद्गुणांचे नियम. या ग्रन्थांतील वर्णनें व्यवस्थित नसलीं तरी त्यांवरून तत्कालीन चीनच्या सामाजिक परिस्थितीचा चांगलाच बोध होतो. कालक्रमाने या ग्रंथाचें महत्त्व वाढलें आणि 'चींगति' नांवाच्या सम्राटाने (इ. स. पूर्व १५६–१४०) त्या ग्रंथास क्लासिक् ऊर्फ अभिजात ग्रन्थ म्हणून मान्यता दिली.

'टाओ' धर्माचा दुसरा ग्रन्थ अन्याच कालावधीनंतर लिहिला गेलेला आहे. त्याचें नांव आहे '**ताइशांग कांग यिंग पियेन**' म्हणजे कर्मे व त्यांचें फळ ह्यांविषयी चर्चा करणारा ग्रन्थ. या ग्रन्थांत नीतीचा उपदेश करण्यांत आलेला आहे. त्यांतील सज्जनाचें वर्णन अतिशय आकर्षक आहे.

'टाओ' शब्दाचा सर्वसामान्य अर्थ 'रस्ता,' 'मार्ग' असा होतो. जपानी 'शिन्तो'–देवांचा मार्ग–या शब्दांतहि 'टाओ' शब्दच आहे. त्या शब्दाचा विशिष्ट अर्थ 'परमतत्त्व' असा होतो. आकाशदेवाप्रमाणे शान्त, निवृत्तिपरायण आणि साधें जीवन घालविणें हा आदर्श सगळ्यांनी आपल्यासमोर ठेवणें जरूरीचें आहे, असें या धर्माचें सांगणें आहे. आकाश आणि पृथ्वी हीं दोन्ही चिरंजीव आहेत कारण तीं स्वतःसाठी जगत नसतात. त्यामुळे सत्पुरुष जरी स्वतःचा उल्लेख सर्वांच्या शेवटीं करीत असले तरी ते सर्वांच्या अग्रभागीं असतात. मनुष्याने लीनतेने वागावें. जे आपल्याशीं चांगले वागत नसतील त्यांच्याशींदेखील आपण गोडीगुलाबीने, चांगुलपणाने वागावें. अशाप्रकारें भलेपणाने वागणें हें सर्वांचें कर्तव्य ठरतें. सदाचार आणि निवृत्तिपरायण जीवन हाच या धर्माचा प्रमुख सिद्धान्त होय.

## मूल्यमापन

या धर्माच्या मूळ प्रस्थापकांनी सामाजिक अव्यवस्था नष्ट करण्यासाठी नीतीचा जो सुंदर उपदेश केलेला आहे तो आजदेखील सर्वांनी विचारांत घेण्याजोगा आहे. नैतिक भूमिकेवर राहिल्याने मानव–समाजाचें कल्याण साधतां येतें हें 'टाओ' धर्माने चांगल्या प्रकारें दाखवून दिलें आहे. 'टाओ' धर्माचें भारतीय तत्त्वज्ञानाशीं असलेलें साम्य पाहून चीन व भारत ह्या दोन शेजारी देशांच्या तात्त्विक विचारधारा किती परस्परसदृश आहेत, तें लक्षांत येतें. कालानुक्रमाने चिनी लोकांना 'टाओ' धर्माच्या उदात्त तत्त्वांचा विसर पडला आहे. परिणामीं, त्या धर्मांत अनेकेश्वरवाद, भूतपिशाचविद्या, जादूटोणा, आणि देवदेवस्की या गोष्टी घुसल्या आहेत. सध्या धर्मगुरु लोकांना आशीर्वाद देतात आणि मंतरलेले गंडेदोरे अथवा ताईत देतात. लोकहि त्यांचा उपयोग करतात. 'टाओ' धर्माला आज आलेली ही अवकळा पाहून असें वाटतें की, ह्या धर्माची आजची स्थिति अत्यंत करुणास्पद आहे. लाओत्से यांचे उत्तम विचार झिडकारून देऊन आज चिनी लोक विनाशाच्या रोखाने वाटचाल करीत आहेत, ही एक विचित्र दैवघटना आहे. हिंसात्मक साम्यवादाच्या प्रभावामुळे मनुष्याचे अन्तःकरणांत तेवत असलेला ज्ञानदीप कसा विझून जातो आणि उभी मानवजात अंधकारांत कशी चाचपडूं लागते, कशी दुःखीकष्टी बनते, आणि अखेरीस ती कशी नष्ट होते हें सारें आज चिनी लोक प्रत्यक्ष दाखवून राहिले आहेत. यामुळे 'टाओ' धर्माची आवश्यकता उत्पन्न झाली आहे.

# ११ शिन्तो धर्म

## धर्माची स्थापना

शिन्तो धर्म हा जपानी प्रजेचा प्राचीन धर्म आहे. तो इसवी सनापूर्वी ६६० सालीं सुरू झालेला आहे. या धर्माची स्थापना एखाद्या महापुरुषाने केलेली नाही. परंतु, पहिल्यापासूनच

जपानी लोक असें मानीत आले आहेत की, ईश्वराने पहिल्यांदा जपानी बेटें निर्माण केलीं आणि पहिला मिकाडो-जपानचा राजा-हा स्वर्गांतील सूर्यदेवतेचा पृथ्वीवरील साक्षात् अवतार होता. शिन्तो धर्मांत कोणत्याहि प्रकारचें तत्त्वज्ञान नाही. तथापि, प्रकृतिपूजा, राजपूजा आणि पवित्रता या त्रयीवर भर देऊन एक प्रकारचें व्यावहारिक ज्ञान देण्यांत आलें आहे. इतर धर्मांविषयी 'शिंतो' धर्माची वृत्ति औदार्याची आहे. त्यामुळे जपानी लोकांत एकजुटीने वागण्याची वृत्ति दिसून येते. वास्तविकपणें 'शिंतो' धर्म हा देशाभिमानाचा उपदेश करणारा धर्म आहे.

## धर्मग्रन्थ

या धर्माचे दोन मुख्य ग्रन्थ आहेत. ( १ ) कोजिकी—जुन्या गोष्टींचा इतिहास, ( २ ) निहोन्गी—जपानचा इतिहास. हे दोन ग्रन्थ अनुक्रमें इ. स. ७१२ सालीं व इ. स. ७२० सालीं रचले गेलेले आहेत. म्हणजे 'शिन्तो' धर्माच्या प्रारंभानंतर बऱ्याच कालावधीने हे ग्रंथ लिहिले गेलेले आहेत. आज जें जपानी साहित्य उपलब्ध आहे, त्यांत हे दोन ग्रंथ सर्वांत प्राचीन आहेत. मागाहून अनेक धर्मग्रंथ रचले गेले आहेत. मोतूरी ( १७३०–१८०१ ) हा या धर्माच्या समस्त इतिहासांतील सर्वांत मोठा पंडित होता. तो असें म्हणे की, एकटा मनुष्यप्राणीच नव्हे, परंतु पशुपक्षी, वृक्षवेली, समुद्र, पर्वत इत्यादि सारेच देव ऊर्फ ईश्वर आहेत.

## सिद्धान्त

जेव्हा सारा अंधकार दूर व्हावयास लागला तेव्हा आकाश आणि पृथ्वी उत्पन्न झालीं आणि त्यानंतर देव उत्पन्न झाले. सुरुवातीस दोनच देव होतेः—१ **ईझनगी** म्हणजे निमंत्रण देणारा पुरुष व २ ईझनमी म्हणजे निमंत्रण देणारी स्त्री. या दोघांनी मिळून प्रजा उत्पन्न केली. अनेक स्त्री-पुरुष देव मनुष्यांसारखें जीवन कंठूं लागले. प्रारंभीं नैसर्गिक तत्त्वांची पूजा होऊं लागली. देवांच्या नांवांपैकी बहुसंख्य नांवें नैसर्गिक पदार्थांचींच आहेत. प्राकृतिक देवतांत 'अमतेरसु' ( आकाशांत प्रकाशणारा पदार्थ ) या नांवाची सूर्यदेवता मुख्य होय. त्यामुळे जपानी लोकांच्या ध्वजावर सूर्याचें चिन्ह असतें. जपानचा दैवी मिकाडो ( = राजा ) याचा वंश एखाद्या पुरुषदेवापासून निघालेला नसून तो सूर्यदेवापासून उत्पन्न झालेला आहे, जगाचा सार्वभौम नियंता स्त्री-जातीचा आहे, अशी या धर्माची कल्पना आहे.

चन्द्रदेवास सूर्यदेवीनंतर स्थान देण्यांत आलें आणि त्यास सूर्यदेवीबरोबर राहून शासन करण्यास सांगण्यांत आलें. हिंदुधर्मात शक्तीस-देवीस ज्याप्रमाणे परमतत्त्व मानून जगाची प्रशासक म्हणून मानतात त्याप्रमाणे शिन्तो धर्मांत देवी जगाचें संचालन करते असें मानतात. या दोन धर्मांतच स्त्री जातीच्या तत्त्वास म्हणजे देवीस परमतत्त्व मानण्यांत

आलेलें आहे ही बाब सर्वांचें लक्ष वेधणारी आहे. चन्द्रसूर्यांप्रमाणेच तारादेव, पर्जन्यदेव, भूम्रदेवी आणि पर्वतदेव यांचीहि पूजा करण्यांत येत असे.

राजपूजा हा या धर्माचा दुसरा विशिष्ट सिद्धांत आहे. पहिल्या मिकाडोची दिव्य उत्पत्ति साक्षात् सूर्यदेवीपासूनच झाली आहे. पृथ्वीवर राज्य करण्यासाठी सूर्यदेवी त्यास आपल्या मुलास धाडून देते. मिकाडो देवाचा अवतार असून त्याची सत्ताहि देवासारखीच आहे. हिंदुधर्माची राजाविषयी 'सर्वदेवमयो नृपः' अशी जी भावना आहे, तिच्याशीं शिन्तो धर्माची ही भावना मिळतीजुळती आहे. मिकाडोच्या वंशजांची सत्ता सर्वस्वीं स्वतंत्र असून त्यांचें राज्य चिरंतन आहे, असें मानण्यांत येतें. राजा ही पवित्र व्यक्ति असल्यामुळे तिच्या आज्ञेचें उलंघन करूं नये, असा हुकूम राज्याच्या तर्फे १८९० सालीं काढण्यांत आला होता. आकाश व पृथ्वी यांच्याइतकी सनातन आणि तिन्ही काळांत टिकणारी राजपदाची समृद्धि संपादा व ती टिकवून धरा अशी शिकवण देण्यांत आली होती. १९२२ सालीं जपानमध्ये प्रजेची सत्ता वाढली आणि राजसत्ता नष्ट होऊं लागली. दुसऱ्या महायुद्धांत १९४५ सालीं जपानांतील नागासाकी व हिरोशिमा या शहरांवर अमेरिकेने अणुबॉंब टाकल्यामुळे तीं शहरें उद्ध्वस्त झालीं व जपानी बादशहावर अमेरिकी प्रजेचा आश्रित बनण्याचा प्रसंग ओढवला. राजाची दैवी सत्ता अस्तंगत झाली. आधुनिक जपानचा रंगढंग सर्वस्वीं पालटून गेला.

जपानमध्ये शिन्तो धर्माचीं देवळें बरींच आहेत. त्यांमध्ये देवदेवतांची विधिपूर्वक पूजा करण्यांत येते, प्रार्थना करण्यांत येतात, आहुति देण्यांत येतात. प्रार्थनांत एकासुद्धा नैतिक अगर आध्यात्मिक पदार्थाची इच्छा व्यक्त करण्यांत येत नाही, परंतु ऐहिक सुखाच्या अपेक्षा प्रकट केल्या जातात. प्रार्थना कांही विशिष्ट धार्मिक संस्कारांशीं जोडण्यांत आल्या आहेत आणि या संस्कारांची प्रजेच्या उत्सवांशीं सांगड घालण्यांत आलेली आहे.

या धर्मांत पावित्र्यावर अधिक भर देण्यांत आलेला आहे. त्यामुळे जपानी लोक आपलीं शरीरें अतिशय निर्मळ, स्वच्छ ठेवतात. 'परम पवित्रते'चा एक महत्त्वाचा विधि सगळ्या संस्कार-विधींमध्ये आढळून येतो. त्याखेरीज सबंध समाजाच्या अपराधाची भावनाहि या धर्मांत दिसून येते. ह्या अपराधाचें निराकरण करण्यासाठी नेहमी शुद्धीची जरूरी असते. परंतु, ज्या स्वरूपाची शुद्धता करण्यांत येते ती मोठ्या प्रमाणावर बाह्यक्रियारूप असते. तिच्यामध्ये हृदय, विचार आणि सामाजिक संबंध यांची पवित्रता फार थोडी असते. एकंदरीने आपल्याला असें म्हणतां येईल की, या धर्मांत नीतिविषयक सिद्धान्त आणि तत्त्वज्ञान निसर्गाच्या धोरणावर आधारित आहेत. [कालांतराने नीतीचें माहात्म्य खूपच वाढलें. याशिवाय या धर्मांत '**बुशीदो**'—वीर पुरुषांचा मार्ग—ही भावना प्रचारांत आलेली आहे. ही भावना म्हणजे सदाचाराचा एक सिद्धान्त असून तो इसवी सनाच्या अकराव्या व बाराव्या शतकांत जमीनदारीच्या योजनांच्या अनुषंगाने

अधिक प्रमाणांत प्रचलित झाला. याच्यामुळे एकवचनीपणा, धैर्यशीलता, आत्मक्लेश, शिष्टाचार, परोपकार, अभिमान, न्याय आणि आत्मसंयम यांसारख्या सद्गुणांचा चांगल्या-प्रकारें विकास झालेला आहे.

**मूल्यमापन—**

शिन्तो धर्मानें जपानी प्रजेंत नीतिमय जीवन, राजभक्ति, आणि एकी निर्माण करण्यांत मोठा वांटा उचलला आहे. कौटिलीय अर्थशास्त्रांत राजा व प्रजा यांचे दरम्यान जी अद्वैताची भावना दाखविण्यांत आलेली आहे तीच भावना शिन्तो धर्मानें जपानांत निर्माण केली. सुमारें बाराशें वर्षें [ इ. स. पूर्वी ६०० ते इ. स. ५५२ ] या धर्माचा अतिशय जोर होता. नंतरच्या अडीचशें वर्षांत ( इ. स. ५५२-८०० ) बौद्ध धर्मानें जपानमध्ये प्रवेश केला आणि बराच पल्ला गांठला. नंतर नऊशें वर्षेपर्यंत [ इ. स. ८००-१७०० ] शिन्तो धर्म बौद्ध धर्माच्या समागमांत आला. दुसऱ्या धर्माशीं त्याची स्पर्धा सुरू झाल्यामुळे तो दुबळा बनला. १७०० ते १८६८ या सुमारें १७० वर्षांच्या काळांत राजाच्या लष्करी प्रतिनिधींनी मिकाडोची सारी सत्ता हस्तगत केली. तथापि **कद, मबुची, मोतूरी** आणि **हिरत** या चार विद्वानांनी शिन्तो धर्मानें पुनरुज्जीवन केलें आणि १८६८ सालीं या धर्माची पुनः स्थापना झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानची परिस्थिति पुष्कळच बदलून गेली आहे. तरीसुद्धा शिन्तो धर्माची छाप जपानवर पडलेली आहेच. जपानी लोकांनी उद्योग व धाडसें करून स्वतःच्या देशाची आर्थिक स्थिति सुधारली आहे. शिंतो धर्मानें जपानी प्रजेचें संघटन करून तीस चैतन्ययुक्त राखलें आहे, हीच या धर्माची थोरवी आहे.

## अभ्यासाचीं साधनें

1 The World's Living Religions — Prof. R. E. Hume.

2 The Eleven Religions & their Proverbial Lore — Selwyn Gurney Champion.

3 East & West in Religions — Dr. S. Radhakrishnan.

४ जगांतील धर्मपंथ — डॉ. द. ल. सहस्रबुद्धे.

## प्रकरण तिसरें

# जगांतील प्रचलित धर्मांची परस्परांशीं तुलना

### धर्मांची समानता

आपण मागील प्रकरणीं विद्यमान धर्मांची रूपरेषा पाहिली. मानवी समाज टिकवून धरणारी धर्म ही एक शक्ति आहे. मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखाच असल्यामुळे जगांतील भिन्नभिन्न धर्मांमध्ये कांही तत्त्वें स्वाभाविकपणेंच सारखीं आढळतात. वेगवेगळ्या धर्मांत स्थानिक कारणामुळें जरी विविधता आढळत असली, तरी त्या सर्वांच्या बुडाशीं जगाला टिकवून धरणारी एकच भावना आहे. ह्या समान भावनेचा किंवा तत्त्वाचा विचार आपल्याला प्रस्तुत प्रकरणांत करावयाचा आहे.

### अेक परमतत्त्व असल्याची श्रद्धा

विश्वामध्ये एक परमतत्त्व आहे, ह्या कल्पनेचें सुरुवातीच्या काळांत **जैन** आणि **बौद्ध** धर्मांनी खंडन केलें होतें. परंतु, कालांतराने ह्या दोन्ही धर्मांत मूळ धर्मसंस्थापकांची पूजा होऊं लागली व तिचा प्रचार-प्रसार झाला. जोपर्यंत यहुद्यांचें देशाटन चालू होतें, तोपर्यंत **यहुदी** धर्माने जाहवेह नांवाचा पूज्य पदार्थ ईश्वर म्हणून मानला होता आणि तो धर्म असा उपदेश करीत असे की, इतर धर्मीयांनी आपापल्या इष्ट देवतांची विधिपूर्वक पूजा-अर्चा करावी. तथापि, यहुदी लोक एकदा स्थिर झाल्यावर ते **एकच** ईश्वर मानूं लागले व त्यांची ती श्रद्धा आजतागायत टिकून राहिली आहे. कॉन्फ्युशिअस धर्मानेंहि एकाच परमतत्त्वास मान्यता दिलेली आहे. जेव्हा हें तत्त्व सगुण मानण्यांत येतें तेव्हा त्यास ‘सर्वश्रेष्ठ प्रशासक’ म्हणतात; जेव्हा तें निर्गुण मानण्यांत येतें तेव्हा त्यास ‘आकाश’ असें संबोधण्यांत येतें. परमतत्त्वाच्या पूजेच्या कल्पनेचा या धर्माने कालांतराने संकोच केला व एकट्या चीन देशाच्या राजाचीच पूजा प्रचारांत आणली व तीसुद्धा वर्षांतून एकदा होऊं लागली. उत्तरायणांतील रात्रीं डिसेंबरच्या बावीस तारखेस अशी पूजा करीत असत. अद्यापि चालू असलेल्या कॉन्फयुशिअस धर्मांत लोकांना निसर्गदेवता आणि पूर्वजांचे आत्मे यांची पूजा करण्याचा उपदेश करण्यांत येतो. अशाप्रकारें ह्या धर्मांत अनेक आत्म्यांची पूजा रूढ झाली आहे.

झरतुष्ट्र धर्म एकच विश्वव्यापी शक्ति मानतो व ती शक्ति म्हणजे पूज्य आहुरमझ्द. अंग्र-मइन्यु नांवाची दुसरी आसुरी शक्ति नेहमीच आहुर-मझ्दाला विरोध करीत असते. ह्या धर्माने इतर अनेक चांगल्या देवतांनाहि मान्यता दिलेली आहे आणि त्या साऱ्या देवता आहुर-मझ्दाच्या ताब्यांत राहणाऱ्या असल्या तरी त्या पूजा-योग्य आहेत, असें मानण्यांत येतें.

हिन्दु व टाओ या दोन धर्मांत एकच अमूर्त, अव्यक्त परमतत्त्व मानलेलें आहे. ह्या तत्त्वास हिंदुधर्मीय ब्रह्म, परमात्मा, भगवान् असें म्हणतात आणि टाओ धर्म त्यास 'टाओ' असें संबोधतो. लोक ह्या तत्त्वाची पूजा–अर्चा करण्याऐवजी त्याचें ध्यान–चिंतन करतात. परंतु ह्या दोन्ही धर्मांत अनेक देवतांची पूजा रूढ आहे. अशाप्रकारें व्यवहारांत अनेकेश्वरवाद प्रचलित आहे.

जगांत एकच सर्वोत्तम तत्त्व असून त्याचीच सर्वांनी पूजा करावयास हवी या स्वरूपाचा खराखुरा एकेश्वरवाद चार धर्मांमध्ये आढळून येतो. ते धर्म म्हणजे देशाटनानंतरचा **यहुदी** धर्म, **ख्रिस्ती** धर्म, **मुसलमानी** धर्म आणि **शीख** धर्म.

## ईश्वराच्या अवताराची कल्पना

ईश्वर स्वतः अवतार घेतो ही समजूत कित्येक धर्मांत रूढ आहे. मात्र तींत कांही भेद आहेत.

हिंदु धर्मांचें तत्त्वज्ञान वेदोपनिषदांच्या काळापासून सुरू होतें. जगांतील प्रत्येक पदार्थांतून अव्यक्त, अतीत आणि नित्य ब्रह्म प्रकट होतें असें मानण्यांत येत असे. अर्थात्, जगांतील पदार्थ म्हणजे नित्यब्रह्माचे आविष्कार होत, तीं त्याचीं प्रकट–रूपें होत. लोकांत प्रचलित असलेल्या हिंदु धर्मांत अनेक देवता मानलेल्या आहेत. भगवान् विष्णूचे अनेक अवतार होऊन गेले. गीतेंत वर्णिलेले अवतारवाद व विभूतिवाद अतिशय महत्त्वाचे आहेत. कृष्ण हाच पूर्णावतार होय. भागवतांत ( १-३-२८ ) असें म्हटलें आहे की, कृष्णस्तु भगवान् स्वयम् ।

**बौद्ध** धर्मांत प्रारंभीं ईश्वर ही कल्पना निःसंदिग्धपणें मानण्यांत येत नसे. परंतु, कालांतराने लोक खुद्द बुद्धासच अवतारी पुरुष मानूं लागले. बुद्ध हा चोवीस अवतारी बुद्धांपैकी एक असून पंचविसावा बुद्ध भविष्यकाळीं अवतार घेणार आहे, असें बौद्ध धर्मीय मानतात.

**मुसलमानी** धर्म अल्लाहास अतीत मानतो, तरीसुद्धा त्या धर्माला अवतार–कल्पना मान्य आहे. चौथा खलीफ **'अली'** हा खरोखरच इमाम म्हणजे अवतारी पुरुष होता. त्यामुळे तो पैगंबरांच्या गादीचा खराखुरा वारस होता. या प्रभावरूनच कित्येक लोक 'सुनी' पंथीयांपासून वेगळे झाले आणि त्यांनी 'शिया' नामक नवीन पंथ स्थापला. तथापि, 'शिया' पंथीय मुसलमानांतदेखील इतःपर होणाऱ्या अवतारी पुरुषांच्या संख्येविषयी आणि शेवटच्या अवतारी पुरुषाच्या स्वरूपाविषयी मतभेद आहेतच. कांही अनुयायी सात अवतार मानतात तर कांही बारा अवतार मानतात.

**ख्रिस्ती** धर्माचा तर असा अगदी स्पष्ट उपदेश आहे की, येशू ख्रिस्त हा अपूर्व अवतारी पुरुष असून त्याच्या रूपाने ईश्वरी वाणी पूर्णरीत्या प्रकट झाली आहे. कारण, येशूचें चरित्र अदृश्य आणि पवित्र ईश्वरी चरित्राशीं आणि हेतूशीं मिळतेंजुळतें आहे.

## मूळ संस्थापकाचा अलौकिक जन्म

कित्येक धर्मांच्या मूळ संस्थापकांचा जन्म अलौकिकरीत्या, अद्भुतरीत्या झाला होता, असें ते ते धर्म मानतात. हिंदुधर्मांतील कित्येक आचार्यांचा जन्महि अलौकिकरीत्या झाला आहे.

## ईश्वराचे सत्य सिद्धान्त

आज प्रचलित असलेल्या अकराहि धर्मांचे अनुयायी असें मानतात की, आपल्याच धर्मांचे सिद्धान्त सत्य आहेत, त्यांच्यामुळेच जगाचें कल्याण होऊं शकेल व ते ईश्वरदत्त आहेत. हे सिद्धान्त कोणत्याहि एखाद्या मनुष्यप्राण्याने सांगितलेले वा शोधून काढलेले नाहीत. गीतेप्रमाणेच बायबलहि असा उपदेश करतें की, ईश्वराने दुसऱ्या अनेक धर्मांतहि अनेक सिद्धान्तांचा आविष्कार केला आहे. त्यामुळे जगांतल्या सगळ्या लोकांत ईश्वरी सिद्धान्तांचा प्रचार झालेला आहे ( ॲक्टस १४–१७ ).

## वेगवेगळ्या धर्मांतून होणारें सत्य–दर्शन

वेगवेगळ्या धर्मांतून पुढीलप्रमाणे शाश्वत सत्याचें दर्शन होतें.

( १ ) **हिंदुधर्म**—जगांत सर्वत्र ब्रह्म असून सर्व जगच ब्रह्ममय आहे. समाजाची व्यवस्था ईश्वराने केलेली आहे. ब्रह्माशीं एकरूप होणें, ब्रह्मरूप होणें हाच जीवनाचा आदर्श होय.

( २ ) **जैन धर्म**—मोक्षप्राप्तीला त्यागाची व वैराग्याची जरूर असते. शरीरास कष्ट करावयास लावल्याने व तपश्चर्या केल्याने आत्म्यास मुक्ति मिळते.

( ३ ) **बौद्ध धर्म**—स्वार्थ हें दुःखाचें मूळ कारण आहे. वासनाहि दुःखप्रदच होत. हृदयाच्या शुद्धीमुळे व संयमामुळे मोक्षप्राप्ति होते.

( ४ ) **शीख धर्म**—एकाच ‘ सत्य ’ ईश्वराचें शिष्यत्व पत्करून त्याच्या नांवाचा श्रद्धापूर्वक जप करणें हाच खराखुरा धर्म होय.

( ५ ) **मुसलमानी धर्म**—ईश्वर एकच असून तो सर्वशक्तिमान् राजा आहे. शिवाय, तो न्याय देतो, पापपुण्याचें फळहि देतो. अशा ईश्वरास शरण गेल्याने मुक्तप्राप्ति होते.

( ६ ) **झरतुष्ट्र धर्म**—आसुरी शक्तींशीं लढतांना जगताच्या सत् ( दैवी ) शक्तींची मदत मिळविणें याचें नांव धर्म.

( ७ ) **खिस्ती धर्म**—जगांत जी परमसत्ता आहे, ती म्हणजे परिपूर्ण पुरुष होय. तो सर्वांचा पिता आहे असें मानून त्याच्याशीं एकरूप व्हावें. येशू खिस्त हा त्या परिपूर्ण पुरुषाचा पुत्र असल्यामुळे त्यास ईश्वराचा प्रतिनिधि मानावा. ईश्वरी आज्ञांचें प्रेमपूर्वक पालन केल्याने आणि जनसमाजाची प्रेमपूर्वक सेवा केल्याने प्रत्येक मनुष्य मुक्त होतो.

(८) **यहुदी धर्म**—ईश्वरी आज्ञेचें पालन केल्याने उत्तम प्रकारच्या सुखाची प्राप्ति होते.

(९) **कॉन्फयुशिअस-धर्म** : मनुष्यामध्ये ईश्वराने प्रारंभापासून साधुत्व संक्रमित केलें आहे. समाजांत माणसांनी परस्परांशीं चांगल्याप्रकारें वागणें याचें नांव धर्म.

(१०) **टाओ धर्म**—दैवी व पवित्र मार्ग श्रद्धापूर्वक अनुसरणें हाच धर्म.

(११) **शिन्तो धर्म**—प्रकृति म्हणजे निसर्ग ही ईश्वराची सुन्दर कृति आहे. पवित्र जीवन घालविणें व सर्वश्रेष्ठ सत्तेस मान देणें यांतच धर्म सामावलेला आहे.

## ईश्वरी प्रेरणेने रचलेले धर्मग्रन्थ :

जे धर्म भूतकाळांत प्रचलित होते आणि ज्यांची नांवनिशाणीदेखील आज आढळत नाही, त्यांपैकी एकाहि धर्मांत ज्याला आपण धर्मग्रंथ म्हणूं शकूं असा ग्रंथ आढळत नाही. परंतु जे धर्म आज विद्यमान आहेत त्यांमध्ये सत्य-सिद्धांत प्रतिपादणारे शास्त्रग्रंथ आढळून येतात आणि मोक्षप्राप्तीसाठी या धर्मशास्त्रज्ञानाची जरूरी आहे. हे सारे धर्मग्रंथ ईश्वररचित आहेत किंवा ईश्वरी प्रेरणेने रचलेले आहेत आणि त्यामुळे ते स्वतःप्रमाण आहेत, असें मानलें जातें. हे धर्मग्रंथ खालीलप्रमाणे होत.

| धर्म | धर्मग्रंथ | धर्म | धर्मग्रंथ |
|---|---|---|---|
| १. **हिंदु धर्म** | **वेद**–ज्ञानग्रंथ | ८. **यहुदी धर्म** | **नियमग्रंथ,** संतांचे ग्रंथ, आणि पवित्र लेख |
| २. **जैन धर्म** | **अंग**–ज्ञानशरीर | ९. **कॉन्फयुशिअस धर्म** | **पांच क्लासिक्स** व **चार बुक्स.** एक पांच ग्रंथांचा व दुसरा चार ग्रंथांचा, असे दोन वर्ग. |
| ३. **बौद्ध धर्म** | **त्रिपिटक**–उपदेशाचे तीन करंडक. | | |
| ४. **झरतुष्ट्र धर्म** | **अवेस्ता**–ज्ञान | | |
| ५. **शीख धर्म** | **ग्रंथसाहेब**–पुस्तक | १०. **टाओ धर्म** | **टाओ तेहकिंग**– बुद्धि व धर्म यांचीं तत्त्वें. |
| ६. **ख्रिस्ती धर्म** | **बायबल**–पुस्तक | ११. **शिन्तो धर्म** | **कोजिकी**–प्राचीन वस्तूंची हकीकत. **निहोन्गी**–जपानचा इतिहास. |
| ७. **मुसलमानी धर्म** | **कुराण**–वाचन अगर पठण | | |

### चमत्कार

सर्वच धर्मसंस्थापकांचें जीवन अद्‌भुत चमत्कारांनी भरलेलें आहे, असें सामान्यपणें मानण्यांत येतें. हे चमत्कार धर्माच्या दृष्टीने बरेच उद्‌बोधक असल्याची समजूत आहे.

### शिष्टाचार

मनुष्यमात्रांनी एकमेकांशीं कसें वागावें व आपापलें जीवन कसें घालवावें त्यासंबंधी निरनिराळ्या धर्मांत अनेक नियम दिलेले आहेत. हे नियम प्रायः एकाच प्रकारचे आहेत. पैकी कांही नियमांचें स्वरूप पाहूं.

**हिंदु धर्म** 'ज्या वर्तनाने तुम्हांला स्वतःला दुःख होईल असें वर्तन दुसऱ्यांशीं करूं नये. मानवी कर्तव्यांचें सारें सार हेंच आहे.'[१]

### बौद्ध धर्म

"मनुष्याने स्वतःचे मित्र आणि परिचित यांचेशीं पांच प्रकारचें वर्तन ठेवावें... स्वतःच्या जातीबरोबर तो जसा वागतो तसेंच त्याने मित्र-परिचितांशींहि वागावें."

"हे राहुला ! असें एखादें कार्य आहे काय की जें करण्याची तुझी इच्छा आहे ? तर मग तूं असा विचार कर—'अमुक एक काम केल्याने माझें एकट्याचेंच नुकसान होणार आहे की इतरांचेंहि होणार आहे की आम्हां सर्वांचेंच होणार आहे ?' जर एखादें कृत्य सर्वांनाच दुःखदायक ठरणारें असेल तर तें वाईट समजून वर्ज्य करावें. असें हानिकारक कृत्य तूं कधीच करतां कामा नये."[२]

### झरतुष्ट्र धर्म

"जी गोष्ट आपल्याला रुचत नाही, आवडत नाही, ती दुसऱ्यांनाहि आवडणार नाही हें लक्षांत ठेवावें. जेव्हा तुम्ही अशा प्रकारें वागाल तेव्हा तुम्ही पवित्र जीवन व्यतीत करीत आहांत असें मानलें जाईल."[३]

"जो मनुष्य स्वतःला न रुचणारें कृत्य इतरांनाहि रुचणार नाही अशी जाणीव मनांत बाळगून तें टाळतो, तोच सज्जन समजावा."[४]

---

१. महाभारत ५-३९-५७ संशोधित आवृत्ति, पुणें. २. मज्झिम निकाय १-४१५. ३. पेहलवी ग्रंथ–भाग १, से. बु. ई. २४-३३०. ४. पेहलवी ग्रंथ–भाग २, से. बु. ई. १८-२७१.

### ख्रिस्ती धर्म

" इतरांनी माझ्याशीं अमुक अमुक प्रकारें वागावें अशी जेव्हा तुम्ही इच्छा बाळगतां तेव्हा इतरांशींहि तसेंच वागणें हें तुमचें कर्तव्य ठरतें. "[1]

### यहुदी धर्म

" मुलांनो, जें काम तुम्ही पत्कराल तें लक्षपूर्वक करा. सर्वांशीं विवेकाने वागा. जी गोष्ट तुम्हांला स्वतःला रुचत नसेल, ती इतरांच्या बाबतींत करूं नका. "[2]

" इतरांची जी वागणूक तुम्हांला स्वतःला आवडत नसेल, तशी वागणूक इतरांना देऊं नका. "[3]

अशा प्रकारें जगांतील सगळ्या धर्मांत एकाच गोष्टीवर भर दिलेला आहे आणि ती ही की, आपल्याला जें आवडत नाही, तें इतरांनाहि आवडणार नाही, या जाणिवेने सर्वांनी वागावें.

### पवित्र संघ

प्रत्येक धर्मांत त्या त्या धर्माचे आदर्श पाळणाऱ्या अनुयायांचा एक वर्ग असतो. तो वर्ग एक संघ किंवा मंडळ स्थापन करतो. जैन व बौद्ध धर्मांनी आपापल्या धर्माच्या अनुयायांचा एक संघ स्थापलेला आहे. हिंदुधर्म असें प्रतिपादन करतो की, वर्णाश्रम-व्यवस्था उत्कृष्ट असून तिच्यामुळे सामाजिक व्यवहार उत्तम प्रकारें चालत आहेत. साधु आणि संन्यासी, आचार्य आणि भक्त यांचे संघ स्थापले गेले आहेत.

### विश्व-धर्म

जगांतले धर्म ज्या भिन्नभिन्न आशा-अपेक्षा बाळगतात त्यांच्या अनुरोधाने जागतिक धर्मांचे अनेक वर्ग पडूं शकतात. शीख व टाओ या धर्मांच्या ग्रंथांत विश्वधर्माची भावना आढळून येत नाही. आणि या दोन धर्मांच्या आजपर्यंतच्या इतिहासावरून अशी भावना पूर्वी कधीकाळीं बाळगण्यांत आली होती, असें कोठेहि जाणवत नाही. कॉन्फ्युशिअस व शिन्तो या धर्मांच्या ग्रंथांतून विश्वधर्माच्या कल्पनेची चर्चा आढळून येत नाही हें खरें; तथापि, पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत या धर्मांच्या अनुयायांत कित्येक सुधारक होऊन गेले व त्यांनी आपापल्या धर्मांचा प्रचार करण्याचे प्रयत्न केले. जैन, यहुदी व झरतुष्ट्र या तीन धर्मांचे ग्रंथ असें पुकारतात की, आमचा धर्म सर्वत्र जगांत प्रचलित होईल व त्याला ' विश्वधर्म ' म्हणून मान्यता मिळेल. परंतु, या धर्मांचा इतिहास लक्षांत घेतां, त्यांची वरील आशा अद्यापि तरी फलद्रूप झाली नसल्याचें लक्षांत येतें.

---

१ मॅथ्यु, ७·१२. २. टोबिट, ४·१४–१५ ३. बॅबिलोनियन शेब्बाथ, ३१ अ

हिंदु धर्माचे सिद्धान्त, विशेषतः गीताप्रणीत सिद्धान्त, विश्वधर्म म्हणून स्वीकारण्याच्या योग्यतेचे आहेत. आपल्या धर्माचा जगतांत प्रचार, प्रसार करण्याची हिंदूंची वृत्ति नसल्यामुळे हिंदूंच्या धर्मग्रंथांत हिंदु धर्मास 'विश्वधर्म' हें विशेषण लावण्यांत आलेलें नाही. परंतु, वस्तुतः गीताप्रणीत धर्म 'विश्वधर्म' बनूं शकेल व गीतोपदेशक श्रीकृष्ण जगद्गुरु होण्याच्या योग्यतेचा आहे. बौद्ध धर्म, खिस्ती धर्म, आणि मुसलमानी धर्म या तिर्हांच्या शास्त्रग्रंथांमध्ये विश्वधर्माची भावना स्पष्ट स्वरूपांत आढळून येते. आपला धर्म विश्वधर्म बनावा यासाठी वरील तिन्ही धर्मांच्या स्थापकांनी पहिल्यापासूनच प्रयत्न केले आहेत. नंतरच्या काळांतहि या धर्मांच्या प्रचारामुळे हे धर्म जगाच्या वेगवेगळ्या भागांत पसरलेले आहेत. एकंदरींत, बौद्ध धर्म आजमितीस शांत आणि निवृत्तिपर आहे. त्यामुळे विश्वधर्म होण्याच्या बाबतींत एकटा मुसलमानी धर्मच खिस्ती धर्माशीं स्पर्धा करीत आहे. जगांतील सगळीं माणसें एकाच बापाचीं–ईश्वराचीं–लेकरें आहेत, ही खिस्ती धर्माची प्रमुख शिकवण आहे. खिस्ती धर्म हा विश्वव्यापी धर्म कसा होऊं शकतो, ह्याविषयी त्या धर्माने एक व्यावहारिक व विधायक मार्ग दाखवून दिला आहे आणि तो असा की, सगळ्या खिस्त्यांनी स्वार्थत्याग करावा, प्रसंगीं आत्मबलिदानास तयार व्हावें, आनन्दाने धार्मिक जीवन घालवावें आणि जगाची सेवा करावी. हीं ध्येयें गांठण्यासाठी सर्व खिस्त्यांनी परस्परांशीं संपूर्ण सहकार्य करण्याची जरूरी आहे.

चालू युगांत भारतांतील अनेक महापुरुषांनी हिंदुधर्मास विश्वव्यापी बनविण्याचे अनेक प्रयत्न केले. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानन्द सरस्वती यांनी वैदिक धर्माची विशालता वाढवून हिंदुसमाजास अधिक व्यापक बनविलें, ज्ञातिज्ञातींचे गट मोडून काढले, धर्माचें द्वार सर्वांसाठी खुलें केलें, शुद्धि व संघटना या साधनांच्या द्वारे इतर धर्मीयांना हिंदु धर्मांत घेतलें, आणि प्रजेंत खूपच चैतन्य निर्माण केलें. स्वामी रामकृष्ण परमहंसांचे परमशिष्य स्वामी विवेकानन्द यांनी अमेरिकेंत वेदान्त तत्वज्ञानावर व्याख्यानें देऊन तत्रस्थ प्रजेला वेदान्ताकडे आकृष्ट केलें. अमेरिकेंतील वेदान्त सोसायटीनें आणि रामकृष्ण मिशनने सबंध विश्व एकखंड असून त्याचा धर्महि एकमेव आहे आणि तो म्हणजे वेदान्ताचा धर्म होय, अशी घोषणा केली आहे. आज अमेरिकेंत वेदान्त-धर्माचे अनेक अनुयायी आढळून येतात. वेदान्तांतील अद्वैतवाद उभ्या जगतांत अद्वैत स्थापूं शकेल, इतकें सामर्थ्य त्या वादांत आहे. त्याच्या प्रसारासाठी दयानन्द सरस्वती, विवेकानन्द, गांधीजी अशांसारख्या व्यक्तींची फक्त जरूरी आहे.

## मृत्यूनंतर काय ?

मरणोत्तरहि मनुष्याचा आत्मा टिकून राहतो, असें सगळेच धर्म मानतात. परंतु, मरणोत्तर जीवनाचें वर्णन व त्या भावी जीवनाची आवश्यकता यांविषयी वेगवेगळ्या

धर्मांत निरनिराळीं मतें दिलेलीं आढळतात. **हिंदुधर्मातील** विचारांनुसार पुण्यकर्मांनी व्यक्तीस स्वर्गप्राप्ति होते तर पापकर्मांमुळे नरकवास भोगावा लागतो. पुण्याचा क्षय झाल्यानंतर आत्मा पुनश्च या मृत्युलोकांत येतो. भक्ति केल्याने आत्मा वैकुंठांत भगवंतांच्या जवळ राहून दिव्य आनंद उपभोगतो तर ज्ञानामुळे आत्मा ब्रह्मरूप होतो. कांहींच्या मतें जगत् ही एक भ्रांति आहे तर कांही हिंदूंच्या मतानुसार जगत् हा परमात्म्याचाच परिणाम असल्यामुळे–परमात्मा स्वतःच जगद्रूप होत असल्यामुळे–जगत् सत्य आहे.

**बौद्ध** धर्माची अशी समजूत आहे की, मनुष्यजीवनाला दुःखामुळे अतिशय अवकळा आलेली आहे. त्यामुळे मानवी प्राण्यास दीर्घकाळपावेतो टिकूं देऊं नये. वासना–त्यागाने मनुष्याच्या दुःखीकष्टी आणि क्षणिक जीवनाचा सरतेशेवटीं संपूर्णपणें नाश होऊं शकतो. **जैनधर्माची** शिकवण अशी आहे की, आत्म्याची अमरता स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. अखेरीस व्यक्तीच्या कर्मानुसार आत्म्यास स्वर्गांत अथवा नरकांत स्थान मिळतें. हिंदुस्थानांत उत्पन्न झालेल्या चारी धर्मांनी **पुनर्जन्माचा सिद्धान्त** स्वीकारलेला आहे. मनुष्याने इहलोकीं जीं कांही कर्मे केलेलीं असतील त्यांनुसार त्यास मरणोत्तर दुसरा जन्म घ्यावा लागतो व अशा प्रकारें जन्ममरणाचे फेरे चालूच राहतात, असें कर्म-सिद्धान्त प्रतिपादितो.

**झरतुष्ट्र व महंमद** यांच्या धर्मांत असें मानतात की, ईश्वर न्यायदानाच्या दिवशीं माणसांना त्यांच्या चांगल्यावाईट कृत्यांचीं फळें देतो व त्या प्रसंगीं कोणतीहि व्यक्ति सुटूं शकत नाही. **मुसलमानी धर्मांमध्ये** तर स्वर्ग-नरकांचें अद्‌भुत वर्णन करण्यांत आलें आहे. त्या वर्णनाच्या बरोबर असेंहि सांगितलें आहे की, पवित्र माणसें स्वर्गांत जाऊन तेथे बहुविध आनंदाचा उपभोग घेतात आणि अल्लाहला शरण न जाणारे नास्तिक लोक नरकांत जातात व तेथे त्यांना अनेक हालअपेष्टा सोसाव्या लागतात. **झरतुष्ट्र** धर्मांत स्वर्ग-नरकांच्या वर्णनांत विषयाच्या सुखदुःखांच्या तत्त्वास फारसें महत्त्व देण्यांत आलेलें नाही आणि त्याबरोबरच असेंहि सांगितलें गेलें आहे की, प्रकटीकरणाच्या संस्काराच्या ( apocalyptic ceremonial ) योगें शेवटीं पापाचा नाश होऊं शकतो.

बायबलांत तसेंच नंतरच्या काळांत रचल्या गेलेल्या **ख्रिस्ती** धर्मग्रंथांत मनुष्याच्या मरणोत्तर स्थितीविषयी अनेक मतें आढळून येतात. परंतु, त्यांत एक गोष्ट अगदी स्पष्टपणें सांगितलेली आहे ती अशी की, एक दिवस भविष्यकालांत असा उजाडेल की ज्या दिवशीं प्रत्येकास त्याच्या कर्मानुसार न्याय दिला जाईल; चांगल्या माणसांचा ईश्वराशीं दृढसंबंध प्रस्थापित होईल व त्यांना आनंद लुटावयास मिळेल; दुष्ट माणसें ईश्वरापासून वेगळीं होऊन हालअपेष्टा सहन करीत राहतील. अर्थात् ह्या हालअपेष्टांना दुष्ट माणसें स्वतःच जबाबदार असतात. बायबलांत म्हटलें आहे की, ‘ कोणीहि ईश्वरास फसवूं शकत

नाही. मनुष्य जसें करतो तसें भरतो. " ( Galatians 6.7 ) येशूने आपल्या शिष्यांना असा निःसंदिग्ध उपदेश केलेला आहे की, जर तुम्ही मनुष्यावर प्रेम केलेंत तर तुमची आध्यात्मिक उन्नति जरूर होईल. जे कांही इतर परिणाम घडून येतात, त्यांच्याविषयींहि बहुविध मतें देण्यांत आलेलीं आहेत. याविषयी एक महत्त्वाचा सिद्धांत पॉलच्या वचनांत दिलेला आहे. तो असा :--" पापाचें फळ मरण हें आहे, परंतु अमर जीवन हें ईश्वराचें पारितोषिक आहे ! " ( Romans 6·23 )

## अभ्यासाचें साधन

Lectures on Comparative Religion—Prof. A. A. Macdonell

## प्रकरण चवथें

# उपसंहार

### धर्म आणि विविध धर्म

जगांतील विद्यमान धर्मांची तुलना व चर्चा केल्यानंतर एक गोष्ट अगदी स्पष्टपणें जाणवते ती अशी की, धर्मांची स्वरूपें जरी विविध असलीं तरी त्या सर्वांच्या बुडाशीं एकच तत्त्व आहे. सूत्रबद्ध भाषेंत हीच गोष्ट अशी सांगतां येईल :—धर्म अनेक असले तरी **धर्म** एकच आहे. ज्याप्रमाणे सगळ्या माणसांमध्ये मनुष्यत्व हें सर्वसमान तत्त्व एक असून तें नित्य आहे, तद्वत् सगळ्या धर्मांत **धर्मत्व** नामक तत्त्व एकच असून तें नित्य आहे. अतिप्राचीन काळीं मनुष्यमात्राचे ठायीं असलेली धर्मभावना या ना त्या स्वरूपांत आजहि आढळून येते. या दृष्टीने विचार करतां जो समाजाचें धारण करतो, समाजास टिकवून धरतो तो धर्म—'धारणात् धर्म इत्याहुः', हें धर्मलक्षण यथायोग्य वाटतें. अनादि काळापासून जगांतल्या निरनिराळ्या लोकसमूहांचें धारण करून त्यांचें संवर्धन करण्याचें कार्य धर्मानेच केलें आहे. जगत् गतिमान् असल्यामुळे त्याची स्थिति वेळोवेळीं पालटत असते. परिस्थिति बदलली की, धर्मांच्या बाह्य स्वरूपांत स्वाभाविकपणेंच फेरफार होतात. वास्तविक पाहतां धर्म ही संस्था समाजासाठीच अस्तित्वांत आलेली आहे. त्यामुळे धर्म व समाज या उभयतांचे संबंध अतिशय घनिष्ट आहेत. परिणामीं, त्यांचा विकास आणि इतिहास, दोन समांतर रेषांप्रमाणे, बरोबरीनेच घडतो. ज्याप्रमाणे पाण्याची पातळी सर्वत्र सारखी असते, त्याप्रमाणे समाज व धर्म हे एकाच पातळीवर असतात.

### रुचि-भेद : प्रयोजन एक

प्रत्येक मनुष्यामध्ये सत्व, रजस् व तमस् हे त्रिगुण कमीअधिक प्रमाणांत असतात. कांहींच्यांत सत्त्वगुण प्रामुख्याने असतो तर कांहींच्यांत रजोगुण तर इतर कांहींच्यामध्ये तमोगुण प्रामुख्याने असतो. या गुणभेदामुळे प्रत्येक मनुष्याचे आचारविचारांत नैसर्गिकपणेंच फरक पडतो. महाकवि कालिदासाने ह्या दृष्टीनेच म्हटलें आहे की, 'भिन्नरुचिर्हि लोकः' (रघुवंशम्—६·३०). अशा भिन्नभिन्न रुचीच्या लोकांना संतुष्ट करण्यासाटी विविध प्रकारच्या धर्मांची आवश्यकता असते. महिम्नस्तोत्रांत पुष्पदन्त कवीने (सुमारें इ. सनाचें १० वें शतक) प्रथमतः वेद, सांख्य, योग, पाशुपत आणि वैष्णव हीं दर्शनें (Systems of philosophy) सांगितलीं आहेत व त्यानंतर असें म्हटलें आहे की, प्रत्येकजण आपापल्या रुचिभेदानुसार वेगवेगळा मार्ग स्वीकारीत असतो; परंतु, वस्तुतः त्या सर्व मार्गांचें प्रयोजन एकच असतें. त्या सर्वांत एकाच परमात्म्याच्या प्राप्तीचा उपदेश असतो. कविकृत मूळ संस्कृत श्लोक पुढीलप्रमाणे आहेः—

त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥ ७ ॥

**अर्थ**:—हें श्रेष्ठ हित साधणारें आहे, हें श्रेष्ठ हित साधणारें आहे (परं पथ्यम्) अशीं निरनिराळी अभिरुचि असणारीं माणसें असल्यामुळे वेगवेगळीं शास्त्रें रचण्यांत आलेलीं आहेत. उदाहरणार्थ, तीन वेद (आणि अठरा विद्या), सांख्य दर्शन (कपिल मुनींचें), योगदर्शन (पतंजलि मुनींचें), पशुपति–महादेवाचें दर्शन (गुजरातेंत बडोद्याजवळ 'कारवण' गांवीं पाशुपत दर्शनाची उत्पति झाली आहे असें, तेथे मिळालेल्या प्राचीन 'लकुलीशा'च्या मूर्तीवरून, अनुमान निघतें), वैष्णव दर्शन (पांचरात्र आणि भागवत संप्रदाय), वगैरे शास्त्रें. रुचिभेदपरत्वें सरळ व कुटिल अशा वेगवेगळ्या मार्गांनी जाणारे लोक, हे सर्वश्रेष्ठ महादेवा, तुला एकट्यालाच प्राप्त करून घेतात. ज्याप्रमाणे यमुना, सरयू यांसारख्या वेड्यावांकड्या नद्या (दुसऱ्या मोठ्या नद्यांना मिळून परंपरेने) आणि गंगा, नर्मदा यांसारख्या सरळ वाहणाऱ्या नद्या (साक्षात्) समुद्रास जाऊन मिळतात त्याप्रमाणे स्वतःच्या रुचीनुसार वेगवेगळ्या मार्गांनी जाणाऱ्या माणसांना साक्षात् अथवा परंपरेने एकट्या तूंच (महादेव, परमतत्त्व) प्राप्त होतोस. अर्थात् सगळ्या शास्त्रांचें तात्पर्य परम-तत्त्वांतच, परमात्म्यांतच सामावलेलें असतें. हीच गोष्ट गीतेंतहि सांगितलेली आहे. कृष्ण म्हणतो की, जगांत माझ्या असंख्य विभूति आहेत (१०·४). 'जी जी वस्तु ऐश्वर्ययुक्त किंवा शोभायुक्त किंवा कांहीतरी प्रभावाने युक्त असेल, ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झालेली आहे' (१०·४१). 'जे श्रद्धापूर्वक अन्य देवतांना भजतात, तेहि माझीच सेवा करितात' (९·२३).

## सिद्धसेन दिवाकर

जैन दर्शनाचे महान् तत्वचिन्तक **सिद्धसेन दिवाकर** हेंसुद्धा हेंच तत्त्व सांगतात. ते म्हणतातः—

उदधाविव सर्वसिन्धवः समुदीर्णास्त्वयि नाथ दृष्टयः ।
न च तासु भवान् प्रदृश्यते प्रविभक्तासु सरित्स्विवोदधिः ॥

(द्वात्रिंशद् द्वात्रिंशिकास्तोत्र, ४·१५)

**अर्थः** हे नाथ, ज्याप्रमाणे सर्व नद्या समुद्रांत सामावलेल्या आहेत, त्याप्रमाणे सगळ्या दृष्टि, सर्व प्रकार, साऱ्या विचारसरणी तुमच्यामध्ये सामावलेल्या आहेत. परंतु, ज्याप्रमाणे वेगवेगळ्या नद्यांमध्ये समुद्र जाणवत नाही, त्याप्रमाणे भिन्नभिन्न दृष्टिकोणांत, विचारसरणींत,

तुमचें अस्तित्व जाणवत नाही. म्हणजेच कोणत्याहि एकाच विचारसर्णीत, एकाच दर्शनांत, एकाच सिद्धान्तांत परमतत्त्वाचें संपूर्ण दर्शन घडूं शकत नाही. तर मग दार्शनिकांनी एक-मेकांशीं लढण्यांत काय तात्पर्य आहे ? जैन दर्शनांतील स्याद्वादाचा सिद्धान्त जर पूर्णपणें आकलन झाला आणि जर त्याचें दैनंदिन व्यवहारांत पालन केलें गेलें तर सर्वच दृष्टिकोणांचा चांगल्या प्रकारें समन्वय साधला जाऊन जगांत प्रेमाचें राज्य स्थापणें शक्य होईल.

धर्मांतील नानात्वामध्ये असलेल्या एकत्वाविषयी भारतांतील तत्त्वज्ञांप्रमाणेच पाश्चिमात्य विचारवंतांनीहि आपले विचार मांडलेले आहेत. सगळेच धर्म परमतत्त्वाच्या प्राप्तीसाठी निर्माण झालेले असून आपापल्या युगांत आपलें उद्दिष्ट गांठून ते निघून जातात. अशा प्रकारें धर्मांचा प्रवाह जगांत अप्रतिहपणें वाहत आहे.

## टेनिसन्

इंग्रज कवि टेनिसन् म्हणतो की,

Our little systems have their day;
They have their day and cease to be;
They are but broken lights of Thee;
And Thou, O Lord, art more than they.

( In memoriam )

**अर्थ** : आपल्या तत्त्वज्ञानाच्या शाखांचीसुद्धा ठराविक काळांत चलती असते. त्या काळांत त्यांचा अतिशय प्रभाव पडतो. परंतु, तदनंतर त्या शाखा मावळतात. त्या शाखा म्हणजे, हे प्रभो, तुझ्या प्रकाशाचीं विखुरलेलीं किरणें होत व तूं, हे सर्वेश्वरा, त्या सर्वांहून प्रभावसंपन्न आहेस. अर्थात्, तत्त्वज्ञानाच्या कोणत्याहि सिद्धान्ताला परमतत्त्वास स्पर्श करतां येत नाही, तेथपर्यंत पोचतांहि येत नाही. परमतत्त्व अतिव्यापक तर तत्त्वज्ञान-शाखा अति-मर्यादित. परमात्मा सर्वांपलीकडे आहे.

## कॉन्फ्युशिअस

वरील दृष्टिकोणांतूनच **कॉन्फ्युशिअसांनी** असं म्हटलें की, नीतीच्या सनातन सिद्धान्ताच्या पायावर उभारलेली शासनपद्धति अवघ्या जगांत शांतता आणि सुख-समाधान निर्माण करूं शकेल. अशा स्वरूपाचें एकच राज्यशासन उभ्या जगांतील सगळया दुःखांचा शेवट करील आणि परिणामीं कल्याणकारी राज्याची स्थापना होईल. खरोखरच हा धर्म सनातन आहे. /

## धर्मांचा तुलनात्मक अभ्यास

या साऱ्या चर्चेनंतर एक गोष्ट आपल्याला स्पष्टपणं समजून येते ती अशी की, धर्मभेदाखातर मानवी समाजांत भेदाभेद पाळण्यास, दुसऱ्या धर्मीयांशीं द्वेषभावाने वागण्यास,

आणि धर्माच्या नांवाखाली हिंसा करण्यास कोणतेंहि सबळ कारण नाही. इतकेंच नव्हे, तर धर्माच्या नांवाखाली युद्ध करणें हें धर्माच्या स्वरूपाशींच विसंगत आहे. आम्ही धर्म पाळतों अशी प्रौढी मिरविणारे लोक जेव्हा हिंसेसारखीं पापकृत्यें करतात तेव्हा येशू ख्रिस्ताप्रमाणे आपल्याला असें वाटूं लागतें की, हीं सारीं स्वतःला "धार्मिक" म्हणविणारीं माणसें जी एकमेकांची हिंसा करीत आहेत, तिच्यावरून त्यांना धर्म म्हणजे काय तें बरोबर उमगलेलेंच नाही. धर्माच्या सत्स्वरूपविषयक अज्ञानामुळे विश्वामध्ये धर्म-विग्रह उत्पन्न होतात. विग्रहाचें कारण धर्म नसून धर्मविषयक दारुण अज्ञान हें होय. त्यासाठी प्रत्येक देशांतील प्रजेला धर्माच्या खऱ्याखुऱ्या स्वरूपाची माहिती करून देणें आवश्यक आहे. भिन्नभिन्न धर्मांच्या तौलनिक अभ्यासामुळे इतर धर्मांतील उदात्तसुंदर तत्त्वें व सर्व धर्मांची समान भूमिका यांची चांगल्या प्रकारें जाणीव होऊं शकते. आपल्या देशांतील अभ्यासक्रमांत धर्मांच्या तौलनिक अभ्यासास प्रवेश मिळणें आवश्यक आहे हें लोकांना आता जाणवलेलें आहे. गुजरात विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ ह्यांसारख्या कांही विद्यापीठांनी या दिशेने पावलें टाकलीं आहेत हें एक सुचिह्न होय. धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासाने भारताचें संप्रदायरहित राज्यधोरण अधिक सफळ होईल आणि आपला देश जगाला प्रेरणा देणारा देश बनूं शकेल.

धर्माच्या नांवावर समाजाची फाळणी करावी, एकच धर्म पाळणाऱ्या राष्ट्रांनी एकत्र येऊन एक महान् संघटना उभारावी आणि नंतर इतर धर्मांच्या प्रजेवर वर्चस्व प्रस्थापित करावें, सगळे देश जिंकून जगांत स्वतःचा धर्म प्रसृत करावा, अशा प्रकारच्या मनीषा बाळगणारीं आजचीं कांही राष्ट्रें योग्य मार्ग विसरलीं आहेत, असें म्हणावयास हवें. धर्मासारख्या निर्दोष तत्त्वाचा आधार घेऊन कांही लोक स्वतःच्या आचारविचारांच्या द्वारें अधर्माचीच स्थापना करून राहिले आहेत, ही जगांतील एक विचित्र व विपरीत घटना आहे. जगांतल्या प्रत्येक देशांतील प्रजेला आपला स्वतःचा धर्म आहे आणि त्याचें योग्य प्रकारें पालन होत आहे, असें मानलें जातें. तथापि, जेव्हा आपल्याला कांही धर्मीयांचीं कृत्यें आढळून येतात, तेव्हा असें जाणवूं लागतें की, हा सारा दांभिकपणा आहे, ही सारी फसवाफसवी चालू आहे. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे लोक स्वजातीस 'धार्मिक' म्हणवून एकमेकांची हिंसा करतात, हें दृश्य आपणांस थरथरां कांपवितें. गेल्या दोन महायुद्धांतील बहुसंख्य प्रजा तर एकच धर्म पाळणारी असूनहि ती आपापसांत लढली ! धर्माच्या घोर अज्ञानामुळे धर्माची धारणाशक्ति हे सारे लोक गमावून बसले आहेत, ही अत्यंत खेदजनक घटना होय !

**प्रजासंघ :—**

पहिल्या महायुद्धानंतर जगांतल्या प्रमुख राष्ट्रांना शान्ततेची आवश्यकता पटली व त्यामुळे त्यांनी 'लीग ऑफ् नेशन्स' — प्रजासंघटना – स्थापन केली. परंतु फारच

थोड्या अवधींत प्रजेचा मूळ रोग – काम, लोभ आणि क्रोध – पुनश्च प्रकट झाला आणि कांही राज्यांतून त्रिदोषांसारखीं लक्षणें दिसूं लागलीं. परिणामीं, दुसरें महायुद्ध झालें आणि पुनश्च प्रजा-संघटना (United Nations Organization — संयुक्त राष्ट्रसंघटना) स्थापन करण्यांत आली. भारतांतहि धर्माच्या आधारें अखंड हिंदी प्रजेचीं हिंदु आणि मुसलमान अशाप्रकारें दोन छकलें झालीं. ह्या दोन्ही प्रजा वेगवेगळया आहेत अशी सबब पुढे करण्यांत आली, दोघींत द्वेषभाव वाढत गेला, मारामाऱ्या झाल्या, खून झाले, आणि सरतेशेवटीं धर्माच्याच नांवाखाली अखंड हिंदुस्थानची फाळणी झाली.

धर्म ही एक वैयक्तिक बाब आहे. तिचा राजकीय बाबींशीं कांहीएक संबंध नाही. वस्तुतः सगळे धर्म एकच आहेत. परंतु, जेव्हा राजकीय विषयांत धर्म घुसतो तेव्हा किती भयंकर परिणाम घडून येतात, तें आपल्याला गतकालीन इतिहासावरून व वर्तमानकालीन घटनांवरून चांगल्या प्रकारें उमगलेलें आहे. आज आपण एक उद्बोधक धडा शिकणें अत्यावश्यक आहे. तो असा की, राजकारणांत धर्माच्या प्रश्नास मुळीसुद्धा स्थान असतां कामा नये. राजकीय प्रश्नांत धर्म मिसळून धर्माच्या विकृत स्वरूपाच्या भूमिकेवर राज्याची रचना होतां कामा नये.

संयुक्त राष्ट्रसंघटना (UNO) या संस्थेस अद्यापपावेतो कांही फार मोठें यश मिळालेलें नाही, तथापि कांही धोकादायक, हानिकारक घटना थोपवून धरण्यांत तिला यश आलें आहे. जगांतल्या आजच्या अविश्वासाच्या वातावरणांत इतकें साध्य झालें हेंहि कांही थोडें नव्हे. विश्वप्रेम व अहिंसा या गांधीप्रणीत सिद्धान्तांचें रहस्य जगांतील लोकांच्या हळूहळू गळीं उतरत आहे. युद्धें थांबविण्यासाठी, सर्वत्र शांतता स्थापण्यासाठी, अणुशक्तीचा मानवजातीच्या केवळ हितासाठीच उपयोग करण्यासाठी, जगांतलीं बडीं राष्ट्रें आज परिषदा भरवीत आहेत, ही एक आनंदाची गोष्ट आहे. आपल्या पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या '**पंचशील**' सिद्धान्ताने सर्वत्र विश्वासाचें व शांततेचें वातावरण निर्माण केलें आहे. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रांच्या पुढाऱ्यांत पुष्कळच समझोता निर्माण झाला आहे. पंडितजींचा पंचशील सिद्धान्त म्हणजे आपल्या सनातन धर्माचेंच एक वेगळें रूप आहे. या सिद्धान्तामध्ये सकल जगताचें हित सामावलेलें आहे; हाच सिद्धान्त समाजाला टिकवून धरणारा खरा धर्म आहे. खरोखरीच, हा धर्माचाच विजय होय!

अशा प्रकारें धर्माच्या भूमीवरून राष्ट्रीय विचारधारा वाहूं लागल्या आहेत. तरीसुद्धा त्या जितक्या वेगाने वाहावयास हव्या होत्या तितक्या वेगाने त्या अद्यापिहि वाहत नाहीत, असें अजूनपर्यंतच्या इतिहासावरून स्पष्टपणें दिसतें. युरोप, आफ्रिका, आशिया आणि अमेरिका या खंडांतून जुनीं भांडणें मिटतात न मिटतात तोंच नवीन भांडणें उभीं राहिलीं आहेतच. चीनने भारताची हद्द ओलांडून तिबेट हस्तगत करण्याचें जें साहस केलें आहे, तद्विषयक तंटा अद्यापि मिटलेला नाही. आफ्रिकेंत वर्ण-

भेदाची नीति अधिक बळ धरूं लागली आहे. वसाहतवादाच्या कचाट्यांतून युरोपची प्रजा अद्यापि मुक्त होऊं शकलेली नाही, हें आपल्याला स्पष्ट दिसत आहे. धर्मांच्या उदात्त भावनांची वारंवार घोषणा करण्यांत येते, परंतु व्यवहारांत धर्मांची सावलीहि आढळून येत नाही, हें आपलें दुर्दैव होय. बोलणें एक, करणें दुसरेंच, अशी परिस्थिति आज जगतांत निर्माण झालेली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत व्यवहाराची जी एक निर्दोषता, शुद्धता हवी, ती आज आपल्याला कोठेच आढळून येत नाही.

## सर्वोदयाची भावना

प्रजेची आधिभौतिक ( material ) आणि आध्यात्मिक ( spiritual ) उन्नति साधण्याच्या दृष्टीने शिक्षण अतिशय उपयोगी पडूं शकतें. शिक्षणाचें स्वरूप आध्यात्मिक भूमिकेवरून ठरविणें हें हितप्रद ठरतें असें मत समर्थ विचारवंतांनी अनेक प्रसंगीं प्रकट केलें आहे. धर्मांच्या तौलनिक अभ्यासामुळे मानवी जीवनाची सर्वसामान्यतः आणि व्यापक दृष्टीने चांगलीच ओळख होते, सद्वर्तनाच्या सनातन नियमांची थोरवी कळून येते, आणि जगांतील साऱ्या पदार्थांचें खरें स्वरूप म्हणजे जीवनांतील त्यांचें खरेखुरें स्थान समजून येतें. शंकराचार्यांनी वेदान्ताच्या अभ्यासकाच्या अधिकाराची चर्चा करतांना ज्याप्रमाणे म्हटलें आहे की, त्या अभ्यासकाचे ठिकाणीं प्रथमतः नित्यानित्यवस्तुविवेक हवा, त्याप्रमाणे शिक्षणाच्या द्वारे मुख्य आणि गौण यांतील भेदाभेद ओळखावयास शिकून मनुष्याने स्वतःच्या जीवनास प्रारंभ करावयास हवा. धर्म आणि तत्त्वज्ञान यांवांचून अशा प्रकारचा विवेक संपादितां येत नाही. त्यामुळे आपल्या शिक्षणविषयक योजना धार्मिक आदर्शांच्या अनुरोधाने आखणें अत्यावश्यक आहे. आपण सुरुवातीस पाहिलेंच आहे की, सकल धर्मांचें प्रयोजन एकच असतें. त्यामुळे त्या एकमेव प्रयोजनाच्या भूमिकेवर उभारलेल्या शिक्षणक्रमांत मानवजातीच्या अद्वैत भावनेची बूज नैसर्गिकरीत्याच राखली जाईल.

## गांधीजी

गांधीजींच्या **आश्रमभजनावली**मध्ये सगळ्याच धर्मांच्या प्रार्थना आढळून येतात. त्यांच्या दैनंदिन प्रार्थनांत भाग घेण्याचें अहोभाग्य ज्यांना लाभलें असेल त्यांना त्या वेळच्या शांत, गंभीर व परमपवित्र वातावरणाचा अनुभव आला असेल व त्यांना मानवजातीची एकताहि जाणवली, पटली असेल. गांधीजींच्या या दैनिक प्रार्थना–पद्धतीचा स्वीकार करण्याची आज आपल्या देशाला अतिशय जरूरी आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांत जर ‘ गांधीनिकेतना ’ सारखे आश्रम स्थापन झाले तर गांधीजींच्या विचारधारांचा प्रवाह अधिक बलवान् आणि विस्तृत होईल. विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत गांधीप्रणीत सिद्धान्तांचा शास्त्रीय दृष्टया सूक्ष्म अभ्यास करण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. गांधी–विद्याभवनांची स्थापना होऊं लागली आहे ही बाब आपल्या देशाच्या दृष्टीने शुभसूचक आहे.

आपल्या देशामध्ये आणि समस्त जगामध्येदेखील धर्मांच्या तौलनिक अभ्यासासाठी संस्था स्थापन करण्याची अतिशय जरूरी आहे. धार्मिक ग्रंथसंग्रहालयें देशाच्या वेगवेगळ्या भागांत, विशेषेंकरून आपल्या सगळ्या विद्यापीठांतून स्थापन करण्यांत आलीं तर वैश्विक संस्कृतीच्या अभ्यासासाठी एक साधन आपल्या हातीं आलें असें होईल. मानवी हक्क-अधिकारांचें संरक्षण करण्यासाठी यूनोच्या (UNO) वतीनें एक विशिष्ट संस्था स्थापण्यांत आलेली आहे, ही चांगली गोष्ट आहे. तिच्या कार्यास अधिक गति मिळण्याच्या दृष्टीने धर्मांच्या तौलनिक अभ्यासाची विशेष आवश्यकता आहे. जगांतील जे देश इतरांवर अत्याचार करीत असतील त्यांचें त्यांच्याच धर्मांच्या उपदेशाकडे जर लक्ष वेधण्यांत आलें तर यूनोसारखी संस्था अतिशय महत्त्वाचें कार्य करूं शकेल. अशा प्रयत्नांमुळे, जगांत आज जें अशांततेचें वातावरण सर्वदूर पसरलें आहे तें हळूहळू नाहींसें होईल. आज जगांत विशेषेंकरून शांततेची गरज आहे आणि ती शांतता सनातन सिद्धान्तांचा स्वीकार व त्यांनुसार आचरण यांखेरीज अशक्य आहे. जगांतील सत्ताधीशांना जर खऱ्या मूल्यांचें यथार्थ आकलन झालें तर मानवी हक्क-अधिकारांचें चांगल्या प्रकारें संरक्षण होऊं शकेल. लोकांना जर जीवनाच्या उच्च, उदात्त दृष्टिकोणाचें ज्ञान झालें तर ते आपापल्या देशांचें तर कल्याण करतीलच परंतु त्यापलीकडे सबंध विश्वामध्ये शान्तता व आनन्द यांचें वातावरण ते निर्माण करूं शकतील. आज आपल्याला निकडीची गरज आहे गांधीजींसारख्या विचारवंतांची आणि कर्मयोग्यांची. जगांतील सारे धर्म पूर्वेकडील देशांत निर्माण झाले आहेत. त्यामुळे लंडनच्या रॉयल अेशिॲटिक सोसायटीचा लॅटिन मुद्रालेख **ex oriente lux** (पूर्वेकडून आलेला प्रकाश) धर्मांना संपूर्णपणें लागूं पडतो. आर्य, मंगोलियन आणि सेमिटिक लोकांनी हे सारे धर्म जगाला दिलेले आहेत. ज्याप्रमाणे सूर्याचा उदय पूर्व दिशेस होतो आणि पूर्वेकडूनच प्रकाश प्राप्त होतो, त्याप्रमाणें आशियास आणि विशेषेंकरून भारतास, जगाला धर्माचा प्रकाश देण्याचा अधिकार पोंचतो. आपला देश सदरहू अधिकाराचा संपूर्णपणें समस्त विश्वाच्या कल्याणासाठीच उपयोग करील, अशी आपण आशा बाळगूं या.

— x —

## अभ्यासाचीं साधनें

1 Religion & Society—Dr. S. Radhakrishnan.
2 Eastern Religion & Western Thought—Dr. S. Radhakrishnan.
3 Hindu View of Life—Dr. S. Radhakrishnan.

विभाग दुसरा

# जागतिक समस्या आणि आधुनिक विचारसरणी

प्रकरण पांचवें

# इंग्रजांच्या आगमनानंतरचा हिंदुस्थानचा राजकीय व आर्थिक विकास

## हिंदुस्थानचा राजकीय विकास

इंग्रजांच्या आगमनापासून आजपर्यंत झालेल्या हिंदुस्थानच्या राजकीय विकासाचे चार कालखंड पडूं शकतात. इंग्रजांच्या आगमनापासून १८५७ सालापर्यंतचा पहिला कालखंड. या कालखंडांत ईस्ट इंडिया कंपनीने सुरवातीस एक व्यापारी पेढी म्हणून हिंदुस्थानांत वखारी घालून सरतेशेवटीं हिंदुस्थानावर इंग्रजांचें संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित केलें. १८५७ ते १९१७ या दुसऱ्या कालखंडांत हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें इंग्लंडच्या राजाच्या हातीं पूर्णपणें होतीं. याच काळांत हिंदी लोकांना राज्यकारभारांत अधिक प्रमाणांत सहभागी करून घेण्याचें तत्त्व अंमलांत आलें. १९१७ ते १९४७ हा तिसरा कालखंड. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश या नात्याने हिंदुस्थानास जबाबदार राज्यपद्धति देण्यांत यावी या तत्त्वाचा पुरस्कार या कालखंडांत करण्यांत आला आणि तें तत्त्व अंमलांत आणण्यासाठी १९१९ चा व १९३५ चा असे हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचे दोन कायदे ब्रिटिश पार्लमेंटने पास केले. १९४७ सालीं हिंदुस्थानची फाळणी झाली, इंग्रजी राजवटीची इतिश्री झाली आणि भारत स्वतंत्र झाला. १९४७ सालापासून आजपर्यंतचा कालखंड हा हिंदुस्थानच्या राजकीय विकासाचा चवथा व सर्वांत अधिक महत्त्वाचा कालखंड होय. स्वतंत्र भारतास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत प्रतिष्ठेचें स्थान मिळालें आहे. आशियांतील एक महान् राष्ट्र म्हणून, आशियांतील राष्ट्रांचें मनोगत व्यक्त करणारें एक प्रमुख राष्ट्र म्हणून, जगांतील मोठ्या राष्ट्रांत आज भारताची गणना होत आहे. तेव्हा वरील चार कालखंडांतून भारताचा राजकीय विकास कसकसा होत आला आहे त्याचा थोडक्यांत अभ्यास करूं.

## इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन

२७ मे, १४९८ या दिवशीं वास्को-डि-गामाने हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरांत पाऊल टाकल्यापासून युरोपिअन लोक हिंदुस्थानांत येऊं लागले. अगदी सुरुवातीस पोर्तुगीज् व डच् लोक भारतांत आले. त्यानंतर ३१ डिसेंबर १६०० या दिवशीं ईंग्लडच्या एलिझाबेथ राणीने कांही इंग्रज व्यापाऱ्यांना हिंदुस्थानाशीं व पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याची सनद दिली व त्या घटनेंतूनच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. जावा, सुमात्रा, इत्यादि ईस्ट इंडीज् टापूंत व्यापाराच्या बाबतींत अपयश आल्यावर इंग्रजांनी हिंदुस्थानांत व्यापार करण्याचें ठरवलें. या सुमारास हिंदुस्थानांत मोगल साम्राज्याची भरभराट होती. १६१६ सालीं मोगल सम्राट् जहांगीर याने हिंदुस्थानांत व्यापार करण्यास इंग्रजांना परवानगी दिली. तिच्या जोरावर इंग्रजांनी सुरतेस वखार उघडली. जहांगीरच्या दरबारांत सर टॉमस रो नामक इंग्रज वकील १६१५ ते १६१८ या काळांत होता. इंग्रजांसाठी व्यापाराचे हक्क मिळविण्याच्या कामीं त्यास यश आलें. १६३९ सालीं मद्रासमध्ये व १६९० सालीं कलकत्त्यांत अशा आणखी दोन वखारी इंग्रज व्यापाऱ्यांनी उघडल्या. १६६८ सालीं पहिल्या चार्ल्स राजाने त्याच्या पोर्तुगीज् राणीस लग्नांत आंदण म्हणून मिळालेलें मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीस वार्षिक दहा रुपये भाड्याने देऊन टाकलें. १६६४ सालीं फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. आणि फ्रेंचांनीहि हिंदुस्थानांत व्यापारासाठी पाऊल टाकलें.

## राजकीय सत्तेसाठी चुरस : इंग्रजांची सरशी

१७०७ सालीं औरंगजेबाचा मृत्यु झाला आणि मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली. साम्राज्य छिन्नभिन्न होऊं लागलें. हिंदुस्थानच्या राजकीय नकाशावर कोणतीहि प्रबल, मध्यवर्ती सत्ता उरली नाही. हिंदुस्थानांत साम्राज्यें उभारण्याचीं स्वप्नें युरोपिअन लोक रंगवूं लागले. साम्राज्य स्थापण्याच्या इंग्रजांच्या विचारास १६८७ सालींच वाचा फुटली होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनी मद्रासच्या गव्हर्नरास पाठविलेल्या पत्रांत असें म्हटलें होतें की, ' हिंदुस्थानांत कायमचें बस्तान बसविण्यासाठी साम्राज्याची पायाभरणी करतां येईल, अशा बेताने कंपनीने स्वतःची लष्करी सत्ता स्थापन करावी. ' सर जोसिआ चाइल्ड हा या धोरणाचा प्रणेता होता. या सुमारास हिंदुस्थानांत मराठे, मुसलमान, शीख व रजपूत यांचीं राज्यें होतीं. परस्परांशीं युद्धें करून, भांडून–तंडून त्यांचें बळ खची झालें होतें. परकीयांना तोंड देण्यासाठी एकजूट करण्याऐवजी एतद्देशीय राजे परक्यांच्या हातांतील प्यादीं बनले. परिणामीं, परक्यांचें राज्य हिंदुस्थानांत सुरू झालें. राजकीय सत्तासंपादनासाठी प्रामुख्याने इंग्रज व फ्रेंच हे हपापलेले असल्यामुळे त्या उभयतांत मोठी चुरस होती. इंग्रजांच्या बाजूस क्लाइव्ह आणि फ्रेंचांच्या

बाजूला डुप्ले ह्यांसारखे कसलेले व धूर्त सेनापति होते. कर्नाटकांत इंग्रज-फ्रेंचांमध्ये तीन लढाया झाल्या. मात्र अखेरीस क्लाइव्हच्या कुशल नेतृत्वाखाली इंग्रजांचा विजय झाला. १७६१ सालच्या पानिपतच्या महायुद्धानंतर मराठे दुर्बळ झाले होते व इंग्रजांशीं मुकाबला करण्याचें त्राण त्यांच्यांत उरलें नव्हतें. बंगालचा नबाब सिराजुद्दौला व इंग्रज यांच्यामध्ये १७५७ सालीं 'प्लासी'चें युद्ध झालें. नबाबाच्या सेनापतींनी आयत्या वेळीं विश्वासघात केल्यामुळे इंग्रजांचें फावलें, त्यांनी फंदफितुरीने युद्ध जिंकलें व त्यांच्या हातचें बाहुलें बनलेल्या मीरजाफरास त्यांनी बंगालचा नबाब म्हणून नेमलें. १७६५ सालीं मोगल बादशाह दुसरा शाहआलम याने इंग्रजांना बंगाल, बिहार आणि ओरिसा या प्रांतांच्या दिवाणीच्या सनदा दिल्या. अशा प्रकारें हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्याची मुहूर्तमेढ बंगालमध्ये रोवण्यांत आली.

## हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याची वाढ

क्लाइव्हने हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातल्यानंतर साम्राज्याची इमारत उभी करण्याचें काम त्याचेनंतर आलेल्या वेल्स्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज आणि डलहौझी या तीन गव्हर्नर जनरलांनी केलें. त्याबाबतींत असें नेहमी म्हणण्यांत येतें की, "क्लाइव्हने हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचें बीजारोपण केलें, वॉरन हेस्टिंग्जने शत्रूंपासून त्याचें संरक्षण केलें, वेल्स्लीने त्याचें संगोपन केलें आणि लॉर्ड हेस्टिंग्जने त्याचीं फळें चाखलीं." वेल्स्लीने तैनाती फौजेची पद्धति सुरू केली. ह्या पद्धतीचे नियम असे होतेः—

इंग्रजांनी एतद्देशीय राजांच्या मुलखाचें संरक्षण करावयाचें व त्याचा मोबदला म्हणून देशी राजांनी आपल्या खर्चानें इंग्रजी सैन्य पदरीं बाळगावयाचें किंवा त्या सैन्याच्या खर्चासाठी अमुक एक प्रदेश इंग्रजांना द्यावयाचा. ह्या पद्धतीचा स्वीकार करणारे राजे नकळत इंग्रजांचे आश्रित बनून जात. आणि व्यवहारांत इंग्रजांची सर्वंकष सत्ता प्रस्थापित होत असे. वेल्स्लीच्या कारकीर्दींत दिल्ली, अयोध्या, म्हैसूर, हैदराबाद, कर्नाटक, सुरत आणि तंजावर इतका प्रदेश इंग्रजांच्या छत्राखाली आला. लॉर्ड हेस्टिंग्जने इंग्रजी राज्याचा सीमाविस्तार केला व पेशवाई संपुष्टांत आणून मराठ्यांचा पुरतेपणीं पराभव केला. मराठी राज्यांवर ब्रिटिश सरकारची सर्वंकष सत्ता स्वीकारण्याची सक्ती हेस्टिंग्जने केली. त्यानंतरच्या काळांत मराठी जनता इंग्रजांसमोर मान ताठ ठेवून उभें राहण्याच्या स्थितींत राहिलीच नाही. मराठ्यांच्यांतील एकीच्या अभावामुळे हा दुष्परिणाम घडून आला. ब्रिटिशांचे धूर्त अधिकारी माल्कम् आणि मेटकाफ् या दोघांनी मध्य हिंदुस्थान, माळवा व राजपुताना या प्रदेशांतील जवळजवळ साऱ्या राजांशीं तह करून त्यांना ब्रिटिशांच्या सत्तेपुढे मान तुकवावयास लावलें. मोबदल्यादाखल इंग्रजांनी त्यांच्या राज्यरक्षणाची हमी घेतली होती. इंग्रजांच्या संमतीशिवाय त्या त्या राजांनी कोणाशींहि युद्ध किंवा तह करावयाचा नाही

व त्यांच्या तंट्यांचा निकाल इंग्रजांनी द्यावयाचा असें ठरविण्यांत आलें. थोडक्यांत, तीं सारीं राज्यें इंग्रजांचीं आश्रित बनून, त्यांच्या ओंजळीने पाणी पिऊं लागलीं. लॉर्ड डलहौझी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी, साम्राज्यवादी पुरुष होता. येन केन प्रकारेण ब्रिटिश साम्राज्याची सत्ता सर्वंध हिंदुस्थानांत प्रस्थापित करावयाची ही त्याची जबरदस्त मनीषा होती. त्याने राज्यें खालसा करण्याचा सपाटा लावला. एखादा राजा निपुत्रिक मरण पावला की त्याचें राज्य खालसा करून ब्रिटिश राज्यास तें जोडण्यांत येई. पूर्वीच्या वहिवाटीनुसार दत्तकपुत्रास राज्य मिळत असे. परंतु डलहौझीने दत्तकपुत्र घेण्याचा अधिकारच नामंजूर ठरवून टाकला. या धोरणाचा अवलंब करून त्याने सातारा, जोधपूर, संबळपूर, उदयपूर, झाशी आणि नागपूर हीं राज्यें खालसा केलीं. डलहौझीनंतर आलेल्या लॉर्ड कॅनिंगने उदयपूरबाबत डलहौझीने दिलेला निर्णय फिरविला होता. तथापि, उदयपूरखेरीज बाकीचीं राज्यें ब्रिटिश साम्राज्यांत विलीन झालीं. वेळेवर खंडणी न मिळाल्याच्या सबबीवर डलहौझीने हैदराबादच्या नबाबाकडून वऱ्हाड प्रांत बळकावला. अयोध्येच्या राज्यकारभारांत अव्यवस्था व बजबजपुरी माजली होती. त्या राज्यांत सुव्यवस्था व शांतता स्थापण्याचें निमित्त करून डलहौझीने तें राज्य ब्रिटिश राज्याला जोडून टाकलें. शिखांशीं युद्ध करून, ब्रिटिश प्रधानमंडळाच्या मनाविरुद्ध, डलहौझीने पंजाबहि खालसा केला. दुसऱ्या ब्रह्मी युद्धाचे अखेरीस डलहौझीने ब्रह्मदेशाचा पेगू प्रांत ब्रिटिशांच्या राज्यास जोडला. त्यानंतर इ. स. १८४३ सालीं लॉर्ड ॲलन्बरोच्या कारकीर्दींत चार्ल्स नेपियरने सिंधचा प्रदेश ब्रिटिश साम्राज्यासाठी हस्तगत केला. अशा प्रकारें १८५७ पर्यंत हिंदुस्थानावर इंग्रजांची सत्ता प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें प्रस्थापित झाली. परंतु, या साम्राज्याचा पाया अनीति व अन्याय यांवर उभारलेला होता. प्रत्येक युद्धाचे शेवटीं लुटालूट करण्यांत येई आणि निरपराधी जनतेवर अत्याचार करण्यांत येत. चार्ल्स नेपियरने एके ठिकाणीं तर स्पष्टपणें म्हटलेलेंच आहे की, "हिंदुस्थान जिंकण्यामागे पैसा मिळविणें हाच आमचा एकमेव उद्देश होता. गेल्या साठ वर्षांत भारतांतून १ अब्ज पौंडांची प्राप्ति झाली, असें म्हणतात. ह्यांपैकी प्रत्येक शिलिंग लोकांचें रक्त शोषून मिळविलेला आहे." या प्रकारामुळे असंतोषाचा दावाग्नि भडकलेला होता. त्यांतून कोणत्याहि घटकेस ज्वालामुखीचा भडका उडण्याची शक्यता होती. असा डोंब १८५७ सालीं अखेरीस उसळलाच !

## कंपनीच्या कारकीर्दींतील राज्यकारभार

ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार सुरुवातीस एखाद्या व्यापारी पेढीप्रमाणे चालत असे. कंपनीच्या कारभाराचीं सारीं सूत्रें इंग्लंडमधील शेअर-होल्डर्स व बोर्ड ऑफ् डायरेक्टर्स यांच्या हातांत असत. हिंदुस्थानांत वखारींच्या प्रमुखांची नेमणूक करण्यांत येत असे. त्यांची सत्ता कंपनीच्या नोकरवर्गावर चालत असे. कंपनीने हिंदुस्थानांतील प्रदेश काबीज केल्यावर बंगाल, मुंबई व मद्रास या तीनहि प्रांतांत गव्हर्नर्स व त्यांचीं कौन्सिलें यांची राजवट सुरू झाली. मात्र हिंदुस्थानांत अद्यापि मध्यवर्ती सत्तेचा अभावच होता.

कंपनीचें एका राजकीय संघटनेंत रूपांतर झालें. कंपनीच्या जुलमी कारभाराबद्दल नक्रारी होऊं लागल्या. तसेंच कंपनीची आर्थिक स्थिति खालावली, त्यामुळे ब्रिटिश पार्लमेंटने राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला आणि १७७३ सालीं प्रसिद्ध रेग्युलेटिंग ॲक्ट (Regulating Act) पास करून आपलें ध्येय तडीस नेलें. हा कायदा हिंदुस्थानांत २६ ऑक्टोबर १७७४ या दिवशीं चालू झाला. बंगालच्या गव्हर्नरास " गव्हर्नर जनरल् " असा किताब असावा; युद्ध व तह करण्यासंबंधाने मद्रास व मुंबई या दोन इलाख्यांवर कलकत्त्याची हुकमत चालावी; हिंदी प्रजेस निःपक्ष व योग्य न्याय मिळावा यासाठी कलकत्त्यास वरिष्ठ न्यायालयाची स्थापना करण्यांत यावी; कंपनीच्या राज्यांतील लष्कराच्या व इतर कोणत्याहि नोकरांनी हिंदी लोकांकडून कोणत्याहि प्रकारचें बक्षीस घेऊं नये किंवा खाजगी व्यापार करूं नये, अशीं या रेग्युलेटिंग ॲक्टाचीं कलमें होतीं. १७८४ च्या पिटच्या इंडिया बिलानुसार पार्लमेंटद्वारे एक नियामक मंडळ ( Board of Control ) नेमण्यांत आलें. परिणामीं, हिंदुस्थानच्या राज्यकारभारावरील ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता हळूहळू वाढूं लागली. सदरहू नियामक मंडळाचे प्रमुख ब्रिटिश प्रधान-मंडळाचे सभासद होते. हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर १८५७ सालापर्यंत नियामक मंडळाची चांगलीच पकड होती. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा अधिकार मात्र बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडेच राहिला. १८१३ सालीं ब्रिटिश पार्लमेंटने हिंदुस्थानांतील प्रदेशावर ब्रिटिश सरकारची सार्वभौम सत्ता असल्याचें जाहीर केलें. आणि १८३३ सालीं पुनः ब्रिटिश पार्लमेंटने अशी घोषणा केली की, ब्रिटिश बादशहाची विश्वस्त म्हणून कंपनी हिंदुस्थानचा राज्यकारभार करील. १८३३ च्या चार्टर ॲक्टाप्रमाणे हिंदुस्थानांतील सत्तेचें केंद्रीकरण करण्यांत आलें व त्यामुळे गव्हर्नर जनरलची दुसऱ्या इलाख्यांवरील सत्ता वाढली. बंगालच्या गव्हर्नर जनरलास "हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल् " अशी पदवी देण्यांत आली. गव्हर्नर जनरल् व त्याचें कौन्सिल यांना सबंध हिंदुस्थानासाठी कायदे करण्याचा अधिकार देण्यांत आला आणि गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलांत एक कायदे-सभासद वाढविण्यांत आला. १८५३ सालीं कायदे करण्यासाठी कौन्सिलांत आणखी ४ सभासद, प्रांतांचे प्रतिनिधी आणि २ न्यायाधीश एवढ्यांचा अंतर्भाव करण्यांत आला. अशा प्रकारें, हिंदुस्थानांत कायदेमंडळाचें बीजारोपण झालें. सामान्यतः गव्हर्नर व गव्हर्नर जनरल् कौन्सिलच्या सल्लामसलतीने कारभार करीत असत. परंतु, १७८६ सालापासून त्यांना कौन्सिलचा निर्णय अमान्य करण्याचाहि अधिकार ( veto ) देण्यांत आला होता. अधिकाऱ्यांच्या नेमणुकीसाठी १८५३ सालापासून स्पर्धा-परीक्षेची पद्धति सुरू करण्यांत आली होती. अशा रीतीने ब्रिटिश पार्लमेंटच्या सर्वसाधारण देखरेखीखाली नियामक मंडळाच्या सूचनेनुसार हिंदुस्थानचा राज्यकारभार गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल् कौन्सिलच्या सल्लामसलतीने चालवीत असत. परंतु, गव्हर्नर जनरल् हिंदुस्थानांत जातीने हजर असल्यामुळे त्याची सत्ता व्यापक होती.

## १८५७–१९१७ इंग्लंडच्या राजाची सत्ता : सहकार्याचें धोरण
(Policy of Association)

### स्वातंत्र्य–युद्धाचे परिणाम

कंपनीच्या गैरकारभारामुळे व जुलूमजबरदस्तीमुळें हैराण झालेल्या हिंदी जनतेनें १८५७ सालीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य उलथून पाडण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले. परंतु ते सफळ झाले नाहीत. असें झालें तरीसुद्धा १८५७ सालच्या स्वातंत्र्य–युद्धाचे कांही अपरिहार्य परिणाम झाले. ते असे :– कंपनीच्या सत्तेचा शेवट झाला आणि इंग्लंडच्या राणीने हिंदुस्थानचा राज्यकारभार स्वतःकडे घेतला. हिंदुस्थानच्या राज्यकारभारासाठी ब्रिटिश प्रधान–मंडळांत एका भारतमंत्र्याची नेमणूक करण्यांत आली. त्याच्या मदतीसाठी १५ सभासदांचें इंडिया कौन्सिल नेमण्यांत आलें. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलास ब्रिटिश बादशहाचा प्रतिनिधि म्हणून 'व्हाइसरॉय' हा किताब देण्यांत आला. महाराणी व्हिक्टोरियाने एक जाहीरनामा काढून हिंदी जनता व देशी राजेरजवाडे यांना अनेक आश्वासनें दिलीं. तीं अशीं––राजेरजवाड्यांच्या हक्क–अधिकारांचें महाराणी रक्षण करील; कंपनीशीं राजेरजवाड्यांनी केलेले तहनामे व करारनामे महाराणी पाळील; राजेरजवाड्यांचा दर्जा, मानमरातब राखला जाईल; आणखी प्रदेश काबीज करून हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्यवादाचा विस्तार करण्यांत येणार नाही. महाराणीने सामान्य प्रजाजनांना पुढील आश्वासनें दिलीं होतीं : प्रत्येक प्रजाजनास आपापल्या धर्मानुसार वागण्याचें स्वातंत्र्य राहील; नोकरांच्या नेमणुका करतांना जाति, धर्म, वर्ण इत्यादि प्रकारचे भेदभाव लक्षांत न घेतां व्यक्तीच्या योग्यतेप्रमाणे नेमणूक करण्यांत येईल; इंग्रज सरकारच्या रयतेचे खून करण्यांत प्रत्यक्ष संबंध असल्याचें ज्यांचेवर शाबीत झालें असेल त्यांखेरीज स्वातंत्र्य–युद्धांत भाग घेण्याचा गुन्हा करणाऱ्या बाकी सर्व अपराध्यांना क्षमा करण्यांत येईल.

महाराणी व्हिक्टोरियाच्या वरील जाहीरनाम्यास कांही लोक 'हिंदी मॅग्नाचार्टा' असें म्हणतात. हिंदी जनतेतील असंतोष शमविण्याचा प्रयत्न वरील जाहीरनाम्याच्या द्वारा करण्यांत आला. परंतु 'टाईम्स' चे बातमीदार रसेल यांच्या म्हणण्याप्रमाणे १८५७ सालच्या स्वातंत्र्य–युद्धांतील घटनांमुळे इंग्रज व हिंदी जनता या उभयतांना एकमेकांबद्दल इतका तिरस्कार वाटूं लागला होता की, तो कित्येक वर्षेपर्यंत नष्ट होण्यासारखा नव्हता. कदाचित असेंहि म्हणतां येईल की, इंग्रज लोक हिंदी जनतेचा विश्वास कायमचाच गमावून बसले होते.

स्वातंत्र्य–युद्धानंतर इंग्रजांनी हिंदी लोकांसंबंधी दुटप्पी धोरण अंगिकारलें. एका बाजूने हिंदी लोकांवरील दडपशाही, जुलूमजबरदस्ती चालूच ठेविली. आणि त्यांच्या

पारतंत्र्याचे पाश अधिकाधिक आवळून घट्ट केले. दुसरीकडे राज्यकारभारांत सुधारणा करून, मूठभर सुशिक्षित हिंदी लोकांना त्यांत सहभागी करून घेऊन त्यांचीं मनें जिंकण्याचा प्रयत्न चालू ठेविला. स्वातंत्र्य-युद्धाचे काळांत ब्रिटिश साम्राज्यास जो हादरा बसला तो लष्करांतील हिंदु-मुसलमान ऐक्याचा परिणाम होता. म्हणून हिंदु-मुसलमानांत भेदाची भिंत उभी करण्याचें धोरण म्हणजेच 'फोडा व झोडा' हें धोरण इंग्रजांनी स्वीकारलें.

## १८६१ चा कौन्सिल ॲक्ट

सहकार्याच्या धोरणाचा पहिला परिणाम म्हणजे १८६१ सालीं पास करण्यांत आलेला कौन्सिल ॲक्ट, असें म्हणतां येईल. या कायद्याने वरिष्ठ कायदेमंडळांत ६ ते १२ सभासद सरकारने नेमावेत व त्यांतील निम्मे सभासद बिनसरकारी असावेत, असें बंधन घालण्यांत आलें. प्रांताप्रांतांतून कायदेमंडळें नेमण्यांत आलीं. ४ ते ८ जादा सभासद घेण्यांत आले. त्यांपैकीहि निम्मे बिनसरकारी असत. जादा सभासदांची नेमणूक व्हाइसरॉय किंवा गव्हर्नर जनरल् करीत असे. या कायदेमंडळांची सत्ता खूपच मर्यादित होती. परंतु, या कौन्सिलच्या कायद्यामुळे हिंदी लोकांना कायदेमंडळांत प्रथमच स्थान मिळालें, एवढ्याच दृष्टीने या कायद्याचें महत्त्व आहे.

## इंग्रजांचें दडपशाहीचें धोरण--राष्ट्रवादाचा विकास

बादशाही अंमल चालू झाल्यानंतरहि इंग्रजांचें दडपशाहीचें धोरण चालूच राहिलें. लॉर्ड लिटनने १८७८ सालीं 'देशी वर्तमानपत्रांसंबंधी कायदा' पास करून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी केली. त्यानेच हत्यारांचा कायदा पास करून प्रजेस निःशस्त्र बनविलें. हिंदी लोकांना पूर्वी आश्वासनें दिलीं गेलेलीं असूनहि सनदी नोकरींत त्यांची नेमणूक करण्यांत येत नसे. सुरेंद्रनाथ बॅनर्जी आय्. सी. एस्. ची परीक्षा पास झाले तरीदेखील त्यांच्या नेमणुकीचे बाबतींत घोळ घालण्यांत आला व नेमणूक केल्यावरहि थोड्या दिवसांतच योग्य कारणें न दाखवितांच त्यांना बडतर्फ करण्यांत आलें. इतकेंच नव्हे, तर १८७७ सालीं वरील परीक्षेसाठी वयोमर्यादा २१ वरून १९ करण्यांत आली. हेतु असा की, हिंदी लोकांना या परीक्षेस बसणें अशक्य व्हावें. त्या काळांत या परीक्षा फक्त इंग्लंडांतच घेण्यांत येत असत. इंग्रजांच्या अशा वागणुकीमुळे हिंदी जनतेंत असंतोष वाढला. सुशिक्षित हिंदी लोकांचे मनांत राष्ट्रभावनेचा उदय झाला होता. सुरेन्द्रनाथ बॅनर्जींनी सनदी नोकरींत राहूनहि सबंध देशांत हिंडून अन्याय व इंग्रजांचा गैरकारभार ह्यांचे विरुद्ध लोकमत जागें केलें आणि हिंदुस्थानांतील निष्प्राण जनतेंत चैतन्य निर्माण केलें. अशा परिस्थितींत इ. स. १८८३ सालीं इल्बर्ट बिल कायदेमंडळांत दाखल झालें. त्यावेळीं उदारमतवादी व सुधारणा-प्रिय लॉर्ड रिपन हा गव्हर्नर जनरल् होता. त्याने स्थानिक स्वराज्याचा कायदा पास करून, निवडणुकीच्या प्रथेचा पुरस्कार करून, हिंदी लोकांना राज्यकारभाराचा अनुभव यावा

यासाठी प्रयत्न चालविले होते. न्यायालयांत इंग्रजांना व हिंदी लोकांना न्याय देण्याच्या पद्धतींत भेदभाव होत आहे हें रिपनच्या लक्षांत आलें. असा भेदभाव अयोग्य व अन्याय्य असल्यामुळे तो नाहीसा करण्यासाठी 'इल्बर्ट बिल' मांडण्यांत आलें होतें. ह्या बिलास अँग्लो-इंडियन लोकांनी सक्त विरोध केला. त्यांनी एक 'संरक्षण मंडळ' स्थापन करून मोठा फंड उभारला आणि हिंदुस्थान व इंग्लंड येथे जोराची चळवळ सुरू केली. त्यांनी रिपनवर सामाजिक बहिष्कार टाकला. शेवटीं हें बिल सशर्त पास करण्यांत आलें. ह्या बिलाचे निमित्ताने झालेल्या चळवळीमुळे हिंदी लोकांचे डोळे उघडले. त्यांची अशी खात्री होऊन चुकली की, ब्रिटिश सरकारकडून न्यायाची अपेक्षा बाळगणें व्यर्थ आहे; इंग्रज व हिंदी लोक यांना समान पातळीवरून वागणूक मिळणें अशक्य आहे. परंतु विरोधकांचीहि फत्ते झाल्यामुळे हिंदी लोकांना मौल्यवान् धडा शिकावयास मिळाला. हिंदूंच्या असें निदर्शनास आलें की, जर जनतेंत एकजूट असली व व्यवस्थित चळवळ करण्यांत आली तर सरकारवरहि दडपण आणून त्याचें धोरण बदलण्यास त्यास भाग पाडतां येतें. हें लक्षांत घेऊन सुरेन्द्रनाथ बॅनर्जींनी पुढाकार घेऊन पहिल्या प्रथमच १८८३ सालीं कलकत्त्यास अखिल हिंदुस्थानच्या प्रतिनिधींचें संमेलन भरविलें.

ह्या सुमारास कांही इंग्रजांच्या व सुशिक्षित हिंदी लोकांच्या मनांत एखादी राष्ट्रीय संस्था स्थापण्याचा विचार घोळत होता. १८८३ सालीं ॲलन् ह्यूमसाहेबांनी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना हिंदी जनतेच्या मानसिक, सामाजिक, नैतिक व राजकीय पुनरुत्थानासाठी एक संस्था उभारण्याची शिफारस केली. व्हाइसरॉय डफरिननेहि, अशा संस्थेला सरकार पाठिंबा देईल, असें जाहीर केलें. परिणामीं, १८८५ सालच्या डिसेंबर महिन्यांत मुंबईमध्ये श्री. व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन भरलें. त्या वेळीं देशांतल्या निरनिराळ्या प्रांतांतले मिळून ७० प्रतिनिधी हजर होते. अशा प्रकारें एका इंग्रज गृहस्थाच्या प्रेरणेने हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर इंग्रजांचा उद्देश, ॲलन् ह्यूमसाहेबांच्या शब्दांत, "ब्रिटिश साम्राज्य भावी काळांत अजिंक्य राखण्यासाठी 'कॉंग्रेस'-सारख्या संस्थेची विशेष आवश्यकता आहे. कारण ही सभा हिंदी प्रजाजनांत दिवसेंदिवस वाढणाऱ्या ब्रिटिश -विरोधी शक्ति निर्मूल करण्याचें कार्य करूं शकेल; नाहीतर भयानक क्रांतीचें अग्निकुंड पेटेल," हा होता. एकोणिसाव्या शतकांत कॉंग्रेसचे मुख्य हेतु, सरकारी कारभारांतील दोष दाखविणें, हिंदी प्रजेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून तो नाहीसा करण्यासाठी प्रयत्न करणें आणि सुधारणांची मागणी करणें, हे होते. कॉंग्रेसचें एकंदर धोरण शांततेचें, नरमाइचें म्हणजेच मवाळ वा नेमस्त होतें. दरवर्षी नाताळच्या सुट्टींत प्रमुख शहरांत कॉंग्रेसचें अधिवेशन भरे, विद्वत्तापूर्ण भाषणें होत आणि अनेक ठराव पास होऊन ते सरकारकडे विचारासाठी

धाडण्यांत येत. सुरवातीस इंग्रजांनी कॉंग्रेसला प्रोत्साहन दिलें. १८८६ सालीं लॉर्ड डफरिनने, १८८७ मध्ये मद्रासच्या गव्हर्नरासकट कांही अधिकाऱ्यांनी कॉंग्रेसच्या अधिवेशनांस हजर राहून तिच्या कार्याविषयी आपली सहानुभूति दर्शविली होती. तसेंच, कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांसाठी उद्यानांतील चहापाण्याचे समारंभहि कांही गव्हर्नर घडवून आणीत असत. परंतु, कॉंग्रेसच्या धोरणामुळे देशांतील जनतेंत राष्ट्रभावनेची जागृति होत होती. लोकांच्या मागण्याहि उग्र स्वरूपांत व्यक्त होऊं लागल्या होत्या. त्यामुळे सरकारी अधिकारी कॉंग्रेसपासून हळूहळू दूर राहूं लागले.

सुरवातीस हिंदुस्थान सरकार कॉंग्रेसच्या ठरावांची दखल घेत नसे. सरकारच्या या अनास्थेच्या वृत्तीमुळे नाराज झालेल्या कॉंग्रेसने असा निर्णय घेतला की, हिंदुस्थानांत व इंग्लंडांत लोकमत जागृत करून सरकारवर दडपण आणावयाचें. इंग्लंडमध्ये सभा घेण्यांत आल्या, प्रचारपत्रें वांटण्यांत आलीं आणि एक समिति नेमण्यांत आली. 'इंडिया' नामक साप्ताहिक पत्रहि सुरू करण्यांत आलें. या साऱ्या खटपटींमुळे इ. स. १८९२ सालीं ब्रिटिश पार्लमेंटने दुसरा कौन्सिल ॲक्ट पास केला. या कायद्यान्वयें कौन्सिलांतील सभासद-संख्या वाढविण्यांत येऊन लोकनियुक्त बिनसरकारी सभासदांची संख्याहि वाढविण्यांत आली. निवडणुकांची प्रथा सुरू होऊन सभासदांना माहितीकरितां प्रश्न विचारण्याचा आणि अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार देण्यांत आला. तरीदेखील या सुधारणांनी हिंदी लोकांचें समाधान झालें नाही. सरकारी राज्य-यंत्राची जुनी पठडी कायमच राहिली. कायदेमंडळें व प्रत्यक्षांतला राज्यकारभार हीं एकमेकांपासून स्वतंत्र होतीं.

## राष्ट्रीय चळवळ-जहाल पक्ष

हिंदुस्थान सरकार राष्ट्रीय सभेच्या ठरावांची उपेक्षा करीत असे. राष्ट्रीय सभेचे पुढारी हे खरे लोकप्रतिनिधी नव्हेत आणि ते अत्यंत अल्पसंख्य शिक्षित समाजाचें प्रतिनिधित्व करतात, असें सरकारचें म्हणणें असे. इंग्रजांच्या या उपेक्षा-वृत्तीमुळे प्रजा असंतुष्ट झाली होती. कॉंग्रेसमध्ये जहाल गटाचा जोर दिवसेंदिवस वाढूं लागला होता. तो गट सरकारास अर्ज-विनंत्या करण्याच्या विरुद्ध होता. इंग्रजांच्या न्याय-बुद्धीवरील त्याचा विश्वास उडाला होता आणि राजकीय सुधारणा केवळ भाषणें करून मिळणार नाहीत, त्यासाठी सक्रिय उपाय योजले पाहिजेत, असें जहाल पक्षाचें पक्कें मत बनलें होतें. या पक्षाचे पुढारी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक होते. 'केसरीं'त अत्यंत कडक लेख लिहून आणि गणपति-उत्सव, शिवजयंति-उत्सव इत्यादि उत्सवांना राष्ट्रीय स्वरूप देऊन टिळकांनी राष्ट्रांत जागृति केली. कांही तरुणांनी तर पश्चिमेकडील देशांचें अनुकरण करून हिंदुस्थानांत क्रांतिकारी मंडळेंहि

स्थापन केलीं होतीं. त्यांची हिंसानुकूल प्रवृत्ति दिवसानुदिवस वाढत होती. १८९९ पासून १९०५ पर्यंत लॉर्ड कर्झन हिंदुस्थानचा व्हाइसरॉय होता. त्याच्या पराकोटीच्या साम्राज्यवादी व अपमानकारक नीतीमुळे देशांतील जनतेची राष्ट्रभावना डिंवचली, दुखवली जाऊं लागली. १९०५ सालीं जपानने रशियाचा पराभव केला. या घटनेमुळे आशियांतल्या देशांतील लोकांत विजेच्या गतीने राजकीय चैतन्य खेळूं लागलें व पाश्चिमात्य देशांना जिंकणें शक्य आहे असा आत्मविश्वास उत्पन्न झाला. जपानच्या विजयामुळे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची आशा बळकट झाली.

अशा वातावरणांत १९०५ सालीं लॉर्ड कर्झनने बंगाल प्रांत मोठा असल्यामुळे राज्यकारभाराच्या सोयीसाठीं बंगालची फाळणी केली. तथापि, दिवसेंदिवस बळकट होणाऱ्या राष्ट्रवादास अजिबात गाडून टाकणें हा बंगालच्या फाळणीमागील कर्झनचा खराखुरा उद्देश होता. बंगालच्या फाळणीमुळे हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीस जोर चढला. वंगभंग म्हणजे राष्ट्राचे तुकडे करणें होय, असें लोकांचें मत बनलें व अवघ्या देशांत वंगभंगाची ब्रिटिश-विरोधी उग्र चळवळ सुरू झाली. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, बिपिनचंद्र पाल आणि अरविंद घोष हे या चळवळीचे पुढारी होते. राष्ट्रवादी मुसलमानांनीहि वंगभंगास विरोध केला. सरकार-विरोधी चळवळीस बंगाल्यांनी वेगळेंच वळण दिलें, आणि जहाल पक्षाच्या नेतृत्वाखाली स्वदेशी आंदोलनास सुरुवात झाली. ब्रिटिश मालावर बहिष्कार, स्वदेशी वस्तूंचा वापर व राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना असा कार्यक्रम आखला गेला. १९०६ सालीं पहिल्यांदाच कॉंग्रेसने, स्वराज्य हें आपलें ध्येय आहे, असें घोषित केलें. तथापि, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशाह महेता इत्यादि मवाळ नेत्यांना जहाल पक्षाच्या पुढाऱ्यांचा वरील कार्यक्रम पसंत नव्हता. सनदशीर मार्गांना प्रयत्नपूर्वक चिकटून राहून आपलें ध्येय गांठण्याची मवाळांची इच्छा होती. १९०७ सालच्या प्रसिद्ध कॉंग्रेस अधिवेशनाचे वेळीं जहाल व मवाळ यांच्यांतील मतभेद तीव्र होऊन जहाल पक्ष कॉंग्रेसमधून बाहेर पडला.

## जातीयवादाचा उदय

१८५७ पासून मुसलमान इंग्रजांचे विरुद्ध होते. कारण हिंदुस्थानांतील आपलें वर्चस्व इंग्रजांनी संपुष्टांत आणलें असा मुसलमानांचा इंग्रजांविरुद्ध दावा होता. स्वातंत्र्ययुद्धाचे प्रसंगीं हिंदु-मुसलमान खांद्याला खांदा भिडवून इंग्रजांच्या विरुद्ध लढले होते. परंतु, इंग्रजांनी 'फोडा व झोडा' नीतीचा अवलंब केला व सुरवातीस हिंदूंची कड घेतली. हिंदूंनी पाश्चिमात्य शिक्षण घेऊन सरकारी नोकऱ्या पटकावल्या होत्या. वहाबी ( शेख अब्दुल वहाबचे अनुयायी ) मुसलमानांनी बंड केलें. त्यामुळे इंग्रजांचे डोळ्यांत मुसलमान खुपूं लागले. मुसलमान हताश होऊन गेले. ते रूढिप्रिय असल्यामुळे इंग्रजी शिक्षणापासून दूर राहिले. परिणामीं, राज्यकारभारांत त्यांना कांहीएक स्थान नव्हतें. या सुमारास सय्यद

अहमदांनी मुसलमान जमातीचा उद्धार करण्याचें ठरविलें. त्यांच्या असें लक्षांत आलें की, ब्रिटिशांशीं राजनिष्ठेने वागल्यास आणि इंग्रजी विद्या संपादन केल्यास आपल्या जमातीचें हित होणार आहे. त्यामुळे सय्यद अहमदांचे वैयक्तिक विचार जरी राष्ट्रवादी असले तरी त्यांनी राष्ट्रहितापेक्षा जातिहिताला अधिक महत्त्व दिलें व इ. स. १८७७ सालीं व्हाइसरॉय लॉर्ड लिटनकरवीं अलीगढ कॉलेजची पायाभरणी केली. त्यानंतर तेथे विद्यापीठाची स्थापना करण्यांत आली. ही युनिव्हर्सिटी मुस्लिम जातीयवादी प्रवृत्तीचें केंद्र बनली. सय्यद अहमदांनी मुसलमानांना राजकारणापासून आणि कॉंग्रेसपासून अलिप्त ठेवलें आणि प्रतिस्पर्धी संस्था स्थापन केल्या. १८८६ सालीं मुस्लिम एज्युकेशनल् कॉन्फरन्स, १८८८ सालीं पॅट्रीयट असोसिएशन्, १८९३ सालीं उत्तर हिंदुस्थानांत मुस्लिम-अँग्लो ओरिएण्टल् संरक्षण मंडळ अशा संघटना उभारल्या गेल्या. सय्यदांनी असें जाहीर केलें की, लोकशाही सरकारची कॉंग्रेसची मागणी अल्पसंख्य जमातींच्या हितास बाधक आहे. श्री. सय्यद १८९८ सालीं मरण पावले. तथापि, त्यांचें धोरण टिकून तें पुढे चालूंच राहिलें. असा प्रकार झाल्यामुळे १८९६ सालीं कॉंग्रेसचे प्रमुख सयाणी म्हणाले, "हिंदुस्थानांतील सारे मुसलमान कॉंग्रेसच्या विरुद्ध आहेत हें बरें नव्हे. कॉंग्रेसची चळवळ कशासाठी चालली आहे, हें बहुसंख्य मुस्लिमांना अजून उमगलेलेंच नाही." अर्थात्, कांही मुसलमान कॉंग्रेसच्या कारभारांत व चळवळींत पुढाकार घेत असत हें खरें. तथापि, राष्ट्रवादाचा विकास होऊं लागल्यामुळे इंग्रजांची कृपादृष्टि मुसलमानांकडे वळली व इंग्रज लोक मुसलमानांच्या कॉंग्रेस-विरोधी वृत्तीस उत्तेजन देऊं लागले. "परंतु, विसाव्या शतकाच्या प्रारंभीं नव्या पिढींतल्या मुसलमानांत राष्ट्रीयता व राजकीय प्रवृत्ति ह्यांकडे कल स्पष्टपणें दिसूं लागला. तेव्हा त्यांना दुसऱ्या बाजूस वळवून घेण्यासाठी १९०६ सालीं ब्रिटिश सरकारच्या प्रेरणेने मुसलमानांचे मुख्य धर्मगुरु आगाखान यांच्या पुढाकाराखाली मुस्लिम लीगची स्थापना झाली. ब्रिटिश सरकारचे बाबतींत राजनिष्ठेचें वर्तन व मुसलमानांच्या हिताचें संरक्षण हीं मुस्लिम लीगचीं दोन मुख्य ध्येयें होतीं." बंगालची फाळणी करून पूर्व बंगाल-मध्ये मुसलमानांचें बहुमत असलेला प्रांत अस्तित्वांत आणावयाचा असा इंग्रजांचा बेत होता. त्यामुळे बंगालची फाळणी करण्याच्या इंग्रजांच्या कल्पनेचें कांही मुसलमानांनी मनः-पूर्वक स्वागत केलें. ढाक्क्याचा नबाब सलीमुल्ला याने ब्रिटिशांच्या योजनेस पाठिंबा दिला; आणि त्याच वेळीं 'स्वदेशी'च्या चळवळीस विरोध केला. अशा प्रकारें सय्यद अहमदांनी पेरलेल्या जातीयवादाच्या बीजाची वाढ होत गेली.

## मोर्ले-मिंटो सुधारणा

वंगभंगाची चळवळ दडपून टाकून सरकारने दडशाहीचे उपाय योजले. पुढाकार घेणाऱ्या टिळकांसारख्या नेत्यांना पकडून सक्तमजुरीच्या सजा ठोठावल्या. परंतु, हें

दडपशाहीचें धोरण राष्ट्रीय चळवळीस थोपवून धरूं शकलें नाही. उलट, दहशतवादी वृत्ति जागी झाली. रशियन व आयरिश क्रांतिकारकांचें अनुकरण करण्यांत आलें. कांहीं सरकारी अंमलदारांचे खून पाडण्यांत आले, तर कांहींचेवर बॉंब फेकण्यांत आले. ह्या दहशतवादी पंथाने हिंदी राजकारणांत नवतेज निर्माण केलें.

जेव्हा इंग्रजांचें दमन-धोरण निष्फळ झालें तेव्हा मवाळ पक्षांतील लोकांना आपल्या बाजूस वळविण्यासाठी सरकारने १९०९ सालीं मोर्ले-मिंटो सुधारणांचा कायदा पास केला. या कायद्यामुळे गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी कौन्सिलांत एक हिंदी सभासद घेण्याचें ठरविण्यांत आलें; वरिष्ठ व प्रांतिक कायदे-मंडळांची सभासद-संख्या वाढविण्यांत आली; निवडणुकींचें तत्त्व मान्य करण्यांत आलें; आगाखानांच्या नेतृत्वाखालील मुस्लिम प्रतिनिधींच्या मंडळाने व्हाइसरॉयच्या मंत्र्याच्या सूचनेवरून केलेली वेगळ्या मताधिकाराची मागणी मंजूर करण्यांत येऊन मुसलमानांना स्वतंत्र मताधिकार देण्यांत आला. लोकनियुक्त सभासदांचें बहुमत होणार नाही, ह्याबद्दल सरकार सावधगिरी बाळगीत असे. या कायद्यामुळे, शिफारसवजा ठराव मांडण्याचा, प्रश्नांवर उपप्रश्न विचारण्याचा, व अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार सभासदांना मिळाला. गोखल्यांसारख्या मवाळ पक्षाच्या पुढाऱ्यांनी, 'जें मिळालें त्यांत संतोष मानला.' तथापि, जहाल पक्षाच्या नेत्यांचें या सुधारणांमुळे समाधान झालें नाही. १९१२ सालीं बादशाह पंचम जॉर्ज याने दिल्लीस दरबार भरवून 'वंगभंग' रद्द केल्याचें जाहीर केलें.

## पहिलें महायुद्ध—मॉंटेग्यूचा जाहीरनामा

१९१३ सालीं मुस्लिम लीगने 'साम्राज्यांतर्गत' स्वराज्याचें (Self-Government within the Empire) ध्येय पुरस्कारलें. महायुद्धांत तुर्कस्थान ब्रिटनचे विरुद्ध लढत होता. त्यामुळे मुसलमानांच्या ब्रिटन-विरोधी भावनेस धार आली. १९१६ सालीं कॉंग्रेस व लीग यांच्या नेत्यांमध्ये 'लखनौ करार' झाला व राजकीय सुधारणांचा एक संयुक्त खलिता तयार करण्यांत आला. स्वराज्यप्राप्तीच्या लढ्यांत हिंदु-मुस्लिम ऐक्याचा हा महान् प्रसंग होता. डॉ. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी 'होमरूल लीग' स्थापन केली होती व स्वराज्याचा लढा चालूच ठेविला होता. दहशतवाद्यांची चळवळहि चालूच होती. युद्धांत जय मिळविण्याचे दृष्टीने ब्रिटिशांना हिंदी जनतेचें सहकार्य आवश्यक वाटत होतें. ह्या साऱ्या पंचप्रसंगांतून मार्ग काढण्याच्या उद्देशाने भारतमंत्री मॉंटेग्यु यांनी २० ऑगस्ट, १९१७ या दिवशीं हिंदुस्थान-विषयक नवीन धोरण ब्रिटिश पार्लमेंटांत जाहीर केलें. ह्या धोरणानुसार हिंदुस्थानास ज्या सुधारणा मिळाल्या त्यांना 'मॉंटफर्ड सुधारणा' असें म्हणतात. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत एक देश या नात्याने हिंदुस्थानांत हळूहळू जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावयाची हें ब्रिटिश

सरकारचें अंतिम ध्येय आहे, अशी घोषणा मॉंटेग्यूंनी केली होती. या घोषणेचा अर्थ 'हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य' द्यावयाचें असा होता, असें स्पष्टीकरण मागाहून इ. स. १९२९ सालीं लॉर्ड आयर्विननी केलें. परंतु, मूळच्या घोषणेंत 'वसाहतीचें स्वराज्य' असा शब्दप्रयोग नसल्यामुळे हिंदुस्थानांत असंतोषाची लाट पसरली. असें असलें तरी वरील घोषणेमुळे नवीन नीतीस सुरुवात झाली व हिंदुस्थानला स्वराज्यप्राप्तीची आशा वाटूं लागली, ह्यांत शंका नाही.

## मॉंटेग्यू-चेम्सफर्ड-सुधारणा : रौलट ॲक्ट

१९१९ सालीं ब्रिटिश पार्लमेंटने एक कायदा पास करून हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणल्या. या कायद्यानुसार गव्हर्नर जनरलच्या मदतीसाठी कौन्सिल ऑफ् स्टेट व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली अशीं दोन कायदे-मंडळें अस्तित्वांत आलीं; कायदेमंडळांतील सभासदांची संख्या वाढविण्यांत आली; आणि जातीय प्रतिनिधित्व मुसलमानांखेरीज शीख, युरोपियन, अँग्लो-इंडियन इत्यादि जमातींसाठीहि मान्य करण्यांत आलें; प्रांताप्रांतांतून द्विदल राज्यपद्धति सुरू करण्यांत आली; राज्यकारभाराच्या सोयीसाठी महत्त्वाच्या विषयांचा कारभार कायदेमंडळाहून स्वतंत्र असलेल्या गव्हर्नरच्या कार्यकारी कौन्सिलच्या सभासदांकडे सोपविण्यांत आला; लोककल्याणासंबंधीच्या विषयांचा कारभार लोकनियुक्त हिंदी प्रधानांकडे सोपविण्यांत आला; व्हाइसरॉयची सर्वंकष सत्ता मध्यवर्ती सरकारांत पूर्वीप्रमाणे चालूंच राहिली.

या सुधारणांमुळे कोणाचेंच समाधान झालें नाही. कॉंग्रेसने 'ह्या सुधारणा अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक' असल्याचें जाहीर केलें. १९१९ सालीं वरिष्ठ कायदेमंडळाने रौलट ॲक्ट नांवाचा एक दडपशाही कायदा पास केला. ह्या कायद्यानुसार कोणत्याहि व्यक्तीस, तिच्या विरुद्ध न्यायालयांत खटला न चालवितांहि, वाटेल तितका वेळ कैदेंत डांबून ठेवतां येण्याची सोय झाली. दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रहाच्या द्वारें विजय मिळवून हिंदुस्थानांत परतलेल्या महात्मा गांधींनी हिंदी कॉंग्रेसच्या कारभारांत पुढाकार घेतला. गांधीजींनी रौलट ॲक्ट ह्या काळ्या कायद्याचा सविनय भंग करण्याचें देशाला आवाहन केलें. देशभर ह्या कायद्यास जोराचा विरोध झाला व ठिकठिकाणीं हरताळ पाडण्यांत आले. गांधीजींना पंजाबच्या वाटेवर अटक करण्यांत आली. वातावरण अतिशय तंग झालें आणि अमृतसरांत १३ एप्रिलच्या दिवशीं जालियनवाला बागेंत अमानुष हत्याकांड झालें. जनरल डायरने निर्दोष, निःशस्त्र हिंदी लोकांवर गोळ्यांचा वर्षाव केला. जवळजवळ ४०० माणसें प्राणांस मुकलीं व १५०० जखमी झालीं. ब्रिटिश सरकारने डायरच्या ह्या कृत्याची वाखाणणी केल्यामुळे हिंदी लोकांच्या जखमेवर मीठ चोळलें गेलें व लोकक्षोभ वाढला. देशांत अशा प्रकारें इंग्रजांचें दडपशाहीचें धोरण चालूं राहिलें.

## असहकारितेची चळवळ

१९२० सालीं गांधीजींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने कलकत्याच्या खास अधिवेशनांत असहकारितेच्या चळवळीचा ठराव पास केला. कायदेमंडळें, शाळा, कॉलेजें, न्यायालयें, सरकारी हुद्दे इत्यादींचा त्याग करावयाचा, त्यांचेवर बहिष्कार घालावयाचा तसेंच विलायती मालावरहि बहिष्कार घालावयाचा असा निर्णय घेण्यांत आला. हातमागाच्या, विणकामाच्या देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचें ठरविण्यांत आलें. जनतेने या मोहिमेस पूर्ण पाठिंबा देऊन, ही चळवळ सबंध देशभर पसरविली. १९२१ सालच्या अहमदाबादच्या अधिवेशनाचे वेळीं महात्मा गांधीजींची सत्याग्रहाच्या अहिंसक लढ्याचे पुढारी म्हणून निवड करण्यांत आली व त्यांना लढ्यासंबंधी पूर्ण अधिकार देण्यांत आले. लढा जोरांत चालू झाला. खिलाफतीच्या प्रश्नावरून मुसलमानहि असंतुष्ट झाले होते. त्यामुळे त्यांनीहि कॉंग्रेसच्या लढ्याला पाठिंबा दिला. सरकारचें दमनचक्र वेगाने फिरतच राहिलें. सुमारें ३० हजार सत्याग्रहींना कैदेंत टाकण्यांत आलें. खवळलेल्या जनतेने दंगल माजवून चौरीचुरा येथील पोलिसस्टेशन जाळलें. त्या दंगलींत २२ शिपाई मरण पावले. या घटनेमुळे गांधीजींना अतिशय दुःख झालें व त्यांनी लढा ताबडतोब थांबविला. गांधीजींना कैद करण्यांत येऊन ६ वर्षांची सजा ठोठावण्यांत आली.

## स्वराज्य पक्ष—सायमन कमिशन—पुनश्च सत्याग्रह

सत्याग्रहाची चळवळ बंद झाल्यानंतर पंडित मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, चित्तरंजन दास, तात्यासाहेब केळकर वगैरेंनी 'स्वराज्यपक्ष' स्थापन केला. त्यांनी निवणुकींत भाग घेऊन, कायदे-मंडळांत जागा पटकावून, कायदे–भंग करण्याचा निर्णय घेतला. त्यांना चांगल्या प्रकारें यशहि आलें. त्यांनी मॉंटफर्ड सुधारणांचा पोकळपणा सिद्ध करून दाखविला. त्यामुळे १९२७ सालीं ब्रिटिश पार्लमेंटने हिंदुस्थानांत मॉंटफर्ड सुधारणांची तपासणी करण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक रॉयल कमिशन नेमलें. त्या कमिशनमध्ये एकहि हिंदी सभासद नसल्यामुळे हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांनी त्याचेवर बहिष्कार टाकला. १९२९ सालीं दिल्लीला एक सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत आली. त्या परिषदेने हिंदुस्थानच्या मागण्यांचा, आकांक्षांचा अहवाल तयार केला. तो 'नेहरू–रिपोर्ट' या नांवाने ओळखला जातो. या अहवालांत बहुमताने हिंदुस्थानचें राजकीय ध्येय वसाहतीचें स्वराज्य असल्याचें पुरस्कारण्यांत आलें होतें. परंतु, एका वर्षाचे अवधींत जर हिंदुस्थानास वसाहतीचें स्वराज्य मिळालें तरच त्याचा स्वीकार करावयाचा; नाहीतर 'पूर्ण स्वातंत्र्याची' मागणी करावयाची, असें कॉंग्रेसने ठरवून टाकलें. या निर्णयानुसार १९२९ सालीं कॉंग्रेसने जाहीर केलें की, 'पूर्ण स्वातंत्र्य हें हिंदुस्थानचें राजकीय ध्येय आहे.' सायमन कमिशनच्या शिफारसी कोणीहि स्वीकारणार नाही असें वाटल्यावरून इंग्लंडांत गोलमेज

परिषद् भरविण्याचें नक्की करण्यांत आलें. परंतु, कॉंग्रेसने स्वराज्याच्या प्राप्तीसाठी पुनः कायदेभंगाचा लढा सुरू केला. प्रथमतः गोलमेज परिषदेंत कॉंग्रेसने भाग घेतला नाही. व्हाइसरॉय आयर्विन यांनी ४ मार्च, १९३१ या दिवशीं गांधीजींशीं करार केला. त्यामुळे कायदेभंगाची चळवळ तहकूब करण्यांत आली आणि कॉंग्रेसचे एकमेव प्रतिनिधि म्हणून गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर राहण्यासाठी इंग्लंडला गेले. परंतु, जातीय प्रतिनिधित्वाच्या प्रश्नावर एकमत न झाल्यामुळे गांधीजी परत आले. त्यांना लगेच अटक करण्यांत आली; फिरून कायदेभंगाची मोहीम सुरू झाली आणि १९३३ सालच्या मार्च महिन्यापर्यंत १,२०,००० माणसें तुरुंगांत डांबलीं गेलीं. मध्यंतरीच्या काळांत इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी १९३२ मध्ये जातवार प्रतिनिधींची संख्या निश्चित करणारा जाहीरनामा काढला. त्यानुसार मुसलमान, ख्रिश्चन, शीख, अँग्लो-इंडियन, स्त्रिया, दलित वर्ग, व्यापारी, जमीनदार या सर्वांसाठी स्वतंत्र मतदारसंघ तसेंच स्वतंत्र व जादा जागा (weightage) देण्यांत आल्या. दलितांना हिंदूंहून वेगळे समजण्याच्या धोरणास गांधीजींनी विरोध केला व प्रायोपवेशनास सुरुवात केली. सरतेशेवटीं "पुणें-करार" होऊन हा प्रश्न मिटला. आतापर्यंत झालेल्या तीन गोलमेज परिषदांच्या शिफारसींच्या आधारें ब्रिटिश पार्लमेंटने १९३५ सालीं हिंदी सुधारणांचा कायदा पास केला. त्यासच Government of India Act असें म्हणतात.

## १९३५ चा कायदा–फेडरेशन–प्रांतिक स्वराज्य

या कायद्यान्वयें पुढील सुधारणा घडून आल्या :– हिंदुस्थानांतील खालसा मुलूख व देशी संस्थानें यांच्याकरितां संयुक्त राज्यपद्धति सुरू करण्यांत आली, म्हणजेच त्यांचें फेडरेशन बनलें. प्रांतिक सरकारांत सर्व खातीं सोपीव (Transferred) बनावीं म्हणजे लोकनियुक्त प्रधानांच्या ताब्यांत देण्यांत यावींत; फक्त कायदा, सुव्यवस्था व पोलिस खातें ह्या खात्यांपुरते गव्हर्नरास विशेष अधिकार असावेत, असें ठरविण्यांत आलें व तशी व्यवस्था अंमलांत आली. प्रांतिक स्वराज्याची स्थापना झाली. कायदेमंडळांत लोकनियुक्त सभासदांचें बहुमत राखण्यांत आलें. तथापि, जातीय प्रतिनिधित्वाच्या प्रथेनुसार निवडून आलेल्या सभासदांचें सहकार्य लाभणें अशक्य होतें. गव्हर्नर व गव्हर्नर जनरल् यांचेवर विशेष जबाबदारी टाकण्यांत आली. व्हेटोचा, वटहुकूम काढण्याचा, आर्थिक खर्चास मंजुरी देण्याचा वगैरे अधिकार त्यांच्याकडेच होते.

१९३७ सालीं प्रांताप्रांतांतून निवडणुका झाल्या व ११ पैकी ८ प्रांतांत कॉंग्रेसला बहुमत मिळालें. त्यामुळे गव्हर्नरांकडून अनेक आश्वासनें मिळवून कॉंग्रेसने प्रांताप्रांतांतून आपलीं मंत्रिमंडळें स्थापलीं. त्यांनी तीस महिन्यांच्या कारभारांत दारूबंदी, शेती-सुधारणा, कर्जनिवारणासाठी मदत, शिक्षणास उत्तेजन, घरगुती उद्योगधंद्यांस मदत इत्यादि लोक-

कल्याणाचीं बहुविध कामें केलीं. १९३९ सालीं हिंदुस्थानच्या संमतीशिवाय ब्रिटिशांनी युद्ध पुकारल्यामुळे व युद्धहेतूंचें स्पष्टीकरण करण्याचें नाकारल्यामुळे कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजिनामे दिले आणि परिणामीं प्रांताप्रांतांतील जबाबदार राज्यपद्धतीची अखेरी झाली.

## दुसरें महायुद्ध आणि राजकीय प्रगति

दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानंतर कॉंग्रेसने युद्धहेतूंचें स्पष्टीकरण ब्रिटिशांकडून मागितलें व साम्राज्यवाद्यांच्या युद्धांत भाग घेण्यास नकार दिला. युद्ध संपल्याबरोबर हिंदुस्थानांत घटना परिषद् भरविण्यांत येऊन हिंदुस्थानासाठी घटना तयार करण्यास जर तुम्ही तयार असाल व ताबडतोब राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत येणार असेल तरच हिंदी लोक महायुद्धांत भाग घ्यावयास तयार होतील, असें कॉंग्रेसने ब्रिटिशांना स्पष्टपणें सांगितलें. कॉंग्रेसशीं ह्याबाबतींत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न १९४० मध्ये एकदा करण्यांत आला. परंतु, कॉंग्रेसच्या मूलभूत मागण्या नामंजूर झाल्यामुळे तो प्रयत्न फसला. परिणामीं, गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली सांकेतिक, वैयक्तिक सत्याग्रहास पुनश्च सुरुवात झाली. गांधीजींनी आघाडीचे सत्याग्रही म्हणून विनोबाजींची निवड केली. त्यानंतर सुमारें २० हजार सत्याग्रही पकडले गेले. मुस्लिम लीगने १९४० सालीं लाहोर अधिवेशनांत प्रथमतःच पाकिस्तानच्या मागणीचा ठराव पास केला. त्यामुळे हिंदी राजकारणाची गुंतागुंत अधिकच बिकट होऊन बसली.

ह्याच सुमारास तिकडे जपान एकामागोमाग एक पूर्वेकडील देश काबीज करीत होता. अशा आणीबाणीच्या समयीं १९४२ सालच्या मार्च महिन्यांत ब्रिटिश सरकारने मंत्रिमंडळाचे सभासद स्टॅफर्ड क्रिप्स यांना हिंदुस्थानांतील राजकीय पेंचप्रसंग सोडविण्यासाठी भारतांत पाठविलें. युद्धाच्या समाप्तीनंतर वसाहतींचें स्वराज्य हिंदुस्थानास दिलें जाईल; ताबडतोब घटना परिषद् भरविण्यांत येईल; सर्व प्रांतांचें मिळून एक संघराज्य बनविण्यांत येईल आणि व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींत कांही हिंदी सभासद घेण्यांत येतील, अशीं आश्वासनें क्रिप्सनी आपल्या योजनेंत दिलीं. तथापि, राष्ट्रीय सरकारची स्थापना व्हावी ही कॉंग्रेसची मागणी क्रिप्सनी फेटाळली. कदाचित्, कांहीतरी मार्ग या पेंचप्रसंगांतून निघाला असता देखील. परंतु, क्रिप्सनी मध्येच अचानकपणें वाटाघाटी बंद केल्या. जें ब्रिटिश सरकार ऐन युद्धाच्या धामधुमींत, कटकटींच्या प्रसंगीं सत्तात्याग करण्यास तयार नाही तें युद्धानंतर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देईल किंवा काय, याबद्दल जनतेच्या मनांत शंका निर्माण झाली. क्रिप्स योजनेचें गांधीजींनी "दिवाळखोर बँकेवरील पुढील तारखेचा चेक" ह्या शब्दांत वर्णन केलें. इतर कोणताच मार्ग न उरल्यामुळे कॉंग्रेसच्या महासमितीने ८ ऑगस्ट, १९४२ या दिवशीं "चले जाव" चा ऐतिहासिक ठराव पास केला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं देशभर पुढाऱ्यांची प्रचंड धरपकड सुरू

झाली. कॉंग्रेस ही बेकायदेशीर संघटना असल्याचें सरकारने घोषित केलें. कॉंग्रेसने प्रजेला 'करेंगे या मरेंगे' हें घोषवाक्य दिलेलें होतें. सबंध देशांत हरताळ पडले, जंगी सभा भरविण्यांत आल्या, मिरवणुका निघाल्या आणि प्रक्षुब्ध जनतेने हिंसक कृत्येंहि केलीं. रेल्वेचे रूळ उखडून टाकण्यांत आले, तारा तोडण्यांत आल्या. उलट सरकारनेहि, जोरदारपणें दडपशाहीच्या नीतीचा अवलंब केला. लाठीमार, गोळीबार, सामुदायिक दंड इत्यादि दडपशाहीच्या मार्गांचा सरकारने अवलंब केला, शेंकडो लोकांना कैद करण्यांत आलें. चार महिन्यांनंतर हा लढा थंडावला.

१९४१ सालच्या २६ जानेवारीस सुभाषचंद्र बोस देशांतून एकाएकी नाहीसे झाले. त्यांनी जर्मनी व जपान यांच्याशीं संधान बांधलें आणि त्यांच्या सहकार्याने हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी 'आझाद हिंद फौजे'ची (Indian National Army) उभारणी केली. २१ ऑक्टोबर, १९४३ या दिवशीं त्यांनी सिंगापुरांत आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारची स्थापना केली. आझाद हिंद फौज हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत आली होती. तिच्या अनेक सैनिकांना इंग्रजांनी कैद केलें.

जून १९४५ मध्ये कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना तुरुंगांतून मुक्त करण्यांत आलें व व्हाइसरॉय वेव्हेल यांनी राजकीय प्रश्नाची निरगांठ सुटावी म्हणून २५ जून, १९४५ या दिवशीं सिमल्यांत एक सर्वपक्षीय परिषद् बोलविली. तिला 'सिमला परिषद्' म्हणतात. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणींतील मुस्लिम सभासदांची पसंति केवळ मुस्लिम लीगच करील अशा लीगच्या हट्टामुळे ही परिषद् अयशस्वी झाली. हिंदुस्थानांतील प्रजेंत प्रचंड असंतोष धुमसत होता. आझाद हिंद फौजेच्या सैनिकांवर खटले चालू झाले तेव्हा त्यांची महान् कामगिरी लोकांसमोर आली व त्यामुळे जनतेस त्यांच्याबद्दल अधिक आदर वाटूं लागला. जनतेने अनेक ठिकाणीं निदर्शनें करून आझाद हिंद फौजेच्या सैनिकांच्या सुटकेची मागणी केली. १८ फेब्रुवारी, १९४६ या दिवशीं भारतीय नाविकदलाच्या सैनिकांनी बंड केलें. हवाईदलाचे कांही सैनिकहि सदरहू बंडांत सामील झाले. लष्करांतहि असंतोष धुमसत होताच. ब्रिटनमध्ये १९४५ च्या निवडणुकींत मजूरपक्षास प्रचंड बहुमत मिळून त्याचें मंत्रिमंडळ इंग्लंडांत स्थापन झालें. त्या पक्षाने हिंदुस्थानचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी पुनः नव्याने प्रयत्न सुरू केले व हिंदुस्थानांतील परिस्थिति प्रत्यक्ष अभ्यासण्याकरितां पार्लमेंटच्या दहा सभासदांचें एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांत पाठवून दिलें. त्याने थोड्याच दिवसांत आपलें इतिवृत्त पार्लमेंटला सादर केलें.

## कॅबिनेट मिशनची योजना

वरील शिष्टमंडळाने सादर केलेल्या इतिवृत्तानुसार भारतांत ब्रिटिश त्रिमंत्री येऊन दाखल झाले. ह्या कॅबिनेट मिशनने कॉंग्रेस व मुस्लिम लीगच्या नेत्यांच्या गांठीभेटी घेऊन त्यांच्याशीं वाटाघाटी केल्या. परंतु त्या निष्फळ झाल्यामुळे १६ मे, १९४६ या दिवशीं

कॅबिनेट मिशनने स्वतःचीच योजना सादर केली. तिचें स्वरूप असें :—( १ ) हिंदुस्थानची घटना निश्चित तयार होईपर्यंतच्या काळांत एक मध्यवर्ती हंगामी सरकार असावें. ( २ ) हिंदुस्थान अखंड राहावा; कारण आर्थिक, लष्करी व राज्यकारभारविषयक दृष्टीनें पाहतां पाकिस्तान-योजना अव्यवहार्य आहे. ( ३ ) ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांचें एक संघराज्य असावें. मध्यवर्ती सरकारकडे परराष्ट्रीय संबंध, संरक्षण व वाहतूक हीं खातीं सोपविण्यांत येऊन बाकीचीं सर्व खातीं प्रांतिक सरकारांकडे असावींत. ( ४ ) प्रांतांना निरनिराळे गट बनविण्याचें स्वातंत्र्य असावें. ( ५ ) हिंदुस्थानची भावी राज्यघटना ठरविण्याकरितां एक घटना परिषद् भरविण्यांत यावी. ( ६ ) नवीन घटना अस्तित्वांत आल्यावर कोणत्याहि प्रांताला आपल्या गटांतून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार असावा. ( ७ ) प्रांतांचे अ, ब व क असे तीन गट असावेत.

कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्या मागण्यांचें समाधान व्हावें या हेतूने वरील योजना तयार करण्यांत आलेली होती. तिच्या द्वारे हिंदुस्थानची एकी आपोआप राखली गेली होती. व त्याच वेळीं दोन प्रांतांत मुस्लिमांचें बहुमत असल्यामुळे तेथे मुसलमानांचेंच मंत्रिमंडळ व त्यांचा राज्यकारभार अस्तित्वांत येईल अशी सोय करण्यांत आली होती. अशा प्रकारें पाकिस्तानची मागणी अप्रत्यक्षपणें स्वीकारली गेली होती.

प्रारंभीं मुस्लिम लीगने सदरहू योजना स्वीकारली; परंतु, कॉंग्रेसने हंगामी सरकारच्या योजनेस संमति दिली नाही. त्यानंतर मुस्लिम लीगने आपल्याला योजना मान्य नसल्याचें जाहीर केलें, तर कॉंग्रेसने हंगामी सरकारच्या योजनेस मान्यता दिली. शेवटीं सप्टेंबर १९४६ मध्ये पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली हंगामी राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्यांत आली. देशांत जातीय दंगे सुरू झाले आणि मुस्लीम लीगने प्रत्यक्ष प्रतिकाराचा निर्धार केला. ऑक्टोबरांत लीगचे प्रतिनिधीदेखील हंगामी सरकारांत आले. परंतु, त्यांनी कॉंग्रेसशीं असहकार पुकारून राज्यकारभार चालविणें कठीण करून सोडलें. लीगने घटना समितीवर बहिष्कार टाकला. ब्रिटिश सरकारने हिंदुस्थान सोडून जाण्याचा निर्धार जाहीर केला आणि लॉर्ड वेव्हेल यांच्या जागीं लॉर्ड मौंटबॅटन यांची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक केली.

## मौंटबॅटन योजना—देशाचे तुकडे

लॉर्ड मौंटबॅटन यांनी २४ मार्च, १९४७ या दिवशीं राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. कॉंग्रेसच्या व लीगच्या नेत्यांशीं वाटाघाटी करून त्यांनी ३ जून, १९४७ या दिवशीं आपली स्वतःची योजना जाहीर केली. तिचें स्वरूप असें—हिंदुस्थान व पाकिस्तान असे देशाचे दोन भाग पाडावेत. पंजाब व बंगाल या प्रांतांतील कायदेमंडळांच्या सभासदांचें मत अजमावून तें अनुकूल असल्यास त्या दोन प्रांतांचीहि विभागणी करावी. सीमाप्रांत तसेंच आसामांतील सिल्हट जिल्हा यांतील लोकमत लक्षांत घेऊन त्यांना भारत किंवा पाकिस्तान यांचेशीं संलग्न करावें. देशी संस्थानांवरील सार्वभौमत्व संपुष्टांत आणावें.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-प्राप्तीचा दुसरा कोणताच उपाय उरलेला नसल्यामुळे कॉंग्रेसने निरुपायास्तव सदरहू योजना स्वीकारली. मुसलमानांनाहि ही योजना संपूर्णपणें पसंत नव्हती. तरीहि त्यांनी तिचा स्वीकार केला. ब्रिटिश पार्लमेंटने जुलै १९४७ मध्ये हिंदी स्वातंत्र्याचा कायदा पास केला व १५ ऑगस्ट, १९४७ या दिवशीं भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांचा जन्म झाला. लॉर्ड मौंटबॅटन हे भारताचे व महंमदअली जिना हे पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल् झाले.

## भारताचें प्रजासत्ताक राष्ट्र-अभिनव भारत

१५ ऑगस्ट, १९४७ हा भारताचा स्वातंत्र्यदिन लोकांनी अपूर्व उत्साहाने साजरा केला. इंग्रजी राजवटीचा नाश झाल्यामुळे राष्ट्राचें नष्टचर्य संपेल आणि आपल्याला शांततेचें, सुखसमृद्धीचें जीवन जगतां येईल अशा आशेचीं किरणें जनतेच्या मनांत फांकलीं. प्राचीन काळचें भारताचें वैभव त्यास पुनश्च प्राप्त होईल अशी आशा सर्वांना वाटूं लागली. परंतु, त्या वैभवसंपन्न स्थितीस पोचण्यापूर्वी राष्ट्राला अनेक संकटांना तोंड द्यावयाचें होतें. सर्वप्रथम निर्वासितांच्या पुनर्वसाहतीचा प्रश्न राष्ट्रापुढे उभा राहिला. जातीय दंगली व गुंडांचे पाशवी अत्याचार यांचेमुळे लक्षावधि लोक पाकिस्तानांतून भारतांत आले. देशी संस्थानें भारतांत विलीन करण्याचा प्रश्न सोडवावयाचा होताच. हा प्रश्न सरदार वल्लभभाई पटेलांनी मोठ्या हिकमतीने सोडविला. परंतु, जुनागढ, हैदराबाद, काश्मीर येथे विलीनीकरणाचे बाबतींत पेचप्रसंग उभे राहिले. इतर राजांनी काळवेळ ओळखून आपणहून सत्तात्याग केला व आपापलीं राज्यें हिंदी संघराज्यांत सामील करून टाकलीं. जुनागढमध्ये सक्तीने भारतीय सत्ता प्रस्थापित करण्यांत आली. हैदराबादेंत पोलिस कारवाई करण्यांत आली. काश्मीर गिळंकृत करण्यासाठी पाकिस्तानने त्याचेवर आक्रमण केलें आणि तेथे पठाण गुंडांनी उच्छाद मांडला. त्यामुळे काश्मीरच्या महाराजांनी हिंदी संघराज्यांत सामील होण्याची इच्छा प्रदर्शित केली. काश्मीर हिंदी संघराज्यांत विलीन झालें. परंतु, ह्या राज्याचा कांही भाग अद्यापि पाकिस्तानच्या ताब्यांत आहे. या प्रश्नासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून भारताला अद्यापि न्याय मिळालेला नाही.

भारताच्या नवरचनेच्या कार्यांत महात्मा गांधीजींच्या अमोल मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता होती. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर सत्तास्थान भूषविण्याऐवजी गांधीजींनी पंजाब, सिंध, बंगाल येथे चालूं असलेलें हत्याकांड थांबविण्याचें कार्य हातीं घेतलें. परंतु, भारताच्या दुर्दैवामुळे ३० जानेवारी, १९४८ या दिवशीं संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं गांधीजींचा वध झाला. सबंध देश शोकसागरांत बुडून गेला.

घटना समितीची बैठक नोव्हेंबर १९४६ मध्ये सुरू झाली. घटना तयार करण्याचें कार्य १९४९ सालच्या नोव्हेंबरांत पुरें झालें. २६ जानेवारी, १९५० या दिवशीं नवीन

घटना अंमलांत आली. या घटनेनुसार भारत एक प्रजासत्ताक राष्ट्र बनलें. तें ब्रिटिश राष्ट्रकुलांत एक सभासद राष्ट्र म्हणून कायम राहिलें. हिंदी प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. राजेन्द्र प्रसाद यांची निवड झाली.

भारताच्या नव्या घटनेंत राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समता स्थापण्याचा ध्येयवाद राष्ट्रापुढे ठेवण्यांत आला आहे. प्रत्येक नागरिकाला संपूर्ण मतस्वातंत्र्य दिलेलें असून आज भारत हें जगांतील सर्वांत मोठें लोकशाही राष्ट्र झालें आहे. राजनैतिक धोरणाच्या सिद्धान्ताची निश्चिति हें आपल्या घटनेचें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारली गेली आहे. परंतु, १५ वर्षेपर्यंत इंग्रजी हीच राज्यकारभाराची भाषा म्हणून चालू राहावी असेंहि ठरविण्यांत आलें आहे. मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण, दारूबंदी, छोट्या उद्योगधंद्यांना उत्तेजन वगैरे तत्त्वें स्वीकारण्यांत आलेलीं आहेत.

स्वतंत्र भारताने आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत मानाचें व महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे. तंग वातावरण कमी व्हावें व जगांत शांतता नांदावी यासाठी भारत प्रथमपासूनच प्रयत्न करीत आला आहे. भारताचें धोरण तटस्थतेचें आहे. तिबेटबाबत चीनशीं १९५४ सालीं तह करून त्यांत पंचशील तत्त्वांचा उभय देशांनी पुरस्कार केला आहे. आणि अशा प्रकारें इतर राष्ट्रांसमोर भारत व चीन या राष्ट्रांनी परराष्ट्रीय नीतीचा जणूं आदर्शच ठेविला आहे. राष्ट्राराष्ट्रांनी एकमेकांच्या सार्वभौमत्वाचा मान राखावा, परस्परांवर आक्रमण करूं नये, एकमेकांच्या अंतर्गत कारभारांत ढवळाढवळ करूं नये, एकमेकांशीं समानतेने वागावें आणि शांततामय सहजीवनाच्या तत्त्वाचा स्वीकार करून त्यानुसार परस्परांशीं वर्तन ठेवावें, हीं तीं पंचशील तत्त्वें होत. दुर्दैवाने चीनने नुकतेंच या तत्त्वांना हरताळ फांसणारें वर्तन केलें आहे. व त्यामुळे उभय देशांत तेढ निर्माण झाली आहे.

परकीयांच्या अनेक वसाहती भारतांत होत्या. पैकी फ्रेंच वसाहतीचा प्रश्न शांततेने सुटला आहे. परंतु दीव, दमण व गोवा या प्रदेशांतून पाय काढण्यास पोर्तुगीज तयार नाहीत. जोपर्यंत हे प्रदेश स्वतंत्र झालेले नाहीत तोपर्यंत भारताचें स्वातंत्र्य अपुरें आहे असेंच मानलें पाहिजे. कॉंग्रेसने भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य केलें आहे. त्यानुसार भारतांत नोव्हेंबर १९५६ पासून भाषावार प्रांतरचना झालेली आहे. मुंबईच्या द्विभाषिक राज्याचेंहि विभाजन झालें असून महाराष्ट्र व गुजरात अशीं दोन स्वतंत्र राज्यें १ मे, १९६० या दिवशीं अस्तित्वांत आलीं आहेत.

राजकीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर भारतासारख्या गरीब देशाने आर्थिक उन्नतीच्या प्रश्नाकडे लक्ष पुरविणें अतिशय जरूरीचें आहे. प्रजेच्या सांपत्तिक स्थितींत सुधारणा घडवून आणण्याचे दृष्टीने पंचवार्षिक योजनांच्या द्वारे नेटाने प्रयत्न करण्यांत येत आहेत.

## हिंदुस्थानचा आर्थिक विकास

हिंदुस्थानाचा राजकीय क्षेत्रांत झालेला विकास आपण वर पाहिला. आता आपण भारताच्या आर्थिक विकासाच्या परिस्थितीकडे दृष्टि वळवूं या. आर्थिक परिस्थितीचा राजकीय परिस्थितीशीं अत्यंत निकटचा संबंध असतो. कोणत्याहि देशाच्या आर्थिक विकासाचे टप्पे त्या देशाच्या राजकीय परिस्थितीवर बहुतांशीं अवलंबून असतात. परतंत्र देशाचें आर्थिक धोरण राज्यकर्त्यांचा वर्ग आपल्या देशाचें हित डोळ्यांसमोर ठेवूनच नक्की करीत असतो. आणि शासित देशाची साधनसंपदा म्हणजे राज्यकर्त्यांचें सुख, वैभव, समृद्धि यांची वाढ करणारें साधन, असें मानलें जातें. अशा प्रकारें राज्यकर्ते म्हणजे प्रशासक आणि जित म्हणजे शासित यांचे परस्परसंबंध शोषक आणि शोषित असे बनून जातात. मात्र स्वतंत्र लोकशाही देशांत प्रजेच्या प्रतिनिधींनें बनलेलें सरकार जनसमुदायाच्या हिताच्या दृष्टीने देशाचें आर्थिक धोरण निश्चित करतें आणि सर्वसामान्य माणसांचें राहणीमान सुधारावें, त्यांना आर्थिक सुस्थिति प्राप्त व्हावी यासाठी तें प्रयत्न करतें. या साऱ्या विधानांची साक्ष हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाच्या इतिहासावरून आपल्याला पूर्णपणें पटूं शकते.

## प्राचीन भारतांतील अर्थव्यवस्था

प्राचीन काळापासूनच भारत त्याच्या आर्थिक भरभराटीसाठी प्रख्यात देश होता. १९१६ सालीं इंग्रज सरकारने नेमलेलें औद्योगिक कमिशन आपल्या अहवालांत म्हणतें, " आधुनिक औद्योगिक संप्रदायांची जन्मभूमि समजल्या जाणाऱ्या पश्चिम युरोपांतल्या देशांतील लोक जेव्हा जंगली अवस्थेंत इतस्ततः भटकत होते तेव्हा हिंदुस्थान त्याच्या राजेरजवाड्यांची अपार संपत्ति व त्याचें कलाकौशल्य यांसाठी विश्वविख्यात होता. " हिंदुस्थानांतील धाडसी व्यापारी पूर्व आफ्रिका, तुर्कस्थान, इराण, अरबस्तान, अफगाणिस्तान, इजिप्त, तिबेट, जावा, चीन, ब्रह्मदेश, सिलोन वगैरे देशांत व्यापारासाठी जात असत. ते धनद्रव्य मिळवीत आणि संस्कृतीचाहि प्रचार करीत असत. हिंदी कलाकौशल्याच्या वस्तू जगद्विख्यात होत्या. डाक्क्याची मलमल जगांत अप्रतिम, अतुल समजली जात असे. हिऱ्यामोत्यांसारख्या मौल्यवान् वस्तू, मसाल्याचे पदार्थ, साखर, अफू, रंग, सुती कापड वगैरे वस्तूंची हिंदुस्थानांतून निर्यात होत असे. तांबें, जस्त, शिसें वगैरे धातू आणि घोडे यांची प्राचीन काळीं आयात होत असे. हिंदुस्थानची व्यापारी बाजू नेहमी अनुकूल राहत असे. हिंदुस्थानच्या निर्यात मालाची किंमत आयात मालाच्या किंमतीहून नेहमीच अधिक असे त्यामुळे बाकीची रक्कम इतर देशांना हिंदुस्थानास सोन्याच्या रूपाने चुकती करणें प्राप्त होत असे. दरवर्षी हिंदुस्थानांत फार मोठ्या रकमेचें सोनें आयात होत असे. पहिल्या शतकांतील रोमन इतिहासकार प्लीनी

यानेहि प्राचीन भारतीय व्यापार-उदीमासंबंधी असेंच मत व्यक्त केलें आहे. त्याच्या वर्णनानुसार रोममधून दर वर्षी मोठ्या रकमेचें सोनें हिंदुस्थानांत पाठविलें जात असे. अठराव्या शतकांत इंग्रजांनीहि अशीच तक्रार केलेली होती. प्राचीन अर्थव्यवस्थेंत स्वावलंबी ग्रामव्यवस्थेस सर्वाधिक महत्त्व होतें. जवळजवळ ९० टक्के लोक खेड्यापाड्यांतून राहत. शेती व हस्तव्यवसाय हे लोकांचे मुख्य धंदे होते. लोकांचें जीवन आर्थिक दृष्टीने सुखाचें, समाधानाचें व समृद्धीचें होतें. प्राचीन हिंदुस्थानांतील राजेमहाराजे आणि मोगल बादशहा भारतीय कलाकुसरींना उत्तेजन देत असत. त्यामुळे, हिंदुस्थानांत अनेक छोट्या उद्योगधंद्यांचा विकास झालेला होता.

## इंग्रजांचें आगमन – आर्थिक ऱ्हास – अवदशा

इंग्रजांच्या आगमनाच्या सुमारास हिंदुस्थानची आर्थिक स्थिति समतोल होती. शेती समृद्ध होती, उद्योगधंद्यांचा विकास झालेला होता, व्यापार मोठ्या प्रमाणावर होत होता व त्याची स्थिति हिंदुस्थानास अनुकूल होती. कै. सर रोमेशचंद्र दत्त यांच्या अभिप्रायानुसार, “ इंग्रज जेव्हा हिंदुस्थानांत आले तेव्हा हिंदुस्थान हा एक महान् कृषिप्रधान आणि उद्योगप्रधान देश होता. हिंदुस्थानांतील हस्तव्यवसाय युरोप आणि आशियाच्या बाजारपेठांना माल पुरवीत असत. ” हिंदुस्थानच्या आर्थिक भरभराटीने मोहून गेल्यामुळेच युरोपांतील व्यापारी कंपन्या भारतांत येत असत, ही वस्तुस्थिति होती. त्या सर्व परकीय व्यापारी कंपन्यांहून इंग्रज वरचढ ठरले; हिंदुस्थानांत ब्रिटिशांच्या राज्याची स्थापना झाली आणि ह्या घटनेबरोबरच हिंदुस्थानच्या आर्थिक अवनतीस प्रारंभ झाला.

हिंदुस्थानांत १८५८ सालपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीचें राज्य होतें. त्यानंतर हिंदुस्थानावर ब्रिटिश बादशहाचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. परंतु, आर्थिक दृष्टीने पाहतां ह्या दोन्ही प्रकारच्या वहिवाटींनी हिंदुस्थानाची आर्थिक पिळवणूक करण्याचें धोरणच अंगिकारलेलें होतें, असें दिसतें. ईस्ट इंडिया कंपनी व्यापारी पेढी असल्यामुळे तिचें व्यापार व आर्थिक नफा यांत स्वाभाविकपणेंच अधिक लक्ष होतें. राज्यावर सत्ता मिळविल्यानंतरहि राज्याचा उपयोग कंपनीच्या व ब्रिटिश जनतेच्या हितासाठीच केला गेला. इ. स. १८१३ पर्यंत हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची सनद ब्रिटिश पार्लमेंटने दिलेली होती. या काळावधींत कंपनीने हिंदुस्थानांत मुक्त हस्ताने ‘ लुटालूट ’ केली. आणि हिंदुस्थानच्या ग्रामीण जनतेची पायमल्ली केली. सुरुवातीस कंपनीने हिंदुस्थानांतून सुती कापड आणि कलाकौशल्याच्या इतर वस्तू यांची निर्यात केली. हिंदी सुती कापड इंग्लंडांतील प्रजेला अतिशय आवडत असे. परंतु, त्यामुळें इंग्लंडांत नव्यानेच सुरू झालेल्या कापडाच्या उद्योगधंद्यास धोका पोचण्याची शक्यता होती. इ. स. १८१३ पर्यंत इंग्लंडांत हिंदुस्थानचें सुती कापड इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या

कापडापेक्षा ५० ते ६० टक्के कमी भावाने विकतां येत असे. त्यामुळे ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानच्या कापडावर ७० ते ८० टक्के जकात लादून इंग्लंडमधील भांडवलदारांच्या हितांचें संरक्षण केलें. जर असें केलें नसतें तर मँचेस्टरच्या कापडाच्या गिरण्यांना सुरवातीसच टाळीं ठोकावीं लागलीं असतीं. ह्यापूर्वीहि इ. स. १७०० ते १७२० मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कायदे पास करून हिंदुस्थानांतून आयात होणाऱ्या सुती आणि रेशमी कापडावर निर्बंध लादले होते. त्यामुळे कंपनी तो माल दुसऱ्या देशांत नेऊन विकत असे. १८ व्या शतकापर्यंत जगांतील सगळ्या देशांचें, सुती कापडाच्या उत्पादनाच्या बाबतींत, हिंदुस्थान हें केंद्र होतें.

कंपनीने हिंदुस्थानांत बंगालमध्ये राज्यें जिंकल्यावर आर्थिक लुटालूट चालविली होती. राजेमहाराजे यांचेकडून सक्तीने बक्षिसें मिळविणें, नजराणे उपटणें, खेडवळांकडून जादा महसूल लुटणें, कारागिरांकडून कमी किंमतींत माल खरेदी करून तो प्रजेला जास्त किंमतींत विकणें, असे ह्या लुटालुटीचे अनेक प्रकार होते. एका अदमासानुसार इ. स. १७५७ ते १७८० या काळांत म्हणजे प्लासीच्या लढाईनंतर केवळ २३ वर्षांच्या अवधींत एकट्या बंगालमधून ३ कोटी ६० लक्ष रुपये इतकें द्रव्य इंग्लंडला नेलें गेलें. यालेरीज कंपनीचे नोकरदेखील पैसा मिळविण्यासाठी हिंदी प्रजेवर जुलूमजबरदस्ती करीत असत. विणकरांवर कंपनीसाठी उत्पादन करण्याची सक्ती करण्यांत येत असे; परंतु, तयार वस्तूंची किंमत त्यांच्या खर्चाइतकीदेखील देण्यांत येत नसे. कंपनीच्या या त्रासाला कंटाळून कित्येक विणकरांनी आपले अंगठे कापून टाकले होते. रेशमी आणि सुती कापडाचा धंदा बंगालमध्ये जवळजवळ जमीनदोस्त झाला. १७६२ सालीं बंगालचा नबाब मीर कासम याने कंपनीच्या गव्हर्नरास लिहिलेल्या पत्रांत अशी तक्रार केली होती की, "इंग्रज व्यापारी हिंदी लोकांना त्यांचा माल एकचतुर्थांश किंमतींत विकण्याची आणि आपला स्वतःचा एक रुपया किंमतीचा माल पांच रुपयांस खरेदी करण्याची सक्ती करीत आहेत आणि जे या अन्यायकारक देवाणघेवाणीस तयार होत नाहीत, त्यांना फटके मारण्यांत येतात किंवा कैद करण्यांत येतें." कंपनीच्या डायरेक्टरांनाहि ही गोष्ट ठाऊक होती. इ. स. १७६६ सालीं क्लाइव्हला पाठविलेल्या एका पत्रांत डायरेक्टर लिहितात:—
"आम्हांस असें समजलें आहे की, देशांतर्गत व्यापारांत कंपनीच्या नोकरांनी खाजगी रीतीने व्यापार करून जो अमाप पैसा मिळविलेला आहे तो इतक्या भयंकर अत्याचारांनी व अन्याय्य मार्गांनी मिळविला आहे की, त्याहून अधिक अन्याय व अत्याचार ह्यापूर्वी कोणत्याहि जमान्यांत, कोणत्याहि काळांत झालेले ऐकिवांत नाहीत."

## इंग्लंडांत औद्योगिक क्रांति आणि वसाहतींविषयीचें धोरण

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत आणि १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्लंडमध्ये कांही महत्त्वाचे यांत्रिक शोध लागले, आणि त्यामुळे आधुनिक उद्योगधंद्यांना प्रारंभ झाला.

या घटनेस "औद्योगिक क्रांति" असें म्हणतात. इंग्लंडांतील ह्या औद्योगिक क्रांतीने मानवी इतिहासांत परिवर्तन घडवून आणलें. परंतु, प्लासीच्या युद्धानंतर जो अमाप पैसा हिंदुस्थांनांतून मिळाला त्याचा औद्योगिक क्रांति यशस्वी करण्यास फार मोठा हातभार लागला. कित्येक जण तर असें मानतात की, औद्योगिक क्रांति हिंदुस्थानच्या लुटीमुळेच यशस्वी झाली. ह्या पैशाचा यांत्रिक शोधांच्या उत्तेजनासाठी व नवीन कारखाने उभारण्यासाठी उपयोग करण्यांत आला. क्रांतीमुळे इंग्लंडांतील उत्पादन कित्येक पटींनी वाढलें. उद्योगधंद्यांसाठी कच्चा माल मिळविण्याचा आणि पक्का माल विकण्याचा प्रश्न उभा राहिला. हा प्रश्न जर सुटला नसता तर इंग्लंडची आर्थिक प्रगति ताबडतोब खुंटली असती. औद्योगिक क्रांति यशस्वी होण्यासाठी वसाहतींची आवश्यकता असते. कच्चा माल पुरविणें व पक्का माल खरेदी करणें हें वसाहतींचें कार्य असतें. या नीतीमुळे वसाहतींचें आर्थिक शोषण होतें व त्या गरीब, धनहीन बनतात. परंतु, त्यांच्या जिवावर राज्यकर्ते गडगंज संपत्ति मिळवून बसतात व स्वतःची भरभराट साधतात. या नीतीस किंवा धोरणास 'वसाहतवादी' नीति म्हणून ओळखण्यांत येतें. इंग्लंडने आपल्या राजकीय सामर्थ्याच्या जोरावर ही नीति हिंदुस्थानास लागू केली. हिंदुस्थान देश इंग्लंडची एक वसाहती बाजारपेठ होऊन बसला.

इंग्लंडने वसाहतवादी धोरणाचा खूपच कडकपणें अंमल सुरू केला. आता हिंदुस्थानास सुती कापड तयार करण्याची गरजच उरली नाही. डायरेक्टरांनी असा हुकूम सोडला की, कापूस व रेशीम हीं हिंदुस्थानाने इंग्लंडला धाडावयाचीं व इंग्लंडचा पक्का माल हिंदुस्थानाने खरेदी करावयाचा. ब्रिटनमधून दरवर्षी यंत्रद्वारा बनलेला लक्षावधि रुपयांचा तयार माल हिंदुस्थानांत येऊं लागला. यांत्रिक मालाला दीर्घकाल टक्कर देण्याचें त्राण देशी हस्त-व्यवसायांत मुळीच नव्हतें. राज्यकर्त्यांकडून हस्त-व्यवसायांना कोणत्याच प्रकारचें संरक्षण देण्यांत आलें नाही. तसेंच, ते व्यवसाय स्पर्धेत टिकून राहावेत यासाठी कोणत्याहि प्रकारची मदतहि करण्यांत आली नाही. उलट, अर्थशास्त्रज्ञांनी खुल्या व्यापाराची तरफदारी केल्यामुळे व तो आता ब्रिटनला अधिक किफायतशीर असल्यामुळे, ब्रिटनला जें अनुकूल व फायदेशीर तें हिंदुस्थानच्याहि हिताचें असतेंच असें मानून ब्रिटिशांनी खुल्या व्यापाराचें धोरण अंगिकारलें. इ. स. १७८६ ते १७९० या काळांत सुती कापडाची आयात सरासरी १२ लक्ष पौंडांची होत असे; ती १८०९ सालीं १ कोटी ८४ लक्ष पौंडांची झाली. इ. स. १८१६–१७ सालीं हिंदुस्थानाने १ कोटी ६६ लक्ष रुपयांच्या कापडाची निर्यात केली होती. परंतु, १८४६–४७ च्या सुमारास हिंदुस्थानचा उद्योगधंदा नष्ट झाला होता व त्यामुळे कापडाची निर्यात संपूर्णपणें अशक्य झाली. उलट, ४ कोटी रुपयांचें कापड इंग्लंडांतून आयात झालें. हिंदुस्थानांत आयात होणारा सगळा माल ब्रिटिश जहाजांतूनच यावयास हवा, असा कायदा करण्यांत आला. परिणामीं, हिंदुस्थानांतील जहाजें बांधण्याचा धंदाहि बसला. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांना उतरती

कळा लागल्यामुळे शेतीवर उदरनिर्वाह करणारांची संख्या वाढली. हिंदुस्थान केवळ शेती–प्रधान देश बनला. १८ व्या शतकाच्या अखेरीस व्यापाराच्या घसरगुंडीस प्रारंभ झाला, ती घसरगुंडी १९ व्या शतकाच्या मध्यास पूर्ण झाली.

## आधुनिक उद्योगधंद्यांची सुरुवात

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत हिंदुस्थानांत आधुनिक उद्योगांची स्थापना होऊं लागली. सुरुवातीस इंग्रजांनी बागायती उद्योगधंदे व खनिजें यांवर आपलें लक्ष केंद्रित केलें. तागाचें उत्पादन, तागाच्या गिरण्या, चहाकॉफीचे मळे, कोळशाच्या खाणी वगैरे धंद्यांत इंग्रजांनी आपलें भांडवल गुंतवलें होतें. कापडाच्या गिरण्याहि सुरू झाल्या. मुंबईत पहिली कापडाची गिरणी १८५४ सालीं सुरू झाली. त्यानंतर मुंबई व बंगालमध्ये मिळून एकूण १५ गिरण्या सुरू झाल्या. या सुमारास हिंदी सरकारने पैसे मिळविण्यासाठी सुतावर ३॥ टक्के व सुती कापडावर ५ टक्के आयात–कर लादला होता. परंतु, लँकेशायर आणि मँचेस्टर येथील उद्योगपतींनी या आयात–कराबद्दल आपला असंतोष व्यक्त केला व त्यांनी अशी तक्रार केली की, या जकातीमुळे हिंदी उद्योगधंद्यांस कृत्रिम संरक्षण मिळत असून, ही जकात त्वरित रद्द व्हावयास हवी. हिंदुस्थानचा तत्कालीन गव्हर्नर जनरल् लॉर्ड नॉर्थब्रुक याने असा खुलासा केला की, सरकारचें उत्पन्न वाढविण्यासाठी सरकारास त्या जकातीची जरूरी आहे. इ. स. १८७५ सालीं लॉर्ड नॉर्थब्रुकला राजिनामा देणें भाग पडलें आणि त्याच्या जागीं आलेल्या साम्राज्यवादी दृष्टिकोणाच्या लॉर्ड लिटनने इ. स. १८७७ सालीं ती आयात–जकात रद्द केली. अशा प्रकारें इंग्रज भांडवलदारांचा विजय झाला. फिरून इ. स. १८९४ सालीं आर्थिक टंचाईच्या कारणाखातर आयात–कर लादण्याची जरूरी उत्पन्न झाली. तेव्हा हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या कापडावरहि एवढीच जकात लादली. १८ व्या शतकांत इंग्लंडने 'संरक्षक व्यापारा'चें तत्त्व अंगिकारलें तेव्हाहि हिंदुस्थानचें अहित झालें व त्या धोरणाचे दुष्परिणाम हिंदी उद्योगधंद्यांना सोसावे लागले. १९ व्या शतकांत 'खुल्या व्यापारा'च्या धोरणामुळेहि हिंदी उद्योगधंद्यांना झळ सोसावी लागली. हिंदुस्थानचें आर्थिक धोरण ब्रिटिशांच्या हिताच्या दृष्टिकोणांतूनच आखण्यांत येत असे त्यामुळे ज्यांत ब्रिटनचें हित समाविष्ट आहे त्यांत न्यायाची आशा बाळगणें व्यर्थ आहे, अशी जनतेची खात्री झाली.

## राष्ट्रवादाची भावना :– उद्योगधंद्यांना उत्तेजन

हिंदुस्थानांत राष्ट्रभावनेचा उदय झालेला होता. परिणामीं, हिंदी उद्योगपति आधुनिक उद्योगधंद्यांची स्थापना करीत होते. २० व्या शतकाच्या सुरुवातीस 'स्वदेशी'च्या चळवळीमुळे देशी उद्योगधंद्यांना खूपच प्रोत्साहन मिळालें होतें. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यांत आला आणि हिंदी लोकांनी केवळ स्वदेशी वस्तूच खरीदण्याची प्रतिज्ञा

केली. त्यामुळे कित्येक महत्त्वाचे, प्रमुख उद्योगधंदेहि हिंदुस्थानांत सुरू झाले. श्री. जमशेटजी टाटांसारख्या धाडसी उद्योगपतींनी लोखंड व पोलादाच्या कारखान्यांची पायाभरणी केली. कापड-गिरण्यांची संख्या वाढली. आधुनिक बँका स्थापन झाल्या. त्यांनी उद्योगधंद्यांना आर्थिक मदत दिली. कागद व चामडें यांचे उद्योगधंदेहि सुरू झाले. परदेशांशीं असलेल्या आपल्या व्यापारावरहि ह्या औद्योगीकरणाचा परिणाम झाला. इ. स. १८७९ सालीं हिंदुस्थानांतून तयार मालाची निर्यात ८ टक्के इतकी होत असे ती १९१७-१८ मध्ये २२ टक्क्यांइतकी झाली. आणि त्याच काळावधींत यंत्रोत्पादित तयार मालाची आयात ६५ टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत घटली. असें असलें तरीहि उद्योगधंद्यांचें प्रमाण जोरदार नव्हतें. १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने मध्यवर्ती सरकारांत व्यापार व उद्योगधंदे यांचें खातें निर्माण केलें आणि मद्रास राज्यांतहि तसेंच खातें १९०८ मध्ये स्थापलें गेलें. इतर प्रांतांनीहि अशीच इच्छा प्रदर्शित केली होती. सरकारने उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी सक्रिय उपाय योजावेत, अशी जनतेचीहि इच्छा होती. परंतु, ह्या गोष्टी इंग्लंडमध्ये पोचतांच तेथील उद्योगपति आणि भांडवलदार यांनी खळबळ उडविली आणि तावडतोब भारतमंत्री लॉर्ड मोर्ले यांनी १९१० सालीं हिंदी सरकारास एक परिपत्रक पाठवून अशी समज दिली की, उद्योगधंद्यांच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारचें धोरण तटस्थतेचें असावें म्हणजे त्या बाबतींत सरकारने ढवळाढवळ करूं नये. मात्र औद्योगिक शिक्षण व माहिती देण्याचें काम सरकारला करतां येईल. तथापि, औद्योगिक विकास साधण्याचें कार्य सरकारचें नसून खासगी भांडवलदारांचें आहे. १९ व्या शतकाच्या अनिर्बंध अर्थव्यवस्थेच्या तत्त्वांवर आपला विश्वास असल्याचें सरकारने जाहीर केलें. कारण ती नीति इंग्लंडच्या हितास पोषक होती. सदरहू अर्थव्यवस्थेचीं तत्त्वें जुनींपुराणीं झालेलीं असल्यामुळे इतर देशांना तीं अमान्य होतीं.

## औद्योगिक कमिशनची नेमणूक

वरील धोरणाचा परिणाम असा झाला की, पहिल्या महायुद्धाच्या काळांत हिंदुस्थान औद्योगिक दृष्ट्या इतर देशांच्या मानाने खूपच मागे पडला; इतका की, खिळे, चुका, स्क्रू, तारा असल्या लहानसहान वस्तूंसाठीहि त्यास परदेशांचे तोंडाकडे बघावें लागत असे. तेव्हा ब्रिटिश सरकारच्या असें ध्यानांत आलें की, औद्योगिक दृष्ट्या हिंदुस्थानांत सुधारणा घडवून आणल्यास हिंदुस्थानचा खूपच उपयोग महायुद्धाच्या कामांत करून घेतां येईल. पूर्वेकडील देशांशीं युद्ध करण्यासाठी हिंदुस्थानची मदत आवश्यक होती. म्हणून याबाबतींत सविस्तर चौकशी करून योग्य त्या शिफारसी करण्यासाठी इ. स. १९१६ मध्ये एक औद्योगिक कमिशन नेमण्यांत आलें. कमिशनने आपला अहवाल १९१८ सालीं सरकारास सादर केला. हिंदुस्थान सरकारने उद्योगधंद्यांना सक्रिय उत्तेजन देण्यासाठी उपाय योजावेत, अशी शिफारस त्या अहवालांत

करण्यांत आलेली होती. मुख्य शिफारसी अशा होत्या—उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी केंद्रसरकारांत तसेंच प्रांतिक सरकारांत व्यापार-उद्योग खातीं स्थापावींत; वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था करावी; मालाच्या खरेदीचें सरकारी धोरण निश्चित करावें; तांत्रिक व आर्थिक मदत द्यावी तसेंच वाहनांच्या, दळणवळणाच्या सोयी उद्योगधंद्यांना उपलब्ध करून द्याव्यात. या शिफारसी सर्वस्वीं साध्यासुध्या व नेमस्त होत्या, तरीदेखील युद्ध संपल्यावर त्यांचेकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. तथापि, हिंदुस्थानांतील उद्योगपति देशांत आधुनिक यांत्रिक उद्योगधंदे उभारण्यास उत्सुक झालेले होते. राष्ट्रवादाची भावना प्रबर बनली होती आणि संरक्षणात्मक धोरण स्वीकारूनहि उद्योगधंदे स्थापन करावेत, अशी मागणी पुढे मांडण्यांत आली. १९१९ सालीं राजकीय सुधारणांचा कायदा पास करण्यांत आला आणि अंशतः जबाबदार राज्यपद्धति अंमलांत आली. आर्थिक क्षेत्रांतहि उद्योगपतींची मागणी पुरी करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. व्यापार-उद्योगधंदे-खातें प्रांतिक सरकारांत लोकनियुक्त प्रधानांवर सोपविण्यांत आलें होतें. त्यामुळेहि उद्योगधंद्यांच्या विकासासाठी सोयीसवलती देण्याची आवश्यकता होती. सरतेशेवटीं भारतमंत्र्यांनी असें जाहीर केलें की, हिंदुस्थान सरकार व हिंदी कायदेमंडळ या उभयतांचें जर उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याच्या प्रश्नाचे बाबतींत एकमत झालें तर ब्रिटिश सरकार त्यांत कोणत्याहि प्रकारें लुडबूड करणार नाही. या धोरणानुसार १९२१ सालीं फिस्कल कमिशन नेमण्यांत आलें.

## संरक्षक व्यापाराचें धोरण आणि औद्योगिक विकास

फिस्कल कमिशनने आपल्या अहवालांत हिंदुस्थानच्या औद्योगिक विकासासाठी संरक्षणात्मक धोरणाची जरूरी आहे, हें मान्य केलें. परंतु, त्यासाठी कांही कडक अटीदेखील सुचविल्या होत्या. त्या अटी पाळणाऱ्या उद्योगधंद्यांनाच संरक्षण द्यावयाचें, अशी सूचना कमिशनने केली होती. अमेरिका, जर्मनी किंवा इतर कोणत्याहि देशांत औद्योगिक विकासासाठी अशा कडक अटी घालण्यांत आलेल्या नव्हत्या. जर त्या अटींचें खंबीरपणाने पालन झालें असतें तर हिंदुस्थानचा औद्योगिक विकास होणें अशक्य बनलें असतें. अशा पक्षपाती धोरणाला देशांतील पुढारी व उद्योगपति यांनी विरोध केला. इ. स. १९२३ सालीं टॅरिफ् बोर्ड नेमण्यांत आलें व त्याच्या शिफारसींनुसार लोखंड व पोलादाच्या उद्योगधंद्याला आणि सुती कापड, कागद, साखर इत्यादि वस्तूंच्या उत्पादक उद्योगधंद्यांना संरक्षण देण्यांत आलें. परिणामीं, थोडक्या अवधींतच ह्या उद्योगधंद्यांचा झपाट्याने विकास झाला. जगांतील आठ प्रमुख औद्योगिक देशांत हिंदुस्थानची गणना होऊं लागली. असें झालें तरीहि खऱ्या अर्थाने एक औद्योगिक देश म्हणून हिंदुस्थानास संबोधतां येत नव्हतें. हिंदुस्थानांत भारी व मूलभूत उद्योगधंदे तसेंच महत्त्वाचे उद्योगधंदे स्थापले गेले नव्हते. मात्र जवळजवळ १५ लाख मजूर मोठ्या कारखान्यांतून काम करीत होते. मोटारी, हत्यारें,

जहाजें, विमानें व रसायनें बनविण्याचे कारखाने येथे सुरू झाले नव्हते आणि जेव्हा कांही धाडसी उद्योगपतींनी ते चालू करण्याची इच्छा प्रदर्शित केली तेव्हा सरकारने त्यांना मदत नाकारली.

१९३२ सालीं ओटावा करार करून इंग्लंडच्या राजास पसंत असलेली नीति हिंदुस्थानच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापाराचे बाबतींत अंगिकारण्यांत आली. तिच्यामुळेहि हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालें. १९३६ सालीं हिंदुस्थानच्या वरिष्ठ कायदेमंडळाने, सदरहू कराराची मुदत वाढवूं नये, असा ठराव पास केला. परंतु, गव्हर्नर जनरलने आपल्या विशेष अधिकाराचा उपयोग करून तो करार चालूंच ठेविला. त्यामुळे हिंदुस्थानास आर्थिक झीज सोसावी लागली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेंतील दोष फिरून उघड झाले. कारखान्यांतल्या उत्पादनासाठी आवश्यक तीं सामान्य रसायनें किंवा रंग यांचेसाठीहि हिंदुस्थानास परदेशावर अवलंबून राहावें लागत असे. युद्धामुळे ह्या वस्तूंची आयात बंद झाल्याकारणाने कारखाने चालविण्याचें काम कठीण झालें. भारी उद्योगधंद्यांच्या अभावीं युद्धकार्यांत हिंदुस्थानास आपला योग्य तो वांटा उचलतां आला नाही. तरीदेखील अवजड उद्योगधंद्यांची स्थापना करण्यास सरकार खूष नव्हतें. त्यामुळे लोकांची पूर्णपणें खात्री झाली की, देश जर स्वतंत्र झाला तरच त्याचा आर्थिक विकास योग्य रीतीने होऊं शकेल.

## स्वातंत्र्य-प्राप्ति आणि आर्थिक पुनर्रचना

दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थानच्या राजकीय नकाशांत झपाट्याने फेरबदल घडून आल. ब्रिटिश मंत्रिमंडळाची योजना निष्फळ ठरल्यावर लॉर्ड मौंटबॅटन यांची योजना हिंदी राष्ट्रीय सभेने हो ना करीत करीत स्वीकारली. १५ ऑगस्ट, १९४७ या दिवशीं हिंदुस्थानची दोन छकलें होऊन भारत आणि पाकिस्तान अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें जन्मास आलीं. हिंदुस्थानची फाळणी आर्थिक दृष्टया दोन्ही देशांना हानिकारक होती. कारण आर्थिक दृष्टया हिंदुस्थान हा एकसंध देश होता. फाळणीमुळे दोन्ही देशांची अर्थव्यवस्था परस्परावलंबी बनली. पाकिस्तानांत मोठे कालवे असलेला सुपीक प्रदेश जास्त होता. कापूस व ताग यांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर पाकिस्तानांत होत असे. परंतु, कापडाच्या व तागाच्या गिरण्या हिंदुस्थानांतल्या प्रदेशांत आल्या होत्या. आर्थिक क्षेत्रांत उभय देशांनी परस्परांशीं सहकार्य करणें जरूरीचें होतें. परंतु, राजकीय कारणांमुळे असें सहकार्य होऊं शकलें नाही. परिणामीं, दोन्ही देशांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावें लागलें.

असें झालें तरीदेखील हिंदी प्रजेच्या मनांत आशेचें व उत्साहाचें वारें खेळूं लागलें.

आपल्या देशाचा भविष्यकाळ घडविण्याचें कार्य आता आपल्याच हातीं येऊन पडलें. हिंदुस्थान जगांतील एक महान् राष्ट्र म्हणून प्रतिष्ठेचें स्थान मिळविण्यासाठी जन्माला आला आहे, हें सिद्ध करण्याची धमक हिंदी प्रजेचे ठिकाणीं निर्माण झाली. भूतकाळांत हिंदुस्थानाविषयी असें म्हटलें जात असे की, ' हिंदुस्थान हा समृद्ध देश आहे, परंतु त्यांत राहणारे लोक गरीब आहेत." हिंदुस्थानासारख्या समृद्ध देशाच्या नागरिकांचें जीवन समृद्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. हे मनोरथ पूर्ण करण्यासाठी भारताने नियोजनाची कांस धरली.

## नियोजनाच्या मार्गावर

नियोजनाच्या मार्गाने हिंदुस्थानचा आर्थिक विकास साधण्याचा विचार कांही सर्वस्वीं नवीन नव्हता. इ. स. १९३४ सालीं प्रसिद्ध इंजिनिअर व राजनीतिकुशल सर विश्वेश्वरैय्या यांनी हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाची योजना तयार केली होती. आणि त्यांनी देशास पुढील मंत्र दिला होता:–" एकतर देशाचें औद्योगीकरण करा, नाहीतर नष्ट व्हा." जेव्हा रशियांत साम्यवादी क्रांति झाली तेव्हा तो अतिशय मागासलेला देश होता. परंतु नियोजनात्मक अर्थव्यवस्थेच्या द्वारे रशियाने केलेल्या अपूर्व प्रगतीने हिंदुस्थानचे नेते भारावून गेले होते व त्यामुळे १९३८ सालीं बाबू सुभाषचंद्र बोस काँग्रेसचे अध्यक्ष असतांना काँग्रेसने हिंदुस्थानच्या विकासाची योजना तयार करण्यासाठी एक समिति नेमली होती. पंडित जवाहरलाल नेहरू त्या समितीचे अध्यक्ष होते आणि विख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रो. के. टी. शाह तिचे चिटणीस होते. दुसऱ्या महायुद्धामुळे सदरहू समिति आपलें कार्य पुरें करूं शकली नाही. १९४३ सालीं हिंदुस्थानांतील आठ अग्रगण्य उद्योगपतींनी हिंदुस्थानच्या विकासासाठी एक योजना जाहीर केली. ती ' मुंबई योजना ' या नांवाने ओळखली जाते. या योजनेंत विशेषतः पायाभूत उद्योगधंद्यांना सर्वाधिक महत्त्व ( Top priority ) देण्यांत आलें होतें. एकूण १५ वर्षांची योजना होती आणि तींत, शेतीच्या उत्पन्नांत १३० टक्क्यांनी वाढ करण्यांत यावी आणि औद्योगिक उत्पादनांत ५०० टक्क्यांची वाढ करण्यांत यावी, असें सुचविण्यांत आलें होतें. दरडोई वार्षिक उत्पन्न ६५ रुपयांचें १३० रुपये करण्याचा उद्देश होता. योजनेस १० हजार कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज होता. श्री. एम्. एन्. रॉय यांनी १५ हजार कोटींची दशवार्षिक योजना सादर केली होती. तींत शेतीचें उत्पादन व गरजेच्या वस्तूंचें उत्पादन यांना महत्त्व देण्यांत आलें होतें. एक गांधीवादी योजनाहि श्री. अग्रवालांनी तयार केली होती. तिच्यांत विकेंद्रित अर्थव्यवस्था, स्वावलंबी खेडीं आणि घरगुती उद्योगधंदे यांना महत्त्व देण्यांत आलें होतें.

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारने देशाच्या आर्थिक पुनर्घटनेचें काम सुरू केलें आणि दूरदर्शीपणाने विचार करून भाकरा नांगल,

दामोदर व्हॅली ह्यांसारख्या, अनेक उद्दिष्टें साध्य करणाऱ्या, योजना सुरू केल्या. परंतु, लवकरच असें जाणवूं लागलें की, देशाच्या मर्यादित साधनांचा कार्यक्षमतेने उपयोग करण्यासाठी आणि व्यवस्थितपणें योजनापूर्वक आर्थिक विकास साधण्यासाठी अधिक व्यापक व समावेशक (Comprehensive) योजना तयार करण्याची जरूरी आहे. त्यामुळे १९५० सालच्या मार्च महिन्यांत पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची नेमणूक करण्यांत आली. नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा (draft) १९५१ सालच्या जुलै महिन्यांत तयार केला. १९५२ सालच्या डिसेंबरांत योजनेस अंतिम, निर्णायक स्वरूप देण्यांत आलें. तथापि, पहिली पंचवार्षिक योजना त्यापूर्वींच म्हणजे एप्रिल १९५१ मध्येच अंमलांत आलेली होती.

## पहिली पंचवार्षिक योजना

भारताच्या विकासासाठी आपल्या घटनेंतच योग्य मार्गदर्शन करण्यांत आलें आहे. सामान्य जनतेचें राहणीमान सुधारणें, तिच्यासाठी रोजगारीचीं साधनें निर्माण करणें, हस्तव्यवसाय, छोटे उद्योगधंदे आणि घरगुती उद्योगधंदे यांना उत्तेजन देणें, आर्थिक समानता स्थापण्यासाठी प्रयत्न करणें, संपत्ति व आर्थिक सत्ता यांचें होणारें केंद्रीकरण रोखून धरणें, इत्यादि तत्त्वें घटना बनविणाऱ्यांनी स्वीकारलेलीं आहेत. हीं तत्त्वें डोळयांसमोर ठेवून आपली पहिली पंचवार्षिक योजना आखण्यांत आली होती.

कोणत्याहि मागासलेल्या देशाच्या आर्थिक विकासांत अनंत अडचणी असतात. भांडवलाची गुंतवणूक व भांडवलाची पैदास ह्या दोन्ही गोष्टी आर्थिक प्रगतीस आधारभूत असतात. परंतु, बहुसंख्य प्रजा गरीब असल्यामुळे त्यांची बचतशक्ति अतिशय दुबळी असते. त्यांच्या प्राप्तींत सुरुवातीस थोडीशी जरी वाढ झाली तरीदेखील पैशाची बचत करणें त्यांना कठीण होतें. कारण उत्पन्न वाढल्याबरोबर त्यांच्या गरजाहि वाढतात. आणि त्यामुळे आर्थिक प्रगति अतिशय सावकाशीने होते. जर परदेशाची आर्थिक मदत मिळाली तर प्रगति झपाट्याने होते. परंतु, आपल्या तटस्थतेच्या धोरणाबाबत सुरुवातीस अमेरिकेचा गैरसमज झाल्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणावर मदत मिळूं शकली नाही. महायुद्धाच्या काळांत ब्रिटनकडे आपली जवळजवळ १६०० कोटींची स्टर्लिंग गंगाजळी जमा झाली होती. परंतु, तिचा उपयोगहि मर्यादित प्रमाणांत करण्याची सवलत मिळाली. या कारणांमुळें पहिली पंचवार्षिक योजना व्यापविस्ताराने मध्यम होती.

भावी काळांत झपाट्याने आर्थिक विकास साधण्यासाठी त्यास पायाभूत असलेल्या शेतीची समृद्धि करावयाची हा पहिल्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश होता. आणि अशा प्रकारें, अन्नाचा प्रश्न सोडवून देशांत आर्थिक स्थिरता स्थापण्याचा हेतु होता. उत्पादन वाढवावयाचें आणि प्राप्तींतील विषमता कमी करावयाची हीं देखील योजनेचीं ध्येयें होतीं.

योजनेच्या साह्याने लोकांच्या राहणीमानांत थोडी सुधारणा करण्याचाहि इरादा होता. १९४८ सालीं सरकारने जाहीर केलेल्या संमिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणानुसार देशाच्या प्रगतीसाठी खासगी भांडवलदार व खुलें क्षेत्र यांच्या सहकार्यानें कार्य करावयाचें होतें. कोळशाच्या खाणी, लोखंड, पोलाद, खनिज तेलें, जहाजें, विमानें, टेलिफोनच्या तारा इत्यादि अवजड व मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासाची जबाबदारी सरकारने आपल्या शिरावर घेतली होती.

सुरुवातीस योजनेचा खर्च २०६९ कोटी रुपये अंदाजण्यांत आला होता. बेकारीच्या प्रश्नानं तीव्र स्वरूप धारण केल्यामुळे योजनेचा विस्तार वाढवून तो २३७८ कोटी रुपये करण्यांत आला. खर्चाची तरतूद खालीलप्रमाणे करण्यांत आलेली होती.

| | कोटी रु. | टक्के |
|---|---|---|
| १ शेती आणि सामूहिक विकास-योजना | ३५४ | १४·९ |
| २ पाणी-पुरवठा आणि विद्युत् योजना | ६४७ | २७·२ |
| ३ उद्योगधंदे, खाणी इ० | १८८ | ७·९ |
| ४ वाहतूक आणि दळणवळण | ५७१ | २४·० |
| ५. समाज-कल्याण योजना | ५३२ | २२·४ |
| ६ इतर किरकोळ खर्च | ८७ | ३·६ |
| | २३७८ | १००·०० |

अशा प्रकारें शेती व पाणी पुरवठ्याच्या योजना यांचेसाठी १००१ कोटी रुपये ( ४२·१ टक्के ) खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. आणि या दोन योजनांना सर्वांत अधिक महत्त्व देण्यांत आलें होतें, तें योग्यच होतें. विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेंत औद्योगीकरणासाठी अन्न व कच्चा माल यांचें उत्पादन वाढविणें आवश्यक असतें. शेतीच्या समृद्धतेमुळे अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत बनतो. परंतु, प्रत्यक्षांत योजनेवर एकूण खर्च सुमारें १९६० कोटी रुपयेच होऊं शकला.

## पहिल्या पंचवार्षिक योजनेचें यश

हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यांत पहिली पंचवार्षिक योजना यशस्वी झाली. तसेंच आर्थिक स्थिति सुधारण्यास सुरुवात झाली. अर्थव्यवस्थेस अधिक बळकटी व स्थिरता प्राप्त झाली. आर्थिक विकासासाठी जनतेंत आशावादी वातावरण निर्माण झालें.

पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राष्ट्रीय उत्पन्नांत १८ टक्क्यांनी वाढ झाली. स्थिर किंमतींच्या दृष्टीने हिशेब करतां असें आढळतें की, १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्न

९,११० कोटी रुपये होतें, तें १९५५-'५६ मध्ये १०,८०० कोटी रुपयांइतकें वाढलें. परंतु, लोकसंख्या वाढल्यामुळे दरडोई वार्षिक उत्पन्न फक्त ११ टक्क्यांनीच वाढलें (२५४ रु. चें २८१ रु. झालें). गरजेच्या वस्तूंवर ९१ टक्के अधिक खर्च झाला. अन्नधान्याचें उत्पादन २० टक्क्यांनी, कापसाचें उत्पन्न ४५ टक्क्यांनी व तेलबियांचें उत्पन्न ८ टक्क्यांनी वाढलें. अन्नधान्याच्या बाबतींत हिंदुस्थान जवळजवळ स्वावलंबी बनला. १९५०–५१ मध्ये अन्नधान्याचें उत्पादन ५ कोटी टन होतें, तें वाढून ६·५ कोटी टन झालें. ६० लाख एकर जमिनीस पाणी–पुरवठ्याच्या मोठ्या योजनांचा फायदा मिळाला व १ कोटी एकर जमिनींत पाणी–पुरवठ्याच्या छोट्या योजना पुऱ्या झाल्या. विजेचें उत्पादन ११ लाख किलोवॅट इतकें वाढलें. ४० ते ५० लाख कामगारांना रोजगारीचीं साधनें उपलब्ध झालीं.

औद्योगिक उत्पादनांतहि स्थिरगतीने वाढ होत राहिली आणि योजनेच्या अखेरीस औद्योगिक उत्पादनांत ४० टक्के वाढ झाली. खुल्या क्षेत्रांत कांही अवजड उद्योगधंदे स्थापण्याचें प्राथमिक कार्य पुरें झालें. त्यांत लोखंड-पोलादाच्या तीन प्रचंड कारखान्यांचाहि समावेश होतो. कापड व सिमेंटच्या उत्पादनांतहि लक्षणीय वाढ झाली. वाहनूक–दळणवळण या क्षेत्रांतदेखील ३८० मैल लांबीचे नवे रेल्वेमार्ग सुरू करण्यांत आले आणि ४३० मैल लांबीचे जुने रेल्वे-मार्ग पुनः चालू करण्यांत आले. भाकरा नांगल, दामोदर व्हॅली, हिराकुड धरण, कोसी योजना, नागार्जुन सागर-योजना आणि मुंबई राज्यांतील कोयना योजना इत्यादि योजनांचे पाठीमागेच सगळा खर्च करण्यांत आला. त्या योजनांच्या कार्यांत बरीच प्रगति झाली. ह्यांखेरीज सिंद्रीचा रासायनिक खतांचा कारखाना, चित्तरंजनचा रेल्वे-इंजिनांचा कारखाना, पेरॅम्बुर येथील रेल्वेच्या वाघिणी बनविण्याचा कारखाना, पिंपरीचा कारखाना, विशाखापट्टमचा जहाजें बांधण्याचा कारखाना, बंगळूर येथील विमानें बांधण्याचा कारखाना, तसेंच तेथील यांत्रिक हत्यारांचा, उपकरणांचा कारखाना, रूपनारायणपूर येथील केबल व टेलिफोनचा कारखाना, इत्यादि कारखाने स्थापण्यांत आले. रासायनिक खतें, पेनिसिलिन, आणि केबल-टेलिफोन यांच्या कारखान्यांनी आपापलीं लक्ष्यें पहिल्या पंचवार्षिक योजनेंतच ओलांडलीं आहेत.

भारत-अमेरिका तांत्रिक सहकार्याच्या करारानुसार १९५२ सालच्या ऑक्टोबर महिन्यापासून सामूहिक विकास योजनेचा कार्यक्रम हिंदुस्थानांतील खेड्यापाड्यांतून सुरु करण्यांत आला.

पहिल्या योजनेंत विकास कार्यक्रमांसाठी ९० कोटी रुपये मंजूर करण्यांत आले होते. परंतु, योजनेच्या अखेरीस फक्त ४६ कोटी रुपये खर्च झाले. पहिल्या योजनेच्या काळांत विकास केंद्रें व राष्ट्रीय विस्ताराचें (National Extension Service) कार्य १ लक्ष ४० हजार खेडीं सामावून घेणाऱ्या ९८८ विकास-गटांत सुरु झालें होतें. त्याचा ७ कोटी ७५ लक्ष

लोकांनी फायदा घेतला. या विस्तारकार्यक्रमांत शेती-सुधारणा, ग्रामोद्योग, पशुपालन, आरोग्य, शिक्षण, सामाजिक कल्याण, छोट्या उद्योगधंद्यांचा विकास, युवकसंघ, स्त्रीशिक्षण इत्यादि बाबतींतील कार्य खेडुतांच्या साह्याने पार पाडण्यांत येत असे. ह्या कार्यक्रमांमुळे ग्रामीण जनतेंत नवचैतन्य खेळूं लागलें आणि त्यामुळे अपूर्व उत्साहाने या कार्यक्रमांच्या यशःसिद्धीसाठी प्रयत्न केले गेले.

## दुसरी पंचवार्षिक योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या यशस्वितेमुळे उत्साहित होऊन दुसरी पंचवार्षिक योजना अधिक महत्त्वाकांक्षी आखण्यांत आली. १९५६ सालच्या एप्रिल महिन्यापासून ती अंमलांत आली. या योजनेचीं मुख्य उद्दिष्टें अशीं :—

( १ ) उच्च राहणीमान प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नांत लक्षणीय वाढ साधणें • ( २ ) भारी म्हणजे अवजड व पायाभूत म्हणजे मूलभूत उद्योगधंद्यांना महत्त्व देऊन झपाट्याने औद्योगिक विकास साधणें ( ३ ) रोजगारीच्या साधनांची वाढ करणें ( ४ ) उत्पन्न व संपत्ति याबाबतींतील विषमता कमी करून आर्थिक समानता स्थापन करणें. देशांत समाजवादी समाजरचना स्थापण्याचाहि निर्णय घेण्यांत आला होता. हीं उद्दिष्टें डोळ्यांसमोर ठेवून द्वितीय पंचवार्षिक योजना मुक्रर करण्यांत आली होती. हीं सारीं उद्दिष्टें परस्परांशीं निगडित आहेत.

पुढे दर्शविल्याप्रमाणे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खुल्या क्षेत्रांत ४८०० कोटी रुपयांचा खर्च नक्की करण्यांत आला. त्याखेरीज २४०० कोटी रुपयांचा खर्च खासगी क्षेत्राचे बाबतींत अंदाजण्यांत आला होता.

| | कोटी रु. | टक्के |
|---|---|---|
| १ शेती आणि सामूहिक योजना | ५६८ | ११·८ |
| २ पाणी-पुरवठा, पाटबंधारे व विद्युत्-योजना | ९१३ | १९·० |
| ३ उद्योगधंदे आणि खाणी | ८९० | १८·५ |
| ४ वाहतूक व दळणवळण | १३८५ | २८·९ |
| ५ सामाजिक कल्याण—योजना | ९४५ | १९·७ |
| ६ इतर किरकोळ खर्च | ९९ | २·१ |
| | ४८०० | १००·०० |

## पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांची परस्पर-तुलना

पहिल्या योजनेंत शेतीला प्राधान्य देण्यांत आलें होतें. अन्नधान्याची टंचाई व उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा, या उणिवांमुळे शेतीस प्राधान्य

दिलें गेलें तें योग्यच झालें. परंतु या उणिवा कांही प्रमाणांत घटल्यामुळे उद्योगधंद्यांना प्राधान्य देऊन झपाट्याने आर्थिक विकास साधणें हें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें लक्ष्य बनलें. त्यामुळेच पहिल्या पंचवार्षिक योजनेंत एकूण खर्चाच्या केवळ ८ टक्के उद्योगधंद्यांसाठी खर्च करण्याचें नक्की करण्यांत आलें होतें, तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १८·५ टक्के खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें. त्याचबरोबर शेतीच्या उद्योगावरील खर्चाचें प्रमाण ४२ टक्क्यांवरून कमी करण्यांत येऊन तें ३१ टक्क्यांइतकें निश्चित करण्यांत आलें. पहिल्या योजनेंत मोठे उद्योगधंदे, शास्त्रीय संशोधन, खाणी यांसाठी केवळ ६० कोटी रुपये खर्च झाले. तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत त्याच गोष्टींसाठी ६९० कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. याखेरीज खासगी क्षेत्रांतहि उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी ५७५ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तसेंच २०० कोटी रुपये ग्रामोद्योग आणि छोटे उद्योगधंदे यांच्या विकासासाठी खर्च करण्यांत येणार आहेत. अवजड व मोठ्या उद्योगधंद्यांना देण्यांत आलेलें महत्त्व योग्यच आहे. कारण त्यांच्यामुळेच देशाची आर्थिक प्रगति त्वरेने साधतां येईल आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत होऊं शकेल. आर्थिक विकासामुळे दळणवळण व वाहतूक यांच्या सुखसोयींची आवश्यकता उत्पन्न होते. त्या सोयीसवलतींचीहि व्यवस्था करण्यांत आलेली आहे. समाज-कल्याणाच्या योजनांमुळे गरीब जनतेचें हित होणार असून त्यांच्या जीवनांत आनंद व सुखसमृद्धि निर्माण होणार आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राष्ट्रीय उत्पन्नांत २५ टक्क्यांनी वाढ होणार आहे. ती वाढ १३४८० कोटी रुपयांची होईल. परंतु, दरडोई वार्षिक उत्पन्न २८१ रुपयांवरून वाढून ३३० रुपये होईल, म्हणजे त्यांत १८ टक्क्यांची वाढ होणार आहे. औद्योगिक क्षेत्रांत लोखंड-पोलादाच्या तीन प्रचंड कारखान्यांचें कार्य पुरें झालें आहे. रशियाच्या मदतीने भिलाई येथील कारखान्यांत, ब्रिटनच्या मदतीने दुर्गापूरच्या कारखान्यांत आणि पश्चिम जर्मनीच्या मदतीने रूरकेला येथील कारखान्यांत पोलादाचें उत्पादन सुरू करून भारताने औद्योगिक क्षेत्रांत खूपच आघाडी मारली आहे. यांखेरीज दोन नवे रासायनिक खतांचे ( Fertilizers ) कारखाने स्थापण्यांत यावयाचे आहेत. तसेंच सिंद्रीच्या कारखान्यांतील उत्पादनांत वाढ करण्यांत येणार आहे. सिमेंटचें उत्पादन ४३ लाख टनांवरून १ कोटी ३० लाख टन इतकें वाढणार आहे, तर ॲल्युमिनियमचें उत्पादन, ७,५०० टनांवरून वाढून २५,हजार टन इतकें होणार आहे. याशिवाय, यंत्रें बनविण्याचे कारखाने, साखरेच्या व कापडाच्या कारखान्यांसाठी लागणाऱ्या यंत्रांचें उत्पादन, सल्फ्युरिक ॲसिड, सोडा ॲश आणि कॉस्टिक सोडा अशांसारखे रासायनिक पदार्थ, यांचें उत्पादन वाढविण्यांत येणार आहे. चित्तरंजनच्या इंजिनांच्या कारखान्यांतून सध्या १२० ईजिनें दरवर्षी बाहेर पडत आहेत. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस त्या कारखान्यांतून ३०० इंजिनें दरवर्षी बाहेर पडूं लागतील. लोकोमोटिव्ह इंजिनांचे बाबतींत

भारत स्वावलंबी झाला असून इंजिनांची लवकरच परदेशांत निर्यात होऊं शकेल, अशी कल्पना आहे. डी. डी. टी. पावडर बनविण्याचा एक नवीन कारखाना त्रावणकोर कोचीनमध्ये उघडण्यांत येणार आहे.

शेती–बागायतीच्या क्षेत्रांतहि २ कोटी १० लाख एकर जमीन पाण्याखाली आणण्यांत येणार असून अन्नधान्याचें उत्पादन ८ कोटी ७० लाख टन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. अशा प्रकारें अन्नधान्याच्या उत्पन्नांत २५ टक्के वाढ होईल. उद्योगांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचें उत्पादनहि ३० लाख टनांइतकें वाढणार आहे.

याशिवाय समाज–कल्याणाच्या क्षेत्रांतहि सुंदर प्रगति होणार आहे. ६ ते ११ वर्षें वयाच्या ६३ टक्के मुलांना व ११ ते १४ वर्षांच्या दरम्यानच्या २२.५ टक्के मुलांना सक्तीचें मोफत प्राथमिक शिक्षण देण्यांत येणार आहे. माध्यमिक शाळांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १३ लाखांनी वाढेल. आणि प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ७७ लाखांनी वाढणार आहे. हें लक्ष्यांक गांठण्यासाठी ५३ हजार नवीन प्राथमिक शाळा व ३५०० माध्यमिक शाळा उघडण्यांत येतील. लोकांचें आरोग्यमान सुधारण्यासाठी डॉक्टरांची संख्या १८ टक्क्यांनी, परिचारकांची संख्या ४१ टक्क्यांनी आणि आरोग्य-मदतनिसांची संख्या ७५ टक्क्यांनी वाढविण्यांत येणार आहे. इस्पितळांतून रुग्णांसाठी असणाऱ्या खाटांच्या संख्येंत २४ टक्के वाढ करण्यांत येणार आहे.

लोकांचें राहणीमान सुधारण्यासाठी गरजेच्या वस्तूंच्या उत्पादनांतहि वाढ करण्यांत येणार आहे. सुती कापडाचें उत्पादन ६८,५०० लक्ष वारांवरून ८५,००० लक्ष वार इतकें वाढणार आहे. साखरेचें उत्पादनहि १७ लाखांवरून २३ लक्ष टनांवर पोंचणार आहे आणि सायकलींचें उत्पादनहि ५॥ लाखांवरून १० लाखांचा लक्ष्यांक गांठणार आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भांडवलदारांवर अधिक करभार टाकण्यांत आलेला आहे. संपत्ति, खर्च, बक्षिसें आणि मांडवलावरील नफा यांवर कर लादून तसेंच प्राप्तिकर वाढवून श्रीमंतांची आवक व संपत्ति कमी करण्याच्या तरतुदींमुळे आणि वर नमूद केलेल्या समाज-कल्याण योजनांच्या मदतीने गरिबांचें जीवन-मान सुधारण्याच्या योजनांमुळे आर्थिक समता साधून समाजवादी समाजरचनेचें ध्येय गांठण्याच्या बाबतींत बरीच प्रगति करण्यांत आली आहे. दुसऱ्या योजनेच्या काळांत १ कोटी माणसांना रोजगारीचीं साधनें उपलब्ध होतील.

दुसऱ्या योजनेंत सामूहिक विकास–कार्यक्रम आणि राष्ट्रीय विस्तार–योजना यांचेसाठी २०० कोटी रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. योजनेच्या अखेरीस सबंध देशांतील सगळीं गांवें या कार्यक्रमांखाली येतील. या कार्यक्रमांमुळ ग्रामीण जनतेंत नव-चैतन्य खेळूं लागल. भावी काळांत सरकारी मदतीशिवाय आपण आपली प्रगति साधूं शकूं

असा आत्मविश्वास ग्रामीण जनतेंत उत्पन्न करण्यांत येत आहे. या कार्यक्रमांत जनता आणि सरकार यांच्या संयुक्त सहकार्यानें राष्ट्र-उभारणीचें कार्य चालू आहे. त्यामुळे जनतेंत जागृति झाली आहे.

याप्रमाणे, भारताने आर्थिक विकासाच्या दिशेने मजबूत पावलें टाकून मार्गक्रमण सुरू केलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीसहि कांही आर्थिक प्रश्न न सुटतां कायम राहतीलच. त्यांची उकल तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करावी लागेल. आज आपल्या देशापुढील सर्वाधिक महत्त्वाचा आर्थिक प्रश्न अन्नधान्याचा आहे. पहिल्या योजनेंत अन्नधान्याचा प्रश्न समाधानकारकपणें व संपूर्णरीत्या सुटूं शकेल अशी जी आशा वाटत होती ती व्यर्थ ठरली आहे. आणि दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें धान्य परदेशांतून आणावें लागत आहे. तिसऱ्या योजनेंत अन्नधान्याच्या प्रश्नाचे बाबतींत स्वावलंबी व्हावेंच लागेल. तसें झाल्यास त्या साधनांचा उपयोग आर्थिक उन्नतीसाठी म्हणजे उद्योगधंद्यांची स्थापना आणि समाज-कल्याण योजना यांसाठी होऊं शकेल. सहकारी शेतीचें तत्त्व मान्य करण्यांत आलें आहे. त्यामुळे शेतीचा प्रश्न सुटेल अशी आशा वाटते. आपली आर्थिक प्रगति अतिशय मंदगतीने होण्याचें एक कारण म्हणजे आपली अफाट लोकसंख्या. हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत दरवर्षी जवळजवळ ४५ ते ५० लाख नव्या जिवांची भर पडत आहे म्हणजे लोकसंख्येंत सुमारें २ टक्के वाढ होत आहे. परिणामीं, आपल्या बऱ्याचशा साधनांचा उपयोग राहणीमान सुधारण्यासाठी होण्याऐवजी तें केवळ टिकवून धरण्यासाठीच होत आहे. कुटुंब-नियोजनाचें तत्त्व स्वीकारण्यांत आलेलें असलें तरी त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. तिसऱ्या योजनेचे विचार सध्या देशांत चालू आहेत. आणि ती सुमारें ९ ते १० हजार कोटी रुपयांची असेल, असें वाटतें. जर परदेशांनी आपल्याला विपुल प्रमाणांत मदत केली तर आपली आर्थिक प्रगति समाधानकारकपणें होऊं शकेल. पहिल्या पंचवार्षिक योजनेसाठी परदेशांनी आपल्याला १८८ कोटींची मदत केली होती. दुसऱ्या योजनेंत ८०० कोटींची परदेशी मदत मिळेल अशी अपेक्षा आहे. सुदैवाने, अमेरिकेंत तसेंच इतर देशांतहि आपल्या परराष्ट्रीय धोरणाबद्दलचे गैरसमज आता नाहीसे होत आहेत आणि आपल्या योजनांबद्दल त्या देशांना आता सहानुभूति वाटूं लागली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष आयझेनहॉवर यांनी हिंदुस्थानांत काढलेल्या दौऱ्याच्या प्रसंगीं हिंदुस्थानच्या प्रयत्नांनी प्रभावित होऊन हिंदी जनतेस असें आश्वासन दिलें की, आपण अमेरिकेस परत गेल्यावर अमेरिकन जनतेस असें निश्चित सांगूं की, हिंदुस्थानांत भांडवल गुंतविणें अगदी सुरक्षित आहे; आर्थिक दृष्ट्या सुरक्षितता आहेच, परंतु भारतांत भांडवल गुंतविणें म्हणजे लोकशाहींत भांडवल गुंतविण्यासारखें आहे. लोकशाही मार्गाने नियोजनाचा जगांतला सर्वांत मोठा प्रयोग आज भारतांत होऊन राहिला आहे. त्याच्या यश:सिद्धीवर भारताच्या आणि आशियांतील

देशांच्या लोकशाहीचें भवितव्य अवलंबून आहे. भारतास याबाबतींत यश मिळेल याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाही.

## अभ्यासाचीं साधनें

1. National Movement and Constitutional Development of India—Aggarwala
2. Political Mind of India - Mehta
3. Economic History of India - Sir R. C. Dutt.
4. Problems in Indian Economics—Jain
5. Some aspects of Economic Growth in underdeveloped countries—Dholakia
6. India's Socialistic Pattern of Society - Chandra
7. Industrial Revolution - Ashton.
८. ब्रिटिश रियासत ( उत्तरार्ध--१७५७-१८५८ )-कै. गो. स. सरदेसाई.
९. आजचा हिंदुस्थान-रजनी पाम दत्त.
१०. इंग्रजांनीं हिंदुस्थान कसें घेतलें ?-रा. गो. भिडे.
११. इंग्रजांनीं हिंदुस्थान कसा सोडला ?-रा. गो. भिडे.
१२. सत्तावन ते सुभाष-बाळशास्त्री हरदास.
१३. द्विखंड हिंदुस्थान-डॉ. राजेन्द्र प्रसाद.
१४. भारतीय राष्ट्रवादाचा विकास-प्रा. न. र. फाटक.
१५. आपल्या गणराज्याची घडण-दादा धर्माधिकारी.
१६. आपलें आर्थिक नियोजन-ह. रा. महाजनी.
१७. भारताचा आर्थिक विकास-प्र. चिं. शेजवलकर.
१८. स्वतंत्र भारताची पहिली पंचवार्षिक योजना-भा. म. काळे.
१९. भारतांतील आर्थिक नियोजन-प्रा. दे. अ. दाभोळकर.

## प्रकरण सहावें

# जागतिक समस्या–शांतता आणि सुरक्षितता

# सुरक्षितता आणि संयुक्त राष्ट्रसंघटना

### दोन संहारक महायुद्धें

जगांत शांतता आणि सुरक्षितता कशी राखावयाची हा आजच्या जगापुढील सर्वांत बिकट आणि महत्त्वाचा प्रश्न आहे. तसें पाहतां मनुष्यप्राणी स्वभावतः शांततेचा भोक्ता आहे. त्याला शांततामय परिस्थितीची ओढ असते; स्वतःचें जीवन शांततेने कंठण्याची त्याची इच्छा असते. त्याच्या व्यक्तित्वाचा विकास, त्याच्या शक्तींचा सर्वांगीण व संपूर्ण विकास शांततामय वातावरणांतच होऊं शकतो, त्यामुळे शांतता व सुरक्षितता मिळविण्यासाठी तो खूप धडपड करीत असतो. मानवी इतिहासाच्या सुरवातीपासूनच शांतता स्थापण्याचे अनेक प्रयत्न केले गेले आहेत; परंतु, शांतता व सुरक्षितता मृगजळाप्रमाणे मनुष्यापासून दूरदूर पळून जात आहे, असें वाटतें. गेल्या पन्नास वर्षांत जगाला दोन महायुद्धांच्या भयंकर व अतोनात यातना सोसाव्या लागल्या आहेत. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या दोस्तराष्ट्रांतील राजकारणी पुरुषांनी असें जाहीर केलें होतें की, हें युद्ध जगांतलें अखेरचें युद्ध असून ह्या युद्धाने जगांत कायमची शांतता प्रस्थापित होईल, जगांतील अन्याय दूर होईल आणि युद्धाचा कायमचा बीमोड होईल. पहिल्या युद्धांत दोस्तराष्ट्रांचा विजय झाला. जगांत शांतता नांदावी ह्या मानवी इच्छेस, ‘ लीग ऑफ् नेशन्स ’ ऊर्फ राष्ट्रसंघ स्थापला जाऊन, मूर्त स्वरूप देण्यांत आलें. परंतु, जगांत अन्यायाची परंपरा चालूच असल्याचें मनुष्याला थोड्याच अवधींत कळून चुकलें. साम्राज्यवाद्यांनी चालविलेली पिळवणूक थोडीसुद्धा कमी झालेली नव्हती. मानवजातीच्या हिताच्या नांवाखाली सगळीं राष्ट्रें आपापला स्वार्थ साधीत होतीं. जगांतील फार मोठ्या लोकसंख्येचें पारतंत्र्य कायमच होतें. परिणामीं, जागतिक शांतता स्थापण्याची इच्छा जणुं एखाद्या स्वप्नासारखी व्यर्थ ठरली. आणि पुनः एकदा युद्धाच्या रणभेरी-दुदुंभि दुमदुमूं लागल्या; दुसऱ्या महायुद्धाच्या भयंकर यातनांतून जाण्याचें दिव्य उभ्या मानवजातीला करावें लागलें. ह्या युद्धांत मनुष्याने पूर्वी कधीहि न वापरलेलीं किंवा पूर्वी ज्यांची कल्पनाहि केलेली नव्हती अशीं महाभयंकर शस्त्रास्त्रें बनवून तीं वापरलीं. त्या अस्त्रांमुळे मानवजातीचा अपरिमित संहार झाला. नागासाकी व हिरोशिमा या शहरांवर अणुबाँबचा वर्षाव झाला. अगणित निरपराधी पुरुष, स्त्रिया व मुलें प्राणांस मुकलीं. पुनः एकदा दोस्तराष्ट्रांचाच विजय झाला.

## तिसऱ्या महायुद्धाच्या सावल्या—

दुसऱ्या महायुद्धाच्या भयंकर हालअपेष्टांनी गांजून गेलेल्या जनतेने महायुद्धाची अखेरी जशी जवळ येऊं लागली तसा सुटकेचा निःश्वास टाकला. मनुष्याच्या मनांत नेहमी वावरणारी विश्वशांति स्थापण्याची इच्छा पुनः एकदा जागी झाली. जागतिक शांतता स्थापण्याचा दृढ निश्चय करून मानवाने संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना केली. सदरहू संघटनेकडून जगांत कायमची शांतता राखण्याचें कार्य कितपत यशस्वीपणाने होऊं शकेल ह्याची मानवाला मनांतून शंकाच वाटत आहे. ह्या संघटनेच्या स्थापनेनंतरहि जगांत कांही युद्धें झालेलीं आहेत. उदा० कोरियाचें युद्ध, अरब व इस्राएली राष्ट्रांतील युद्धें, इजिप्तच्या सुवेझ कालव्याच्या प्रश्नावरून इंग्लंड व फ्रान्स यांनी केलेलें आक्रमण, हंगेरींतील रशियाचें आक्रमण, हिंदुस्थान व चीन तसेंच हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्या दरम्यानचे सरहद्दी-संबंधीचे तंटे, काश्मीरचें युद्ध, तसेंच अल्जीरियाचें युद्ध ह्या साऱ्या युद्धांवरून संयुक्त राष्ट्र-संघटना युद्धें थोपवून धरण्यास असमर्थ असल्याचें जसें जाणवतें तसेंच तिसरें युद्ध रोखण्याचें सदरहू संघटनेचें सामर्थ्यहि दिसून येतें. महायुद्धाच्या भीषण परिणामांच्या कल्पनेनेच तिसरें महायुद्ध रोखलें गेलें आहे, असें देखील म्हणतां येईल. एक गोष्ट मात्र अगदी खरी आहे की, युद्धें कायमचीं नष्ट झालेलीं नाहीत. युद्धांचें स्वरूप पालटलें आहे. ‘ गरम युद्ध ’ बंद पडून ‘ शीत युद्ध ’ सुरू झालें असून तें कायमचें चालूच आहे. विश्वयुद्धाची भीति कायमचीच आहे. जगांतील तणातणी आज शिगेला पोचली असून जागतिक शांततेस आज तरी धोका आहे, असें म्हणावयास हरकत नाही.

## शांतता स्थापण्याची आवश्यकता

अशा परिस्थितींत जर मानवजातीचें अस्तित्व टिकवून धरावयाचें असेल, जर मानवी संस्कृतीचें संरक्षण करावयाचें असेल, विज्ञानांतील महान् शोधांचा उपयोग सृष्टीच्या संहाराऐवजी तिच्या नवरचनेसाठी, नवनिर्मितीसाठी, मनुष्याची भरभराट व समृद्धि व्हावी ह्यासाठी जर करावयाचा असेल तर जागतिक शांतता स्थापन करण्याखेरीज गत्यंतर नाही. महायुद्धांनंतरच्या काळांत मनुष्याने हायड्रोजन बॉम्ब, न्यूक्लिअर शस्त्रें, जेट विमानें, रॅकेट्स अशा प्रकारचीं सर्वसंहारक शस्त्रास्त्रें शोधून काढलीं आहेत. तिसरें महायुद्ध झालेंच तर त्यांत राष्ट्रें किंवा माणसें यांचा विजय होणार नसून ह्या महाभयंकर शस्त्रास्त्रांचा विजय होणार आहे. मानवजातीचा संहार, संपूर्ण नाश हाच तिसऱ्या महायुद्धाचा परिणाम असेल. म्हणूनच जगांत शांतता आणि सुरक्षितता कशी स्थापन करतां येईल ह्या प्रश्नावरच आपल्याला आपलें लक्ष केंद्रित करावयास हवें.

## विज्ञानाची वाढ व जगाचा संकोच

विज्ञानांतील महान् शोधांनी सध्याचें जग कमालीचें संकुचित केलें आहे. ‘ वसु-धैव कुटुम्बकम् ’ ह्या वचनानुसार सबंध जग एक विशाल कुटुंब बनूं शकेल अशी आजची

वस्तुस्थिति आहे. आज जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सहजासहजीं जातां येतें. चंद्रलोक आणि दुसरे ग्रह, उपग्रह यांचेपर्यंत पोचण्याची शक्यता आज उत्पन्न झालेली आहे. ह्या स्थितीचा परिणाम असा झाला आहे की, कोणत्याहि देशाला अलिप्ततेने राहणें आज अशक्य होऊन बसलें आहे. पृथ्वीच्या पाटीवर कोणत्याहि एखाद्या भागांत होणाऱ्या घडामोडींचा परिणाम सगळया जगावर होत आहे. कोरियांत अगर इंडोचायनांत युद्ध झालें तर त्याचे परिणाम युरोप-अमेरिकेलाहि भोगावे लागतात. अमेरिकेंत जर आर्थिक मंदी निर्माण झाली तर तिची लाट इतर देशांतहि पसरते. जग आज इतकें सलग, एकखंड बनून गेलें आहे की, एकतर अवघ्या जगांत सुख, शांतता, समृद्धि यांचें साम्राज्य प्रस्थापित होईल, नाहीतर सबंध जगाचा विध्वंस तरी होईल. आजच्या काळांत शांतता व सुखसमृद्धि हीं इतकीं अविभाज्य बनलीं आहेत.

## अशांतीचें मूळ – साम्राज्यवाद !

भूतकाळांत पृथ्वीवरील राष्ट्रें शांतता व सुरक्षितता टिकवून धरण्यासाठी महान् साम्राज्यें स्थापीत असत. रोमन साम्राज्यांत, उदाहरणार्थ, सर्वत्र शांतता होती. साम्राज्याचें सैन्य प्रजेचें संरक्षण करून शांतता टिकवून धरीत असे. परंतु साम्राज्याच्या हद्दीतच साम्राज्यवाद्यांच्या पिळवणुकीमुळे प्रजेंत असंतोष फैलावत असे. तात्पर्य, साम्राज्यवादच जगांतील अशांततेचें मुख्य कारण आहे. प्रजा नेहमी स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्न करीत असते आणि साम्राज्यवाद्यांना असले प्रयत्न कधीच रुचत नाहीत. परिणामीं, संघर्ष उत्पन्न होऊन त्यांतून युद्धें भडकतात. उदाहरणार्थ, अल्जीरियांतील प्रजेचा स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क आजदेखील फ्रान्स मान्य करावयास तयार नाही. साम्राज्यवादी देशांच्या वसाहतींतील प्रजेंतहि मोठ्या प्रमाणांत असंतोष फैलावलेला असून त्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा कधी स्फोट होईल तें सांगतां येणार नाही.

## शांतता राखण्याचे मार्ग—

एकोणिसाव्या शतकांत सुरक्षितता व शांतता टिकविण्यासाठी युरोपांतील देश ' सत्ता-समतोला 'चें ( Balance of Power ) तत्त्व अनुसरीत असत. ते दुसऱ्या मित्र-राष्ट्रांशीं संधीचे करार घडवून आणीत असत. एखाद्या राष्ट्रावर आक्रमण झाल्यास इतर मित्रराष्ट्रें त्याच्या मदतीस धावून जात असत. वरील तत्त्वानुसार कोणतेंहि एखादें राष्ट्र किंवा एखादा राष्ट्रसमूह दुसऱ्या राष्ट्राहून किंवा राष्ट्रसमूहाहून बलिष्ठ होणार नाही व इतरांवर आक्रमण करणार नाही, अशी दक्षता बाळगूनच करार करण्यांत येत असत. युरोपांतील राष्ट्रांनी हें धोरण स्वीकारलें होतें. तरी देखील तें युद्धें थांबविण्यास समर्थ ठरूं शकलें नाही. त्यामुळे पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या ' लीग ऑफ् नेशन्स ' ह्या राष्ट्रसंघाने सामुदायिक सुरक्षिततेचा सिद्धान्त स्वीकारला होता. संयुक्त राष्ट्रसंघटनेनेंहि ह्या

सिद्धान्ताचा स्वीकार केलेला आहे. या सिद्धान्तानुसार असें ठरलें आहे की, जर जगांतील एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण केलें तर जगांतील इतर साऱ्या राष्ट्रांनी आक्रमक राष्ट्राशीं युद्ध करून आक्रमण परतवून लावावयाचें. जर ह्या सिद्धान्ताचें खंबीरपणाने पालन केलें गेलें तर साहजिकपणेंच कोणतेंहि राष्ट्र युद्ध करण्यास धजणार नाही, हें अगदी स्पष्ट आहे. कारण आक्रमण झाल्यास आक्रमक राष्ट्राविरुद्ध इतर सारीं राष्ट्रें दंड थोपटून उभीं राहतील, त्याचेवर आर्थिक बहिष्कार टाकतील व अखेरीस त्याचेविरुद्ध युद्धहि पुकारतील. अशा प्रकारें सामुदायिक सुरक्षितता व शांतता टिकविणें शक्य होईल अशी आशा वाटते.

## शांततेचें जन्ममरण बड्या राष्ट्रांच्या हातीं !

'लीग ऑफ् नेशन्स' ही राष्ट्रसंघटना सार्वत्रिक सुरक्षितता टिकवून धरण्यांत अपशी ठरली. कारण इटली, जर्मनी, जपान इत्यादि बड्या राष्ट्रांविरुद्ध ती कोणतीच प्रभावी उपाययोजना अंमलांत आणूं शकली नाही. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्याहि कांही मर्यादा उघड झाल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या घटनेंत असें नमूद केलेलें आहे की, कोणत्याहि आक्रमक राष्ट्राविरुद्ध जर सामुदायिक उपाययोजना अंमलांत आणावयाची असेल तर सुरक्षा मंडळांतील पांच बड्या राष्ट्रांची तीस संमति हवी. जर एखाद्या बड्या राष्ट्राने संमति दिली नाही, तर सामुदायिक सुरक्षिततेसाठी कोणतेहि उपाय योजितां येत नाहीत. कोरियांतील युद्धाच्या वेळीं, जगाच्या इतिहासांत अगदी पहिल्याच प्रसंगीं, 'यूनो' ह्या आंतरराष्ट्रीय संघटनेने सामुदायिक सुरक्षिततेसाठी आक्रमक देशाशीं युद्ध पुकारलें आणि आक्रमण मोडून काढलें. सामूहिक सुरक्षिततेच्या सिद्धान्ताची सफलता त्या वेळीं शाबीत झाली हें खरें. तथापि, त्याच वेळीं त्याची मर्यादाहि स्पष्टपणें दिसून आली. कोरियांत 'यूनो' चें सैन्य पाठवावें ह्या निर्णयाच्या वेळीं रशिया सुरक्षा मंडळांत हजर नव्हता म्हणूनच तो निर्णय घेणें शक्य झालें. जर रशिया त्या प्रसंगीं हजर राहिला असता तर त्याने 'व्हेटो' चा अधिकार वापरून सुरक्षिततेसाठी उपाययोजना अंमलांत आणण्यास विरोध केला असता. मागाहून संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने 'शांततेसाठी एकत्र येण्याचा' ठराव पास केला आणि आक्रमण थोपविण्याच्या आपल्या सामर्थ्याचा वापर केला. तथापि, सामुदायिक सुरक्षिततेच्या सिद्धान्ताची मर्यादा स्पष्ट आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेंतील पांच बड्या राष्ट्रांवर जागतिक शांततेची जबाबदारी सोपविण्यांत आलेली आहे. तथापि, रशिया व अमेरिका ह्या दोन बड्यांचें धोरण हाच विश्वशांतीचा मुख्य आधार होय, असेंच म्हटलें पाहिजे.

## प्रादेशिक लष्करी करार व जागतिक शांतता—

प्रादेशिक लष्करी करारांच्या द्वारें जागतिक शांतता स्थापण्याचे व महायुद्ध टाळण्याचे प्रयत्न अमेरिकेने चालविलेले आहेत. अमेरिका व तिचीं मित्रराष्ट्रें यांची अशी समजूत आहे की, महायुद्धाची खरी भीति रशिया व साम्यवादी देश यांचेपासूनच असल्यामुळे

साम्यवादाची प्रगति रोखून धरली पाहिजे. रशिया व साम्यवादी देश ह्यांचे भोवतीं अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांचें कडें उभें करून व त्या मित्रराष्ट्रांना आधुनिक शस्त्रास्त्रांचा पुरवठा करून सुसज्ज करावयास हवें. तसेंच लष्करी ठाण्यांची उभारणी साम्यवादी देशांच्या आसपास करावयास हवी. अशा पद्धतीने रशिया व साम्यवादी राष्ट्रें यांचे भोवतालीं जर शस्त्रसज्ज देशांची मजबूत तटबंदी उभारली तर रशिया युद्ध करण्यास धजणार नाही आणि मग जागतिक शांतता टिकवून धरणें शक्य होईल, अशी अमेरिकेची कल्पना आहे. ह्या कल्पनेनेच अमेरिकेने लष्करी करारांच्या द्वारे 'नाटो'[1] या संघटनेने पश्चिम युरोपांतील देशांना, 'सीटो'[2] या संघटनेने आग्नेय आशियांतील देशांना व 'बगदाद' कराराने मध्य आशियांतील देशांना संघटित केलें आहे. ह्या लष्करी करारांचा प्रतिकार म्हणूनच जणू कांही रशियाने पूर्व युरोपांतील साम्यवादी देशांशीं 'वॉर्सा' करार केला आहे. अशा प्रकारें अमेरिका व रशिया हीं दोन राष्ट्रें लष्करी करारांच्या द्वारे जागतिक शांतता स्थापण्याचा प्रयत्न करून राहिलीं आहेत.

## लष्करी करार म्हणजे शांततेस आव्हानच !

प्रादेशिक लष्करी करारांच्या साह्याने विश्वशांति निर्माण करण्याचें कार्य कितपत फलद्रूप होईल याची शंकाच आहे. या करारांमुळे कांही साम्राज्यवादी राष्ट्रेंहि एकमेकांना जोडलीं गेलीं आहेत. त्यांनी अमेरिकन शस्त्रास्त्रांचा वापर साम्यवाद्यांच्या विरुद्ध करण्याऐवजी स्वतःचें साम्राज्य टिकवून धरण्यासाठी, राष्ट्रवाद्यांची स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यासाठी करून संयुक्त राष्ट्रसंघटनेने शिरोधार्य मानलेल्या स्वतंत्रता, न्याय, शांतता ह्या तत्त्वांना पूर्णपणें हरताळ फासला आहे. फ्रान्सने, उदाहरणार्थ, अल्जीरियांत नाटो संघटनेच्या शस्त्रास्त्रांचा उपयोग केलला आहे. त्याच संघटनेच्या प्रतिष्ठेखातर अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री जॉन फॉस्टर डलेस यांनी, "गोवा हा पोर्तुगालचा प्रांत असून 'गोवा' प्रश्नावरून युद्ध उद्‌भवल्यास पोर्तुगालला 'नाटो' संघटनेंतील राष्ट्रांची मदत मिळूं शकेल", असें मागे जाहीर केलें होतें. कित्येक देशांत सत्ताधारी पक्षांनी अमेरिकेच्या लष्करी मदतीच्या जोरावर प्रजेला अप्रिय असलेल्या सरकारांची सत्ता टिकवून धरण्याचे प्रयत्न केलेले आहेत. एकीकडे लष्करी करारांनी जोडलेलीं राष्ट्रें व दुसरीकडे साम्यवादी देश ह्यांचे दरम्यान 'शीतयुद्धास' सुरुवात झाली आहे. परिणामीं, राष्ट्राराष्ट्रांतील तणातणीचें व अशांततेचें वातावरण वाढलें आहे. भारत पहिल्यापासूनच प्रादेशिक लष्करी करारांना सक्त विरोध करीत आला आहे. भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. छगला ह्यांचे म्हणण्याप्रमाणे, 'लोकशाहीवादी अमेरिकेने पाकिस्तानाला दिलेली लष्करी

१ नाटो—North Atlantic Treaty Organisation.

२ सीटो—South East Asia Treaty Organisation.

मदत ही जगांतील अत्यंत करुण आणि दुर्दैवी घटना आहे.' तात्पर्य, प्रादेशिक करार हा जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचा रास्त मार्ग नव्हे, हेंच खरें.

## आर्थिक व सामाजिक समानता हाच विश्वशांतीचा पाया

आपण जर युद्धाची अगर अशांततेचीं कारणें तपासून पाहूं लागलों तर आपल्याला असें आढळून येईल की, साम्राज्यवादाला आर्थिक व सामाजिक अन्यायाची जोड मिळालेली आहे. हें लक्षांत घेऊनच संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सामाजिक व आर्थिक मंडळाचे प्रमुख मेक्सिकोचे डॅनिअल् कोसिओ विलेगस ३१ जुलै, १९५९ ह्या दिवशीं मंडळाच्या सभासदांसमोर भाषण करतांना म्हणाले, ' जर कायमच्या स्वरूपाची शांतता प्रस्थापित करावयाची असेल तर तिची उभारणी आर्थिक व सामाजिक समानतेच्या पायावरच व्हावयास पाहिजे. ' पुंजीपतींच्या अर्थकारणांत वसाहतींची गरज अनिवार्य मानली जाते. वसाहतींच्या आर्थिक पिळवणुकीच्या पायावरच देशाच्या समृद्धीचा डोलारा उभा असतो. इंग्लंडचें साम्राज्य विस्ताराने खूप मोठें असल्यामुळे औद्योगिक प्रगतीनंतर आर्थिक प्रगति इंग्लंडला साधतां आली; कारण, इंग्लंडला हवा असलेला कच्चा माल वसाहतींकडून मिळूं शकला आणि तयार माल विकण्यास बाजारपेठाहि आपोआपच सापडल्या. आफ्रिकेंत व आशियांत फ्रान्सच्याहि वसाहती होत्या. जर्मनींत औद्योगीकरण झाल्यानंतर तिलाहि वसाहतींची गरज तीव्रतेने भासूं लागली. परंतु, जगांतील बहुतेक वसाहती इंग्लंड, फ्रान्स व इतर युरोपीय राष्ट्रांनी युद्धें करून काबीज केल्या होत्या. त्यामुळे जर्मनीची पंचाईत झाली. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठीहि वसाहतींचा उपयोग होतो. याहि दृष्टीने जर्मनीस वसाहतींची विशेष गरज भासूं लागली. त्यांचे अभावीं जर्मनीची औद्योगिक प्रगति रोखली जाऊन ती इंग्लंड व फ्रान्स यांचेशीं बरोबरी करण्याच्या बाबतींत मागे पडली. युद्धाखेरीज प्रदेश मिळविणें अशक्य होतें. परिणामीं, पहिलें महायुद्ध झालें. व्हर्सायच्या तहाने झालेला अन्याय आणि इतर आर्थिक व सामाजिक कारणें दुसऱ्या महायुद्धाच्या मुळाशीं होतीं.

## आर्थिक व सामाजिक समता स्थापण्याचे मार्ग—

एवढ्या चर्चेनंतर हें स्पष्ट व्हावयास हरकत नाही की, जर जगांत शांतता व सुरक्षितता निर्माण करावयाची असेल तर शस्त्रास्त्र-स्पर्धेने तें कार्य साध्य होणार नाही, तर युद्धाचीं मूळ कारणें दूर करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. साम्राज्यवादाचा नाश झाला पाहिजे. वसाहतींची पिळवणूक थांबली पाहिजे. जगांतील सगळया लहानमोठ्या राष्ट्रांचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करून सगळया देशांना स्वराज्य मिळावयास हवें. जगांतील एखाद्या प्रदेशांत जोपर्यंत साम्राज्यवाद्यांनी पिळवणूक चालू ठेवलेली आहे तोपर्यंत जागतिक शांततेस धोका आहे, हें मान्य केलें पाहिजे. दुसरें म्हणजे, जोपर्यंत जगांत आर्थिक

विषमता चालू राहील तोपर्यंतहि जगांत शांतता नांदूं शकणार नाही. कारण असें की, गरीब प्रजेंत क्रांतिवादी विचार झट्दिशीं फैलावतात. आर्थिक दुःस्थितीने गांजलेली प्रजा चटकन् हिंसेचा आश्रय घेते. आणि अशा परिस्थितींतून अंतर्गत कलह उत्पन्न होतात. साम्यवादी विचारसरणींत आर्थिक समानतेचें व भरभराटीचें चिन्ह दिसत असल्यामुळे असे कलह ह्या विचारसरणीचें स्वाभाविकपणेंच स्वागत करतात. दुर्दैवाने जगांत आज आर्थिक विषमता पसरत आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ८२ सभासद-राष्ट्रांपैकी ६० राष्ट्रें आर्थिक दृष्ट्या मागासलेलीं आहेत. एकीकडे विकसित राष्ट्रांतील दरडोई वार्षिक उत्पन्न सुमारें १० हजार रुपये इतकें प्रचंड आहे तर दुसरीकडे अविकसित राष्ट्रांतील दरडोई वार्षिक उत्पन्न सुमारें ३०० रुपये इतकें कमी आहे. जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांनी मागासलेल्या राष्ट्रांच्या विकासासाठी आर्थिक मदत करावयास पाहिजे. असें करणें हें प्रगत राष्ट्रांच्या दृष्टीनेहि हिताचेंच आहे. कारण जागतिक शांततेमुळे सगळ्याच राष्ट्रांचा फायदा होणार आहे. मागासलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक भरभराटीमुळे विकसित राष्ट्रांच्याहि सुखसमृद्धींत भर पडणार आहे. तिसरी गोष्ट अशी की, सामाजिक अन्यायांचेंहि जगांतून उच्चाटन व्हावयास हवें. सगळीं माणसें सारखीं असल्यामुळे प्रत्येक मनुष्याला मानाने जगतां यावयास हवें आणि मानवी हक्क प्राप्त व्हावयास हवेत. गोरीं माणसें श्रेष्ठ असून काळीं माणसें गुलाम होण्यासाठीच जन्माला आलेलीं आहेत असल्या कल्पना झिडकारल्या गेल्या पाहिजेत. दक्षिण आफ्रिकेचें वर्णभेदाचें धोरण मानवी हक्कांच्या विरुद्ध असून तेथील लोकांवर अन्याय करणारें आहे. अशा धोरणांतहि युद्धाचीं बीजें सामावलेलीं असतात हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा प्रकारें जागतिक शांततेच्या स्थापनेसाठी पुढील उपाय अंमलांत आणण्याची अत्यंत जरूरी आहे :—

(१) साम्राज्यवादाचा नाश करणें.

(२) मागासलेल्या राष्ट्रांना त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी पुढारलेल्या राष्ट्रांनी मदत करणें.

(३) आर्थिक विषमतेचा नाश करणें.

(४) सामाजिक अन्याय नेस्तनाबूद करणें.

**संयुक्त राष्ट्रसंघटना ऊर्फ 'यूनो' – मानवतेचें एकमेव आशास्थान !**

वरील ध्येयांच्या अनुरोधाने दुसऱ्या महायुद्धानंतर जी संयुक्त राष्ट्रसंघटना स्थापन झालेली आहे तिने आंतरराष्ट्रीय सहकार्य संपादून जागतिक शांतता व सुरक्षितता स्थापण्याचें व टिकविण्याचें उद्दिष्ट आपल्यापुढे ठेविलें आहे. त्या संघटनेची ऊर्फ 'यूनो' ची स्थापना, तिचें कार्य, तिच्याशीं संलग्न असलेल्या मंडळांची कार्यपद्धति ह्या विषयांची आता माहिती करून घेऊं.

## संयुक्त राष्ट्रसंघटना (United Nations Organisation)

### 'यूनो'चे पूर्वावतार—

'यूनो' ह्या जागतिक संघटनेची स्थापना २५ जून, १९४५ ह्या दिवशीं झाली. तथापि, जगांतील सर्व राष्ट्रांनी एकत्र येऊन, विचारविनिमय करून जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी व ती टिकविण्यासाठी 'यूनो'सारख्या संघटना उभारण्याचे प्रयत्न भूतकाळांत अनेकदा झाले होते. उदा० १३०५ सालीं ड्यूब्रा नांवाच्या एका फ्रेंच गृहस्थाने आंतरराष्ट्रीय सहकार्याची सविस्तर योजना तयार केली होती. चौथ्या हेन्रीने १५९३ सालीं युरोपांतील राज्यांच्या सहकार्याची योजना मांडली होती; ती योजना 'ग्रँड डिझाइन' म्हणून प्रसिद्ध आहे. रूसो या तत्त्ववेत्त्याने १७६१ सालीं एका ग्रंथांत शांततेसाठी जगाची पुनर्रचना करण्याची कल्पना मांडली होती. १८१५ सालीं इंग्लंडप्रभृति पांच राष्ट्रांनी 'पवित्र संघ' या नांवाची संघटना उभारली होती. पहिलें जागतिक महायुद्ध १९१८ सालीं संपलें. त्यानंतर पॅरिसला शांतता-परिषद् भरली. १९१९ सालीं 'लीग ऑफ् नेशन्स' या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यांत आली. वरीलसारख्या संघटना म्हणजे जागतिक शांततेच्या प्रस्थापनेसाठी झालेले 'यूनो'पूर्व प्रयत्न होत. 'लीग ऑफ् नेशन्स'च्या स्थापनेंत अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी फार पुढाकार घेतला होता. परंतु, बड्या राष्ट्रांच्या साम्राज्यवादी स्वार्थी धोरणामुळे 'लीग' निरुपयोगी ठरली. दुसरें महायुद्ध ती रोखूं शकली नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं १९४० च्या उन्हाळयांत सदरहू संघटना विसर्जित करण्यांत आली.

### यूनोची पूर्वपीठिका

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचे अखेरीस भावी युद्धांतून जगांतील प्रजेला वांचविण्यासाठी व जागतिक शांतता टिकवून धरण्यासाठी 'यूनो' ची स्थापना करण्यांत आली. ह्या संघटनेच्या रचनेच्या कहाणीचा प्रारंभ १९४१ पासून होतो. त्या वर्षाच्या जानेवारी महिन्यांत अमेरिकेचे त्या वेळेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी जगांतील प्रत्येक मानवाला चार मूलभूत स्वातंत्र्यांची हमी देणारी घोषणा केली. हीं चार स्वातंत्र्यें अशीं:—(१) उच्चार स्वातंत्र्य (Freedom of Speech), (२) धार्मिक स्वातंत्र्य (Freedom of Religion), (३) आर्थिक स्वातंत्र्य (Freedom from Want) व (४) युद्धाच्या भयापासून स्वातंत्र्य (Freedom from Fear of War). त्यानंतर १४ ऑगस्ट, १९४१ या दिवशीं ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान चर्चिल व अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष रूझवेल्ट या उभयतांची अटलांटिक महासागरांत एका युद्धनौकेवर भेट झाली. उभयतांनी तत्कालीन राजकीय प्रश्नांवर चर्चा करून ८ ध्येयांना संमति दिली. यालाच 'अटलांटिक सनद' असें म्हणतात. ह्या सनदेंत 'सामान्य सुरक्षिततेसाठी भावी काळांत कांहीतरी व्यापक व कायमची व्यवस्था

व्हावयास हवी', अशा शब्दांत व्यक्त झालेल्या इच्छेचा अर्थ 'जागतिक संघटनेची रचना' असा होता. १९४१ सालच्या डिसेंबरांत अमेरिकेसकट २६ राष्ट्रांचे प्रतिनिधी वॉशिंग्टन येथे जमले व त्यांनी 'अटलांटिक सनदे'स पाठिंबा देणारी घोषणा १ जानेवारी, १९४२ या दिवशीं केली. तीं सारीं राष्ट्रें 'संयुक्त राष्ट्रें' या गौरवपूर्ण नांवाने ओळखलीं जाऊं लागलीं. त्यानंतर १९४३ सालच्या ऑक्टोबरांत मॉस्को येथे सदरहू प्रश्नावर चर्चा करण्यासाठी अमेरिका, ब्रिटन, चीन व रशिया यांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक भरली होती. विश्वशांति व सुरक्षितता स्थापण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेंत सामील होण्याची इच्छा वरील प्रसंगीं रशियानेंदेखील व्यक्त केली होती. २१ ऑगस्ट, १९४४ या दिवशीं अमेरिकेंतील 'डम्बार्टन ओक्स' या वॉशिंग्टन डी. सी. जवळच्या रम्य स्थळीं चार बड्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद् भरविण्यांत आली. जागतिक संघटनेची सर्वांना मान्य होईल अशी घटना तयार करणें हा या परिषदेचा हेतु होता. त्या परिषदेने 'डम्बार्टन ओक्स योजना' या नांवाने ओळखली जाणारी योजना तयार केली. परंतु सुरक्षा मंडळांत प्रत्येक राष्ट्राला काय स्थान असावें ह्या प्रश्नावर वरील परिषदेच्या प्रतिनिधींत एकमत होऊं शकलें नाही. म्हणून अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष रूझवेल्ट, इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान चर्चिल व रशियाचे त्या वेळचे अध्यक्ष स्टॅलिन हे तिघे १९४५ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत याल्टांत खलबतासाठी एकत्र जमले. आणि त्यांनी डम्बार्टन ओक्स परिषदेंतील वादग्रस्त मुद्यांच्या सोडवणुकीचा मार्ग शोधून काढला. १९४५ सालच्या एप्रिलांत संयुक्त राष्ट्रांची परिषद् सॅन्फ्रान्सिस्को येथे भरली. तिला जगांतील ८० टक्के लोकवस्तीच्या ५० राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. सदरहू परिषदेंत विस्तृत व तपशीलवार चर्चा व विचारविनिमय झाल्यानंतर सर्वसंमतीने सनदेचा अखेरचा मसुदा तयार करण्यांत आला. आणि २५ जून, १९४५ या दिवशीं पन्नास राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी 'यूनो' करारावर सह्या करून 'यूनो' या जागतिक संघटनेची स्थापना केली. सध्या जवळजवळ ८२ राष्ट्रें यूनोची सभासद आहेत. यूनोचें पहिलें अधिवेशन लंडनमध्ये १० जानेवारी, १९४६ या दिवशीं सुरू झालें.

## यूनोचीं ध्येयें

यूनोच्या सनदेंतील पहिल्या कलमांत 'संयुक्त राष्ट्रसंघटने'चीं चार ध्येयें सांगितलेलीं आहेत. तीं अशीं :—

( १ ) **जागतिक शांतता व सुरक्षितता टिकविणें** ह्यासाठी शांततेला धोका उत्पन्न होण्याचें टाळण्याकरितां किंवा धोका उत्पन्न झालाच तर तो दूर करण्यासाठी आणि आक्रमण किंवा शांतताभंग करणारीं इतर कृत्यें यांचा प्रतिबंध करण्यासाठी परिणामकारक असे सामुदायिक उपाय योजणें आणि शांततेच्या मार्गाने आणि आंतरराष्ट्रीय न्याय व कायदा ह्यांना अनुसरून सर्व आंतरराष्ट्रीय झगडे मिटविणें, शांतता-भंगाचे प्रकार थांबविणें.

(२) **सर्व राष्ट्रांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणें;** प्रत्येक राष्ट्राला स्वतःचें सरकार निवडण्याचा अधिकार असला पाहिजे. सर्व राष्ट्रें सारखीं आहेत. तसेंच जागतिक शांतता वाढविण्यासाठी योग्य उपाययोजना अंमलांत आणणें.

(३) **आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य उत्पन्न करणें;** सर्व राष्ट्रांच्या मदतीने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवतावादी प्रश्न सोडविणें; वंश, लिंग, भाषा किंवा धर्म यांवर आधारलेल्या भेदभावांचा विचार न करतां सर्व मानवांना समान मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य साधणें.

(४) **हीं सर्वसंमत ध्येयें साध्य करण्यासाठी 'जागतिक केंद्र' म्हणून कार्य करणें.**

सगळ्या राष्ट्रांना समान हक्क व प्रत्येक राष्ट्राचें सार्वभौमत्व हीं तत्त्वें यूनो मान्य करते. कोणत्याहि सभासद राष्ट्राच्या अंतर्गत कारभाराच्या बाबतींत हस्तक्षेप करण्याचा यूनोला अधिकार नाही. थोडक्यांत, जागतिक शांतता व जागतिक कल्याण हे यूनोचे मुख्य हेतू होत.

## यूनोचें सभासदत्व

जगांतील कोणत्याहि शांतताप्रेमी राष्ट्राला यूनोचें सभासद होतां येतें. जें राष्ट्र यूनोच्या सनदेंत समाविष्ट असलेल्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यास तयार व पार पाडण्यास समर्थ व तत्पर असतें, त्या राष्ट्रास यूनोचें सभासदत्व मिळतें. सुरक्षा मंडळाच्या शिफारसी-नंतरच यूनोची आमसभा नव्या राष्ट्रांना सभासद म्हणून दाखल करून घेते. या पद्धतीने अफगाणिस्तान, आइसलँड, सयाम, स्वीडन, पाकिस्तान, ब्रह्मदेश, सीलोन, घाना इत्यादि राष्ट्रांना सभासदत्व देण्यांत आलें आहे. एखाद्या सभासद-राष्ट्राने शांतताभंगाचें कृत्य केलें आणि त्याविरुद्ध सुरक्षा मंडळाने उपाययोजना केली असेल तर सुरक्षा मंडळाच्या शिफारसीनंतर आमसभेला त्या राष्ट्राचें सभासदत्व तात्पुरतें रद्द करतां येतें. एखादें राष्ट्र यूनो सनदेच्या सतत विरोधी वागत आहे असें आढळून आलें तर त्याला संघटनेंतून हाकलून देण्याची व्यवस्था आहे. अशी हकालपट्टी आमसभा सुरक्षा मंडळाच्या शिफारसीनंतरच करते. यूनोचें केंद्र-कार्यालय अमेरिकेंत न्यूयॉर्कला आहे.

## यूनोचे घटक

संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सहा प्रमुख घटक आहेत. ते असे :—

(१) **आमसभा** (General Assembly)

(२) **सुरक्षा मंडळ** (Security Council)

(३) **आर्थिक व सामाजिक मंडळ** ( Economic & Social Council )
(४) **विश्वस्त मंडळ** ( Trusteeship Council )
(५) **आंतरराष्ट्रीय न्यायालय** ( International Court of Justice )
(६) **सचिवालय** ( Secretariat )

वरील घटकांची थोडक्यांत माहिती करून घेऊं.

(१) **आमसभा** ( General Assembly )

आमसभेस अनेकदा 'जागतिक नगरसभा' असें म्हणण्यांत येतें. यूनो सनदेच्या ९ व्या कलमानुसार आमसभेंत संयुक्त राष्ट्रसंघटनेचीं सर्व सभासद–राष्ट्रें असतात. प्रत्येक राष्ट्राला एकच मत देण्याचा अधिकार असतो तथापि, पांच प्रतिनिधी व आवश्यक तेवढे सल्लागार पाठविण्याची परवानगी असते.

## आमसभेचे हक्क

'यूनो' सनदेच्या मर्यादेंत आमसभा कोणत्याहि आंतरराष्ट्रीय प्रश्नावर चर्चा करूं शकते. सनदेंत नमूद केलेल्या कोणत्याहि कार्यविषयक बाबींवरहि आमसभा चर्चा करूं शकते. निःशस्त्रीकरणाचा सिद्धान्त, शस्त्रास्त्रांचें नियमन, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी परस्पर–सहकार्य इत्यादि विषयांवरील सर्वसाधारण सिद्धान्तांची चर्चाहि आमसभा करूं शकते. आणि ह्या सिद्धान्तांबाबत सभासद–राष्ट्रें व सुरक्षा मंडळ यांना शिफारसी करूं शकते.

## आमसभेच्या मर्यादा

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता यांना धोक्यांत आणणाऱ्या परिस्थितीकडे सुरक्षा मंडळाचें लक्ष वेधण्याचें कार्य आमसभा करूं शकते. तथापि, 'यूनो' सनदेच्या १२ व्या कलमानुसार, "कोणत्याहि तंट्याविषयीं किंवा परिस्थिती–विषयी सुरक्षा मंडळ सनदेप्रमाणे आपलें कर्तव्य बजावीत असेतोपर्यंत प्रत्यक्ष सुरक्षा मंडळाच्या विनंतीखेरीज, आमसभा त्या तंट्याविषयीं वा परिस्थितीविषयीं कोणतीहि शिफारस करूं शकत नाही." याचा अर्थ असा की, सुरक्षा मंडळांत एखादा प्रश्न दाखल होऊन त्याची जर त्या ठिकाणीं चर्चा चालू असेल तर त्या प्रश्नाचे बाबतींत शिफारसी करण्याचा आमसभेला अधिकार नाही. सुरक्षा मंडळाला जे तंटे मिटवितां येत नाहीत तेच तंटे विचारांत घेण्याचें व मिटविण्याचें कार्य आमसभेनें करावयाचें असतें. त्या तंट्यांचा निकाल लावण्यासाठी आमसभा लवाद, कमिशन किंवा मध्यस्थ नेमूं शकते. आमसभेचे निर्णय बंधनकारक असत नाहीत, ते शिफारसवजा असतात.

## आमसभेच्या कार्याचें स्वरूप

सुरक्षा मंडळावरील कायम नसलेल्या ६ सभासदांची निवड करण्याचें कार्य आमसभा करते. आर्थिक व सामाजिक मंडळाचे १८ सभासद, विश्वस्त मंडळावरील प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयावरील १५ न्यायमूर्ति या सर्वांची निवड आमसभाच करते. यूनोचें वार्षिक अंदाजपत्रक तयार करणें, वर्षाकाठीं झालेला खर्च सर्व सभासदांत मारखा विभागणें हीं कामेंदेखील आमसभाच करते. सुरक्षा मंडळाच्या शिफारसीनुसार एखाद्या राष्ट्रास यूनोचें सभासद करून घ्यावयाचें असेल तर त्या प्रश्नावर दोन तृतीयांश मतें पडलीं तरच निर्णय होऊं शकतो. सुरक्षा मंडळाने सादर केलेल्या निवेदनांवर चर्चा, विचारविनिमय करून त्यांचा स्वीकार आमसभाच करते. यूनोच्या सेक्रेटरी जनरलची ऊर्फ प्रमुख सचिवाची निवड करणें, त्यानें सादर केलेल्या अहवालास मंजुरी देणें, हीं कामेंहि आमसभेचींच होत. थोडक्यांत, आमसभा कोणत्याहि प्रकारचे बंधनकारक कायदे पास करीत नाही. परंतु जगांतील राष्ट्राराष्ट्रांच्या परस्परसंबंधांच्या प्रश्नांची चर्चा करून आमसभा शिफारसी करते. चर्चा करणें हेंच तिचें खरेखुरें कार्यक्षेत्र होय.

## आमसभेची कार्यपद्धति

आमसभेचें अधिवेशन वर्षांतून एकदा २ सप्टेंबरनंतर येणाऱ्या तिसऱ्या मंगळवारीं भरतें. हें वार्षिक अधिवेशन सुमारे पांच ते सहा आठवडे चालतें. सुरक्षा मंडळाच्या विनंतीवरून किंवा बहुसंख्य सभासदांच्या मागणीवरून महत्त्वाच्या कामासाठी तातडीचें अधिवेशन फक्त २४ तासांची सूचना देऊनहि बोलावतां येतें. आमसभा दरवर्षी आपला अध्यक्ष व सात उपाध्यक्ष निवडते. आमसभेचे पहिले अध्यक्ष बेल्जियमचे पॉल हेन्री स्पाक ( Paul Henri Spaak ) हे होते. १९५३ सालीं आमसभेच्या अध्यक्षपदीं भारताच्या प्रतिनिधि श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांची निवड झाली होती. त्यांनी त्या वर्षी अध्यक्षपद इतक्या जबाबदारीने व निःपक्ष बुद्धीनें सांभाळलें की, सर्व सभासद-राष्ट्रांनी त्यांचा गौरव केला.

## आमसभेचीं वैशिष्ट्यें

आमसभेच्या कार्यावरून तिचीं खालील वैशिष्ट्यें ध्यानांत येतात :—

( १ ) आमसभा आंतरराष्ट्रीय शांततेसाठी स्वतः कोणतेच उपाय योजूं शकत नाही. तथापि, आमसभेंत प्रत्येक प्रश्नावर जागतिक लोकमताचे पडसाद उमटत असतात. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र ह्या लोकमतास मान देण्याचा प्रयत्न करीत असतें. आणि अशा प्रकारें आक्रमक राष्ट्राविरुद्ध जागतिक लोकमत संघटित होऊन तें जर यूनोच्या आमसभेंत प्रकट झालें तर आक्रमक राष्ट्रावरहि त्याचा परिणाम होऊन जागतिक शांततेचें रक्षण होऊं शकतें.

( २ ) आमसभेंत लहानमोठ्या सगळ्या राष्ट्रांना समान मानण्यांत येतें. सर्वांना समान मताधिकार आहे. त्यामुळे छोटीं राष्ट्रें एकत्र येऊन बड्या राष्ट्रांवर नैतिक दडपण आणूं शकतात. परंतु, बहुसंख्य छोटीं राष्ट्रें अमेरिका व रशिया यांच्या गटांत सामील होऊनच मतदान करतात. अरब राष्ट्रें व भारतादि आशियांतील कित्येक राष्ट्रें स्वतंत्रपणें मतदान करतात. आमसभेंतहि गट पडल्यामुळे तिचें महत्त्व कमी होत आहे.

**( २ ) सुरक्षा मंडळ** ( Security Council )

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याचें अत्यंत बिकट कार्य सुरक्षा मंडळाला करावयाचें असतें. ही गोष्ट ध्यानांत घेतली तर, जबाबदारीच्या दृष्टीने यूनोच्या घटकांत सुरक्षा मंडळ सर्वांत महत्त्वाचें व प्रमुख आहे, हें लक्षांत येईल. सुरक्षा मंडळांत एकूण ११ सभासद असतात व ही संख्या कायम राहते. अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स व राष्ट्रवादी चीन ह्या पांच बड्या राष्ट्रांना सुरक्षा मंडळावर कायमचें स्थान असतें. या कायम सभासदांशिवाय सहा सर्वसाधारण सभासद असतात. त्यांची निवड आमसभा करते. प्रत्येक वर्षी तीन सभासदांची निवड दोन वर्षांसाठी होत असते. दोन वर्षांची मुदत संपल्यावर मध्ये एक वर्ष थांबून त्याच राष्ट्राला पुनः निवडणुकीसाठी उभें राहतां येतें. आमसभा ज्या वेळीं राष्ट्रांची निवड करते तेव्हा ( १ ) जागतिक शांततेला होणारें त्या राष्ट्राचें साह्य आणि ( २ ) समान भौगोलिक प्रतिनिधित्व ह्या दोन कसोट्यांचा विचार आमसभा करते. सुरक्षा मंडळावरील सर्वसाधारण सहा सभासद हे जगांतील निरनिराळ्या भागांतील असतात. या व्यवस्थेमुळे सुरक्षा मंडळांत जरी केवळ अकराच सभासद असले तरी तें मंडळ बऱ्याच प्रमाणांत जगाचें प्रतिनिधित्व करतें.

## सुरक्षा मंडळाच्या कार्याचें स्वरूप

आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था यांचें रक्षण करण्याची जबाबदारी या मंडळावर सोपविण्यांत आलेली आहे. हें कर्तव्य बजावण्यासाठी सदरहू मंडळ यूनोच्या ध्येय-धोरणांना अनुसरून कार्य करीत असतें. जगाच्या पाठीवरील एखाद्या देशांत शांतताभंग झाला किंवा तशी परिस्थिति उत्पन्न झाली तर तणातणीची परिस्थिति आटोक्यांत आणण्यासाठी सुरक्षा मंडळ तावडतोब उपाययोजना करतें. प्रथमतः मंडळ उभय देशांना शांततेच्या मार्गाने तंटा मिटविण्याची विनंती करतें आणि त्या दृष्टीने योग्य शिफारसीहि करतें. परंतु इतकें करूनहि शांतताभंग चालूच राहिला तर सुरक्षा मंडळ सभासद-राष्ट्रांना, त्यांनी शांतताभंग करणाऱ्या आक्रमक राष्ट्राशीं आर्थिक संबंध तोडून टाकावेत; रेल्वे, सागरी, हवाई मार्गांनी होणारें दळणवळण तसेंच पोस्ट, टेलिग्राफ, रेडियो यांसारख्या साधनांच्या द्वारें होणारा व्यवहार बंद करावेत किंवा राजकीय संबंध तोडून टाकावेत अशा सूचना करूं शकतें. ही सारी उपाययोजना अपुरी असल्याचें सिद्ध झाल्यास यूनो सनदेच्या ४२ व्या कलमानुसार हें

मंडळ " आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी वा पुनः प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक वाटेल ती उपाययोजना हवाई, सागरी किंवा खुष्कीच्या सैन्यदळांच्या द्वारे अंमलांत आणूं शकतें. यूनोच्या सैन्याच्या द्वारे होणारीं निदर्शनें, नाकेबंदी, किंवा इतर इलाज यांचा वरील उपाययोजनेंत समावेश होतो." या हेतूच्या सिद्धीसाठी सभासद-राष्ट्रांकडून सुरक्षा मंडळ सैन्याची मदत मागूं शकतें. आणि शांतताभंग करणाऱ्या राष्ट्राशीं युद्ध पुकारूं शकतें.

## सुरक्षा मंडळाची कार्यपद्धति

सुरक्षा मंडळ आपला अध्यक्ष एक महिन्याच्या मुदतीसाठी निवडतें. राष्ट्रांच्या नांवांच्या इंग्रजी आद्याक्षरांप्रमाणे प्रत्येक राष्ट्राच्या प्रतिनिधीची अध्यक्ष म्हणून निवड होते. आमसभेचें अधिवेशन वर्षांतून एकदा भरतें आणि मग सभासद आपापल्या देशांत परत जातात. तसें सुरक्षा मंडळाचें नसतें. सुरक्षा मंडळ कायम अस्तित्वांत असतें. अकराच्या अकरा सभासद न्यूयॉर्कला नेहमी उपस्थित असले पाहिजेत, असा नियम आहे. वर्षभर सतत सुरक्षा मंडळाच्या बैठकी चालू असतात. मंडळाची बैठक केव्हाहि बोलावितां येते. दोन बैठकींत दोन आठवड्यांपेक्षा अधिक काळ जात नाहीं.

## 'व्हेटो'चा अधिकार

सुरक्षा मंडळांतील मतदानाचे विशिष्ट नियम आहेत. साध्या कारभारविषयक प्रश्नावर अकरांपैकी कोणत्याहि सात सभासदांचें बहुमत असलें तरी पुरतें. पण कारभारविषयक प्रश्न सोडून इतर सर्व प्रश्नांवर निर्णय घेण्याच्या वेळीं पांचहि बड्या राष्ट्रांची संमति आवश्यक असते. त्यांच्याशिवाय उरलेल्या सहापैकी किमान दोघांनी संमति दिली तरच निर्णय घेतां येतो. एखाद्या आक्रमक राष्ट्रावरील उपाययोजनेच्या ठरावावरील मतदानांत पांचांपैकी एखाद्या बड्या राष्ट्रानें अनुकूल मतदान केलें नाहीं म्हणजेच संमति नाकारली तर उपाययोजनेचा ठराव पास होऊं शकत नाहीं. प्रत्येक प्रश्नावर पांचहि बड्या राष्ट्रांची संमति लागणें याला 'व्हेटोचा अधिकार' म्हणतात. अशा प्रकारें सुरक्षा मंडळांत सगळ्या राष्ट्रांना समान मानलें जात नाहीं. यूनोच्या सनदेंत व्हेटोच्या अधिकाराचा समावेश एवढ्यासाठी केला आहे की, जेव्हा सॅन्फ्रान्सिस्को परिषदेंत बहुसंख्य राष्ट्रें व्हेटो नको असें म्हणूं लागलीं त्या वेळीं व्हेटो नसेल तर आम्ही यूनोंत येणार नाहीं असें अमेरिका व रशिया या दोन बड्या राष्ट्रांनी स्पष्टपणें सांगितलें. आणि या दोन बड्या राष्ट्रांना वगळून जागतिक संघटनेची स्थापना करणें अव्यवहार्य ठरलें असतें. त्यामुळे छोट्या राष्ट्रांनी आपला आग्रह मागे घेतला व व्हेटोला मान्यता दिली. यावरून व्हेटोचा अधिकार हा यूनो संघटनेचा पाया आहे हें स्पष्ट होईल.

## व्हेटोचें महत्त्व

'व्हेटो' हा एक पायाभूत अधिकार असला तरी त्याचेवर नेहमीच टीका केली जाते. व्हेटोचा अधिकार हा सुरक्षा मंडळाच्या कामांतील एक मोठा अडथळा मानला जातो. यूनोच्या स्थापनेपासून १९५६ सालापर्यंत ६० वेळा हा व्हेटोचा अधिकार सुरक्षा मंडळांत वापरला गेला. त्यांपैकी ५८ प्रसंगीं रशियाने एकट्याने त्या अधिकाराचा वापर केला. 'व्हेटो'मुळे बडीं राष्ट्रें व छोटीं राष्ट्रें असा भेद निर्माण होऊन एक प्रकारें 'आंतरराष्ट्रीय जातिभेद' निर्माण झाला आहे असें कांही टीकाकार म्हणतात. त्यामुळे हा लोकशाही-विरोधी, बुद्धीला न पटणारा अधिकार रद्द करावा अशी अन्यान्य लोकांची मागणी आहे. परंतु 'व्हेटो'चा अधिकार हेंच सर्व कटकटींचें, तंट्यांचें मूळ कारण नाही, इकडे आपलें दुर्लक्ष होतां कामा नये. व्हेटो हा रशियाशीं असलेल्या मतभेदांचे केवळ प्रतिबिंब आहे. एखाद्या उपाययोजनेस 'सगळ्यांची संमति हवी' हा सिद्धान्त आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिस्थितींतून निर्माण झालेला आहे. जर पांच बड्या राष्ट्रांत त्यांच्या हितविषयक प्रश्नावर मतभेद उत्पन्न झाला व त्यांपैकी एखाद्या राष्ट्राविरुद्ध बळाचा वापर करण्याचा निर्णय घेण्यांत आला तर महायुद्धाचा भडका उडेल यांत शंकाच नाहीं. परंतु 'यूनो' ची स्थापना तर महायुद्ध थोपविण्यासाठी झालेली आहे. त्यामुळे 'व्हेटो' या अधिकारांत यूनोला प्रभावी व परिणामकारक बनविण्याचें सामर्थ्य आहे, हें स्पष्ट होतें.

### ( ३ ) आर्थिक व सामाजिक मंडळ ( Economic & Social Council )

जोपर्यंत जगांतील राष्ट्रांत सामाजिक अन्याय आणि आर्थिक विषमता आहे, तोपर्यंत जगांत शांतता नांदणें शक्य नाही, हें यूनोच्या सभासदांनी मान्य केलं आहे आणि त्यामुळे विश्वशांति स्थापण्यासाठी मागासलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या विधायक कार्याची अत्यंत जरूरी आहे. हें कार्य यूनो आर्थिक व सामाजिक मंडळ तसेंच त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या विशिष्ट समित्या यांच्या मदतीने पार पाडीत असते.

## आर्थिक व सामाजिक मंडळाची घटना व कार्यपद्धति

आर्थिक व सामाजिक मंडळांत यूनोच्या आमसभेने निवडलेले एकूण १८ सभासद असतात. आमसभा दरवर्षी सहा सभासदांची निवड करते. एकदा निवडून आल्यावर प्रत्येक सभासद तीन वर्षे काम करतो. तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर लगेच पुनः दुसऱ्या तीन वर्षांच्या मुदतीकरितां त्या सभासद-राष्ट्रास निवडणुकीस उभें राहतां येतें. हें मंडळ आपल्या अध्यक्षाची निवड एक वर्षाच्या मुदतीसाठी करतें. ह्या मंडळाची बैठक दरवर्षी कमींत कमी तीन वेळा व्हावयास हवी, असा नियम आहे. प्रत्येक सभासद-राष्ट्राचा ह्या मंडळांत एकेक सभासद असतो व त्यास एकच मत असतें. सगळे निर्णय बहुमतानेच घेतले जातात.

## मंडळाचीं कामें

मंडळाच्या कामांचा उल्लेख 'यूनो' सनदेच्या ५५ व्या कलमांत करण्यांत आलेला आहे. त्यानुसार यूनोच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतील सर्व कार्यक्रमांवर देखरेख ठेवणें; आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, शास्त्रीय, आरोग्यविषयक प्रश्नांवर अभ्यास करणें, चिकित्सा करून शिफारसी सुचविणें; उच्च राहणीमान, संपूर्ण रोजगार, सामाजिक व आर्थिक विकास यासाठी प्रयत्न करणें; जाति, लिंग, भाषा अगर धर्म ह्यांवरून पडलेले भेदभाव लक्षांत न घेतां सर्वांना मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्यें मिळावींत व त्यांचा मान राखला जावा ह्यासाठी प्रयत्न करणें, हीं या मंडळाचीं कामें आहेत. हीं कामें पार पाडण्यासाठी मंडळ विविध प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांची नेमणूक करतें, अहवाल तयार करतें व शिफारसी करतें. आंतरराष्ट्रीय परिषदा बोलावण्याचें कामहि या मंडळाला करतां येतें.

## आर्थिक व सामाजिक मंडळाच्या समित्या

मंडळाने आपल्या ह्या बहुविध कामांत मदत व्हावी ह्या हेतूने अनेक समित्या ( Specialised Agencies ) व मंडळें ( Commissions ) यांची स्थापना केलेली आहे. पैकी महत्त्वाच्या समित्या खालीलप्रमाणे आहेत :-

( १ ) आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, शास्त्रीय व सांस्कृतिक संघटना ( UNESCO )

( २ ) आंतरराष्ट्रीय अन्न व शेती संघटना ( F. A. O. )

( ३ ) आंतरराष्ट्रीय पुनर्रचना व विकास यासाठी बँक ( BANK )

( ४ ) आंतरराष्ट्रीय चलन फंड ( FUND )

( ५ ) आंतरराष्ट्रीय मजूर संघटना ( I. L. O. )

( ६ ) आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना ( W. H. O. )

( ७ ) आंतरराष्ट्रीय नागरी-विमान संचालन संस्था ( I. C. A. O. )

वरील संस्थांची थोडक्यांत माहिती मिळवूं.

### ( १ ) आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, शास्त्रीय व सांस्कृतिक संघटना ( United Nations Educational, Scientific and Cultural Organisation )

युनेस्कोच्या घटना-प्रस्तावनेंतच तिचा हेतु स्पष्ट झालेला आहे. ती प्रस्तावना अशी:- 'युद्धाची इच्छा मनुष्याच्या मनांत निर्माण होते आणि म्हणून शांततेच्या रक्षणाची इच्छाहि मनुष्याच्या मनांतच निर्माण करावयास हवी. एकमेकांचे जीवनादर्श आणि चालीरीति यांच्या विषयीच्या अज्ञानामुळे जगांतल्या राष्ट्राराष्ट्रांत गैरसमज व अविश्वास

उत्पन्न होतात. त्यांच्यांतूनच अनेकदा युद्धाचा भडका उडतो...शांतता, न्याय, स्वतंत्रता तसेंच ज्ञानप्रसार व सांस्कृतिक औदार्य यांचा फैलाव होऊन मानवाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी सगळया राष्ट्रांनी प्रयत्न करणें हें त्यांचें पवित्र कर्तव्य होय. जी शांतता केवळ सरकारांच्या राजकीय व आर्थिक व्यवस्थांवर अवलंबून असते, अशा शांततेस जगांतल्या सर्व लोकांचा कायमच्या स्वरूपाचा व हार्दिक पाठिंबा मिळूं शकत नाहीं. आणि म्हणून जागतिक शांततेचा भंग होऊं नये अशी इच्छा असेल तर तिची उभारणी मानवाची बुद्धि व नीति यांच्या दृढतेच्या भक्कम पायावरच व्हावयास पाहिजे."

## युनेस्कोचें उद्दिष्ट व कार्यक्षेत्र

शिक्षण, ज्ञानविज्ञान, सांस्कृतिक मूल्यें इत्यादींच्या प्रसाराने मानवाचा बौद्धिक व सांस्कृतिक विकास साधून त्याच्या डोक्यांतून युद्धाची इच्छा काढून टाकणें हा युनेस्कोचा उद्देश आहे. राष्ट्राराष्ट्रांत परस्पर-परिचय वाढवून एकमेकांबद्दलचे ग्रहपूर्वग्रह दूर करणें, अज्ञान, गैरसमज नष्ट करणें व परस्पराविषयीचा समजूतदारपणा वाढवून शांततेस पोषक वातावरण निर्माण करणें, हें युनेस्कोचें कार्यक्षेत्र आहे. बातम्यांच्या प्रसिद्धीच्या बाबतींत नियंत्रण असूं नये यासाठी युनेस्को प्रयत्न करीत असते. वस्तुसंग्रहालयें, विद्यापीठें, महाविद्यालयें यांना युनेस्को आर्थिक व इतर प्रकारची मदत करते. विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक ह्यांना वेगवेगळया देशांत जाण्याची संधि मिळावी यासाठी त्यांच्या अदलाबदलीचा कार्यक्रम आखून युनेस्को तो कार्यक्रम पार पाडते. जगांतील कोट्यवधि निरक्षर लोकांना शिक्षण मिळून ते सज्ञान व्हावेत यासाठी युनेस्को योजना आखते.

## युनेस्कोची कार्यकारिणी व कार्यपद्धति

युनेस्कोच्या सभासद-राष्ट्रांची परिषद् वर्षांतून एकदा होते. युनेस्कोची कार्यकारिणी वेगवेगळया १८ राष्ट्रांतील सभासदांची मिळून बनलेली असते. ह्या समितीच्या बैठकी वारंवार होतात. युनेस्कोचे पहिले कार्यवाह जगत्प्रसिद्ध वैज्ञानिक ज्यूलियन् हक्स्ले होते. १९४५ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत युनेस्कोची घटना तयार झाली व त्याच सालीं तिचा ४४ राष्ट्रांनी स्वीकार केला. युनेस्कोचें मध्यवर्ती कार्यालय फ्रान्समध्ये पॅरिसला आहे.

## (२) आंतरराष्ट्रीय अन्न आणि शेती-संघटना (Food & Agriculture Organisation)

अन्न ही मनुष्याची अगदी प्राथमिक गरज आहे. जर ही गरज भागूं शकली नाही तर मनुष्य साहजिकपणेंच हिंसा व क्रांति या मार्गांचा अवलंब करतो. अमेरिकेच एक वेळचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी पूर्वी एकदा अवघ्या मानवजातीसाठी 'आर्थिक स्वातंत्र्या'ची घोषणा केली होती. त्या घोषणेचें मूर्त स्वरूप असलेली ही संघटना जगांतील

वेगवेगळया देशांत अन्न व शेतीचें उत्पादन यांची यथायोग्य व न्याय्य विभागणी व्हावी यासाठी सतत खटपट करीत असते.

### अन्न व शेती संघटनेचें कार्य

सर्व लोकांना पुरेसें अन्न मिळावें यासाठी ही संघटना प्रयत्न करते. अन्नधान्याचें उत्पन्न वाढविण्यासाठी नवीन पद्धतींचें संशोधन करून जगांतील वेगवेगळया देशांच्या शेतकी–खात्यांमार्फत खेड्यांतील शेतकऱ्यांत त्या पद्धतींचा प्रचार ही संघटना करते. अन्नधान्याच्या वस्तूंची खरेदी व विक्री ह्या बाबतींतहि ही संघटना मदत करते. लोकांचा आहार अधिक समतोल बनून त्यांचें चांगल्या प्रकारें पोषण होईल इकडेदेखील ही संस्था लक्ष पुरविते.

### संघटनेची कार्यपद्धति

संघटनेचीं सभासद-राष्ट्रें हिच्या खर्चाचा बोजा स्वीकारतात.' कोणत्याहि सभासद-राष्ट्राला ही संघटना सक्ती करूं शकत नाही. कांही विशेष हेतूंसाठी ती परिषदा भरविते. प्रत्येक सभासद राष्ट्राचा तींत एक प्रतिनिधि असतो. त्यास एक मत असतें. संघटनेच्या सर्व सभासदांची वर्षांतून एकदा बैठक भरते. १५ सभासदांची बनलेली तिची कार्यकारिणी तिचा नेहमीचा कारभार पाहते. ह्या कार्यकारिणीच्या बैठकी वारंवार होतात. ह्या संघटनेचें मध्यवर्ती कार्यालय इटलींत रोम येथे आहे. सध्या ह्या संघटनेचे डायरेक्टर जनरल् म्हणून भारताचे श्री. बी. आर्. सेन हे काम पाहतात.

### ( ३ ) आंतरराष्ट्रीय पुनर्रचना व विकास यासाठी बँक ( The International Bank for Reconstruction and Development )

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत हानि झालेल्या देशांची पुनर्रचना तसेंच मागासलेल्या राष्ट्रांचा विकास या कार्यासाठी ही संघटना स्थापण्यांत आली आहे. १९४४ सालच्या जुलै महिन्यांत अमेरिकेंतील ब्रेटनवुड्झमध्ये जगांतील राष्ट्रांची आर्थिक परिषद् बोलावण्यांत आली होती. त्या परिषदेने सदरहू आंतरराष्ट्रीय बँक स्थापण्याचा निर्णय घेतला. ह्या आंतरराष्ट्रीय बँकेच्या कार्याला आरंभ जून १९४६ पासून झाला. सुरवातीस जगांतलीं ३८ राष्ट्रें ह्या बँकेचीं सभासद् होतीं; सध्या सभासद-संख्या सुमारें ६७ आहे. बँकेची मुख्य कचेरी वॉशिंग्टनला आहे.

### बँकेचें स्वरूप व उद्दिष्ट—

ही बँक म्हणजे एक आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना आहे. यूनोच्या आर्थिक व सामाजिक मंडळाशीं ही एका विशिष्ट रीतीने संलग्न आहे. बँकेचें उद्दिष्ट असें आहे:—

( १ ) महायुद्धांत उद्‌ध्वस्त झालेले कारखाने व दुसऱ्या कचेऱ्या पुनः उभारण्यासाठी

( २ ) रेल्वेमार्ग, ग्वाणी, तसेंच कापड व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादक कारखान्यांसाठी व

( ३ ) आर्थिक विकास साधण्यासाठी तसेंच उच्च राहणीमान प्राप्त करून देण्यासाठी, सभासद-राष्ट्रांना आर्थिक मदत करणें. बँकिंगच्या नियमांनुसार ही बँक कर्जरूपानें भांडवल पुरवून राष्ट्रांना मदत करते. कर्ज मंजूर करतेवेळीं कर्ज काढणाऱ्या राष्ट्राची कर्ज फेडण्याची कुवत, योजनांचा भक्कमपणा, त्यांची उपयुक्तता, योजनांत होणारा परदेशी हुंडणावळीचा खर्च, योजनांपासून होणारा फायदा इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या जातात. योजनेचें आर्थिक स्थैर्य लक्षांत घेतेवेळीं सभासद-राष्ट्राची राजकीय विचार-प्रणालि विचारांत घेतली जात नाही. सध्या ह्या बँकेचे प्रमुख युजेन आर्. ब्लॅक ( Eugene R. Black ) आहेत.

बँकेच्या शुभेच्छांचा उपयोग आंतरराष्ट्रीय प्रश्नांची उकल करण्यासाठीहि करून घेण्यांत येतो. सध्या भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान चालू असलेल्या कालवा-पाणी-तंट्याचा समाधानकारकरीत्या निकाल लावण्यासाठी ही बँक खटपट करीत आहे.

## ( ४ ) आंतरराष्ट्रीय चलन फंड ( International Monetary Fund )

१९४४ सालीं ब्रेटनवुड्झ येथे भरलेल्या आर्थिक परिषदेने आंतरराष्ट्रीय बँकेच्या स्थापनेच्या निर्णयाबरोबरच आंतरराष्ट्रीय चलन फंड स्थापण्याचाहि निर्णय घेतलेला होता. ह्या दोन्ही संघटना परस्परपूरक आहेत. तात्पुरत्या आर्थिक अडचणींना तोंड देण्यासाठी ह्या चलन फंडांतून मदत देण्यांत येते. परंतु दीर्घ मुदतीचीं कर्जें हवीं असल्यास आंतरराष्ट्रीय बँकेवरच विसंबावें लागतें. फंडाचीहि मुख्य कचेरी वॉशिंग्टनलाच आहे.

### फंडाचें सभासदत्व व उद्दिष्ट

या संघटनेचे सभासद असल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्राला आंतरराष्ट्रीय बँकेचे सभासद होतां येत नाही. या संघटनेचे ६७ सभासद आहेत. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य साधणें, सर्व राष्ट्रांना त्यांच्या चलनाची किंमत स्थिर ठेवण्यास मदत करून आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविणें, व अशा प्रकारें आंतरराष्ट्रीय सुखसमृद्धींत भर घालणें हें या संघटनेचें उद्दिष्ट आहे. परदेशी चलनाच्या दरांत स्थिरता टिकवून धरून स्पर्धा रोखणें याकडे या संघटनेचें लक्ष असतें. ही संघटना प्रत्येक देशांतील आर्थिक व चलनविषयक माहिती मिळवून तिच्या आधारें अहवाल प्रसिद्ध करते.

## (५) आंतरराष्ट्रीय मजूर संघटना (International Labour Organisation)

या संघटनेची स्थापना प्रथमतः १९०२ मध्ये होऊन मागाहून ही संघटना 'लीग ऑफ् नेशन्स'ला जोडण्यांत आली. २ ऑक्टोबर, १९४६ या दिवशीं एक ठराव पास

करून या संघटनेने यूनोची एक विशिष्ट शाखा म्हणून कार्य करण्यास सुरुवात केली. स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे या संघटनेची मुख्य कचेरी आहे.

### संघटनेचे उद्देश व तिची कार्यपद्धति

जगांतील वेगवेगळया राष्ट्रांतील कामगारांसाठी कामाची पद्धति व परिस्थिति मानवतेस अनुरूप राहील ह्या गोष्टीकडे लक्ष पुरविणें हें या संघटनेचें उद्दिष्ट आहे. कामगारांना योग्य वेतन, कामाच्या सोयीसवलती, कोवळया वयाच्या मुलांना कारखान्यांतून काम करण्यास मनाई करणें, दुखापत झालेल्या वा अपघातांत अपंग झालेल्या कामगारांना वैद्यकीय मदत किंवा नुकसान भरपाई देणें, इत्यादि प्रश्नांबाबत ही संघटना धोरणें निश्चित करते. आणि सभासद-राष्ट्रांना त्या धोरणांची अंमलबजावणी करण्याची शिफारस करते. कामगारांची पिळवणूक थांबविण्यांत तसेंच त्यांची परिस्थिति सुधारण्यांत ह्या संघटनेस चांगलेंच यश प्राप्त झालें आहे.

### ( ६ ) आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना ( World Health Organisation )

नवीन वैद्यकीय शोध लावून तसेंच रोगनिवारणाच्या नव्या औषधांच्या उपयोगाविषयी माहिती एकत्र करून ती निरनिराळया राष्ट्रांना पुरविण्याचें कार्य ही संघटना करते. रोग पसरविणाऱ्या जंतूंविरुद्ध या संघटनेने एक मोहीमच उघडली आहे. भारतांत अन्न व शेतकी संस्थांच्या सहकार्याने मलेरियाच्या जंतूंचा नाश करण्याची वरील संघटनेने आघाडी उघडलेली आहे. ही संघटना रोगनिवारणासाठी वैद्यकीय मदत, औषधें व इतर साधनें पाठविण्यास सभासद-राष्ट्रांना भाग पाडते.

### संघटनेचें स्वरूप व तिची कार्यपद्धति

संघटनेची बैठक वर्षांतून एकदा होते. तिच्या कामकाजासाठी एक कार्यकारिणी आहे. तिची सत्ता असाधारण आहे. जर सभासद-राष्ट्राने आपला विरोध आगाऊ नोंदविला नसेल तर ह्या संघटनेचे नियम सभासद-राष्ट्राला बंधनकारक आहेत, असें मानलें जातें. ७ एप्रिल, १९४८ या दिवशीं ह्या संघटनेची स्थापना झाली. ८१ पूर्ण व तीन जोडून घेतलेले असे या संघटनेचे ८४ सभासद आहेत. मुख्य कचेरी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे आहे.

### ( ७ ) आंतरराष्ट्रीय नागरी-विमान संचालन संस्था ( International Civil Aviation Organisation )

संघटनेची पहिली बैठक कॅनडांतील मॉंट्रियल येथे १९४५ सालीं भरली होती. आंतरराष्ट्रीय विमान-प्रवास सुलभ आणि बिनधोक करणें हा या संघटनेचा उद्देश आहे. विमानप्रवास सोपा व बिनधोक कसा करतां येईल यावर ही संघटना अभ्यास करून

उपाययोजना सुचविते, नियम तयार करते व त्यांचें कसोशीने पालन होत आहे की नाही यावर देखरेख ठेवते. ६५ राष्ट्रें या संघटनेच्चीं सभासद असून मुख्य कचेरी मॉंट्रियल येथे आहे.

## आर्थिक व समाजिक मंडळाने नेमलेलीं इतर मंडळें

वरील सर्व संघटनांखेरीज आर्थिक व सामाजिक मंडळाने स्वतःच्या कार्यांत मदत व्हावी या उद्देशाने कांही खास मंडळांची नेमणूक केलेली आहे. उदाहरणार्थ, ( १ ) मानवी हक्क मंडळ, ( २ ) महिलांच्या दर्जासाठी मंडळ, ( ३ ) सामाजिक प्रश्नांसाठी मंडळ, ( ४ ) वाहतूक व दळणवळण मंडळ, ( ५ ) आर्थिक व रोजगारी मंडळ, ( ६ ) संख्या-शास्त्रविषयक संस्था, ( ७ ) अंमली पदार्थाविषयीचें मंडळ, (८) लोकसंख्याविषयक मंडळ. त्यांखेरीज कित्येक प्रादेशिक मंडळें महत्त्वाचें कार्य करीत आहेत. उदाहरणार्थ, ( १ ) युरोपीय देशांतील आर्थिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी Economic Commission for Europe ही संस्था, ( २ ) आशिया व दूर पूर्वेकडील देश यांमधील आर्थिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी Economic Commission for Asia and Far East हें मंडळ, ( ३ ) लॅटिन अमेरिकेंतील देशांसाठी आर्थिक मंडळ, ( ४ ) आफ्रिकेंतील देशांसाठी आर्थिक मंडळ. हीं मंडळें आपापल्या प्रदेशांत अभ्यास करून, संशोधन करून, उपयुक्त माहिती एकत्र करून अहवाल प्रसिद्ध करतात. मुलांसाठीहि International Children's Emergency Fund नांवाची संस्था स्थापण्यांत आलेली आहे. याखेरीज, जवळजवळ ९५ बिनसरकारी आंतरराष्ट्रीय संस्था आर्थिक व सामाजिक मंडळाबरोबर सहकार्याने काम करीत आहेत.

## आर्थिक व सामाजिक मंडळाचें कार्यक्षेत्र व महत्त्व

अशा प्रकारें आर्थिक व सामाजिक मंडळाचें कार्यक्षेत्र विशाल आहे. हें मंडळ विविध संघटनांच्या कार्यांचें संकलन करतें. त्याचें कार्य रचनात्मक व विधायक स्वरूपाचें आहे. तें सभासद-राष्ट्रांना सल्ला-सूचना देतें व शिफारसीहि करतें. 'यूनो' सनदेच्या ५६ व्या कलमानुसार प्रत्येक सभासद-राष्ट्र आर्थिक व सामाजिक मंडळ तसेंच आमसभा यांचेशीं सहकार्याने कार्य करण्यास बांधलें गेलेलें आहे. म्हणजे वरील संघटनेच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येक राष्ट्रावर आहे. ह्या आर्थिक व सामाजिक मंडळाच्या पहिल्या बैठकीचे प्रमुख म्हणून भारताचे विद्वान् प्रतिनिधि सर रामस्वामी मुदलियार यांची निवड झाली होती.

## ( ४ ) विश्वस्त मंडळ ( Trusteeship Council )

जगांतील लोकसंख्येच्या सुमारें एकचतुर्थांश लोक वसाहतींत राहतात. त्यांचेवर दुसरीं राष्ट्रें राज्य करीत आहेत. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या 'लीग ऑफ्

नेशन्स 'च्या ' मँडेट ' योजनेखालील देश, दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस शत्रुराष्ट्रांकडून मिळविलेले प्रदेश व विश्वस्त मंडळाच्या कारभाराखाली ठेवण्यांत आलेले प्रदेश हे सारे मिळून विश्वस्त प्रदेश होतात.

## मंडळाचीं ध्येयें

विश्वस्त मंडळाचीं चार ध्येयें आहेत. तीं अशीं :—

( १ ) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता कायम टिकविणें.

( २ ) विश्वस्त प्रदेशांतील लोकांचा राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास साधणें; त्यांची इच्छा व स्वराज्याचे परिणाम लक्षांत घेऊन स्वराज्याच्या दृष्टीने त्यांची प्रगति साधणें.

( ३ ) कोणत्याहि प्रकारचे भेदभाव लक्षांत न घेतां सर्व मानवांचे समान मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांबद्दल आदराची भावना निर्माण करणें.

( ४ ) सर्वांस सारखा न्याय मिळेल अशी व्यवस्था करणें.

## मंडळाची रचना

विश्वस्त मंडळाची रचना विशिष्ट पद्धतीने करण्यांत येते. ह्या मंडळांत तीन प्रकारचे सभासद असतात. ( १ ) विश्वस्त प्रदेशांचा कारभार न पाहणारीं सुरक्षा मंडळांतील पांच बडीं राष्ट्रें, ( २ ) विश्वस्त प्रदेशांचा कारभार पाहणारीं सारीं राष्ट्रें, ( ३ ) आमसभेने निवडलेलीं सभासद-राष्ट्रें. आमसभेने निवडलेलीं राष्ट्रें तीन वर्षांच्या मुदतीसाठी विश्वस्त मंडळाचीं सभासद होतात. विश्वस्त मंडळावर, विश्वस्त प्रदेशांवर कारभार करणारीं राष्ट्रें व कारभार न करणारीं राष्ट्रें यांची संख्या समान राहील इतकींच राष्ट्रें आमसभा निवडते. विश्वस्त मंडळाची सभा वर्षांतून कमींत कमी दोन वेळा व्हावीच लागते. प्रत्येक बैठकींत तिच्या अध्यक्षाची निवड करण्यांत येते. मंडळांत प्रत्येक सभासद-राष्ट्रास एक मत असतें. सगळे निर्णय हजर असलेल्या सभासदांच्या बहुमताने घेण्यांत येतात.

## मंडळाच्या कार्याचें स्वरूप

विश्वस्त मंडळ विश्वस्त प्रदेशांच्या कारभारावर देखरेख करून त्या प्रदेशांचें संरक्षण करतें. कारभार पाहणाऱ्या राष्ट्रांकडून मंडळ अहवाल मिळवितें. लोकांच्या तक्रारी ऐकून त्यांची चौकशी करण्यासाठी वहिवाट करणाऱ्या राष्ट्रामार्फत प्रयत्न करतें. मंडळाचे सभासद अधूनमधून कारभार पाहणाऱ्या राष्ट्राशीं सल्लामसलत करून योग्य समयीं विश्वस्त प्रदेशांना भेट देतात. हें मंडळ विश्वस्त प्रदेशांतील राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीविषयी प्रश्नावली तयार करून माहिती गोळा करतें. विश्वस्त प्रदेशांचे

अहवाल आमसभेंत दाखल होतात. तेथे अहवालांवर चर्चा होऊन शिफारसी करण्यांत येतात. कारभार पाहणाऱ्या राष्ट्राने जर विश्वस्त प्रदेशांत लष्करी ठाणीं उभारलीं तर त्यांची माहिती विश्वस्त मंडळाला देण्यांत येत नाहीं. विश्वस्त प्रदेशांना योग्य वेळीं स्वातंत्र्य दिलें जातें. १ जानेवारी, १९६० या दिवशीं फ्रान्सच्या देखरेखीखाली असलेल्या फ्रेंच कॅमरूनला स्वातंत्र्य देण्यांत आलें. पुढील वर्षभरांत आणखी पांच प्रदेश स्वतंत्र होतील असें मानण्यांत येत आहे.

## ( ५ ) आंतरराष्ट्रीय न्यायालय ( International Court of Justice ).

आंतरराष्ट्रीय तंटे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार न्याय्यपणें मिटविणें हा यूनोचा एक उद्देश आहे. त्यामुळे सदरहू न्यायालय हें यूनोचें एक महत्त्वाचें अंग आहे. या न्यायालयांत १५ न्यायाधीश असतात. आमसभा व सुरक्षा मंडळ स्वतंत्रपणें मतदान करून या न्यायाधीशांची निवड करतात. ही निवड नऊ वर्षांसाठी होते. एकाच राष्ट्राचे दोन न्यायाधीश असतां कामा नयेत असा नियम आहे. प्रत्येक न्यायाधीश त्याच्या देशाने ठरविलेली सर्वोच्च पात्रता धारण करणारा व कायद्यांत निष्णात असावयास हवा, असाहि नियम आहे.

### न्यायालयाचें कार्य

सगळीं राष्ट्रें सार्वभौम असल्यामुळे सगळेच तंटे या न्यायालयापुढे आणण्याची सक्ती राष्ट्रांवर करतां येत नाहीं. कोणत्याहि दोन राष्ट्रांमध्ये झालेल्या कराराच्या अर्थाबाबत मतभेद उत्पन्न झाला, आंतरराष्ट्रीय नियमांचें पालन झालें नाहीं, आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सिद्धान्ताबावत विवाद उत्पन्न झाला, तर त्या तक्रारी ह्या न्यायालयासमोर आणतां येतात. ज्या राष्ट्रांनी ह्या न्यायालयाचा अधिकार मान्य केलेला असतो त्यांना न्यायालयाचे निर्णय मानावे लागतात. कित्येक प्रसंगीं न्यायालयाच्या अधिकाराचा सशर्त स्वीकार करण्यांत येतो. सुरक्षा मंडळ व आमसभा ह्यांना हें न्यायालय कायद्याच्या प्रश्नांविषयी सल्ला देतें.

### न्यायालयाची कार्यपद्धति

न्यायालयाचे न्यायाधीश तीन वर्षांसाठी आपला अध्यक्ष निवडतात. कोणत्याहि खटल्याच्या सुनावणीच्या वेळीं कमींत कमी ९ न्यायाधीश हजर असणें आवश्यक असतें. ज्या दोन राष्ट्रांतील तंट्याचा निवाडा करावयाचा असेल त्या दोन राष्ट्रांपैकी एकाचा न्यायाधीश जर न्यायालयांत अगोदरच असेल तर दुसऱ्या राष्ट्राचा न्यायाधीशहि त्या खटल्याच्या कामकाजापुरता घेतला जातो. सबंध वर्षभर ह्या कोर्टाचें कामकाज चालू असतें. हें आंतरराष्ट्रीय न्यायालय नेदर्लंड्‌समधील हेग या शहरीं भरतें. परंतु दुसऱ्या शहरींहि हें कोर्ट भरूं शकतें. या न्यायालयाचा क्वचितच उपयोग होतो.

**सचिवालय** ( Secretariat )

यूनो सनदेच्या ९७ व्या कलमानुसार सचिवालयांत प्रमुख सचिव व तिच्याच्या काम-काजासाठीं आवश्यक तितके अधिकारी असतात. सुरक्षा मंडळ प्रथम प्रमुख सचिवाची निवड करतें. मग त्याच्या नांवाला आमसभेने संमति दिल्यावर त्याची नेमणूक होते. आणि मग प्रमुख सचिव आमसभेने केलेल्या नियमांनुसार दुसऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करतो. नेमणूक करतेवेळीं उच्च दर्जाची कार्यक्षमता, लायकी, प्रामाणिकपणा हे गुण विचारांत घेतले जातात. प्रादेशिक प्रतिनिधित्वहि कांही अंशीं लक्षांत घेतलें जातें. सचिवालयांत ८ खातीं असून प्रत्येक खात्याचा प्रमुख म्हणून साहाय्यक सचिव ( Assistant Secretary General ) असतो.

**यूनोच्या कार्यक्षमतेचा आधारस्तंभ—सचिवालय !**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यांत आणणाऱ्या कोणत्याहि बाबीकडे ‘ यूनो ’ सनदेच्या ९९ व्या कलमानुसार प्रमुख सचिव सुरक्षा मंडळाचें लक्ष वेधूं शकतो. प्रमुख सचिव यूनोच्या कार्याविषयीं वार्षिक अहवाल तयार करून तो आमसभेस सादर करतो. बहुमतवाल्या सभासद-राष्ट्रांच्या विनंतीवरून अथवा सुरक्षा मंडळाच्या सूचनेवरून त्यास बैठकी बोलाविण्याचा अधिकार सचिवालयास असतो. यूनोच्या विविध मंडळांच्या कार्यांची नोंद ठेवण्याचें कार्य सचिवालय करतें. यूनोचें सचिवालय म्हणजे यूनोच्या कार्यक्षमतेचा महत्त्वाचा आधारस्तंभ होय !

**यूनोचें यशापयश व यूनोचें भवितव्य**

संयुक्त राष्ट्रसंघटनेची रचना, तिचे उद्देश, तिच्याशीं संलग्न असलेल्या इतर संघटना व त्यांचें कार्य ह्यांविषयी आपण येथवर माहिती मिळविली. यूनोचे उद्देश उदात्त व मानवाच्या सुखसमृद्धीची वाढ करणारे आहेत. ते अंमलांत आणण्याच्या हेतूनें योग्य सोयीसवलती विचारांतीं निश्चित केल्या गेल्या आहेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेस १५ वर्षें लोटलीं आहेत. ह्या कालावधींत तिनें कांही बाबतींत यश मिळविलें आहे तर कांही बाबतींत तिला अपयश आलें आहे. परंतु, यूनोमुळे जागतिक शांततेची भक्कम पायावर उभारणी झालेली आहे असें मुळीसुद्धा म्हणतां येणार नाहीं.

**यूनोचें आजपर्यंतचें रचनात्मक कार्य**

यूनोच्या स्थापनेनंतर तिसरें महायुद्ध घडवून आणूं शकणाऱ्या पॅलेस्टाईन, कोरिया, सुवेझ, काश्मीर इत्यादि कित्येक संघर्षमय घटना होऊन गेल्या. तथापि, यूनोच्या प्रयत्नांमुळे युद्धाचा डोंब उसळला नाहीं. यूनोच्या आर्थिक व सामाजिक मंडळानें तसेंच इतर घटक-संघटनांनीहि पुष्कळच विधायक व सुंदर कार्य केलें आहे. मानवी हक्कांचा जाहीरनामा तयार करण्यांत आला असून दरवर्षी १० डिसेंबरला मानवी हक्कदिन साजरा करून

जगांतील लोक मानवी हक्कांवरील आपली अनन्यनिष्ठा व्यक्त करीत आहेत. 'यूनो'-दिन २४ ऑक्टोबरला पाळण्यांत येऊन यूनोवरील आणि जागतिक शांततेवरील विश्वास व्यक्त करण्यांत येतो. जगांतल्या मागासलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक, तांत्रिक प्रगतीसाठी गेल्या वर्षी १० कोटी डॉलर्सच्या एका खास फंडाची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. त्यांपैकी ८० लाख डॉलर्सच्या १३ योजना मंजूर देखील झाल्या आहेत. विश्वस्त मंडळाच्या प्रयत्नांमुळे घाना, गिनी वगैरे कित्येक स्वतंत्र राष्ट्रांचा जागतिक संघटनेंत अंतर्भाव झालेला असून येत्या वर्षभरांत टॅगोलँड, सोमालिलँड इत्यादि आफ्रिकेच्या राज्यांना स्वतंत्रता देण्याचा निर्णयहि घेण्यांत आलेला आहे. या संघटनेमार्फत जी तांत्रिक मदत देण्यांत येते तींत अद्यापपर्यंत ८००० तज्ज्ञ व १४ हजार फेलोशिप्स व स्कॉलरशिप्स इतकी मदत १४० राष्ट्रें व प्रदेश यांना करण्यांत आलेली आहे.

## युद्धाची टांगती तलवार कायमच आहे !

असें असूनहि जागतिक शांततेची व सहकार्याची आशा पूर्णपणें फलद्रूप झालेली नाही. कांही लोक तर यूनोस ( Divided Nations ) 'विभक्त राष्ट्रें' असें म्हणतात. आज 'गरम युद्ध' नसलें तरी 'शीत युद्ध' चालूंच आहे. जगांतील बहुसंख्य देश रशिया व अमेरिका यांच्या गटांत विभागले गेले आहेत. आणि त्यांचें शीत युद्ध यूनोंतहि चालूंच आहे. जर्मनीचे दोन भाग झाले आहेत. कोरिया, व्हिएटनाम या राष्ट्रांचेहि तुकडे झाले आहेत. दक्षिण आफ्रिकेचें वर्णभेदाचें धोरण, काश्मीर, गोवा हे न सुटलेले प्रश्न व त्या प्रश्नांविषयी बड्या राष्ट्रांचें पक्षपाती धोरण, अल्जीरियाचें स्वातंत्र्ययुद्ध आणि अल्जीरियाच्या स्वातंत्र्याच्या हक्काविरुद्ध साम्राज्यवाद्यांचें हट्टी धोरण, पोर्तुगालचें वसाहतींबाबतचें धोरण, रशिया व अमेरिका यांचे दरम्यान चालू असलेली शस्त्रास्त्र-स्पर्धा, अण्वस्त्रांचे प्रयोग, लालचीनच्या यूनो-प्रवेशाचा प्रश्न हे सारे प्रश्न म्हणजे जगांत धुमसणाऱ्या अशांततेचीं चिन्हें आहेत. चालू शीतयुद्धांतून गरम युद्धाचा भडका कधी उडेल तें सांगतां येणार नाही.

## यूनोच्या यशस्वितेसाठी पाळावयाचीं पथ्यें

यूनोच्या यशस्वितेसाठी प्रत्येक राष्ट्राने कांही पथ्यें पाळणें अत्यावश्यक आहे.

( १ ) प्रत्येक राष्ट्राने आपल्या सार्वभौमत्वावर कांही बंधनें लादून घेण्यास तयार झालें पाहिजे. निरंकुश सार्वभौमत्व म्हणजे आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील अराजक. देशांतल्या देशांत एखादा तंटा उद्‌भवल्यास तो अपक्ष न्यायालयामार्फत कायद्यानुसार मिटूं शकतो. तेथे बळप्रयोगाची जरूरी नसते. देशांत कायद्याचें राज्य चालूं असतें. परंतु सार्वभौमत्वाच्या नांवाखाली आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत 'कायद्याचें राज्य' जुमानलें जात नाही. दुसऱ्या राष्ट्रांचे संबंध ज्यांत गुंतलेले आहेत अशा प्रश्नांचे निर्णय, आंतरराष्ट्रीय तंट्यांचा निकाल, सैन्याच्या

बळावर किंवा युद्धाच्या मार्गाने न लावतां आंतरराष्ट्रीय कायदा व नीति ह्यांच्या नियमां-नुसार अपक्ष मंडळाच्या द्वारा किंवा आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मार्फत सामोपचाराने लावण्याची संवय जगांतील राष्ट्रांनी अंगीं बाणवून घेतली पाहिजे.

(२) कोणत्याहि परिस्थितींत आपण युद्ध पुकारणार नाही अशी प्रतिज्ञा सर्व राष्ट्रांनी केली पाहिजे. भारताने या बाबतींत इतरांनी गिरविण्यासारखा पायंडा पाडला आहे. खेरीज, कोणत्याहि परिस्थितींत आपण कोणत्याहि राष्ट्राशीं युद्ध पुकारणार नाही, असें भारताने स्पष्टपणें जाहीर करून टाकलें आहे. सगळया भांडणतंट्यांचा निकाल शांततेच्या मार्गाने करण्याचा भारत प्रयत्न करीत आहे. सगळया राष्ट्रांनी अंतःकरणपूर्वक भारतासारखें प्रकट निवेदन करावयास पाहिजे.

(३) पंडित नेहरूप्रणीत पंचशील तत्त्वांचा स्वीकार सगळया राष्ट्रांनी करावयास हवा. जर सारीं राष्ट्रें त्या तत्त्वांप्रमाणे वागूं लागलीं तर आपण जागतिक शांतता कायमची स्थापन करण्याच्या ध्येयाच्या पुष्कळच जवळ पोहोचूं शकूं.

पंचशील तत्त्वें अशीं आहेतः—

१. राष्ट्राराष्ट्रांनी परस्परांच्या सार्वभौमत्वाचा स्वीकार करून प्रत्येक राष्ट्राच्या अखंडत्वाबद्दल इतर राष्ट्रांनी आदर बाळगावा.

२. कोणत्याहि राष्ट्रावर आक्रमण करण्याची बुद्धि बाळगूं नये.

३. देशाच्या अंतर्गत कारभाराचे बाबतींत ढवळाढवळ करूं नये.

४. परस्परांची समानता व हितसंबंध पाळावेत.

व ५. शांततापूर्ण सहजीवन सर्वांनी उपभोगावें.

सध्याच्या परिस्थितींत ह्या सिद्धान्तांचा स्वीकार व त्यांचें पालन अतिशय जरूरीचें आहे. याखेरीज शस्त्रास्त्रस्पर्धेचा त्याग करणें, विश्वनागरिकत्वाची भावना मनांत वागविणें, पूज्य गांधीजींच्या सत्य-अहिंसेच्या सिद्धान्तांचें पालन करणें ह्या गोष्टीदेखील खऱ्या अर्थाने जागतिक शांतता स्थापण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत.

## जागतिक शांततेचीं प्रसादचिन्हें !

जागतिक शांततेच्या आशेचीं किरणें क्षितिजावर दिसूं लागलीं आहेत. ख्रुश्चेव्ह अधिकारावर आल्यापासून रशियाचीं पावलें शांततेकडे वळूं लागलीं आहेत. ख्रुश्चेव्हची अमेरिकेस भेट, यूनोच्या आमसभेपुढील त्याचें भाषण, ह्या गोष्टी शांततेच्या निदर्शक आहेत. बड्या राष्ट्रांत शिखर परिषदेच्या बाबतींत एकमत झालेलें आहे हेंहि एक सुचिन्हच होय. जागतिक शांततेची जबाबदारी, योग्य वेळीं, बड्या राष्ट्रांवरच सोपविण्यांत आलेली आहे. जर शस्त्रास्त्रस्पर्धा थांबली तर ख्रुश्चेव्हच्या भाषेंत, वार्षिक १०० अब्ज डॉलर्सची बचत होऊन तितकी रक्कम आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या कार्यासाठीं

वापरतां येईल. ‘ यूनो ’चे एक वेळचे प्रमुख सचिव श्री. ट्रिग्वे ली एकदा असें रास्तपणें म्हणाले होते की, आपल्याला “ जीवन व मृत्यु यांच्यांत निवड करावयाची आहे. यूनोचें अपयश म्हणजे जागतिक शांततेचें अपयश व विनाशाचा विजय. ” जगांतल्या लोकांनी जागतिक शांतता स्थापण्याच्या दृढ निश्चयानें लोकमत संघटित करून यूनोंत आपला आवाज उठविला पाहिजे. तसें झाल्यास बड्या राष्ट्रांनाहि लोकमतास धिक्कारतां येणार नाही. यूनोचे दोष मान्य करूनहि तिच्यावर विश्वास ठेवून तिला मजबूत बनविण्याचा सर्वांनी निर्धार करावयास हवा. या दिशेने भारतानें पंचशील सिद्धान्तांचा पुरस्कार करून आदर्श धडा घालून दिला आहे. जर जगांतील सारीं राष्ट्रें पंचशील सिद्धान्तांचें मनापासून, निष्ठेने पालन करतील तर जागतिक शांतता स्थापन करतां येईल हें निःसंशय !

## अभ्यासाचीं साधनें

1. The Pattern of World Conflict–Arnold.
2. International Relations between the Two World Wars – 1919–1939 – Carr.
3. Dynamics of International Relations – Haas.
4. A short History of International Organisation – Mancone.
5. United Nations for the Classroom – Jones.
6. The United Nations in Action – Chase.
७. जागतिक राजकारणांत भारत – ना. य. डोळे.
८. यूनो – ना. य. डोळे.
९. युनोची कार्यपद्धति – टॉम गाल्ट.
१०. तिसऱ्या महायुद्धाच्या छायेंत – य. न. केळकर

## प्रकरण सातवें

# आधुनिक विचारसरणी

### १ स्वातंत्र्यवाद

व्यक्ति-स्वातंत्र्यवादाचा उद्गम आणि विकास जवळजवळ अठराव्या शतकाच्या अखेरीस आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस झाला. या विचारसरणीनुसार राज्यसंस्था आणि व्यक्ति ह्या दोहोंत व्यक्तीस विशेष प्राधान्य देण्यांत येतें. या विचारसरणींत व्यक्ति आणि व्यक्ति-स्वातंत्र्य यांना विशेष महत्त्व देण्यांत आलें आहे. राज्यास "एक अरिष्ट" मानलें असून त्याचवेळीं राज्यसंस्था ही अनिवार्य आहे, असेंहि मानण्यांत आलें आहे. राज्यसंस्था जर नसेल तर मनुष्य आपल्या नैसर्गिक स्वार्थी स्वभावानुसार दुसऱ्यांचें अकल्याण करील, दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेईल आणि परिणामीं गुन्ह्यांचें प्रमाण वाढून लोकांची मालमत्ता सुरक्षित राहणार नाही. यासाठी राज्यसंस्था अस्तित्वांत असणें आवश्यक आहे. परंतु, तिची अधिकार-कक्षा, तिची सत्ता मर्यादित करावयास हवी. कारण असें की, जितकें राज्याचें कार्यक्षेत्र वाढेल तितकें व्यक्ति-स्वातंत्र्य कमी होईल. यासाठी मारामारी, दंगेधोपे, लूटमार, चोऱ्यामाऱ्या, इत्यादींपासून लोकांच्या जीविताचें, त्यांच्या स्वातंत्र्याचें, वित्ताचें आणि मालमत्तेचें संरक्षण करण्याच्या कार्यापुरतेंच राज्यसंस्थेचें कार्यक्षेत्र असावें. ज्या सरकारची हुकमत कमींत कमी असते तें सर्वोत्कृष्ट सरकार होय ("That Government is best which governs least"), अशी एकंदरीने या सिद्धान्तांतील विचारसरणी आहे. अशा प्रकारच्या राज्याला पोलिस-राज्य असेंहि म्हणतात. अशा राज्याचें मुख्य कार्य देशांत शांतता व व्यवस्था राखणें आणि देशाचें संरक्षण करणें हें असतें. आर्थिक क्षेत्रांतहि अशा राज्याने ढवळाढवळ करावयाची नसते. शिवाय, शिक्षण, आरोग्य, सुखसमृद्धि तसेंच लोककल्याणाचीं इतर कार्येंदेखील ह्या राज्याने हाताळावयाचीं नसतात.

अठराव्या शतकांत आर्थिक क्षेत्रांत व्यापारवादाची विचारसरणी प्रचलित होती. या विचारसरणीप्रमाणे सर्व आर्थिक बाबींवर राज्याचें नियंत्रण असे आणि नियम – निर्बंध सर्वव्यापी असत. व्यापारउदीम, उद्योगधंदे, आयात-निर्यात वगैरे बाबतींत असंख्य नियम करण्यांत आले होते. परिणामीं, व्यापारउदिमांचा विकास खुंटला होता. फ्रान्समध्ये प्रवृत्तिवाद्यांनी (Physiocrates) आणि इंग्लंडमध्ये ॲडॅम स्मिथने या निर्बंधांना विरोध केला आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या सिद्धान्ताचें – आर्थिक क्षेत्रांतील स्वातंत्र्यवादाचें (Lesseiz Faire) प्रतिपादन केलें. हा अर्थव्यवस्थेचा सिद्धान्त म्हणजे स्वातंत्र्यवादाच्या सिद्धान्ताचा पाया होय. शिवाय युरोपांतील राज्यांत अनिर्बंध राज्यकारभार चालत असे. त्याला विरोध

म्हणूनहि हा सिद्धान्त मांडण्यांत आला. या सिद्धान्ताचें प्रतिपादन इंग्लंडमध्ये रिकार्डो, हर्बर्ट स्पेन्सर आणि जॉन स्टुअर्ट मिल यांनी, व जर्मनींत कांट आणि विल्यम् हंबोल्ट यांनी केलें. या सिद्धान्ताचें समर्थन राजकीय, आर्थिक, नैतिक आणि वैज्ञानिक अशा विविध दृष्टिकोणांतून करण्यांत आलें आहे.

## राजकीय दृष्टीने स्वातंत्र्यवादाचें समर्थन

सतराव्या आणि अठराव्या शतकांत राजांच्या ईश्वरदत्त हक्कांची विचारसरणी रूढ होती. आपण ईश्वराचे प्रतिनिधी या नात्याने राज्य करीत आहोंत, असे सगळे राजे मानीत असत. परिणामीं, आपण कुणाचेंहि अकल्याण करूं शकणार नाही, असें ते सांगत. ते सर्वस्वीं स्व–तंत्र होते; सत्तेचा उपयोग बेजबाबदारपणें करीत असत. ते लोकांच्या स्वातंत्र्यावर घाला घालीत आणि लोकांच्या खाजगी जीवनांतहि हस्तक्षेप करीत असत. त्याचा परिणाम असा झाला की, राजेशाहीचे विरोधक राज्यसत्ता दूषणास्पद मानूं लागले आणि सरतेशेवटीं सगळ्याच सत्ता दूषणास्पद मानल्या जाऊं लागल्या. विरोधकांनी व्यक्ति व व्यक्तीचे हक्क यांवर भर दिला. व्यक्तींना त्यांच्या हक्कांची हमी देण्याचें व त्यांचें संरक्षण करण्याचें कार्य राज्याचें आहे, असें या नव्या विचारसरणीच्या पाठिराख्यांनी स्पष्ट केलें. व्यक्तीवर लादलीं गेलेलीं बंधनें, नियंत्रणें राज्याने दूर करावयास हवींत आणि कायद्यांची संख्या कमी करावयास हवी; राज्यसंस्थेमुळे व्यक्तिस्वातंत्र्य कोणत्याहि प्रकारें घटतां कामा नये; अशा प्रकारें राज्याचें कार्य निषेधात्मक असावयास हवें म्हणजेच व्यक्ति–स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या अडीअडचणी दूर करणें हें राज्याचें कार्य असावयास हवें; व्यक्तीस तिच्या इच्छेनुसार वागण्याची मुभा असावयास हवी कारण व्यक्ति तिच्या शरिराची आणि मनाची पूर्णपणें मालक असते; अशी ही नवी विचारसरणी पुढे आली.

जॉन् स्टुअर्ट मिल हा प्रागतिक स्वातंत्र्यवादाचा प्रचारक होता. त्याचा "On Liberty" या नांवाचा निबंध हा या विषयावरील विवेचनाचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. हा निबंध म्हणजे सर्व प्रकारच्या सर्वाधिकारशाहीच्या विरोधाचा आणि स्वातंत्र्य–सिद्धान्ताचा जणूं एक जाहीरनामाच होय. राज्यकर्त्यांकडून होणाऱ्या अत्याचारांपासून संरक्षण म्हणजे स्वातंत्र्य. मिल म्हणतो की, व्यक्तीस केवळ स्वसंरक्षणासाठीच व्यक्तिगत रीतीने किंवा सामूहिकरीत्या दुसऱ्या व्यक्तींच्या कृत्यांची, उलाढालींची दखल घ्यावी लागते. सुसंस्कृत समाजांत एखाद्या व्यक्तीचें कृत्य जेव्हा इतर सर्वांना तापदायक होणारें असतें तेव्हाच त्या व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध सत्तेचा उपयोग होऊं शकतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या वागण्याचा संबंध दुसऱ्या व्यक्तींशीं येतो तेव्हाच ती व्यक्ति स्वतःच्या वर्तनाच्या बाबतींत समाजाला जबाबदार असते. नाहीतर स्वतःवरच परिणाम घडवून आणणारीं कृत्यें करण्यास ती सर्वथैव मोकळीच असते. राज्याने 'पोलिस' कार्यें करावींत, दुसरें कांही एक

करूं नये. व्यक्तीवरील सामाजिक सत्तेच्या मर्यादांची चर्चा करतांना मिल लिहितो की, जोपर्यंत वैयक्तिक कृत्यांचा परिणाम केवळ व्यक्तीपुरताच मर्यादित असतो तोपर्यंत व्यक्तीला स्वेच्छेनुसार जगण्याचा अधिकार आहे. मात्र समाजाशीं निगडित असलेल्या जीवनाचे बाबतींत व्यक्ति समाजाधीन असते. मिल हा विकेंद्रीकरणप्रधान लोकप्रिय सरकारचा समर्थक होता. समाजांत व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावा अशी मिलची इच्छा असे. त्यामुळेच त्यानें व्यक्तिगत स्वातंत्र्यावर अधिक भर दिलेला आहे. आणि तो व्यक्ति-स्वातंत्र्याकडे व्यक्तीचें सुख व तिची प्रगति तसेंच समाजाची प्रगति यांचें मुख्य साधन म्हणून पाहतो. लोकशाही आणि व्यक्ति-स्वातंत्र्य-वाद हीं दोन्हीं तत्त्वज्ञानें एकदम अस्तित्वांत आलीं. लोकांना राज्यकारभारांत अधिकाधिक भाग हवा होता. आणि सरकारची सत्ता कमींत कमी असावी अशी लोकांची इच्छा होती. त्यांच्या दृष्टीने किमान अधिकार गाजविणारें सरकार हेंच श्रेष्ठ सरकार होतें.

## आर्थिक दृष्टिकोणांतून व्यक्ति-स्वातंत्र्यवाद

ॲडॅम स्मिथ आणि इतर अर्थशास्त्रज्ञांनी अनिर्बंध अर्थव्यवस्थेची तरफदारी केलेली आहे. खुली स्पर्धा आणि अनियंत्रित उद्योगधंदे आणि व्यापार ह्या गोष्टी सरकारी कायद्याखालील आर्थिक उलाढालींपेक्षा अधिक किफायतशीर असतात. या सिद्धान्तानुसार, व्यक्तीच्या आर्थिक उलाढालींत, व्यापारव्यवहारांत राज्याने किमान लक्ष घालावें. व्यक्तीला तिच्या आर्थिक व्यवहारांत संपूर्ण स्वातंत्र्य द्यावयास हवें. असें केल्याने व्यक्ति व राष्ट्र यांचा आर्थिक दृष्ट्या फायदाच होईल. प्रत्येक व्यक्तीस आपलें स्वतःचें हिताहित चांगल्या प्रकारें समजत असल्यामुळे ती यथाशक्ति द्रव्योत्पादन करील आणि जास्तींत जास्त पैसा मिळविण्यासाठी प्रयत्न करील. आणि जेव्हा सगळे अशा प्रकारें वागूं लागतील तेव्हा व्यक्ति आणि समाज यांचा उत्कर्ष होईल.

अनिर्बंध अर्थव्यवस्थेंत प्रत्येक व्यक्तीला आर्थिक स्वातंत्र्य असतें. कमींत कमी किंमतींत वस्तू खरेदी करण्याची गिऱ्हाइकांची इच्छा असते आणि अधिकाधिक समाधान मिळविण्यासाठी त्यांची धडपड चालू असते. उत्पादकांची दृष्टि, जास्तींत जास्त फायदा कसा मिळवितां येईल, यावर असते आणि ते गिऱ्हाइकांच्या मागणीनुसार वस्तूंचें उत्पादन करीत असतात. ते कमींत कमी खर्चांत वस्तूंचें उत्पादन करून जास्तींत जास्त फायदा मिळवितात. मागणी व पुरवठा यांतील न्यूनाधिक्यावर वस्तूंच्या किंमती निश्चित होत असतात. जमिनीचें भाडें, मजुरांचा पगार, व्याजाचा दर आणि नफा या साऱ्या गोष्टी मागणी आणि पुरवठा यांतील कमीअधिकपणामुळे, अनिर्बंध अर्थव्यवस्थेंत, एका विशिष्ट पातळीवर स्थिरावतात. अशा प्रकारें गिऱ्हाइकें, उत्पादक, भांडवलदार, मजूर, जमीनदार या सर्वांचाच आर्थिक दृष्ट्या फायदा होतो. परिणामीं, राष्ट्राची संपत्ति वाढते. आणि म्हणूनच व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्याचें तत्त्व राज्यसंस्थेने मान्य करावयास हवें.

वरील सिद्धान्ताच्या प्रचारामुळे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्लंडांत व्यापार उद्योगधंदे आणि मजूर-मंडळें यांवर नियंत्रण ठेवणारे सर्व कायदेकानू रद्द करण्यांत आले. त्यामुळे राज्यरक्षित ठेकेदारी पद्धतीचा नाश झाला, युरोपांतील देशांत खुल्या व्यापाराची चलती झाली आणि अमेरिकेंतहि खासगी उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळालें.

## स्वातंत्र्यवादाचा नैतिक दृष्टिकोण

प्रत्येक व्यक्तीस स्वहित चांगल्या प्रकारें कळतें. तिच्या शक्तीच्या विकासासाठी तिला एकटी सोडणें आवश्यक असतें. जर तिच्या स्वातंत्र्यावर नियंत्रणें घातलीं, निर्बंध लादले तर तिची स्वावलंबनाची आणि धाडसाने एखाद्या कामास हात घालण्याची वृत्ति नष्ट होते, तिचा स्वभाव नेभळट बनतो, आणि तिच्या प्रगतीची शक्यता मर्यादित होते. सरकारच्या वाढत जाणाऱ्या हस्तक्षेपामुळे व्यक्तीचें व्यक्तित्व नष्ट होतें. तिच्या क्रियाशील व रचनात्मक वृत्ति कुंठित होतात. स्वातंत्र्याचें वातावरणच व्यक्ति-विकासासाठी योग्य संधि व क्षेत्र प्राप्त करून देतें. मनुष्य निसर्गतःच स्वतंत्र आहे. स्वातंत्र्यावरील निर्बंध विपरीत परिणाम घडवून आणतात. म्हणून व्यक्तीच्या नैतिक प्रगतीसाठी स्वतंत्रता अतिशय आवश्यक आहे.

## स्वातंत्र्यवादाचा शास्त्रीय (वैज्ञानिक) दृष्टिकोण

हर्बर्ट स्पेन्सर व त्याच्यासारख्या दुसऱ्या विचारवंतांनी स्वातंत्र्यवादाची वैज्ञानिक दृष्टिकोणांतून समीक्षा केली आहे. या जगांत प्राणिमात्रांत जीवनार्थ संघर्ष चालू आहे. या संघर्षांत केवळ अतिबलवान् व योग्यतम तोच टिकून राहतो आणि या प्रक्रियेचा परिणाम मानवी प्रगतीवर होतो. म्हणजे राज्याचा हस्तक्षेप नैसर्गिक प्रगतीच्या आड येतो व तिचें नुकसान करतो. व्यक्तीने आपलें स्वतःचें भवितव्य राज्याच्या मदतीशिवाय किंवा नियंत्रणांवांचून घडविलें पाहिजे. यायोगें अयोग्य व्यक्तींचा नाश होईल, ज्या बलवान् असतील तेवढ्याच वांचतील आणि अशा प्रकारें समाजाच्या खऱ्याखुऱ्या हिताचा उत्कर्ष होईल.

हर्बर्ट स्पेन्सर व त्याच्यासारखे विचारवंत असें मानीत असत की, राज्याने निवळ नकारात्मक कार्यें करावींत. म्हणजे असें की, खास जरूरीचीं कामें तेवढींच राज्याने पार पाडावींत, इतर कार्यांच्या भानगडींत राज्याने पडूं नये. स्वच्छता, शिक्षण, ग्रंथालयें, बागबगीचे इत्यादि लोककल्याणकारक कार्यांसाठीहि राज्याने कायदे करूं नयेत. राज्य ही एक अपरिहार्य आपत्ति होय. त्याचें कार्यक्षेत्र, ज्या ज्या प्रमाणांत संस्कृतीचा विकास होईल त्या त्या प्रमाणांत, कमीकमी होत जाईल. राज्याच्या कार्यक्षेत्रांत होणाऱ्या प्रत्येक वाढीचा परिणाम विपरीत झाल्याशिवाय राहणार नाही.

## स्वातंत्र्यवादावरील टीका

राज्य हें एक अरिष्ट असून व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे परिणाम नेहमीच चांगले होतात,

हें स्वातंत्र्यवादाचें म्हणणें खोटें आहे. राज्यसंस्था आणि स्वातंत्र्य या दोन गोष्टी परस्पर-विरोधी नव्हेत. राज्यसंस्था आणि स्वतंत्रता यांना, व्यक्तिवादी लोक, जमाखर्चाच्या वहीच्या उधार व जमा अशा बाजूंप्रमाणे मानतात; पण हें बरोबर नाही. राज्यसंस्था व कायद्याचीं बंधनें यांवरीज स्वतंत्रता संभवतच नाही. आजच्या अत्यंत गुंतागुंतीच्या आणि जटिल जीवनांत औद्योगिक व सामाजिक अन्याय थोपविण्यासाठी राज्याचा हस्तक्षेप अपरिहार्य बनला आहे. अनिर्बंध अर्थव्यवस्थेचा आसरा घेऊन भांडवलदारांनी मजुरांची पिळवणूक चालविली आहे, ती थांबविण्यासाठी प्रत्येक देशांतील राज्यसंस्थेस कायदे करावे लागत आहेत. व्यवहारांत या उभय पक्षांत समान स्पर्धा घडून येतच नाही. भांडवलदारांचें पारडेंच नेहमी जड असतें.

अन्याच व्यक्तींना आपलें हित खरोखर कशांत आहे, तें नीटपणें कळत नाही. भूतकाळांत राज्यसंस्थांनी अमुक चुका केलेल्या असल्यामुळे त्यांची सत्ता कमी करून व्यक्तीस स्वातंत्र्य द्यावें हें म्हणणें रास्त नाही.

## उपसंहार

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाच्या दोषाची प्रतिक्रिया म्हणून स्वातंत्र्यवादाचा जन्म झाला. तत्कालीन लोकशाही क्रांतिकारी चळवळींसाठी तसेंच प्रकृतिवादी ( Physiocrates ) आणि खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते ( Free Traders ) यांच्या आर्थिक विचारसरणीसाठी स्वातंत्र्यवादाने पायारूप कार्य केलें. परंतु, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यांत समाजवादाचा प्रचार झाल्यामुळे आणि सुधारणांसाठी झालेल्या चळवळींमुळे हा सिद्धान्त जुनापुराणा बनला. समाजवादी आणि सुधारणावादी या दोघांनी राज्याचें कार्यक्षेत्र जास्तींत जास्त विस्तृत असावें अशी मागणी केली होती व ते आजही करीत आहेत. सध्याचें राज्य हें ‘ पोलीस राज्य ’ नाही; तथापि तें कल्याणकारी राज्य होण्यासाठी प्रयत्नशील आहे. तें आर्थिक जीवनावर, व्यवहारांवर नियंत्रण ठेवीत आहे, तसेंच मूलभूत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करीत आहे. लोकशाही, समाजवादी, साम्यवादी या विचारसरणींच्या प्रचारामुळे आज प्रत्येक राज्यसंस्था अधिकाधिक लोककल्याणकारी कार्यें करण्याच्या पाठीमागे आहे. तरीदेखील स्वातंत्र्यवादी विचारसरणींत एक बहुमोल सत्य आहे. सध्या दिवसेंदिवस राज्याचें कार्यक्षेत्र खूप वाढण्याचें भय निर्माण झालें आहे आणि त्यामुळे व्यक्ति–स्वातंत्र्यास धोका उत्पन्न झाला आहे.

कोणताहि निर्णय न घेतां सतत एकमेकांशीं पत्रव्यवहार करीत राहणें, एकमेकांना खलिते धाडीत राहणें, काटकसरीचा अभाव, लाच-लुचपत इत्यादि दोषांमुळे आर्थिक क्षेत्रांतहि आज राज्यें मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करीत आहेत. वरील सिद्धान्त म्हणजे अशीं राज्यें व हुकुमशाही यांना दाखविलेला लाल कंदील आहे.

भारतांत नुकताच अस्तित्वांत आलेला स्वतंत्र पक्ष म्हणजे एक परीनें स्वातंत्र्यवादाच्या सिद्धान्तांचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न होय, असें मानावयास हरकत नाही.

## २ लोकशाही (Democracy)

लोकशाही हें अर्वाचीन काळांतील राज्यपद्धतीचें आदर्श स्वरूप आहे. जगांतील जवळजवळ सगळयाच प्रगतिशील देशांनी कोणत्या ना कोणत्या रीतीने लोकशाही राज्य-व्यवस्था स्वीकारलेली आहे. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इत्यादि देशांत लोकशाही राज्ययंत्र आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर वेगवेगळ्या देशांच्या घटनांच्या आधारें घटनासमितीनें लोकशाही घटना तयार केली. मोठी नवलाची गोष्ट अशी की, चीन, रशिया व इतर साम्य-वादी देशदेखील खरीखुरी लोकशाही आपल्याच देशांत आहे, असा दावा मांडतांना आढळतात. उलटपक्षीं, पाकिस्तान, ब्रह्मदेश, ईजिप्त इत्यादि लष्करी राजवट चालू असलेल्या देशांचे सर्वाधिकारी हुकूमशाहासुद्धा, आपलें ध्येय लोकशाहीस पोषक वातावरण निर्माण करून लोकशाही राज्यव्यवस्था स्थापण्याचें आहे, अशा घोषणा करीत आहेत. अशा प्रकारें, एकंदरींत, आज लोकशाही शासनपद्धतीस महत्त्व मिळालें आहे, यांत शंका नाहीं.

### लोकशाहीची व्याख्या

लोकशाही म्हणजे प्रजेने चालविलेला राज्यकारभार. जींत प्रजा सार्वभौम असते अशी ही राजकीय समाज-व्यवस्था आहे. लोकशाहींत अंतिम सत्ता प्रजेची असते. प्राचीन ग्रीकांच्या दृष्टिकोणानुसार लोकशाही म्हणजे, 'अनेक लोकांचे वतीने चालविण्यांत आलेलें सरकार.'

प्रोफेसर शेलीच्या मताप्रमाणे ज्या राज्यव्यवस्थेंत प्रत्येकाला वांटा असतो अशी राज्यव्यवस्था म्हणजे लोकशाही. अमेरिकेचे एक भूतपूर्व अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची एक उत्तम व्याख्या केली आहे. त्यांच्या मताप्रमाणे लोकशाही म्हणजे, 'लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी चालविलेलें लोकांचें सरकार.' लॉर्ड ब्राईसची व्याख्या-देखील महत्त्वाची आहे. त्याच्या सांगण्याप्रमाणे लोकशाही हा राज्यपद्धतीचा असा एक विशिष्ट प्रकार आहे की, ज्यांत राज्यसत्ता कोणत्याहि एकाच वर्गाच्या किंवा अमुक वर्गाच्या हातीं असत नाही, परंतु सामूहिक रीतीने ती सगळ्या वर्गांत विखुरलेली असते. या सगळ्या व्याख्यांचा निष्कर्ष असा सांगतां येईल की, लोकशाही म्हणजे जनतेचें राज्य, लोकराज्य.

### लोकशाहीचे प्रकार

लोकशाहीचे मुख्य प्रकार दोनः— १ प्रत्यक्ष लोकशाही व २ परोक्ष लोकशाही.

### १ प्रत्यक्ष लोकशाही

प्राचीन ग्रीक-नगर-राज्यांत हा प्रकार आढळून येतो. त्या राज्यांत सगळे नागरिक

नगर-राज्य-सभेत एकत्र जमत, सगळया राजकीय प्रश्नांची चर्चा करीत, कायदेकानू पास करीत असत. तेथेच न्यायदानाचेंहि काम होई, युद्ध किंवा संधीचे तहनामे, करारनामे, तेथेच होत. व्यापारउदिमांच्या प्रश्नांची चर्चाहि तेथेच चाले आणि निर्णयहि तेथेच घेतले जात. अधिकाऱ्यांच्या निवडणुका तेथेच होत असत. अशा प्रकारें सगळया नागरिकांना राज्यकारभारांत भाग घेतां येत असे. या नगर-राज्यांत लोकांची इच्छा आणि राज्याची इच्छा ही एकरूप होती.

वरील प्रकारची लोकशाही छोटींछोटीं राज्यें आणि अविकसित समाज यांचेसाठी योग्य आहे. आधुनिक राज्यांत ती अशक्य आहे. सध्या केवळ स्वित्झर्लंडच्या केन्टन एपेंझ, युरी, अन्टरवाल्डन, आणि ग्लेरस येथें प्रत्यक्ष लोकशाही आढळून येते.

## २ परोक्ष लोकशाही

चालू जमान्याला लोकशाहीचा हाच प्रकार सर्वस्वीं योग्य आहे. आधुनिक राज्यें विस्ताराने खूप मोठीं असतात. कल्याणकारी राज्याचा आदर्श आजच्या राज्यसंस्थांनी आपल्या डोळयांसमोर ठेवलेला असल्यामुळे त्यांचें कार्यक्षेत्र खूप विस्तृत बनलें आहे. आणि त्यांत अनेक क्लिष्ट, गुंतागुंतीच्या व बहुरंगी राजकीय प्रश्नांचा निर्णय करण्याची पाळी वारंवार येत असते. लोकसंख्यादेखील आधुनिक राज्यांत इतकी प्रचंड असते की, एका वेळीं सगळे प्रजाजन एकत्र जमून राज्यकारभारांत भाग घेतील हें केवळ अशक्य असतें. परिणामीं, अर्वाचीन युगांत प्रजा स्वतःचे प्रतिनिधी निवडते व त्यांचेकडे राज्यकारभार सोपविण्यांत येतो, जनता आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें राज्यकारभारांत अप्रत्यक्ष रीतीने भाग घेते. प्रतिनिधी जनतेच्या इच्छेस वाचा फोडतात, आणि तदनुसार राज्यकारभाचा गाडा हाकतात. जर लोक व लोकप्रतिनिधी यांच्यांत मतभेद उत्पन्न झाला तर प्रतिनिधींना सर्वसामान्यपणें लोकांच्या इच्छेस मान द्यावा लागतो.

## लोकशाही सरकारचीं लक्षणें

( १ ) विचार, भाषण व लेखन या बाबतींतील स्वातंत्र्य हें लोकशाहीचें आद्य लक्षण आहे. लोकशाही शासनपद्धतींत सरकारास विरोध करण्याचा, स्वतंत्र मत व्यक्त करण्याचा आणि सरकारी कामकाजावर टीका करण्याचा प्रजेचा मूलभूत हक्क मान्य करण्यांत आलेला आहे. त्यासाठीच विरोधी पक्ष म्हणजे लोकशाहीचें एक अपरिहार्य अंग होय, असें मानण्यांत येतें. साम्यवाद्यांच्या लोकशाहींत विरोधी पक्षास अजिबात स्थान नसतें.

( २ ) या राज्यपद्धतींत प्रजेस पसंत नसलेल्या सरकारास सनदशीर मार्गांनी सत्तेवरुन दूर करण्याचा हक्क प्रजेला असतो.

( ३ ) समानतेचें तत्त्व हा लोकशाहीचा पाया होय. सामाजिक, राजकीय व धार्मिक बाबतींत प्रत्येक राष्ट्रिकास समान हक्क असतात. गरीब–श्रीमंत, स्त्री–पुरुष, गोरे-काळे, स्पृश्य–अस्पृश्य अशा प्रकारचे भेदभाव लोकशाहीस मंजूर नाहीत.

( ४ ) लोकशाहींत सर्वच राष्ट्रिकांना कोणत्याहि प्रकारचा भेदाभेद न करतां मूलभूत अधिकार देण्यांत येतात. आणि राज्यांनी नेमलेलीं न्यायालयें त्या हक्क–अधिकारांचें संरक्षण करतात. सगळे प्रौढ राष्ट्रिक स्वतः निवडलेल्या प्रतिनिधींच्या द्वारें राज्यकारभारांत समानतेच्या तत्त्वानुसार भाग घेतात.

( ५ ) लोकशाहींत कायद्याचें राज्य असतें हें लोकशाहीचें एक महत्त्वाचें वैशिष्टय होय. लोकशाहींत 'गेस्टॅपो'सारख्या पोलिसी संस्थांचें भय राष्ट्रिकांना नसतें. फक्त कायद्याचा भंग झाल्यास न्यायालयामार्फत कायद्यानुसार अपराध्यावर खटला चालविला जाऊन गुन्हा शाबीत झाल्यासच गुन्हेगारास शिक्षा होऊं शकते. व्यक्तीचा कोणत्याहि प्रकारचा अपराध नसतांना अगर केवळ संशयावरून व्यक्तीवर खटला न भरतां तीस जन्मभर कैदेंत डांबून ठेवणें लोकशाहींत शक्य नसतें.

( ६ ) सॅबाईन् नांवाचा विख्यात राज्यशास्त्रज्ञ लिहितो की, जगांत एका माणसाच्या हिताचा दुसऱ्याच्या हिताशीं संघर्ष होणें स्वाभाविकच आहे. आणि असे हितसंबंध परस्परविरोधी असतील तर त्यांचा समन्वय साधणें अतिशय आवश्यक ठरतें. लोकशाहींत चर्चा व वाटाघाटी यांच्या द्वारें परस्परांच्या हितसंबंधांचा समन्वय साधण्यांत येतो. बळ हा लोकशाहीचा पाया नसून जनतेची इच्छा हा तिचा पाया होय.

( ७ ) लोकशाहींत ठराविक वर्षांच्या कालावधीनंतर देशांत खुल्या वातावरणांत निवडणुका होतात आणि प्रजेस आपले प्रतिनिधी निवडण्याची संधि मिळते.

( ८ ) लोकशाहींत एकाहून अधिक राजकीय पक्ष असणें जरूरीचें असतें व ते तसे असतातहि.

पंडित जवाहरलाल नेहरू लोकशाहीचीं चार लक्षणें आवश्यक मानतात. तीं अशीं :—( अ ) व्यक्ति-स्वातंत्र्य, ( ब ) प्रतिनिधि-युक्त सरकार, ( क ) सामाजिक व आर्थिक समानता आणि ( ड ) भिन्नभिन्न दृष्टिकोणांबद्दल सहानुभूति.

## लोकशाहीचे फायदे

लोकशाही राज्यव्यवस्थेंत सरकार प्रजेस पूर्णपणें जबाबदार असतें. परिणामीं, सरकारी धोरण सबंध प्रजेचें कल्याण साधण्यासाठी आखण्यांत आलेलें असतें; तें विशिष्ट जातीच्या किंवा वर्गाच्या जमातीसाठी नसतें. लोकनियुक्त व लोक-नियंत्रणाखाली असलेले अधिकारी हे अधिक विश्वासार्ह व कार्यक्षम असतात; प्रजेस त्यांच्या हक्कांचें संरक्षण करण्याची व त्यांच्या हिताविषयी मोकळेपणाने मत व्यक्त करण्याची सूटसवलत असेल तर सगळयांच्याच हक्कांचें आणि हिताचें संरक्षण होऊन ते हितसंबंध सहीसलामत राहतात. ह्या दृष्टीने पाहतां इतर कोणत्याहि राज्यव्यवस्थेपेक्षा लोकशाही राज्यव्यवस्थेंत कार्यक्षमता आणि लोककल्याणाची भावना अधिक असते.

समानतेच्या तत्त्वावर लोकशाही उभारलेली असल्यामुळे सरकार कोणत्याहि एखाद्या विशिष्ट वर्गाचें ठेकेदार असत नाही. परंतु, प्रजेंतील सारे वर्ग राज्यकारभारांत सहभागी होऊं शकतात. लोकशाहींत सगळयाच लोकांना समसमान राजकीय हक्क असतात.

बळाच्या पायाचें संमतीच्या पायांत रूपांतर करून लोकशाही सार्वभौम सत्तेला मुरड घालूं शकते. लोकशाहींत राज्य व्यक्तीसाठी असतें, व्यक्ति राज्यासाठी नसते. लोकशाहींत मनुष्याला स्वविकासाला भरपूर संधि असते; व्यक्तीचे ठायीं सुप्त असलेल्या शक्तींच्या विकासाला विशाल क्षेत्र मोकळें असतें.

लोकशाहींत राज्यहित व लोकहित ह्यांचा समन्वय होतो. त्यामुळे प्रजेंत असंतोष फार थोड्या प्रमाणांत भडकतो. लोकशाहींत प्रजेला आपला असंतोष सार्वत्रिक निवडणुका, पोट-निवडणुका, राजकीय पक्ष, सभा, निदर्शनें, भाषणें आणि वर्तमानपत्रें अशा प्रकारच्या सनदशीर मार्गांच्या द्वारें व्यक्त करतां येत असल्यामुळे लोकशाही राज्यांत क्रांतीची भीति कमी असते. आणि सरकार स्वाभाविकपणें प्रजेस जबाबदार असल्यामुळे तें असंतोष नाहीसा करण्याचा प्रयत्न करतें. हा लोकशाहीचा मोठा फायदा होय. हुकूमशाही देशांत प्रजेस आपला असंतोष क्रांति केल्याशिवाय किंवा बळाचा आधार घेतल्याशिवाय इतर कोणत्याहि मार्गांनी व्यक्त करतां येत नाही.

लोकशाही सरकार प्रजेचें जीवनमान सुधारण्यासाठी व प्रजेचा उत्कर्ष साधण्यासाठी बहुविध प्रयत्न करतें. जाहीर गोष्टींत प्रजा लक्ष घालते. राज्यकारभार प्रजानियुक्त प्रतिनिधींच्या हातांमध्ये असल्यामुळे व सरकारहि प्रजेचेंच असल्यामुळे लोकांचें राष्ट्रप्रेम व त्यांचा देशाभिमान हीं प्रज्वलित होतात. लोकशाहीमुळे प्रजेचा आत्मगौरव खडबडून जागा होतो. लावलेयच्या ( Laveleye ) मतानुसार फ्रान्समध्ये क्रांति झाल्यानंतर जेव्हा प्रजा राज्यकारभारांत सहभागी झाली तेव्हापासून फ्रेंच लोक फ्रान्सवर अंतःकरणपूर्वक प्रेम करूं लागले.

अब्राहम लिंकनने असें म्हटलें आहे की, जगांतील कांही लोकांना तुम्ही नेहमीच फसवूं शकतां, सगळया लोकांना फार थोड्या वेळां फसवूं शकतां, परंतु सगळयांनाच तुम्ही नेहमी फसवूं शकत नाही. ह्या विधानांतील तत्त्व लोकशाहीच्या दृष्टीने लाल कंदिलासारखें आहे. आणि म्हणूनच लोकशाही जनतेच्या हितासाठीच कार्य करते.

राजकीय मताधिकार मिळाल्यामुळे नागरिकांची प्रतिष्ठा वाढते, असें ब्राईसचें मत आहे. लोकशाहींतच स्वातंत्र्याचें खरेंखुरें वातावरण उपलब्ध होऊं शकतें आणि राष्ट्रिकांना त्यांच्या व्यक्तित्वाच्या विकासाला उत्तम संधि प्राप्त होऊं शकते. कारण लोकशाहींत कोणत्याहि एकाच पक्षाचें कायमचें राज्य असत नाही. 'गेस्टॅपो 'सारख्या संस्था ऊर्फ

केंद्यांच्या छावण्या लोकशाहींत आढळून येत नाहीत. तसेंच कोणत्याहि व्यक्तीवर विचार किंवा मतें लादण्यांत येत नाहीत.

## लोकशाहीचे तोटे

पाकिस्तानचे एके काळचे प्रमुख जनरल मिर्झा यांनी म्हटलें होतें कीं, " शिक्षणाशिवाय लोकशाही म्हणजे निव्वळ ढोंगीपणा होय " ( Democracy without education is a hypocracy without limitation ).

आफ्रिका व आशिया या खंडांतील बहुसंख्य देशांतलें साक्षरतेचें प्रमाण खूपच कमी आहे. भारतांत केवळ २४ टक्के लोक शिक्षित आहेत. त्यामुळे पश्चिम युरोपीय देशांतल्यासारखी मजबूत व निर्दोष लोकशाही आफ्रिका व आशिया खंडांत स्थापन करण्याची आशा व्यर्थ आहे. आणि जोपर्यंत शिक्षणाचें प्रमाण वाढत नाही व लोकशाहीचा स्वीकार व प्रसार करण्यास लोकांची मानसिक तयारी होत नाही, तोपर्यंत सर्वांगपूर्ण, निर्दोष व भक्कम लोकशाही, हें केवळ स्वप्नच राहील. देशाच्या प्रगतीची भिस्त राजकारणी पुरुषांवर असते. परंतु, लोकशाहींत गुणांपेक्षा संख्येला अधिक महत्त्व देण्यांत येतें. परिणामीं, पुष्कळदां, सामर्थ्यसंपन्न, कार्यकुशल आणि प्रामाणिक पुढाऱ्यांच्या ऐवजी नालायक लोक निवडणुकांत विजयी होतात; व सत्तेचीं सूत्रें त्यांचे हातीं जाऊन पडतात. आणि हे संधिसाधु लोक सत्तेचा उपयोग स्वार्थासाठी करतात. हें लक्षांत घेऊन तेलीरानें (Telleyrand) लोकशाहीची व्याख्या ' दुष्ट लोकांचें कुलीन तंत्र ' अशी केली आहे. हें लोकशाहीला मोठें आव्हान होय.

लोकशाहींत जेव्हा दोहोंहून अधिक पक्ष निवडणुका लढवितात व जेव्हा कोणत्याहि पक्षाला निर्विवाद बहुमत मिळत नाही, तेव्हा देशांत संमिश्र प्रधान-मंडळें अस्तित्वांत येतात. परंतु तीं देशास अन्तीं हानिकारक ठरतात. कारण तीं अस्थिर व निष्प्रभ असतात. फ्रान्समध्ये दुसऱ्या युद्धानंतर वेगवेगळ्या पक्षांचीं सुमारें पंचवीस प्रधान-मंडळें आलीं आणि गेलीं. आपल्या शेजारच्या देशांत–पाकिस्तानांत १९४७ पासून ते १९५८ पर्यंतच्या काळावधींत आठ सरकारें राज्य करून गेलीं. अशा घटनांचा परिणाम असा होतो कीं, सरकार कोणतेंहि एकच राजकीय, आर्थिक आणि सामाजिक धोरण आखूं शकत नाही; लोककल्याणाचीं कार्यें होऊं शकत नाहीत; लोकशाहीवरील लोकांचा विश्वास उडूं लागतो व लोकशाही सरकारचें अस्तित्व धोक्यांत येतें. सरदार पणिक्कर[1] लिहितात की, " जेव्हा लोकशाही संस्था केवळ देखाव्यापुरत्या नाममात्र बनून जातात अगर जेव्हा त्या प्रजेच्या समक्ष आपली प्रतिष्ठा गमावून बसतात, तेव्हा लष्करी राजवट अस्तित्वांत येते. "

लोकशाहींत कार्य अतिशय मंदगतीने होतें. अनेक विचारवंत याबाबतींत असें कटाक्षाने सांगतात की, अशा मंदगतीमुळे लोकशाही हें निर्णय न लावणाऱ्या पत्र-

1. Popular Government.

व्यवहारांचें, खलित्यांचें राज्य बनतें. युद्धाच्या किंवा आणीबाणीच्या वेळीं हें धोरण धोकादायक ठरतें. अपारस्थ्याच्या आर्थिक प्रगतीसाठीहि लोकशाही योग्य मानण्यांत येत नाही. लोकशाहीचे टीकाकार आपल्या टीकेच्या समर्थनासाठी रशिया व साम्यवादी चीनच्या द्रुतगति आर्थिक प्रगतीचा दाखला पुढे करतात.

हेन्री मेन नांवाचा लेखक आपल्या एका पुस्तकांत[1] लोकशाहीवर कडक टीका करतो. लोकशाही प्रौढ मताधिकारावर मदार ठेवते. हा प्रौढ मताधिकार म्हणजे निर्दय राज्यशासनाचा पाया होय. लोकशाही बुद्धिमंतांच्या आणि विज्ञानाच्या प्रगतीस मुळीच पोषक नाही. लोकशाही सरकारें कला, विज्ञान व संस्कृति यांच्या विकासांतील विघ्नें होत. लोकशाहीचें कित्येकदा टोळीशाहींत रूपांतर होत असतें.

लेकी (Lecky) नांवाचा लेखक लोकशाहीला गरीब, अडाणी आणि दुबळ्या लोकांचें सरकार असें म्हणतो. कारण समाजांत अशाच लोकांची बहुसंख्या असते. मानसशास्त्राच्या दृष्टिकोणांतूनहि समानतेच्या तत्त्वावर टीका करण्यांत येते. अमेरिकेंत करण्यांत आलेल्या एका पाहणींत शेंकडा ४॥ टक्के लोक कुशाग्र बुद्धीचे सापडले, ३० टक्के सर्वसामान्य बुद्धिवंतांपेक्षा कांही अंशीं अधिक बुद्धिमान् आढळून आले तर सर्वसाधारण बुद्धि असणाऱ्यांची संख्या ६० टक्के आढळून आली. या हिशेबानुसार पाहतां लोकशाहींत सर्वसामान्य बुद्धीचीं माणसें राज्यकारभाराचा गाडा हाकीत असतात, असें दिसेल. परंतु, लोकशाहीचें जटिल, गुंतागुंतीचें राज्ययंत्र चालविण्यास अशीं सामान्य बुद्धीचीं माणसें असमर्थ असतात.

श्री. जयप्रकाश नारायण आणि पूज्य विनोबा भावे यांसारखे नेते लोकशाहीच्या विकेंद्रीकरणावर भर देतात. सत्तेचें विकेंद्रीकरण होऊन ग्रामपंचायती आणि स्थानिक संस्था यांचेकडे जर सत्ता सुपूर्त करण्यांत आली तरच खरीखुरी लोकशाही अस्तित्वांत येईल. लोकशाहींतील पक्षपद्धतीसहि वरीलसारख्या नेत्यांचा विरोध आहे.

लॉर्ड ब्राईसच्या मतें आधुनिक लोकशाही राज्यपद्धतींत खालील दोष आहेत.

१ राज्यकारभार, कायदेकानू व न्यायालयें भ्रष्ट करणारी आर्थिक वशिलेबाजी.

२ राजकारणास एक धंदा बनवून टाकणारी वृत्ति.

३ राज्यकारभारांतील खर्चिकपणा व काटकसरीचा अभाव.

४ समानतेच्या तत्त्वाचें विकृतीकरण व राज्यकारभारांतील कार्यक्षमतेचें महत्त्व पारखण्याच्या बाबतींतील अपयश.

---

1. The Afro-Asian States & their Problems.

५. कायदेकानू पास करण्याच्या वेळीं आणि कायदेभंग होऊं नये यासाठी तरतुदी करण्याच्या वेळीं राजकीय पुढारी व विधिमंडळांतील सभासद यांची मतांसाठी करारमदार करण्याची वृत्ति.

लोकशाहींत वर दर्शविलेले दोष असूनहि दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या राज्यव्यवस्थे-पेक्षा लोकशाही राज्यव्यवस्था अधिक स्वीकरणीय आहे. लोकशाहींत स्वतंत्रतेचें वातावरण असतें. आणि प्रत्येकास आपल्या विकासासाठी योग्य संधि व क्षेत्र हीं मिळतात. त्याखेरीज लोकशाहींतील दोष हे अपरिहार्य वा कायमच्या स्वरूपाचे असतात, असें नाही. बरेचसे दोष सहजपणें निवारतां येण्यासारखे असतात. प्रजेला योग्य शिक्षण दिलें गेल्यास आणि राजकीय जागृति झाल्यास प्रजा योग्य, चारित्र्यसंपन्न, प्रामाणिक, निःस्वार्थी आणि सेवातत्पर व्यक्तींनाच आपले प्रतिनिधी म्हणून निवडील यांत शंका नाही. परिणामीं, राज्यकारभारांतहि कार्यक्षमता येईल. जीं दोन महायुद्धें होऊन गेलीं त्यांत लोकशाही देशांना विजय मिळालेला आहे. ह्या गोष्टीवरून असें स्पष्ट दिसतें की, बिकट परिस्थितींत लोकशाहीच टिकून राहते. कला, विज्ञान, आणि संस्कृति यांची भरभराट लोकशाहीच्या शांततामय, स्वतंत्र व मोकळया वातावरणांतच होऊं शकते. जगांत शांतता स्थापण्यासाठी लोकशाहीचे प्रयत्न चालू आहेत. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा सिद्धान्तहि मान्य करण्यांत आला आहे. आणि तो प्रत्यक्षांत उतरविण्यांतहि आला आहे. सगळया लोकशाही देशांत स्थानिक स्वराज्याच्या संस्थांना संपूर्ण उत्तेजन देण्यांत आलें असून त्या संस्था अतिशय उत्साहाने कार्य करीत आहेत. त्यामुळे प्रजेस लोकशाहीचे धडे मिळत आहेत. लोकशाहींत प्रत्येक व्यक्तीस समानता देण्यांत येते. प्रत्येक स्वरूपाच्या राजकीय व्यवस्थेंत थोडेफार दोष असतातच आणि त्याप्रमाणे लोकशाहींतहि वर दर्शविल्याप्रमाणे दोष आहेत. तरीमुद्धा लॉर्ड ब्राईस म्हणतो त्याप्रमाणे, लोकशाहीच्या विरोधकांना अजूनपर्यंत लोकशाहीहून श्रेष्ठ असा पर्याय सुचवितां आलेला नाही.

लोकशाहींत कोणत्या प्रकारचें सरकार असतें त्याची चर्चा आपण वर केली. परंतु खऱ्याखुऱ्या लोकशाहीसाठी आर्थिक व सामाजिक समानतेची जरूरी असते. भारताने समाजवादी समाजरचनेचें ध्येय आपल्यासमोर ठेवलें आहे. त्यांत लोकशाही व समाजवाद यांचा समन्वय झालेला आहे.

## लोकशाही आणि भारत

भारत हें जगांतील सर्वांत मोठें लोकशाही राष्ट्र आहे. भारतीय घटनेने प्रौढ मताधिकाराच्या धोरणाचा स्वीकार करून अठरा कोटी जनतेस मताधिकार दिलेला आहे. सगळया नागरिकांना भाषण, विचार, आणि लेखन ह्याविषयींचें स्वातंत्र्य तसेंच दुसरे मूलभूत हक्क देऊन सर्वांना व्यक्तित्वाच्या विकासाची पुरेपूर संधि दिलेली आहे. व्यक्ति

स्वातंत्र्याचें तत्त्व पुरस्कारण्यांत आलें आहे. खास अपवादात्मक परिस्थितींतच एखाद्यास कायद्यानुसार अटक करण्यांत येते. कोणत्याहि राष्ट्रिकास मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोचतां येतें. धर्माचे बाबतींत सरकार तटस्थ आहे. अस्पृश्यता नष्ट करून सामाजिक समतेचें तत्त्व मान्य करण्यांत आलें आहे. आर्थिक योजना आखून प्रजेची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत. उलटपक्षीं, देशांतील बहुसंख्य जनता अशिक्षित आहे. घटनेने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याचें ठरविलें आहे. परंतु, त्या तत्त्वाचा अंमल अद्यापि संपूर्णतः सुरू होऊं शकलेला नाही. जातीयवादी वृत्ति आणि अस्पृश्यता अद्यापि समाजांतून पूर्णपणें नष्ट झालेल्या नाहीत. लोकांचें आर्थिक जीवन-मान अतिशय निकृष्ट आहे. परंतु, भारताने समाजवादी पद्धतीच्या समाजरचनेचें तत्त्व मान्य केलेलें असून तें तत्त्व म्हणजे भारताचा 'ध्रुवतारा' होय. आणि देशांत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांवरून असें सिद्ध झालें आहे की, लोक आपल्या मताधिकाराचा उपयोग योग्य प्रकारें करतात. आज भारत म्हणजे आशियांतील देशांतील स्थिर व यशस्वी लोकशाहीचा उज्ज्वल दाखला आहे. एका विदेशी पंडिताने भारताच्या लोकशाहीची प्रशंसा करतांना असें म्हटलें आहे की, दिल्ली ही लोकशाहीचे पाठ देणारी आशिया खंडांतील शाळा होय, असें पंडित नेहरू यत्किंचितहि अतिशयोक्ति न करतां निःसंशय सांगू शकतील.

आज आशियांतील बहुसंख्य देशांतील लोकशाही राजवटी धोक्यांत आल्या आहेत. लोकशाही तणातणीच्या, कटकटींच्या काळांतून पार पडत आहे. अशा धोक्याच्या समयीं आचार्य कृपलानींचे पुढील उद्गार विशेष उल्लेखनीय व संस्मरणीय वाटतातः—

"जर आज मानवसमाजांतल्या कोणत्याहि एखाद्या वर्गाला समान संधि व समान हक्क देण्यांत आले नाहीत तर रशिया व चीन येथे झाल्या तशा रक्तरंजित क्रांत्या होतील आणि अशा क्रांत्या राजकीय स्वतंत्रतेचा (लोकशाहीचा) बळी घेऊन समतेचें युग सुरू करतील."

## ३. भांडवलशाही (Capitalism)

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडांत व युरोपांतील देशांत औद्योगिक क्रांति झाली व तिचा एक परिणाम म्हणून भांडवलशाहीचा जन्म झाला.

भांडवलशाही समाजव्यवस्थेंत जमीन, उद्योगधंदे आणि उत्पादनाचीं इतर साधनें खासगी मालकीचीं असतात. तीं साधनें म्हणजे खासगी पेढ्यांची मालमत्ता बनून जाते आणि त्या खासगी पेढ्या त्यांचा उपयोग नफा मिळविण्याच्या हेतूने करतात. जेव्हा प्राप्तीच्या अनुरोधाने कांही देवाणघेवाण होते, तेव्हा तींत मुख्य मोजदाद नफ्याची होत असते. प्रत्येक उत्पादकाला त्याच्या इच्छेनुसार वस्तूंचें उत्पादन करण्याचें स्वातंत्र्य

भांडवलशाहींत असतें. फायदा मिळविण्यासाठी नागरिकांना परस्परांशीं करारमदार करतां येतात. भांडवलशाही पद्धतींत उत्पादन, वांटणी, विनिमय ( देवघेव ) व वापर याबाबतींतील निर्णय विविध आर्थिक संघटना स्वतंत्रपणें घेत असतात. आणि या संघटना अनियंत्रित असतात. त्यांचेवर राज्याचें अथवा इतर कोणत्याहि नियोजनमंडळाचें बंधन नसतें. थोडक्यांत, औद्योगिक व कारभारविषयक संस्थांच्या विकासांत एक अशी परिस्थिति उभी राहते की, जींत श्रमजीवी वर्गाकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी असत नाही आणि मूठभर भांडवलदार आपल्या संपत्तीच्या जोरावर जमीन, यंत्रें व मजूरवर्ग यांवर नियंत्रणें लादून श्रमजीवी लोकांचा उपयोग वैयक्तिक नफ्यासाठी करून घेतात; भांडवलदारांच्या सदिच्छा व त्यांची मेहेरबानी यांवर त्या श्रमजीवी लोकांना स्वतःचा उदरनिर्वाह, स्वतःची सुरक्षितता, आणि वैयक्तिक स्वातंत्र्य इत्यादि बाबतींत भिस्त ठेवावी लागते; तशा प्रकारच्या परिस्थितीस आपण ' भांडवलशाही ' या नांवाने ओळखतों.

## भांडवलशाहीचीं लक्षणें

( १ ) खाजगी मिळकत आणि वारसा पद्धति हीं भांडवलशाहीचीं प्रमुख लक्षणें होत. या पद्धतींत व्यक्तीस मिळकत प्राप्त करण्याचा व तिचा यथेच्छ उपभोग घेण्याचा हक्क असतो. मिळकत वारसापद्धतीनेहि मिळूं शकते.

( २ ) उत्पादनाच्या साधनांची मालकी खाजगी व्यक्तींकडे असते. जास्तींत जास्त नफा मिळविण्याच्या हेतूने व्यक्ति उत्पादन-साधनें हाताळतात. प्रत्येक उत्पादकास स्वेच्छेनुसार वस्तूंचें उत्पादन करण्याचें स्वातंत्र्य असतें. भांडवलदारांचें लक्ष केवळ नफ्यावर खिळलेलें असतें आणि त्यामुळे अनेकदा ते समाजाचे हित विसरून निव्वळ फायदा पदरांत पाडून घेण्यासाठी समाजावर अनर्थ ओढविणाऱ्या वस्तूंचेंहि उत्पादन करतात.

( ३ ) भांडवलशाही वेगवेगळ्या वर्गांना, गटांना जन्म देते. भांडवलशाहीमुळे भांडवलदार आणि श्रमजीवी अशा दोन वर्गांत समाज विभागला जातो.

( ४ ) ही पद्धति आर्थिक स्वातंत्र्याचें स्वागत करते. खासगीरीत्या आर्थिक जोखीम स्वीकारण्याची मुभा, करार-स्वातंत्र्य आणि खासगी प्राप्ति करण्याचा हक्क या गोष्टींचा समावेश आर्थिक स्वातंत्र्यांत होतो. प्रत्येक व्यक्ति स्वेच्छेनुसार धंदाउद्योग करूं शकते, फायद्यासाठी दुसऱ्या नागरिकांशीं ती करार करूं शकते आणि प्रत्येक व्यक्तीला कमाईचा यथेच्छ उपभोग घेण्याची मुभा असते.

( ५ ) समन्वयाचा अभाव हें भांडवलशाहीचें एक महत्त्वाचें लक्षण होय. आर्थिक व्यवहारांचें संचालन एकाच केंद्राकडून होत नसतें. आर्थिक बाबींसंबंधीचे निर्णय अनेक योजक स्वतंत्रपणें घेतात. एक योजक काय निर्णय घेतो त्याची दुसऱ्याला माहिती-देखील नसते. योजकाच्या इच्छेनुसार वस्तूंचें उत्पादन करण्यांत येतें. खरेदी करणाऱ्या

गिऱ्हाइकांच्या आवडी-निवडींचा परिणाम वस्तूंच्या उत्पादनावर होत असतो. कारण भांडवलशाही पद्धतींत खरेदी करणारास त्याच्या पसंतीनुसार वस्तु खरेदी करण्याचें स्वातंत्र्य असतें. वस्तूंच्या वापरावर नियंत्रण असत नाही. या पद्धतींत खरेदी करणाऱ्यास म्हणजे वस्तूंचा वापर करणाऱ्यास पूर्ण स्वातंत्र्य असतें. कशाचें उत्पादन करावयाचें व कशाचें थांबवावयाचें यासंबंधीचा निर्णय खरेदीदाराच्या पसंतीवर अवलंबून असतो. ग्राहक आपली पसंती-नापसंती मागणीच्या द्वारें प्रकट करतात आणि मागणींतील फेरफारांनुसार किंमतींत चढउतार होत असतात. तसेंच, मागणींतील फेरबदल लक्षांत घेऊन उत्पादक वस्तूंचें उत्पादन वाढवावयाचें की कमी करावयाचें तें ठरवितात. अशा प्रकारें ग्राहकवर्ग व उत्पादकवर्ग यांवर वस्तूंच्या किंमतींचा परिणाम होत असतो आणि त्यामुळे ही पद्धति मूल्य-निष्ठ व्यवस्था ( Government by Price ) या नांवाने ओळखली जाते.

( ६ ) या पद्धतींत योजकांचें स्थान अतिशय महत्त्वाचें असतें. उत्पादनाचीं साधनें, यंत्रें इत्यादि त्यांच्या ताब्यांत असतात. योजक म्हणजे वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतींतील समाजाचा एकमेव दलाल होय. प्रत्येक वस्तूच्या उत्पादनाचा तोच आधार असतो.

( ७ ) या पद्धतींत आर्थिक, साहसी उलाढालींवर, व्यापारावर नियंत्रण असतें. व्यक्तीने जितक्या प्रमाणांत आर्थिक साहस केलेलें असेल, तितक्याच प्रमाणांत तिचें व्यापारावर नियंत्रण असावें, हा भांडवलशाहीचा सुवर्ण-नियम समजण्यांत येतो. त्याचप्रमाणे या पद्धतींत भावी काळांत वस्तूला कितीशी मागणी राहील त्यासंबंधी अंदाज बांधून भांडवलदार वस्तूंचें उत्पादन करतात व आर्थिक धाडस करतात. असे अंदाज केव्हा बरोबर ठरतात तर केव्हा चुकीचेहि ठरतात.

( ८ ) व्यापारांत व उद्योगधंद्यांत संपूर्ण स्पर्धा हें या पद्धतीचें एक महत्त्वाचें लक्षण होय. प्रत्येक क्षेत्रांत चढाओढ चालू असते. एका व्यापाऱ्यास दुसऱ्याशीं, एका गिऱ्हाइकास दुसऱ्या गिऱ्हाइकाशीं व एका मजुरास दुसऱ्या मजुराशीं स्पर्धा करावी लागते. व अशा स्पर्धेमुळे वस्तूची समतोल किंमत व मजुरीचे दर निश्चित होतात.

( ९ ) या पद्धतींत वेगवेगळ्या घटकांच्या हितसंबंधांमुळे त्यांच्या त्यांच्या स्वार्था-नुसार भिन्नभिन्न संघटना निर्माण होतात. उदाहरणार्थ, कामगार-संघटना स्थापून मजूर संघटित होतात. अशा संघटना मजुरांच्या हितासाठी नेहमी भांडवलदारांशीं लढत असतात आणि मजुरांच्या हिताचें संरक्षण करतात. उलटपक्षीं, भांडवलदारवर्गहि आपल्या हितरक्षणा-साठी मंडळें स्थापन करतो. अशा प्रकारें या पद्धतींत स्पर्धा आणि संघटना ह्या एकमे-कींशीं निगडित असतात.

( १० ) मक्तेदारी पद्धति या ना त्या स्वरूपांत भांडवलशाहींत दिसून येते. जास्तींत जास्त नफा मिळविण्यासाठी मक्तेदारी अस्तित्वांत येते. ट्रस्ट, सिन्डिकेट अशांसारख्या

संघटना उभारण्यांत येतात. आणि अशा प्रकारें उत्पादनांत वाढ करून, किंमती नक्की करून भांडवलदार जास्तींत जास्त नफा मिळवितात. परंतु, या प्रकारामुळे समाजाची पिळवणूक होते.

## भांडवलशाहीचे फायदे

( १ ) भांडवलशाहीची तरफदारी करणारे लोक, वस्तूंची विपुलता आणि विविधता या गोष्टींकडे भांडवलशाहीपासून होणारा फायदा म्हणून बोट दाखवितात. फायद्याची दृष्टि म्हणजेच द्रव्यलोभ भांडवलदारांना नवीन आर्थिक धाडसें करण्यास आणि जोखीम स्वीकारण्यास प्रवृत्त करतो. परिणामीं, उत्पादनाचीं नवीन नवीन क्षेत्रें काबीज करण्यांत येतात. त्यामुळे लोकांचें राहणीमान उंचावतें; छानछोकी, पोक, वाढतात. त्यांतून उत्पादनाच्या नवीन साधनांचें संशोधन होतें व देशाचा विकास होतो. अशा प्रकारें भांडवलशाही जणू समाजसेवाच करते.

( २ ) समाजाच्या मर्यादित साधनांचा कार्यक्षमतेने, काटकसरीने व अधिकाधिक काळजीपूर्वक उपयोग करण्यांत येतो.

( ३ ) संपूर्ण व खुल्या स्पर्धेमुळे खरेदीदारांचा फारच फायदा होतो. खरेदीदारांचें नियंत्रण हें या पद्धतीस लोकशाही स्वरूप प्राप्त करून देतें. गिऱ्हाइकांच्या पसंतीनुसार उत्पादन करण्यांत येतें व गिऱ्हाइकें आपापल्या क्रयशक्तीनुसार वस्तूंची खरेदी करतात, आणि स्वेच्छेनुसार त्यांचा वापर करतात.

( ४ ) भांडवलशाहींत बंधनें, नियंत्रणें यांचेबरोबर जोखीमहि स्वीकारावें लागतें. त्यामुळे आर्थिक प्रश्नांसंबंधीचे निर्णय अतिशय सावधगिरीने व काळजीपूर्वक घेतले जातात.

## भांडवलशाहीवरील टीका, भांडवलशाहीचे दोष

( १ ) भांडवलशाही व्यवस्थेत खाजगी मिळकतीवरील हक्कास मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यामुळे प्राप्तींतील विषमता निर्माण होते. आणि आर्थिक विषमतेमुळे समाजांतल्या फार मोठ्या वर्गाची अनेक जीवनावश्यक वस्तूंविषयींची मागणी परिणामकारक ठरत नाही.

( २ ) या पद्धतीमुळे होणाऱ्या आर्थिक उत्पातांमुळे देशाची अर्थव्यवस्था विस्कळित होते. तेजीमंदीचे चढउतार ठराविक क्रमाने येऊं लागतात. आणि त्यांच्यामुळे उत्पादनव्यवस्थेचा विकास रोखला जातो.

( ३ ) मर्यादित साधनांचा उपयोग, या व्यवस्थेत, वैयक्तिक नफ्याचा हेतु डोळ्यांसमोर ठेवून केला जातो. सामाजिक फायदा साधण्यांत येत नाही. कारण समाजकल्याणाची दृष्टिच भांडवलशाहींत नसते. मौल्यवान खनिजें, तेल, कोळसा इत्यादींचा

खर्च होऊन राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष होतें. ह्या वस्तूंची बेसुमार निर्यात करण्यांत येते. आणि त्यांच्या पुरवठ्याच्या बाबतींत भावी काळांत चणचण भासूं लागेल किंवा काय ही बाब विचारांतच घेतली जात नाहीं.

(४) स्पर्धा हें भांडवलशाहीचें अनिवार्य व महत्त्वाचें लक्षण होय. स्पर्धेचे जसे फायदे होतात, तसेच तोटेहि होतात. स्पर्धेमुळे वस्तूंचा अपव्यय होतो. जाहिरात, प्रचार यांचेमागे फार पैसा खर्च होतो आणि स्पर्धेच्या प्रमाणांत सामाजिक कल्याण साधत नाही.

(५) कामगारांच्या नोकरीची सुरक्षितता, शाश्वति भांडवलशाहींत नसते. भांडवलदार वाटेल तेव्हा कामगारांना बडतर्फ करूं शकतात. अशा प्रकारें भांडवलशाही व्यवस्थेंत कामगारांना नेहमी टांगत्या तरवारीखाली काम करणें भाग पडतें.

(६) भांडवलशाहीने समाजांत वर्गविग्रहाचीं बीजें पेरलीं आहेत आणि त्यामुळे अशांतता निर्माण झाली आहे. भांडवलशाहीने समाजाचीं, भांडवलदारांचा वर्ग व कामगारांचा वर्ग, अशीं दोन छकलें पाडलीं आहेत. या दोन्ही वर्गांचे हितसंबंध परस्पर-विरुद्ध असल्यामुळे या दोन वर्गांत नेहमी लढा चालू असतो व ते एकमेकांना एकमेकांचे शत्रु मानतात.

(७) मिळकतीच्या विभागणींतील विषमता हा भांडवलशाहीचा सर्वांत मोठा दोष होय. श्री. जी. डी. एच्. कोल यांचें मतें भांडवलदारांचें सुख आणि कामगारांचें सुख या दोहोंत बरेंच अंतर असतें. उभयतांच्या सुखाच्या व्याख्येंत बरीच तफावत असते. या समाजव्यवस्थेंत सधन व्यक्ति ऐषारामाचें जीवन घालवूं शकतात तर बहुसंख्य जनतेस सर्वसामान्यपणें निर्वाह करणें देखील कठीण होऊन बसतें. जेव्हा यंत्रें आणि कारखाने निष्क्रिय बनतात, तेव्हा बेकारी गंभीर स्वरूप धारण करते. इकडे लोकांच्या प्राथमिक गरजा भागत नसतात, लोक उपाशीपोटीं मरत असतात, तर तिकडे वस्तूंचे भाव टिकवून धरण्यासाठी भांडवलदार वस्तूंची होळी करीत असतात !

## उपसंहार

अमेरिका, इंग्लंड इत्यादि देशांत भांडवलशाहीने चांगलीच प्रगति केली आहे, व तिचें आगेकूच चालू आहे. प्रजेचें राहणीमानहि सुधारलें आहे. असें असलें तरीदेखील भांडव-लशाहीस आपलें अस्तित्व टिकवून धरावयाचें असेल तर तिने केवळ नफ्यावर दृष्टि खिळवून काम करण्याच्या वृत्तीला तिलांजलि देऊन समाजहित डोळ्यांसमोर ठेवलें पाहिजे. आधुनिक शासनांनी सामाजिक हित डोळ्यांसमोर ठेवून लोककल्याणासाठी भांडवलशाही प्रवृत्तींवर कायद्याचे निर्बंध लादले आहेत. जर भांडवलदारांनी सामाजिक हित आणि लोककल्याणाची दृष्टि हीं लाथाडलीं तर प्रजा समाजवाद किंवा साम्यवाद या पर्यायांचा स्वीकार करील, यांत शंका नाही.

## ४. समाजवाद ( Socialism )

व्यक्तिवादाच्या विचारसरणीच्या विरुद्ध विचारसरणी म्हणजे समाजवाद होय. एकोणिसाव्या शतकाच्या सुमारास व्यक्तिवादी सिद्धान्ताची प्रतिक्रिया या रूपाने समाजवादाचा जन्म झाला. समाजवादाचीं वेगवेगळीं स्वरूपें आहेत. ह्या स्वरूपांचे दोन वर्ग पडूं शकतात. ( १ ) क्रांतिकारी समाजवादी–यांचा दृष्टिकोण आणि यांची जीवनविषयक दृष्टि ह्या गोष्टी साम्यवाद्यांशीं मिळत्याजुळत्या आहेत व ( २ ) सनदशीर समाजवादी–हे शांततामय व सनदशीर मार्गांच्या द्वारें समाजवादाची स्थापना करण्याचें ध्येय बाळगून त्यासाठी प्रयत्न करीत असतात.

समाजवादाच्या दृष्टीनुसार राज्य हा एक सर्वोच्च व श्रेष्ठ गट ( Unit ) आहे. समाजवादाचीं उद्दिष्टे गांठण्यासाठी आणि सिद्धि मिळविण्यासाठी राज्य आणि त्याच्या संस्था हीं उत्तम साधनें होत. आणि म्हणून राज्यसत्ता प्राप्त करण्यासाठी समाजवाद्यांचे प्रयत्न चाललेले आहेत. सनदशीर समाजवाद्यांचा, प्रजेची समजूत, सनदशीर मार्ग, निवडणुकींतलें यश इत्यादि राज्यसत्ता मिळविण्याच्या मार्गांवर विश्वास असतो. आणि स्वाभाविकपणेंच ते क्रांतीचा किंवा हिंसेचा मार्ग सोडून शांतता व अहिंसा यांचा मार्ग स्वीकारतात. त्यांच्या ध्येय-आदर्शाचा प्रतिपाळ करण्यासाठी लोकशाही शासनपद्धति हाच उत्तम मार्ग होय. लोकशाही साधनांच्या द्वारें समाजवादानें ध्येय गांठण्याची सनदशीर समाजवाद्यांची इच्छा असते. समाजवादाचे पुरस्कर्ते म्हणतात की, ‘ समाजवादाचें मूळ राजकीय लोकशाहींत असावयास हवें ’ ( Socialism must be rooted in political democracy ). लोकमत जागृत व संघटित करून प्रजेचा विश्वास संपादून प्रजेच्या पाठिंब्यानेच समाजवादी सिद्धान्त कार्यवाहींत आणणें हा त्यांचा कार्यक्रम असतो.

लोककल्याण हें समाजवादाचें उद्दिष्ट आहे. विद्यमान भांडवलशाही समाजव्यवस्था बदलून अशी एक वेगळी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था समाजवादी निर्माण करूं इच्छितात की, ज्या व्यवस्थेमुळे केवळ मूठभर भांडवलदार किंवा कोणताहि एखादा विशिष्ट वर्ग यांचें हित न होतां, सबंध जनतेचें हित होईल. समाजाची व अर्थव्यवस्थेची ही नवी घडण प्रजेस बेकारीच्या व उपासमारीच्या भयांतून मुक्त करील. कोणत्याहि एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या वा वर्गाच्या हितावर समाजवाद्यांची दृष्टि खिळलेली नसते. परंतु, सबंध समाजाचें, आम जनतेचें, उपेक्षित जनतेचें कल्याण साधणें हा समाजवाद्यांचा ‘ ध्रुवतारा ’ असतो.

समाजवादाचीं वरील ध्येयें गांठण्याचे उद्देशाने समाजवादी आपल्या कार्यक्रमांत उत्पादनाच्या व वांटणीच्या साधनांच्या राष्ट्रीयीकरणास अग्रस्थान देतात. देशांतील महत्त्वाच्या व मूलभूत उद्योगधंद्यांचें सरकारने राष्ट्रीयीकरण करून ते उद्योगधंदे फायद्याच्या

दृष्टीने न चालवतां सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने चालवावेत. समाजवादी राज्यांत उत्पादनाच्या वांटणीचे नियम सरकारने करावे. परंतु, उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी नेस्तनाबूद करावी. समाजवादांत कोणत्याहि व्यक्तीची अगर वर्गाची पिळवणूक न होतां प्रत्येक व्यक्ति स्वतःच्या शक्तीनुसार कार्य करील व तीस कामाप्रमाणे वेतन मिळेल. "प्रत्येक व्यक्तीकडून तिच्या शक्तीनुसार काम करवून घेणें व प्रत्येकीस तिच्या गरजांप्रमाणे मोबदला देणें," हें समाजवादाचें ध्येय होय.

प्रमुख उद्योगधंदे, बँका, खाणी, दळणवळणाचीं, वाहतुकीचीं साधनें, आणि नैसर्गिक साधनसंपत्ति यांचें राष्ट्रीयीकरण करून समाजाच्या हितासाठी त्यांचा उपयोग करण्यांत येईल. आखलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वरील सर्व उत्पादनाच्या साधनांचा कार्यक्षमतेने आणि विवेकशील बुद्धीने उपयोग करणें, आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम आखणें, या गोष्टींना आधुनिक समाजवाद्यांच्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान असतें. समाजवादी राज्यांत उत्पादनाच्या वांटणीचें नियमनहि सरकार सामाजिक हिताच्या दृष्टींतून करील. थोडक्यांत, समाजवाद्यांचा मुख्य कार्यक्रम म्हणजे महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें हळूहळू राष्ट्रीयीकरण करून सामाजिक हिताच्या दृष्टीने ते चालविणें; संपत्ति व प्राप्ति यांच्यांतील विषमता कमी करणें आणि आर्थिक सत्तेची समप्रमाण विभागणी करणें.

टप्याटप्यांनी समाजवादाची स्थापना करणें हा त्यांचा कार्यक्रम आहे. त्यांचा हिंसेवर विश्वास नाही.

## समाजवादाची कैफियत

भांडवलशाहींत प्राप्ति आणि संधि या बाबतींत विषमता असते. पैसा व शक्ति ह्या गोष्टी मूठभर भांडवलदारांच्या हातांत केन्द्रित झाल्यामुळे श्रमजीवी लोकांनी मेहनत करून ज्या वस्तू निर्माण केलेल्या असतात, त्यांची पुरेपूर किंमत भांडवलदार मोजीत नाहीत. अशा प्रकारें श्रमजीवी लोकांची पिळवणूक करून, त्यांच्या मेहनतीचा फायदा उठवून, भांडवलदार स्वतः वस्तूंच्या जबरदस्त किंमती घेऊन भरपूर नफा पदरांत पाडून घेतात. समाजवाद्यांचा या गोष्टींना विरोध असतो. समाजवादांत जमीन आणि उत्पादनाचीं साधनें यांवर नियंत्रण ठेवण्याचें कार्य सरकारच्या हातीं असल्यामुळे पिळवणुकीच्या पद्धतीचा नायनाट होतो. आणि केवळ मूठभर श्रीमंतांचें किंवा एखाद्या विशिष्ट वर्गाचें कल्याण होण्याऐवजी सर्वंध समाजाचें हित होतें.

भांडवलशाही समाजरचनेंत वस्तूंचें उत्पादन सामाजिक आवश्यकतेच्या अनुरोधाने करण्यांत येत नसतें. त्या समाजरचनेंत आर्थिक नियोजनाचाहि अभाव असतो. तसेंच आर्थिक क्षेत्रांत खुल्या चढाओढीस स्थान देण्यांत येतें. परिणामीं, एखादे वेळेस गरजेहून अधिक उत्पादन होतें, तर एखादे वेळेस एखाद्या वस्तूची टंचाई भासूं लागते. भांडवलशाही

अर्थव्यवस्थेंत तेजीमंदीची चढ-उतार अनिवार्य असते. त्यामुळे बेकारी व उपासमारी यांसारख्या आपत्ति ओढवतात. उलटपक्षीं, समाजवादी अर्थव्यवस्थेंत वस्तूंचें उत्पादन, सर्वसामान्य जनता डोळयांसमोर ठेवून, समाजाच्या गरजांनुसार, पूर्णपणें योजनापूर्वक करण्यांत येतें. परिणामीं, बेकारी व उपासमारी नाहीशी होते. हानिकारक वस्तूंच्या उत्पादनास प्रतिबंध करतां येतो व तेजीमंदीच्या चढ-उतारांपासून अर्थव्यवस्था मुक्त होते.

मक्तेदारी पद्धति हेंहि एक भांडवलशाहीचें वैशिष्ट्य आहे. या पद्धतीमुळे भांडवलदार खूप फायदा मिळवूं शकतात. उत्पादनांत कृत्रिम घट निर्माण करून, गिऱ्हाइकांकडून दामदुप्पट किंमत उकळून, भरपूर नफा भांडवलदार खिशांत घालतात. समाजवादांत अनिर्बंध स्पर्धेस स्थान नाही. समाजवादी पद्धतींत उत्पादनाचीं साधनें सरकारी मालकीचीं असतात व त्यांचा उपयोग लोक-कल्याणासाठीच करण्यांत येतो. त्यामुळे समाजाचा फायदा होतो; उत्पादनाचा खर्च घटतो आणि जीवनावश्यक वस्तू समाजास वाजवी किंमतींस मिळूं शकतात. साहजिकपणेंच, जीवनावश्यक वा उपयुक्त वस्तूंचें उत्पादन कमी करणें हा प्रकारच समाजवादी पद्धतींत असूं शकत नाही.

समाजवादांत व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊं शकेल. व्यक्तीस आपलें व्यक्तित्व सुधारण्यास, समृद्ध, संपन्न करण्यास पुरेपूर संधि देण्यांत येईल. व्यक्ति वैयक्तिक हिताऐवजीं सर्वंध समाजाच्या हिताचा विचार करूं लागेल. वर्गरहित समाजरचना अस्तित्वांत येईल आणि श्रमजीवी लोक आपापलीं कामें उत्साहाने, गोडीने करूं लागतील. उद्योगधंद्यांच्या वहिवाटींत, कारभारांत मजुरांच्या मताला किंमत राहील व त्यांत त्यांचा भागहि असेल. व्यक्तींना आपापल्या विकासासाठी समान संधि मिळाल्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाचा संपूर्ण विकास होऊं शकेल. परिणामीं, समाजाचें ध्येयधोरणहि उच्च प्रकारचें बनेल.

समाजवादी समाजरचनेमुळे लोकशाही सरकार सुदृढ, स्थिर आणि सफल बनतें. आर्थिक समतेखेरीज राजकीय समतेस कांहीच अर्थ नाही. समाजवाद आर्थिक विषमता दूर करून लोकशाही सरकारचा पाया दृढ व मजबूत करतो.

## समाजवादावरील टीका—समाजवादाचे दोष

समाजवाद राज्याची वा सरकारची कार्यक्षमता आणि कार्यशक्ति मोठ्या प्रमाणावर रोखून धरतो; सरकारच्या शक्तींत अंधश्रद्धा शिरते. अनुभवांतीं हें सिद्ध झालें आहे की, सरकारी कार्यपद्धति मंदगतीची व खर्चीक बनते. खेरीज तिला सांचेबंद स्वरूप प्राप्त होतें. सरकारी अधिकाऱ्यांत नवीन प्रयोग करण्याची वृत्ति उरत नाही. आर्थिक उन्नतीसाठी वैयक्तिक क्रियाशीलता व धाडस हीं अत्यंत आवश्यक असतात. उद्योगधंद्यांचें संचालन सरकारनियुक्त अधिकाऱ्यांकडे सोपविण्यांत आल्यास नोकरशाहीचे सर्व दोष त्यांत उतरून

मजुरांवर भांडवलदारांच्या अनिर्बंध सत्तेखाली राबण्याऐवजी अधिकारीवर्गाच्या अनियंत्रित सत्तेखाली राबण्याची पाळी येईल, अशी संभाव्यता वाटते.

भांडवलशाहींत ग्राहकांच्या सार्वभौमत्वाची विचारसरणी मान्य करण्यांत आलेली आहे. त्यांच्या आवडीनिवडींनुसार वस्तूंचें उत्पादन होतें. उलटपक्षीं, समाजवादांत उत्पादनाच्या सगळया साधनांवर सरकारी नियंत्रण असल्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या पसंतीनुसार वस्तूंचें उत्पादन करण्यांत येईल. अशा प्रकारें खरेदीदार गिऱ्हाइकाच्या स्वातंत्र्यास मुरड पडून तो नाडला जाईल. त्याला ज्या वस्तू देण्यांत येतील, ज्या किंमतींत देण्यांत येतील व ज्या प्रमाणांत देण्यांत येतील, तशाच स्वीकारणें त्यास भाग पडेल.

समाजवादी असा दावा मांडतात की, समाजवादी राज्यव्यवस्था स्वीकारणारें राज्य हें खरें लोकशाही राज्य होय. परंतु हा दावा कांही खरा नव्हे. समाजवादी राज्यांत सरकारी सत्ता विशाल असते, व दररोज तींत वाढच होत असते. तशा परिस्थितींत अशा विशाल सत्ताधारी सरकारावर नियंत्रण ठेवण्याचें कार्य जनतेस अतिशय मुष्किलीचें होऊन बसतें. परिणामीं, जनतेस राज्यकारभारांत गोडी वाटत नाही, ती त्यांत कोणत्याहि प्रकारें भाग घेऊं शकत नाही. उलट जनतेसच सरकारी हुकूम पाळावे लागतात. त्यामुळे क्रमशः व्यक्ति-स्वातंत्र्याचा नाश होतो आणि सर्वाधिकारशाही किंवा हुकूमशाही अस्तित्वांत येते.

मानसशास्त्रदृष्टया विचार करतां असें लक्षांत येतें की, समाजवादाची भावना मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे. मिळकतीच्या मालकीची भावना प्रत्येक व्यक्तींत स्वभावतःच असते. परंतु, कांहीसा अपवाद वगळतां, समाजवादांत खाजगी मिळकतीच्या तत्त्वाला मान्यता देण्यांत आलेली नाही. उलट खाजगी मिळकत नष्ट करणें हें समाजवादाचें ध्येय आहे. समाजवादाचा असा मूलभूत सिद्धान्त आहे की, प्रत्येक व्यक्तीने आपापल्या शक्तीनुसार काम करावें आणि जरूरीपुरेंतच वेतन घ्यावें. याचा परिणाम असा होतो की, एखाद्या बलवान् व उद्योगी माणसाने केलेल्या उत्पादनाचा त्याला मिळालेला मोबदला आळशी व दुर्बळ माणसाबरोबर त्याला विभागून, वांटून घ्यावा लागतो; परिणामीं, उद्योगी माणसाची काम करण्याची वृत्ति, शक्ति व कामाबद्दलचा उत्साह हीं हळूहळू नष्ट होतात.

**उपसंहार :**

समाजवादी विचारसरणीची दाट छाप जगांतील भांडवलशाही देशांवर पडलेली आहे. आणि त्या देशांनी भांडवलशाही समाजरचनेचा मुखवटा न बदलतां समाजवादाचीं अनेक तत्त्वें आत्मसात् केलीं आहेत. असें करण्यामागे भांडवलशाही टिकवून धरण्याची दृष्टि आहे. इंग्लंडांत समाजवादी विचारसरणीच्या मजूर पक्षाने १९४५ सालीं सत्ता काबीज केली आणि बँक ऑफ् इंग्लंड, कोळशाच्या खाणी आणि लोखंड-पोलादाचे कारखाने यांचें, मोबदला देऊन, राष्ट्रीयीकरण केलें. आज इंग्लंडांत पुनश्च हुजूर पक्ष सत्तारूढ आहे. तरीहि त्या

पक्षाने बेकारांसाठी विमा-योजना सुरू केली आहे; अपघात, आजारपण, वृद्धावस्था इत्यादींपासून नागरिकांचें संरक्षण व्हावें यासाठी कायदे केलेले आहेत. अमेरिकेने देखील सामाजिक सुरक्षिततेचे कायदे अंमलांत आणले आहेत. भारतांत काँग्रेसने १९५५ सालीं अवाडी येथील अधिवेशनांत समाजवादी स्वरूपाच्या समाजरचनेचा आदर्श स्वीकारलेला आहे. आपल्या घटनेंत देखील, राजनीतीच्या मार्गदर्शक सिद्धान्तांत, संपत्तीच्या व नैसर्गिक साधनांच्या होणाऱ्या केंद्रीकरणास रोखणें, व आर्थिक न्याय देणें या तत्वांचा निर्देश करण्यांत आलेला आहे. आपल्या घटनेचा कल समाजवादाच्या बाजूनेच आहे. पंचवार्षिक योजनांच्या द्वारें सर्वसामान्य माणसाची आर्थिक प्रगति साधून त्याचें राहणीमान सुधारण्याचें, उच्च करण्याचें धोरण पुरस्कारण्यांत आलें आहे. प्राप्ति व संपत्ति यांची विषमता दूर करण्यासाठी भांडवलदारांवर प्राप्तिकर, संपत्तिकर, व्ययकर, बक्षीसकर असे भारी कर लादण्यांत आलेले आहेत. मजुरांचें हित लक्षांत घेऊन तदनुसार कायदे पास करण्यांत आलेले आहेत. आयुर्विमा कंपन्या व इंपीरिअल बँक ऑफ् इंडिया यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें आहे. कंपनीकायद्यांत सुधारणा करून प्रत्यक्षरीत्या उद्योगधंद्यांवरील सरकारी नियंत्रण वाढविण्यांत आलें आहे. आपण मिश्र अर्थव्यवस्थेचें धोरण स्वीकारलेलें आहे. परंतु त्यांत जाहीर क्षेत्राचा वांटा दरवर्षी वाढत आहे. सर्वसामान्यपणें समाजवादी लोक खालच्या थरांतील लोकांच्या हिताच्या अनुषंगानेच कार्यक्रम आखीत असतात.

भारतांत सामाजिक सुरक्षिततेचा कायदा इ. स. १९४८ पासून अंमलांत आलेला आहे. त्यांत आजारपण, प्रसूति, अपघात इत्यादि प्रसंगीं मजुरांना मदत देण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. अशा प्रकारें भारताने समाजवादी स्वरूपाच्या समाजरचनेच्या दिशेने सावकाश परंतु निश्चयाने वाटचालीस सुरवात केली आहे. लोककल्याणाचा आदर्श साध्य करण्यासाठी भारताने यापूर्वी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत व अद्यापिहि भारत त्या दिशेने प्रयत्न करीत आहे.

### ० ५. साम्यवाद ( Communism )

साम्यवादी विचारसरणीचे लोक कार्ल मार्क्सला आपला गुरु मानतात. ते मार्क्स व एंजल्स यांच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' व मार्क्सच्या 'कॅपिटल' या ग्रंथांना पवित्र ग्रंथ समजतात. आता आपण साम्यवादाचे सिद्धान्त पाहूं या.

**१. इतिहासाची भौतिक मीमांसा** ( Materialistic Interpretation of History )

मार्क्सच्या दृष्टीने मानवसमाजाच्या साऱ्या हालचालींचें, घडामोडींचें मूळ जीवनाच्या भौतिक परिस्थितींत असून तें अर्थोत्पादनाच्या पद्धतींत सामावलेलें आहे. राजकीय संघटना, कायदेकानू, धर्म आणि तत्वज्ञान-परंपरा यांच्या रूपरेषांत त्या त्या समाजाच्या आर्थिक

परिस्थितीचें प्रतिबिंब उमटलेलें असतें. मानवी बुद्धीचे हे सारे आविष्कार समाजाच्या आर्थिक परिस्थितीनुसार अस्तित्वांत येत असतात. शील, चारित्र्य, मतांची घडण यांचेवरहि आर्थिक परिस्थितीचा ठसा उमटत असतो. या सिद्धान्तानुसार, सामाजिक व राजकीय क्रांत्या आर्थिक परिस्थितीमुळेच घडून येतात. मार्क्सने या सिद्धान्ताचा उपयोग एक भूतकालीन व दुसरी भविष्यकालीन, अशा दोन क्रांत्या समजावून देण्यासाठी केलेला आहे. मार्क्सचें असें मत आहे की, भूतकालीन क्रांति हा भांडवलदारांचा राजेशाहीविरुद्धचा लढा होता. फ्रान्समधील राज्यक्रांति हें या प्रकारच्या क्रांतीचें उदाहरण आहे. भविष्यकालीन क्रांतींत मजूरवर्ग भांडवलदारांशीं लढेल असें मार्क्सचें भाकित आहे. व्यक्तीवर भौतिक व आर्थिक कारणांमुळे होणारे परिणाम लक्षांत घेऊन मार्क्स इतिहासाच्या गतीचा विचार करतो. साम्यवादी क्रांति अटळ आहे, असें मार्क्सचें मत आहे.

## २. भांडवलाच्या केन्द्रीकरणाचा सिद्धान्त

भांडवलशाही उद्योगधंद्यांचा जसजसा विकास होत जातो, तसतशी भांडवलदारांची संख्या घटत जाते व उद्योगधंद्यांच्या केन्द्रीकरणास उत्तेजन मिळतें. म्हणजे असें की, जे भांडवलदार प्रचंड प्रमाणांत भांडवल गुंतवूं शकतात त्यांच्या हातीं उद्योगधंदे जाऊं लागतात व अशा प्रकारें मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवूं शकणाऱ्या भांडवलदारांची संख्या हळूहळू कमी होऊं लागते. अशा रीतीने मोठे भांडवलदार छोट्या भांडवलदारांना नेस्त-नाबूद करतात. परिणामीं, भांडवल अधिकाधिक प्रमाणांत मूठभर व्यक्तींच्या हातीं केंद्रित होऊं लागतें, भांडवलदारांची संख्या हळूहळू कमी होऊं लागते आणि जे भांडवलदार अशा प्रकारें दूर फेंकले जातात ते शेवटीं कामगारवर्गास जाऊन मिळतात. हा सिद्धान्त कार्ल मार्क्सने शेतीलाहि लागू करून दाखविला आहे. जसजशी जमीनदारांच्या मालकीची जमीन वाढत जाईल तसतशी त्यांची संख्या घटत जाईल, असा मार्क्सचा निष्कर्ष आहे.

## ३. वर्ग-विग्रह

वर्ग-विग्रहाचें अस्तित्व कांहीं नवीन नव्हे, असें मार्क्सचें प्रतिपादन आहे. विग्रह पूर्वीहि सतत अस्तित्वांत होता आणि आजहि आहेच. आजपर्यंतच्या सगळ्या समाजांचा इतिहास हा वर्ग-विग्रहाचाच इतिहास होय. मार्क्समतें भांडवलदारवर्गाचें व मजूरवर्गाचें हित हीं नेहमीच एकमेकांच्या विरुद्ध असतात. प्रत्येक मनुष्यास एक तर पुंजीपति किंवा मजूर तरी व्हावें लागतें. मजूरवर्गापाशीं स्वतःच्या मजुरीखेरीज दुसरें कांहीच असत नाही. भांडवलदारांचा वर्ग स्वार्थासाठी मजूर-वर्गाची पिळवणूक करतो. जसजशी भांडवलशाही आपलें स्वतःचें रूप प्रकट करूं लागते तसातसा पुंजीपति व कामगारवर्ग यांच्यांतील संघर्ष अधिकाधिक गंभीर स्वरूप धारण करूं लागतो. या दोन्ही वर्गांचे हितसंबंध परस्परविरुद्ध असतात, त्यामुळे उभयवर्गांत वर्ग-विरोध उत्पन्न होतो.

अगदी सुरवातीस वर्गविग्रह वैयक्तिक भांडवलदार व वैयक्तिक मजूर यांच्यामध्ये निर्माण होतो. त्यानंतर आस्तेआस्ते कामगारवर्ग स्वतःच्या होणाऱ्या पिळवणुकीच्या प्रतिकारासाठी सुरवातीस स्थानिक स्वरूपाच्या, त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाच्या व सरतेशेवटीं आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संघटना उभारण्यास शिकतो. जेव्हा कामगारवर्गास आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संघटना उभारतां येतील, तेव्हा तो वर्ग पुंजीपतींचा नाश करून वर्गविग्रहांत यश मिळवील. त्यानंतर कामगार लोकांची हुकूमशाही स्थापन होईल व खाजगी मिळकतीचा नाश होईल. सारी जमीन व मालमत्ता सरकारच्या हातीं पडेल, पिळवणुकीच्या धोरणाची इतिश्री होईल, वर्गविहीन समाजरचना अस्तित्वांत येईल आणि सगळे लोक स्वतंत्र होतील.

**४. वाढाव्याचा ( अतिरिक्तमूल्याचा ) सिद्धान्त** ( Theory of Surplus Value )

हा सिद्धान्त एक मूलभूत साम्यवादी सिद्धान्त आहे. मार्क्सने आपल्या ' कॅपिटल ' नामक ग्रन्थांत या सिद्धान्ताविषयी चर्चा केलेली आहे. या सिद्धान्तानुसार केवळ श्रमानेच मूल्य उत्पन्न होतें. भांडवलशाही पद्धतींत मजुरांना त्यांनी उत्पादन केलेल्या वस्तूंची पुरेपूर मोलमजुरी मिळत नाही. त्यांना फक्त चरितार्थापुरतें वेतन मिळतें. अधिक मूल्य पुंजीपति नफा म्हणून खिशांत टाकतात. हें अधिक मूल्य म्हणजे मजुरांनी ज्याचें उत्पादन केलें व त्यांना वेतन म्हणून जें देण्यांत आलें, त्या दोहोंतील फरक असतो. सारांश, अतिरिक्त मूल्याइतकी कामगारांची पिळवणूक पुंजीपति करतात. आणि अशी पिळवणूक हा अर्वाचीन भांडवलशाही पद्धतीमुळे होणारा मोठा अन्याय होय. यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होतात आणि गरीब अधिकाधिक गरीब बनतात.

## ५. साम्यवादाच्या दृष्टिकोणांतून राज्य किंवा सरकार

साम्यवादी लोक राज्यास ' दडपशाही संस्था ' असें म्हणतात. अशा संस्थेंत एक आर्थिक वर्ग दुसऱ्या आर्थिक वर्गावर वर्चस्व प्रस्थापित करून त्याची पिळवणूक करतो. एका वर्गाच्या हितासाठी राज्य किंवा सरकार दुसऱ्या वर्गावर दडपशाही करतें. मार्क्सच्या मतानुसार अर्वाचीन राज्यांचा कारभार म्हणजे भांडवलवाल्यांच्या सर्वसाधारण व्यवहारांची व्यवस्था पाहणारी जणू ' कमिटी ' होय. साम्यवादी लोक राज्यास वर्गीय राजकारणाचें एक साधन असें समजतात. वर्गीय विरोधांचा परिणाम म्हणजे राज्य होय, असें साम्यवाद्यांचें मत आहे.

## ६. श्रमजीवींची सर्वाधिकारशाही

कामगारवर्गाचें पहिलें कार्य म्हणजे सरकारवर हुकमत संपादणें हें होय. आपण वर पाहिलें त्याप्रमाणे वर्गविग्रह अपरिहार्य असून त्या वर्गविग्रहांत सरतेशेवटीं कामगारवर्गाचा विजय होईल, असें मार्क्स मानतो. तथापि, यशस्वी क्रांतीनंतर सरकार मोडून टाकावें

असें मार्क्सचें म्हणणें नाही, तर क्रांतीनंतर कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही प्रस्थापित करावी असें त्याचें म्हणणें आहे. लेनिनच्या मतानुसार शोषकांच्या विरुद्ध साम्यवादी लोक सरकारी यंत्रणा व शस्त्रास्त्रें यांचा तात्पुरता उपयोग करीत असतात. ही सर्वाधिकार-शाही स्थापन झाल्यानंतर भांडवलशाहीचा नाश करण्यांत येईल. उत्पादनाचीं सगळीं साधनें सरकारकडे सोपविण्यांत येतील म्हणजेच तीं कामगार-वर्गाच्या हातीं येतील. एंजल्सच्या मताप्रमाणे जेव्हा सरकारी सत्ता कामगार-वर्ग स्वतःकडे घेईल तेव्हा तो वर्गविरोध व वर्गीय मतभेद यांचा नाश करील. परिणामीं, सरकारचा सरकार या नात्याने शेवट होईल आणि तदनंतर, केवळ संक्रमण-काळापुरती सरकारची जरूरी असते, असें मानण्यांत येऊं लागेल. कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही स्थापन करणें हें कांही साम्यवाद्यांचें अंतिम उद्दिष्ट नाही. तथापि, कामगारांची सर्वाधिकारशाही हें, साम्यवादी समाज, वर्गरहित समाज स्थापन करण्याचें एक साधन आहे, अशी साम्यवाद्यांची विचारप्रणाली आहे.

### ७. राज्याचा लोप होईल

साम्यवादी समाजाची स्थापना झाल्यानंतर कामगारवर्गाच्या सर्वाधिकारशाहीची आवश्यकताच उरणार नाही. म्हणजे राज्य किंवा सरकार यांची जरूरीच राहणार नाही. कारण लेनिनच्या म्हणण्याप्रमाणें, वर्गरहित समाजांत इतरांवर दडपण आणणारी व्यक्ति अस्तित्वांत असणारच नाही. स्वतंत्रता आणि समता यांवर आधारलेला समाज अस्तित्वांत येईल. आणि जेव्हा असा समाज स्थापन होईल तेव्हा वर्गनिष्ठ सर्वाधिकारशाहीची जरूरी उरणार नाही. आणि अशा प्रकारें राज्यास म्हणजे सरकारास कांहीच काम न उरल्यामुळे तें लुप्त होईल म्हणजेच राज्याचा ऊर्फ सरकारी यंत्रणेचा नाश होईल.

## साम्यवाद-एक आंतरराष्ट्रीय आन्दोलन

साम्यवादी विचारसरणी म्हणजे खरोखरच एक आंतरराष्ट्रीय आंदोलन आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोच्या अखेरीस जगांतील कामगारांना साम्यवादाच्या झेंड्याखाली जमून बंड करण्याचें आवाहन करण्यांत आलेलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे की, " साम्यवादी लोक आपले हेतु हिंसक मार्गांचा आश्रय करून तडीस नेतील. साम्यवादी क्रांतीच्या द्वारें शासकवर्गांचा नाश व्हावयास हवा. कामगार-वर्ग स्वतःच्या गुलामीच्या शृंखलांतून कायमचा मुक्त होईल. कामगारांना विश्वविजयी व्हावयाचें आहे. सगळ्या देशांतील कामगारांनी एकत्र यावें." श्री. जी. डी. एच्. कोल् लिहितात की, सगळ्या देशांतील कामगारांनी एकत्र यावें हें आवाहन आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें आहे. ज्या जर्मनांनी सदरहू मॅनिफेस्टोंतील आवाहन मंजूर केलें होतें ते जर्मन लोक म्हणजे आंतरराष्ट्रीय अंतःकरणाचे कामगार होते. त्यांना त्यांच्या देशांतून हांकलून देण्यांत आलेलें होतें व दरम्यानच्या काळांत

ते ज्या देशांत राहत होते त्या देशांतील ( विशेषतः फ्रान्स देशांतील ) कामगार-वर्गाच्या चळवळींत ते पुढाकार घेत असत. थोडक्यांत, कम्युनिस्ट मॅनिफेस्टोंतल्या अखेरच्या शब्दांनी या आंदोलनास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून दिलें.

## साम्यवादावरील टीका

मार्क्सने असें एक भाकित केलें होतें की, साम्यवादी क्रांति मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झालेल्या देशांत होईल. परंतु मार्क्सची ही भविष्यवाणी ऐतिहासिक घटनांनी खोटी पाडली आहे. युगोस्लाव्हियांतील माजी साम्यवादी पुढारी मिलोवान जिलास ( Milovan Djilas ) आपल्या ' दि न्यू क्लास ' नांवाच्या पुस्तकांत असें लिहितात की, भांडवलशाहीची अधिक प्रगति झाल्यामुळे साम्यवादी क्रांत्या झाल्या असें नव्हे, तर उलट ज्या देशांत भांडवलशाहीचा पुरेपूर विकास झालेला नाही, अशा देशांत साम्यवादी क्रांति झालेली आहे. जिलासांनी आपल्या या विधानाच्या पुष्टीसाठी सोव्हियेट रशिया, चीन, आणि युगोस्लाव्हिया या देशांत झालेल्या साम्यवादी क्रांत्यांचे दाखले दिलेले आहेत. या तिन्ही देशांतील क्रांत्यांना तत्कालीन आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकीय कारणें जबाबदार होतीं. परंतु, जिलासांच्या मताप्रमाणे या सर्व क्रांत्यांमागील मूलभूत कारण ' औद्योगिक फेरफारांची निकडीची गरज ' हें होतें.

याखेरीज, दुसऱ्या महायुद्धानंतर लगेच पूर्व जर्मनी, आल्बेनिया, बल्गेरिया, पोलंड, रुमानिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया इत्यादि पूर्व युरोपांतील अनेक देशांवर लाल सैन्याने बळजबरीने साम्यवादी सरकारें लादलीं.

वरील उदाहरणांवरून एक गोष्ट सिद्ध होते ती अशी की, सोव्हिएट रशिया व लाल चीन यांसारख्या साम्यवादी देशांच्या साम्राज्यशाही वृत्तीमुळेहि साम्यवाद अस्तित्वांत येत असतो. थोडक्यांत, साम्यवादी क्रांति आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या आणि औद्योगीकरण न झालेल्या चीन, रशिया यांसारख्या देशांत झालेली आहे. ती ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका यांसारख्या औद्योगीकरण झालेल्या देशांत झालेली नाही. याशिवाय, रशिया व चीन या देशांनी साम्यवाद ज्या देशांवर सक्तीने लादलेला आहे, त्या देशांत त्याने मूळ धरलें आहे. याचा अर्थ असा की, प्रत्यक्षांतल्या घटनांनी मार्क्सचें भाकित चुकीचें ठरविलें आहे.

साम्यवाद्यांच्या आंतरराष्ट्रीयवादावर बर्नस्टाईनने[1] टीका केली आहे. प्रत्येक कामगारास स्वतःची मातृभूमि असते. तो जन्मल्याबरोबर आपल्या देशाचा नागरिक बनतो. त्यामुळे सगळेच कामगार राष्ट्रवादी आहेत. दोन महायुद्धांनी असें सिद्ध केलें आहे की, कामगारवर्ग हा प्रथमतः राष्ट्रवादी आहे. कामगार स्वतःच्या देशासाठी दुसऱ्या देशांतल्या कामगारांशीं लढतात.

---

1. Bernstein–Evolutionary Socialism.

आजचा बुद्धिमान्, कार्यकुशल कामगार मजुरांच्या जगांतील जणू अमीर-उमराव होय. तो अडाणी कामगारांच्या बाजूने उभा राहून भांडवलदारांशीं लढेल किंवा कसें, हा एक प्रश्नच आहे. बुद्धिमान् कामगार म्हणजे छोटेखानी पायावर उभा राहिलेला एक भांडवलदार आहे आणि त्यामुळेच वर्गविग्रहाची तीव्रता भडकलेली नाही. याशिवाय भांडवलदारवर्ग आणि कामगारवर्ग या दोहोंच्या मध्ये मध्यम वर्गासारखे दुसरे वर्ग आहेत. म्हणजे कामगार-वर्ग आणि भांडवलदारवर्ग हे एकमेकांचे शत्रू आहेत. हें सत्य सर्वसाधारण नागरिकाच्या दृष्टीला जाणवत नाही. शिवाय, सामान्य नागरिकास आता वर्गविग्रहांत विशेष गोडी राहिलेली नाही. त्याला फक्त राहणीमान सुधारण्याच्या प्रश्नाबद्दल आस्था वाटत आहे. लिमिटेड कंपन्यांच्या विकासामुळे शेअर खरेदी करून सामान्य मनुष्यदेखील उद्योगधंद्यांच्या मालकींत भागीदार बनूं शकतो. अशा प्रकारें उद्योगधंद्यांच्या मालकीचें विकेन्द्रीकरण झालें आहे.

साम्यवाद्यांच्या मतानुसार सरकार ही एक वर्गीय संस्था आहे. परंतु, प्रत्यक्षांत सरकार ही तशी वर्गीय संस्था नाही. लोकशाही राज्यांत सरकार लोकांच्या इच्छेनुसार चालतें. येथे लोक याचा ' लोकांचे सगळे वर्ग ' असा अर्थ असतो. लोकशाहींत सरकार सर्व वर्गांच्या कल्याणासाठी कार्य करतें, एकाच वर्गाच्या हिताकडे तें पाहत नाही.

साम्यवादी म्हणतात की, साम्यवादाच्या स्थापनेनंतर सरकार लुप्त होईल; सरकारचें अस्तित्व पुसलें जाईल. परंतु प्रत्यक्षांत, पहिलें साम्यवादी सरकार—रशिया—जवळजवळ ४० वर्षांनंतरहि लुप्त झालेलें नाही आणि रशियन सरकारच्या शेवटाचीं चिन्हेंहि अद्यापि दिसत नाहीत.

साम्यवादी देशांत आज साम्यवादी पक्षाचें महत्त्व वाढलें आहे. लेनिनच्या मताप्रमाणे कडक शिस्तबद्ध साम्यवादी पक्ष क्रांतीचें नेतृत्व करतो आणि श्रमजीवींच्या हिताचें संरक्षण करतो. साम्यवादी देशांत साम्यवादी पक्षाव्यतिरिक्त इतर पक्षांना नेस्तनाबूद करण्यांत येतें. स्टॅलिनने एकूण एक विरोधकांचा नायनाट करून स्वतःची हुकूमशाही स्थापन केली होती. अशा प्रकारें साम्यवादी देशांत व्यक्तीस स्वातंत्र्य असत नाही.

अशा रीतीने वर्गरहित समाज स्थापण्याचें साम्यवाद्यांचें ध्येय फलद्रूप झालेलें नाही. फक्त साम्यवादी राज्यांत भांडवलदार-वर्गाच्या ऐवजी साम्यवादी पक्षाच्या हुद्देदारांचा वेगळा वर्ग अस्तित्वांत आलेला आहे. राजकीय वर्गाचे हितसंबंध आणि कामगारवर्गाचे हितसंबंध नेहमी सारखे असत नाहीत. म्हणजे साम्यवादी देशांतमुद्धा वर्गरहित समाज स्थापन होण्याची शक्यता दिसत नाही. याशिवाय दोन साम्यवादी देशांचे हितसंबंध एकसारखे असत नाहीत. उदा० हंगेरी आणि रशिया. हंगेरीच्या जनतेने रशियाच्या सत्तेविरुद्ध बंड पुकारलें होतें. रशियाने तें बंड निर्दयपणें मोडून काढलें. युगोस्लाव्हिया व रशिया यांचे हितसंबंधहि अद्यापि एकरूप नाहीत.

असें असलें तरीदेखील आज भू-गोलाच्या पाठीवरील एक चतुर्थांश प्रदेशावर व जगाच्या पाठीवरील एकतृतीयांश लोकसंख्येवर म्हणजे जवळजवळ ७५ कोटींवर साम्यवाद्यांची सत्ता आहे. अत्यंत निर्धन देशांत साम्यवादाचें फार त्वरेने स्वागत होतें. लोकशाहीचें संरक्षण करावयाचें असेल तर साम्यवादाची आगेकूच थोपवून धरण्यासाठी मागासलेल्या, अविकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास साधण्याची उपाय-योजना अंमलांत आणली पाहिजे. मात्र लष्कर किंवा शस्त्रास्त्रें यांच्या साह्याने साम्यवादाचें पसरणारें लोण थांबवितां येणारें नाही.

## ६. गांधीवाद

राष्ट्रपिता गांधीजी यांनी आपल्या आयुष्यांत तसेंच हिंदवी स्वराज्याच्या लढ्याविषयीं निर्माण झालेल्या प्रश्नांची उकल करण्यासाठी, पश्चिमेच्या जड सिद्धान्तांवर आधारलेल्या कोणत्याहि प्रकारच्या विचारसरणीचा स्वीकार करण्याऐवजी सत्य आणि अहिंसा या सनातन सांस्कृतिक, मूलभूत, भारतीय सिद्धान्ताचा उपयोग केला. आणि हिंदुस्थानाने गांधीजींच्या नेतृत्वाखाली सत्य-अहिंसेच्या मार्गाने, स्वातंत्र्य संपादून जागतिक इतिहासांत अभूतपूर्व यशःसिद्धि मिळविली. गांधीजींनी आपल्या सबंध आयुष्यांत या सिद्धान्ताचें पालन करण्याचे प्रयत्न केले होते. सत्याला गांधीजी ईश्वराचें स्वरूप मानीत असत. आणि त्यामुळे त्यांच्या जीवनास सत्याचे प्रयोग किंवा सत्याचे शोध असें म्हणतां येतें. गांधीवाद ही इतर वादांप्रमाणे कांही निश्चित सिद्धान्तांवर उभारलेली राज्यशासनाची किंवा राज्यकारभाराची विचारसरणी नव्हे. तिला 'एक जीवन-पद्धति' असें म्हणतां येईल. गांधीजींनी त्यांच्या आयुष्यांत, उपस्थित झालेल्या प्रश्नांविषयीं, सत्याच्या शोधांत जे विचार व्यक्त केले, त्यांना आपण कदाचित् गांधीवाद हें नांव देऊं शकूं. तथापि, त्यांचे विचार निश्चित किंवा स्थिर नव्हते. काळवेळ व परिस्थिति यांच्या अनुषंगानें त्यांच्या विचारांत परिवर्तन होत असे. त्यामुळेच इतर वादांप्रमाणे या वादाचें विवरण-निरूपण करतां येणार नाही. इतकेंच नव्हे, तर खुद्द गांधीजींनीच १९३६ सालीं मार्च महिन्यांत सावली येथे गांधीसंघास उद्देशून भाषण करतांना स्पष्ट म्हटलें होतें कीं, "गांधीवाद अशी कांही वस्तु नाहीच. आणि आपल्या पश्चात् एखादा संप्रदाय ठेवून जावें, अशी माझी इच्छाहि नाही. मीं कांही नवें तत्त्व अथवा नवा सिद्धान्त शोधून काढला आहे, असा माझा दावाच नाही. मीं केवळ जीं आपलीं चिरंतन तत्त्वें आहेत तीं आपल्या नित्याच्या जीवनास आणि प्रश्नांस लागू करण्याचा माझ्या पद्धतीने प्रयत्न केलेला आहे......सत्य आणि अहिंसा हीं तत्त्वें अनादि काळापासून चालत आलेलीं आहेत. मीं केवळ माझ्या सामर्थ्यानुसार या दोहोंचे प्रयोग केले आहेत... माझें तत्वज्ञान......मीं वर जें सांगितलें आहे त्यांत येऊन जातें. तुम्ही त्याला गांधीवाद म्हणूं नका. त्यांत वादासारखें कांही नाहीच." गांधीजींचे हे उद्गार ध्यानीं वागवून, वेगवेगळया प्रसंगीं महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी प्रकट केलेले विचार आता आपण पाहूं या.

## गांधीजींची राज्यविषयक कल्पना

गांधीजी सत्य आणि अहिंसा यांचे निष्ठावंत अनुयायी होते. त्यांच्या दृष्टीने राज्यसंस्था हें हिंसेच्या केन्द्रित व व्यवस्थित स्वरूपाचें प्रतीक होय. राज्यसंस्थेच्या बुडाशींच हिंसेचें अस्तित्व अनिवार्यपणें असतें. कोणत्याहि प्रकारच्या लोकशाही राज्यांतसुद्धा हिंसा ही असतेच. आणि हिंसेचें अस्तित्व म्हणजे पिळवणूकहि अपरिहार्य. हिंसाविरहित राज्याची कल्पनाहि करणें शक्य नाही. त्याचप्रमाणे राज्यसंस्थेंत हुकमांचें पालन आवश्यक असतें. हुकूम-भंग करणारास शिक्षा होते. परंतु गांधीजींचें असें म्हणणें आहे की, कोणत्याहि प्रकारचा हुकूम व त्याचें सक्तीचें पालन ह्या गोष्टी नीति-सिद्धान्तांच्या विरुद्ध आहेत. व्यक्तींचें केवळ स्वेच्छापूर्वक वर्तनच नैतिक म्हणतां येईल. अशा प्रकारें राज्यसंस्थेंत हिंसा अटळ असते, व्यक्तींचें वर्तन नीति-विरोधी बनतें. त्यामुळे गांधीजी राज्यसंस्थेच्या अस्तित्वाच्याच विरुद्ध होते. राजकीय दृष्ट्या त्यांना 'अराज्यवादी' देखील म्हणतां येतें. त्यांच्या मतें राज्यहीन व वर्गनिरपेक्ष समाजरचनाच आदर्श होय. अशा समाजव्यवस्थेंत सगळ्या व्यक्ति स्वतंत्रपणें वागतात आणि त्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाचा पूर्णपणें विकास होऊं शकतो. व्यक्ति-समुदाय, गांवें, उभा समाज हे सगळे परस्पर-सहकार्यानें वागतात. त्यामुळे राज्यसंस्थेची आवश्यकता उरत नाही.

पूज्य गांधीजी हे अतिशय व्यवहारी राजपुरुष होते. त्यामुळे आपण कल्पितों तसा आदर्श अहिंसक समाज अस्तित्वांत येणें शक्य नाही, हें गांधीजींना पूर्णपणें ठाऊक होतें. त्यामुळे त्यांनी राज्यसंस्थेची आवश्यकता मान्य केली. ही संस्था हिंसेपासून पूर्णपणें कधीच मुक्त होऊं शकत नाही हें जरी खरें असलें, तरी देखील ती प्राधान्येंकरून अहिंसक असावी, अशी गांधीजींची भावना होती. ते मानीत असत की, "जें कमींत कमी शासन करतें तें सरकार श्रेष्ठ." या सिद्धान्तानुसार विकेन्द्रित सरकार हेंच श्रेष्ठ सरकार होय, असें त्यांचें मत होतें. अशा सरकारांत कांही निवडक व्यक्ती एखाद्या गांवांत किंवा ग्रामसमूहांत स्वतःचा कारभार पाहतात. ज्यांची लोकशाही-भावना व लोकशाहीवरील निष्ठा ह्यांविषयी इतर सगळ्यांना विश्वास वाटत असतो अशींच माणसें कारभार पाहण्या-साठी निवडलीं जातात. हीं माणसें त्या त्या गांवास वा ग्रामसमूहास आवश्यक त्या साऱ्या गोष्टी घडवून आणतात. हें छोटेखानी सरकार एखाद्या मोठ्या कुटुंबाप्रमाणे किंवा एखाद्या सहकारी संस्थेप्रमाणे वागतें. सरकारांतील तसेंच गांवांतील प्रत्येक व्यक्ति सबंध समूहाच्या उत्कर्षांत स्वतःचा उत्कर्ष मानते. अर्थात् प्रत्येक ग्रामसमूह आपल्यापुरतेंच पाहतो, इतरांशीं अलिप्तपणानें वागतो, असें मात्र नव्हे. ग्रामसमूहांचें आपापसांतील संबंध सलोख्याचे व सहकार्याचे असतात. गांधीजी असें सुचवितात की, छोट्याछोट्या ग्रामसमूहांचें एकीकरण करून त्यांचा संघ उभारावा. स्वेच्छापूर्वक सहकार्य व परस्पर-साह्याची भावना हें अशा

संघाचें अधिष्ठान असावें. एका समूहाने इतरांवर वर्चस्व स्थापण्याची भावनाच बाळगूं नये. अशा संघाची रचना पिरॅमिडच्या रचनेमारखी असूं नये तर ती एखाद्या वर्तुळासारखी असावी. म्हणजे असें की, वर्तुळांत जसें केंद्र-बिन्दूस महत्त्व असतें, तसेंच अशा संघरूप वर्तुळांत व्यक्तिरूप केन्द्रबिंदूस महत्त्व असावें. व्यक्तीने ग्रामसमूहासाठी वाटेल तो त्याग करावयास—प्रसंगीं आत्मबलिदान करावयासहि—तयार असावें व अशा त्यागाचा योग्य मोबदला व्यक्तीला देण्यास ग्रामसमूहाने तयार असावें. अखंड समूहजीवन व्यक्तींचेंच बनलेलें असल्यामुळे व्यापक ग्रामसमूहरूप वर्तुळ छोट्या ग्रामरूप वर्तुळास गिळंकृत करीत नाही. उलट अंतर्गत वर्तुळाच्या संरक्षणासाठी बाह्य वर्तुळ अधिक बलशाली बनतें. तें स्वतःचें सामर्थ्य अंतर्वर्तुळांतूनच संपादितें. अशी गांधीजींची अहिंसक राज्याविषयीची कल्पना आहे. ग्राम–स्वराज्य हा तिचा पाया आहे. तींत व्यक्तिविकासाला संपूर्ण वाव आहे. राज्यसंस्थेचें कार्यक्षेत्र न्यूनतम असावें. व्यक्तीला आत्मविकासाला संधि देणें हें राज्यसंस्थेचें मुख्य कर्तव्य आहे. व्यक्तीला दुबळें बनविणारें कोणतेंहि कृत्य राज्यसंस्थेने करतां कामा नये. राज्याच्या कामांतील प्रत्येक वाढ व्यक्ति--विकासाच्या आड येणारी आहे, असें गांधीजी मानीत असत. गांधीजी अशा राज्यास ‘ रामराज्य ’ म्हणत असत. प्रजेचें प्रेम हा रामराज्याचा पाया होय. रामराज्यांत सरकार व प्रजा यांचे परस्परसंबंध प्रेममय असतात. राज्यकारभार हें प्रेमाचें शासन आहे, राजदंड म्हणजे पशुबळ नव्हे तर प्रेमाची गांठ !

गांधीजींचे लोकशाहीविषयक विचारहि समजून घेण्यासारखे आहेत. ‘ डेमॉक्रसी–मनुष्यांची उपस्थिति मोजून प्रजेचें मत समजून घेण्यांत आलें असें ज्या पद्धतींत मानतात ती डेमॉक्रसी–गांधीजींना अजिबात मान्य नाही......प्राचीन काळीं ज्या पद्धतीने ऋषि–मुनि तपश्चर्या करीत असत त्या पद्धतीने जे तपश्चर्या करतात, जे लोकांची सेवा करतात, जे प्रजाहिताची भावना मनीं बाळगतात, मानवी जीवन आणि जग यांविषयी ज्यांचे ठायीं उदात्त भावना वागत असते, असे सत्यनिष्ठ लोक जें मत देतात तेंच खरें प्रजामत म्हणावयाचें......आणि तें ज्या पद्धतींत समजून घेण्यांत येतें ती पद्धति म्हणजे खरी लोकशाही–डेमॉक्रसी. लोकशाहीविषयी गांधीजींची कल्पना अशी आहे की, लोकशाहींत बलवानांतल्या बलवानाला आणि श्रीमंतांतल्या श्रीमंताला आत्मोन्नतीसाठी जितकी संधि मिळते तितकीच दुबळयांतल्या दुबळ्याला आणि गरिबांतल्या गरिबालादेखील मिळावयास पाहिजे. जर एखादी लोकशाही दुबळयांचें व गरिबांचें संरक्षण करूं शकत नसेल, जर ती हिंसेने टिकवून धरावी लागत असेल, तर ती लोकशाही खरी लोकशाही नव्हेच. ’’

## गांधीजींचा स्वराज्यविषयक आदर्श–रामराज्याची कल्पना

रामराज्य हा गांधीजींचा स्वराज्याचा आदर्श होता. रामराज्यांत धर्म, न्याय आणि प्रेम यांचें राज्य असतें. त्यांत अहिंसा व प्रजेचें स्वराज्य हीं असतात. ज्या स्वराज्यांत

प्रत्येक व्यक्ति स्वतः स्वराज्याचा उपभोग घेते, त्यास प्रजेचें स्वराज्य म्हणावयाचें. रामराज्यांत, एकीकडे गगनचुंबी इमारतींत विलासोपभोग घेणारे श्रीमंत आणि दुसरीकडे पदपथावर उपासमारीच्या यातनांनी विव्हळणारे गरीब, असा भेदभाव उत्पन्न होण्याचा प्रसंग येत नाही. रामराज्यांत कोणीहि माणूस उपासमारीने मरत नाही. राज्याचे कायदे बंदुकीच्या बळावर चालत नाहीत. लोकांच्या प्रेमावर व त्यांनी निर्भयपणें दिलेल्या समंजस सहकार्यावर रामराज्य उभारलेलें असतें. रामराज्यांत सत्तेचा उपयोग अत्यल्प प्रमाणांत करण्यांत येतो. म्हणजेच अशा स्वरूपाच्या राज्यांत कमींत कमी कायदेकानू असतात. ज्या परिस्थितींत, कायदेकानू पास करून, शिक्षेचें आणि बंदिवान्याचें भय दाखवून कायद्यांचे पालन इतरांकडून करविणें भाग पडतें, अशी परिस्थिति रामराज्यांत उद्भवत नाही. रामराज्यांत लोक आपापल्या संघटनांचे द्वारा कायद्यांचें पालन करतात आणि स्वतःचा कारभार स्वतःच पाहतात, त्यामुळे रामराज्यांत बहुमतवाले अल्पसंख्यांकांवर कोणतेंहि दडपण आणूं शकत नाहीत. रामराज्यांत अधिकारी जोपर्यंत प्रजेचे सेवक म्हणून वावरतात, तोपर्यंत ते अधिकारावर राहतात. शेती हा रामराज्यांतील सर्वोत्तम व्यवसाय समजला जातो, आणि रामराज्यांतील प्रजा अन्नवस्त्रांचे बाबतींत स्वावलंबी असते. सगळया धर्मांचे, वर्णांचे, वर्गांचे लोक रामराज्यांत शांततेने व स्नेहभावाने एकत्र नांदतात. रामराज्यांत स्त्री–पुरुषांचा दर्जा समान असतो. आणि लष्करी खर्च जवळ जवळ नसतोच, किंवा असलाच तर अगदी कमी असतो.

## स्वराज्याचीं चार लक्षणें.

गांधीजींनी संपूर्ण स्वराज्याचीं ऊर्फ स्वातंत्र्याचीं चार लक्षणें मानलेलीं आहेत.

**१ अर्थसिद्धि**—राज्यांत उपासमार कोठेंच असतां कामा नये. सगळयांच्या जीवनाच्या अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा पुऱ्या व्हावयास हव्यात. **२ राज्यशासनाचे बाबतींतील स्वातंत्र्य :** राज्यशासन पद्धति भारतीय असावी, पाश्चात्य धर्तीची असूं नये. राजकीय स्वातंत्र्य हिंदुस्थानास अनुरूप असावें, ही गांधीजींची एतद्विषयक कल्पना. गांधीजींच्या मतानुसार स्वराज्यांत हिंदुस्थानचे कोट्यवधि लोक जें मागतील तें पुरें करणारें राज्यशासन असेल. ह्या राजकीय स्वातंत्र्यांत एका माणसाचें राज्य असणार नाही, तर सर्वांचें राज्य असेल. **३ नैतिक ऊर्फ सामाजिक स्वातंत्र्य :** गांधीजींनी नैतिक आणि सामाजिक यांचा समन्वय साधला आहे. आणि त्यांत सत्य आणि अहिंसेच्या सिद्धान्तांचा समावेश केला आहे. ४. **धर्म :** कारण धर्माशिवाय वरील तीन लक्षणें अस्तित्वांत येऊंच शकणार नाहीत. गांधीजी म्हणतात की, " या चार काटकोनांनी बनलेलें जें राज्य त्याला स्वराज्य म्हणावें. मी त्यास रामराज्य म्हणतों. "

## गांधीजी आणि सत्याग्रह

अन्याय आणि तत्सदृश अनिष्ट प्रवृत्तींविरुद्ध लढण्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाचें अमोघ शस्त्र शोधून काढलें. या शस्त्राचा राजकारणांत उपयोग करून गांधीजींनी राजकीय

डावपेंच आणि क्रांतितंत्र यांत अद्‌भुत परिवर्तन घडवून आणलें. इतकेंच नव्हे, तर सत्याग्रहाचे द्वारें भारतास स्वातंत्र्य मिळवून देऊन, त्या शस्त्राचें सामर्थ्य सिद्ध केलें व जगाच्या इतिहासांत एक अपूर्व सिद्धि मिळविली. सत्य आणि अहिंसा यांच्या मूलभूत सिद्धान्तांमधूनच सत्याग्रहाचा उद्‌भव झाला. "सत्याग्रहामागील मूळ तत्त्व असें आहे कीं, प्राणिमात्राचे ठिकाणीं आत्मा असतो. आणि जर या आत्म्यास योग्य प्रकारें आवाहन केलें, तर दुसरा आत्मा त्यास प्रतिसाद दिल्याशिवाय राहत नाही. एका विशुद्ध हृदयाची हांक दुसऱ्या मानवी अंतःकरणास स्पर्श केल्याविना राहूं शकणार नाही." थोडक्यांत, प्रेम आणि आत्मदमन यांच्या द्वारें सत्याग्रही व्यक्ति विरोधकाचें हृदयपरिवर्तन घडवून आणते. आणि त्यामुळे अन्याय व अनिष्ट प्रवृत्ति यांचें निवारण होतें. गांधीजींनी सत्याग्रहाच्या शस्त्राचा दक्षिण आफ्रिकेंत यशस्वी प्रयोग करून भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी त्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला. खेरीज सत्याग्रहाच्या शस्त्राचा विकास करून त्यांत कांही नवीन पद्धतींचा त्यांनी समावेश केला. त्यांनी असें स्पष्टपणें सांगितलें आहे की, "सत्याग्रह हें दुबळ्यांचे शस्त्र नाही. तें बलवानांचें व शूरांचें शस्त्र आहे. विरोधकास त्रास देण्याऐवजी स्वतः दुःख सहन करावयाचें, हा सत्याग्रहीचा धर्म होय."

सत्याग्रहाच्या अंमलाचे बाबतींत असहकार आवश्यक आहे. गांधीजी म्हणत कीं, जर सगळे प्रजाजन अन्यायी व जुलमी राज्यकर्त्यांशीं संपूर्ण असहकार पुकारतील आणि निर्भयपणें वागतील तर अनिर्बंध सत्ता त्वरित संपुष्टांत येईल. प्रजेच्या ऐच्छिक किंवा सक्तीच्या संमतीशिवाय अन्याय किंवा जुल्मजबरदस्ती संभवत नाही. असहकारासाठी हरताळ, सामाजिक बहिष्कार, निदर्शनें, सविनय कायदेभंग, उपवास, इत्यादि मार्ग त्यांनी सुचविले. परंतु, या सर्वांचा उपयोग अतिशय काळजीपूर्वक, सत्य व अहिंसा हीं लक्षांत ठेवून, करावयास हवा. हरताळ ऐच्छिक असावा व तो समजूतदारपणें पाडावा. कोणावर सक्ती करूं नये. आणि एखादे वेळेसच हरताळ पाडावा. सामाजिक बहिष्कारांत व्यक्तीचा अपमान होतां कामा नये, तसेंच शिवीगाळहि होतां कामा नये. वागणें विनयपूर्ण असावें. निदर्शनें आगेखोरपणें करूं नयेत; तीं शांततापूर्ण असावींत. कायदेभंगापूर्वी खूप विचार करावा. एखाद्या योग्य पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली कायदेभंग करावा. कोणत्या कायद्यांचा भंग करावयाचा तें देखील अगोदर विचारपूर्वक ठरवावयास हवें. प्रारंभीं, कांही निवडक सत्याग्रहींनी कायद्याचा सविनय भंग करावा. जर एखाद्या राज्यांत स्वाभिमानानें राहतां येत नसेल आणि खराखुरा सत्याग्रही म्हणून असहकाराच्या शस्त्रानें अन्यायाशीं लढा देणें अशक्य असेल तर त्या राज्यांतील वतनें सोडावींत, असाहि सल्ला गांधीजी देत. असा सल्ला त्यांनी लिंबडी व जुनागढ येथील सत्याग्रहींना दिला होता.

उपवासाचा उपयोग आत्मशुद्धीसाठी खूप विचारांतीं योग्य व्यक्तीनेच करावा; त्याचा वारंवार उपयोग करूं नये, अशा गांधीजींच्या एतद्विषयक कल्पना होत्या.

गांधीजींचा सत्याग्रहाच्या शस्त्रावर दृढ विश्वास होता व तें शस्त्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतहि वापरतां येईल, असें ते मानीत असत. हिंसेमुळे शत्रुत्व वाढतें, तें नाहीसें होत नाही. फक्त अहिंसक मार्गानेच एखादा प्रश्न कायमचा सुटतो. परकीय आक्रमणासहि सत्याग्रहाच्या द्वारें तोंड देतां येईल, असा गांधीजींना विश्वास वाटत असे. परकीय आक्रमणाची शक्यता अहिंसक राज्याचे बाबतींत असत नाही असें गांधीजी मानीत असत.

गांधीजींना खात्री होती की, शत्रूसहि हृदय असतें. आणि त्याचें हृदय–परिवर्तन होऊं शकतें. आपण शत्रूशीं मित्रत्वाचें नातें ठेवावें, मैत्रीची भावना मनीं बाळगावी तसेंच त्यास जरूर लागल्यास साहाय्यहि करावें. फोडाझोडा वृत्तीसहि त्यांचा विरोध असे. गांधीजींच्या या कल्पना कार्यवाहींत आणावयास संधि मिळालेली नव्हती. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं त्यांच्या अनुयायांनी ( कॉंग्रेसच्या नेत्यांनी ) जपानी आक्रमण वरील पद्धतीने थोपवून धरण्यास आपण असमर्थ असल्याचें प्रकट केलें होतें.

## ट्रस्टीशिपचा ( विश्वस्ततेचा ) सिद्धान्त

समाजवादी व साम्यवादी खाजगी मिळकतीस अनिष्ट व पिळवणुकीचें साधन समजतात. खाजगी मालकीच्या हक्कामुळे वर्ग–विग्रह सतत चालू राहतो. यासाठी खाजगी मिळकतीच्या राष्ट्रीयीकरणाची शिफारस करण्यांत येते. गांधीजींचाहि आर्थिक विषमतेस विरोध होता. आर्थिक समता स्थापन व्हावी अशी गांधीजींची इच्छा असे. ते साम्यवाद्यांच्या एक पाऊल पुढे जाऊन असें मानीत असत की, कोणत्याहि प्रकारचा परिग्रह असूं नये. परंतु, अहिंसेच्या मार्गाने परिग्रहाचा संपूर्ण त्याग अशक्य कोटींतला वाटतो. वर्गविग्रहाचा मार्गहि स्वीकारणें अशक्य. त्यामुळे त्यांनी खाजगी मिळकतीपासून घडणारे अन्याय दूर करण्यासाठी सत्य आणि अहिंसा यांच्या सिद्धान्तांना अनुरूप उपाय सुचविला. तो उपाय म्हणजे ट्रस्टीशिपचा सिद्धान्त. जर भांडवलदार आणि जमीनदार हा सिद्धान्त स्वीकारतील तर खाजगी मिळकतीमुळे निर्माण होणाऱ्या अनिष्ट प्रवृत्ति अहिंसक मार्गांनी दूर होतील, वर्ग–विग्रहाऐवजी वर्ग–संगम साधतां येईल आणि समाजांत शांततामय वातावरण निर्माण होईल.

या सिद्धान्तानुसार कोणताहि पुंजीपति किंवा जमीनदार स्वतःच्या मिळकतीचा मालक या नात्याने वागूं शकत नाही, तर त्याने मिळकतीचा विश्वस्त म्हणून वागावयास हवें. त्याने स्वतःच्या मालकीचा उपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी किंवा फायद्यासाठी करतां कामा नये, तर समाजहितासाठी करावयास हवा. त्याने, सुखी जीवन जगतां यावें यासाठी आवश्यक तितकाच, स्वतःच्या मिळकतीचा उपभोग घ्यावयास हवा. अधिक मिळकत

त्याच्याच ताब्यांत असते; तथापि, तिचा तो केवळ ट्रस्टी असतो व त्याच्या विश्वस्ततेस समाजाची अनुमति हवी असते. प्रत्येकाने आपापलीं कर्तव्यें प्रामाणिकपणें पार पाडावयास हवींत. स्वतःच्या उपभोगासाठीं जेवढा रास्त असेल तितकाच पगार प्रत्येकास मिळूं शकेल. खर्च वजा जातां कांहीं शिल्लक उरल्यास त्या शिल्लकीवर व्यक्तीची मालकी असूं शकत नाही. प्रत्येक मनुष्यास जरूरीपुरताच पगार मिळतो. मिळकतीवर कुणाचीच मालकी नसते. तिच्यावर फक्त ईश्वराचीच मालकी असते.

ट्रस्टीशिपचा सिद्धान्त, पुंजीपति अथवा जमीनदार यांचा नाश करण्याच्या ऐवजीं त्यांना सुधारण्याची संधि देतो. त्यांच्या माणुसकीवर सदरहू सिद्धान्ताचा विश्वास आहे. या सिद्धान्तानुसार सरकार सामाजिक हितासाठी खाजगी मिळकतीवर नियंत्रण घालूं शकतें आणि त्यासंबंधी कायदे करूं शकतें. ज्याप्रमाणे न्यूनतम पगारमान निश्चित करण्यांत येतें, त्याप्रमाणे महत्तम प्राप्तीदेखील ठरविण्यांत यावयास हवी. आणि वस्तूंचें उत्पादन नफ्याच्या दृष्टीने न करतां सामाजिक गरजा लक्षांत घेऊन व समाज-हित डोळयां-समोर ठेवून व्हावयास हवें. जर उद्योगपतींनी उद्योगधंद्यांचें संचालन ट्रस्टीशिपच्या भावनेने केलें नाही तर त्या व्यवसायांचें राष्ट्रीयीकरण करावें अशी शिफारस गांधीजींनी केली होती.

कांही टीकाकारांच्या मताप्रमाणे हा सिद्धान्त म्हणजे सध्याचे प्रस्थापित हितसंबंध टिकवून धरण्याची केवळ एक युक्ति होय. ज्या माणसांच्या हातीं सांप्रत मिळकत, सत्तास्थानें, अधिकार वगैरेंचा कबजा आलेला आहे परंतु, त्या गोष्टी प्राप्त करण्यासाठी दुसरे लोक धडपड करीत आहेत, त्यांच्या हातीं त्या गोष्टी पडूं नयेत, यासाठी उभें केलेलें हें एक ढोंग आहे, ही एक निव्वळ बतावणी आहे. कांहीना तर असा वहीम आलेला आहे कीं, राजेरजवाडे, जमीनदार आणि इतर सत्ताधारी लोक यांचेविषयी अगदी वेगळी भावना बाळगणाऱ्या गांधीजींनी त्यांचें कल्याण साधण्यासाठी 'ट्रस्टीशिप' हा शब्द वापरून मोठ्या चातुर्याने त्यांच्या हातीं, त्यांना आपली स्वतःची मिळकत आणि सत्ता सुपूर्त करावी लागू नये या हेतूने, एक हत्यार देऊन ठेविलें आहे. इंग्रजदेखील भारतावर आपली सत्ता चालू राहावी यासाठी अशा बतावण्या करीत असत. गांधीजीविषयक ह्या कल्पना अयोग्य आहेत. ते अहिंसेची निष्ठेने तरफदारी करणारे होते. ते असें मानीत असत की, या सिद्धान्ता-शिवाय खाजगी मिळकतीच्या अनिष्ट परिणामांचा अहिंसक मार्गाने नाश होणारच नाहीं. रक्तरंजित क्रांति टाळण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

## विकेन्द्रीकरणाचा सिद्धान्त

अहिंसक समाजरचनेच्या स्थापनेसाठी, गांधीजींच्या दृष्टीने, राजकीय आणि आर्थिक सत्तेचें विकेन्द्रीकरण आवश्यक आहे. विकेन्द्रीकरणाचा सिद्धान्तहि गांधीजीप्रणीत महत्त्वाच्या

सिद्धान्तांपैकी एक होय. श्री. किशोरलाल मश्रूवाला सदरहू सिद्धान्त खालीलप्रमाणें समजावून सांगतात—

आधुनिक अर्थव्यवस्थेंत निष्कारण नाश व खर्च पुष्कळ होतो. जर हा अकारण होणारा नाश व खर्च कमी करावयाचा असेल तर आपल्या अनेक आधुनिक गरजेच्या वस्तूंची पैदास विकेन्द्रीकरणानें करावयास हवी. विकेन्द्रित उत्पादन-पद्धतींत वस्तू बनविणारा व ती वापरणारा हे एकमेकांना ओळखणारे असतात, आणि एकमेकांच्या राहणीमानाशीं ते परिचित असतात. राजकीय सत्तेचें विकेन्द्रीकरण करावयास पाहिजे. प्रत्येक घटकास स्वतःच्या क्षेत्रा-पुरती स्वतंत्रता असेल तर या जागृत लोकशाहींत व्यवहारी योजना आखून त्या कार्य-वाहींत आणणें सरळ-सुलभ होईल......अशा प्रकारें, साधें जीवन आणि साधी राजकीय व सामाजिक व्यवस्था अहिंसक समाजरचनेसाठी आपोआप अधिकाधिक अनुकूल परिस्थिति निर्माण करील. साध्या जीवन—व्यवस्थेंत व विकेंद्रित समाजरचनेंत हिंसा अल्प प्रमाणांत होईल. तसेंच आर्थिक विषमता व कलह यांचें निवारण करणें सोपें होईल.

यंत्रांच्या द्वारें कारखान्यांत होणाऱ्या मोठ्या शस्त्रांच्या उत्पादनाच्या तसेंच औद्यो-गीकरणाच्या गांधीजी विरुद्ध होते. कारण शस्त्रोत्पादन व औद्योगीकरण यांच्याशीं हिंसा आणि पिळवणूक हीं अनिवार्यपणें निगडित असतात. त्यांच्यामुळे व्यक्तीचें नैतिक स्वातंत्र्य आणि मूलभूत स्वातंत्र्य यांची हानि होते आणि लोकशाही धोक्यांत येते. अहिंसा आणि केन्द्रित उद्योगधंदे हे परस्परविरोधी होत. किशोरलाल मश्रूवाला लिहितात, "अतिकेन्द्रित यांत्रिक आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या व्यवस्थेंत हिंसा केल्याशिवाय सुटकाच नाही. कारण या व्यवस्थेसाठी अतिशय खर्चीक राजकीय आणि शासनाचें तंत्र आणि देशाच्या प्राप्तीचा भलाथोरला भाग गिळून टाकणारी युद्धसामग्री हीं अपरिहार्य बनतात. खेरीज, या जीवन—व्यवस्थेंत......माणसाचें स्वतःचेंच यांत्रिकीकरण होतें, त्याचेवर नियंत्रणें—निर्बंध लादले जातात आणि प्रत्येक नव्या अडचणीच्या किंवा संकटाच्या वेळीं त्याच्या स्वायत्ततेवर व स्वातंत्र्यावर नवीन नियंत्रणें येऊन पडतात." यासाठी गांधीजींनी आपल्या कार्यक्रमांत खादी, ग्रामोद्योग आणि ग्रामीण—स्वराज्य यांना अधिक महत्त्वाचें स्थान दिलें.

असें असलें तरी गांधीजी यंत्रांच्या पूर्णपणें विरुद्ध नव्हते. यंत्र म्हणून यंत्रास गांधी-जींचा कोणताहि विरोध नव्हता. यंत्रांच्या परिणामांस त्यांचा विरोध होता......अशा प्रकारें त्यांनी यंत्राची निश्चित मर्यादा आंखलेली होती.

## वर्णव्यवस्थेचा सिद्धान्त

ट्रस्टीशिपचा सिद्धान्त, विकेन्द्रीकरणाचा सिद्धान्त, आणि वर्णव्यवस्थेचा सिद्धान्त हे गांधीजींच्या विचारसरणींतील तीन महत्त्वाचे सिद्धान्त होत. आणि जर या सिद्धान्तांना

प्रत्यक्षांत उतरविण्यांत आलें तर अहिंसक समाजरचनेची स्थापना करणें शक्य होईल. गांधीजींनी हिंदुस्थानच्या प्राचीन वर्णाश्रम-व्यवस्थेचा नवीन अर्थ बसविला. या सिद्धान्तानुसार समाजांत प्रत्येक धंदा, व्यवसाय किंवा उद्योग यांची प्रतिष्ठा व त्यापासून होणारी प्राप्ति सारखी असावयास हवी. प्रत्येक धंदा नीतीच्या मूलभूत सिद्धान्तानुसार केला गेला पाहिजे. आणि तो देखील केवळ उदरनिर्वाहासाठी एक म्हणून कर्तव्य किंवा एक धर्म म्हणून करावयास हवा. वर्णाश्रम म्हणजे प्रत्येक मनुष्याने स्वतःच्या पिढीजाद चरितार्थ-साधनाने संतुष्ट राहण्याचा धर्म. या योजनेच्या मुळाशीं अहिंसा आहे, ईश्वरी नियंत्रणाचें ज्ञान आहे, शुद्ध अर्थशास्त्र आहे, माणुसकी आहे. वर्णव्यवस्थेचा गांधीजींनी केलेला हा अर्थ स्वीकारण्यांत आल्यास वर्णावर्णांतील उच्चनीच भेदभाव शिल्लक राहणार नाहीत...सगळयांचे धंदे प्रतिष्ठेच्या दृष्टीने सारखे गणले जातील.

हा व ट्रस्टीशिपचा सिद्धान्त या दोन सिद्धान्तांमुळे समाजांत वर्गसंगम आणि सामाजिक शांतता निर्माण होतील. वर्गावर्गांत मेळ साधण्याचा गांधीजींचा हा अहिंसक मार्ग आहे. रक्तरंजित क्रांतीचा मार्ग त्यांना पसंत नाही.

गांधीजींच्या दृष्टीने वर्ण ही एक सांप्रदायिक समजूत किंवा कर्मकांडाची विचारधारा नव्हे. विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे वर्णव्यवस्थेच्या जुन्या कल्पनेंत नवा अर्थ समाविष्ट करून गांधीजींनी तिचा स्वीकार केला आहे. हा त्यांचा एक अहिंसेचा प्रयोग आहे. ( १ ) मजुरीचा सारखेपणा ( २ ) स्पर्धेचा अभाव आणि ( ३ ) आनुवंशिक संस्कारांचा फायदा घेणारी शिक्षण-योजना, हें वर्णव्यवस्थेचें सार होय. अहिंसक समाजरचनेंत एवढ्याच गोष्टींचा समावेश होतो.

## उपसंहार

सत्य व अहिंसा हीं भारतीय संस्कृतीचीं मूलभूत तत्त्वें आहेत. त्यांत डुंबून जाऊन जीवनाच्या समस्या कशा सोडवाव्यात तें गांधीजींनी दाखविलें. त्यांचे महत्त्वाच्या प्रश्नांविषयींचे विचार आपण पाहिले. त्यांचे कांही विचार एखाद्यास आधुनिक युगांत अव्यवहार्य वाटण्याचीहि संभाव्यता आहे.

जगाला गांधीप्रणीत जीवन-पद्धति आणि अणुबॉंब, हायड्रोजन बॉंब या दोहोंपैकी एकाची पसंति करावयाची आहे. आणि अशी संभवनीयता आहे की, गांधीजींनी दर्शविलेल्या मार्गानेच जगाचें कल्याण होईल. राजकारणांतहि सत्य, नीति, धर्म समाविष्ट करण्यासाठी गांधीजींनी जो प्रयत्न केला, तो प्रयत्न म्हणजे गांधीजींचें मोठें वैचारिक उड्डाण होय. त्यांच्या दृष्टीने साधन आणि साध्य यांत तफावत असूच शकत

नाही. उत्तम सिद्धि मिळविण्यासाठी उत्तम साधनें वापरणेंच जरूरीचें आहे. उभयतांतील संबंध बीज व वृक्ष यांच्यांतील संबंधासारखा आहे. उत्तम बीजांतूनच उत्तम वृक्ष अंकुरतो, फुलतो व फळतो. "

## अभ्यासाचीं साधनें


1. Society – Maciver-
2. Society – Park
3. Freedom & Control in Modern Society – Berger.
4. Power & Society – Lasswell.
5. Man, Culture & Society – Shapiro.
6. Power – A New Social Analysis – Russell.
7. Government in Modern Society – Field.
८. व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास–म. प. मंगुडकर.
9. Democracy & Dictatorship – Barbu,
10. Procedure & Democracy – Calamandrel.
11. The Dynamics of Democratic Govt.– Roche.
12. Voting in Democracies – Lakeman.
13. Democratic Government in India – Srinivasan.
१४. नवें दर्शन–लोकशाही–बर्नार्ड बारुच.
१५. लोकशाही–आचार्य शं. द. जावडेकर.
१६. गांधीजींची लोकशाही–निलनकुमार तडवी.
17. Studies in the Development of Capitalism – Dobb.
१८. पुंजीवाद, समाजवाद कीं ग्रामवाद?–धर्माधिकारी.
१९. वर्गविरहित भांडवलवाद–फ्रेडरिक मार्टिन स्टर्न.
२०. मालकीची मीमांसा–वा. ज. कुंटे.
21. Socialist Thought – The Forerunners-Cole.


---

**आभारपूर्वक नोंद :** 'गांधीवाद' या लेखासाठी महात्मा गांधीजींचे 'हरिजनबंधु' मधील कित्येक लेख, श्री. किशोरलाल मश्रूवालाकृत 'समूळी क्रांति' (मूलभूत क्रांति) आणि प्रा. ई. र. दवेकृत 'गांधीदर्शन' यांचा आधार घेण्यांत आलेला आहे—**लेखक**

२२. समाजवादाचा ओनामा—पां. वा. गाडगीळ.
२३. शास्त्रीय समाजवाद—शं. द. जावडेकर.
२४. समाजवाद आणि सर्वोदय—शं. द. जावडेकर
२५. समाजवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्यवाद—अशोक मेहता.
२६. समाजवादी समाजरचना—स. मा. गर्गे.
27. Communism — Edwards.
28. What is Communism ? — Kirk.
२९. मार्क्सचें कॅपिटल—पां. वा. गाडगीळ.
३०. कम्युनिस्ट जाहीरनामा—मार्क्स व एंगल्स.
३१. गांधीवाद—शं. द. जावडेकर.
३२. गांधी आणि गांधीवाद—अनु. गं. भा. निरंतर.
३३. गांधीचा अहिंसावाद—त्र्यं. र. देवगिरीकर.
३४. गांधीप्रणीत अर्थयोजना—श्रीमन्नारायण आगरवाल.
३५. गांधीवादाचें समर्थन—डॉ. ग. य. चिटणीस.
३६. तिसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमि—पां. वा. गाडगीळ.
३७. शासननिरपेक्ष समाज—धीरेन्द्र मुजूमदार.
३८. मानवाचा आदर्श—श्रीमती एलन् रॉय—अनु. गोवर्धन परीख.

## परिशिष्ट

# जगांतील अकरा धर्म

( उत्पत्ति–कालानुक्रमानुसार )

| | धर्मांचें नांव | उत्पत्ति-काल अथवा धर्म-संस्थापकाचा जन्म | संस्थापक | परम दैवत | सध्याचें प्रचार-स्थान | धर्मग्रंथ | अनुयायांची संख्या ( आंकडे लाखांचे आहेत ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **हिंदु** | इ. स. पूर्वी ४००० वर्षें | कोणी नाहीं | ब्रह्म अथवा अनेक देवदेवता | भारत, सिलोन, बाली बेटें, सयाम, नेपाळ, द. आफ्रिका | वेद, उपनिषदें, गीता, भागवत इत्यादि | ३,००० |
| २ | **यहुदी** | इ. स. पूर्वी १२०० वर्षें | मोझेस | जेहोवाह | इस्त्राएल, युरोप, अमेरिका, व इतरत्र | जुना करार | १६० |
| ३ | **शिन्तो** | इ. स. पू. ६६० | कोणी नाही | निसर्ग-देवता | जपान | कोजिकी व निहोन्गी | १७० |
| ४ | **झरतुष्ट्र** | इ. स. पू. ६६० | झरतुष्ट्र | आहुर-मझ्द | इराण, भारत | अवेस्ता | १.२५ |
| ५ | **टाओ** | इ. स. पू. ६०४ | लाओत्झे | टाओ | चीन, कोरिया, मांचुरिया | टाओ तेह-किंग | ६०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | **जैन** | इ. स. पू. ५९९ | वर्धमान महावीर | सुरुवातीस कोणी नाही. सध्या स्थापक | भारत | अंगें, उपांगें | १६ |
| ७ | **बौद्ध** | इ. स. पूर्वी ५६० | गौतम बुद्ध | ,, | भारत, सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड, इंडोचायना, तिबेट, नेपाळ, चीन, कोरिया, जपान, मंगोलिया, रशिया | त्रिपिटक | ५,२०० |
| ८ | **कॉन्फ्युशिअस** | इ. स. पूर्वी ५५१ | कॉन्फ्युशिअंस | आकाश अथवा स्थापक | चीन, कोरिया, मांचुरिया | क्लासिक्स | ४,००० |
| ९ | **खिस्ती** | इ. स. ३० | जीझस खाइस्ट | ईश्वर ( पिता ) | जगांतील सगळ्या खंडांत | बायबल | ५,५७० |
| १० | **इस्लाम** ( मुसलमानी ) | इ. स. ५७० | महंमद | अल्लाह् | भारत, पाकिस्तान, इराण, अरबस्थान, अफगाणिस्तान, ईजिप्त, तुर्कस्थान वगैरे | कुराण | ३,००० |
| ११ | **शीख** | इ. स. १४६९ | नानक | सत् नाम | भारत | ग्रन्थसाहेब | ६२ |

V.K. Lele

3/4/82

३० जुलै, १९६०.

आणखी काही संदर्भ-ग्रंथ

1 The Religions of the World - Barton. II Edn. 1919 [illegible] University
2 An Introduction to some living religions of the East - Cave, 1921
3 The History of Religions - E.W. Hopkins, 1918
4 The History of Religions - Menzis., 1914
5 History of Religions - Moore (I part - 1920; II part - 1919)
6 Birth & Growth of Religions - Moore (1923)
7 Christ & the World Religions - Peton (1918)
8 The Religions of Mankind - Sopar (1923)
9 Great Religious Teachers of the East - Martin (1919)
10 A Christian Appreciation of Other Faiths - Reed.
11 The Religions of India - Hopkins 1918
12 Indian Wisdom - Monier Williams.
13 India & its faiths - Pratt
14 The Heart of Jainism - Mrs. Stevenson
15

